# महाराष्ट्रांत विनोबा

दुसरा

१५८६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. १५८६

REFBK-0009785

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# महाराष्ट्रांत विनोबा

भाग दुसरा

REFBK-0009785

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

डिसेंबर १९५८ ] [ मू: १ रुपया २५ नये पैसे

प्रकाशक :
**भाऊ पानसे**
ग्राम-सेवा-मंडळ, परधाम विद्यापीठ
पो. पवनार, जि. वर्धा.

आवृत्ति १ ली– प्रति ३०००

मुद्रक :
**भाऊ पानसे**
परंधाम मुद्रणालय, परधाम विद्यापीठ,
पो. पवनार, जि वर्धा.

# निवेदन

'महाराष्ट्रांत विनोबा' भाग पहिला एक महिन्यापूर्वी वाचकांच्या हातांत दिला. आज हा दुसरा भाग वाचकांच्या हातीं पडत आहे. या भागांत २९-४-५८ ते ८-६-५८ पर्यंतचीं एकूण तीस प्रवचनें दिलीं आहेत. एकूण चार भागांत हें काम पुरें होईल असा अंदाज आहे. तिसरा भाग मराठवाड्यांतील भाषणांचा होणार असून त्या पुढील उरलेलीं भाषणें चौथ्या भागांत समाविष्ट होतील, अशी साधारण योजना आहे.

तिसरा आणि चौथा भाग लवकर च वाचकांच्या हातीं देऊं शकूं अशी आशा आहे.

पवनार, प्रकाशक

ता. ३१-१२-५८

# अनुक्रमणिका


१ ग्रामोद्योगांचा ऱ्हास १
२ सगळ्या फौजा बेकार होतील ६
३ तीन स्मरणें ११
४ किरकोळ हिंसा अधिक घातक २३
५ बालकांच्या मेळाव्यांत २८
६ मुलें गुन्हेगार असत नाहींत ३१
७ भारताला जग जिंकण्याची संधि आली आहे ३४
८ सर्वोदय-पात्र आणि शांति-सेना ४०
९ पृथ्वी पादाक्रांत करण्याची उमेद मला आली आहे ४६
१० मराठी साहित्यिकांशीं हितगुज ५०
११ राजनीतींतून लोकनीतीकडे ६५
१२ परोक्ष लोकशाहीऐवजीं प्रत्यक्ष लोकशाही ७१
१३ आतां कुंपणें नकोत ७८
१४ नव विचारानें भारलेला वर्ग निर्माण व्हावा ८६
१५ भगवद्गीता हा जीवनाचा ग्रंथ आहे ९३
१६ ज्ञानदेवादि संतांची शिकवण फुकट गेली नाहीं. ९९
१७ विज्ञानाला आत्म-ज्ञानाचा अंकुश पाहिजे १०२
१८ मालकी गेली म्हणजे प्रेमाचें राज्य होईल १०६
१९ मातृमुखेन शिक्षणम् १०९
२० " एकमेकांस रक्षूनि पावा कल्याण सर्व हि " ११४
२१ जमीन गरजेला पुरेशी आहे लोभाला पुरेशी नाहीं ११७
२२ भारताच्या समस्या सर्वोदया-शिवाय सुटणार नाहींत १२०
२३ हिंदी च राष्ट्रभाषा होण्याला योग्य १२७
२४ भेटीचें आमंत्रण १३३
२५ महाराष्ट्राची पदयात्रा सुफलित झाली १४८
२६ विठ्ठलाच्या भेटीनंतर १५८
२७ साहित्य-शक्ति १६५
२८ सेवा हा सर्वोत्तम धर्म आहे १७५
२९ " अवघे ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव " १७८
३० धर्मचक्र प्रवर्तनाच्या भावनेनें कामाला लागा १८२

अनुक्रम ३५७२८ ... वि:
क्रमांक ... नों: दि:

# महाराष्ट्रांत विनोबा

## भाग दुसरा

### ग्रामोद्योगांचा ऱ्हास

आज सकाळीं आसपासच्या गांवचे कांहीं लोक इथें आले होते. त्यांनीं त्यांचीं कांहीं गाऱ्हाणीं मांडलीं, त्यांत त्यांना जमीन पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानांत ३७ कोटि लोक आहेत. आणि जमीन जेमतेम माणशीं एक एकर आहे. कांहीं भागांत ती याहून हि कमी आहे. रत्नागिरींत माणशीं याच्या निम्मी जमीन आहे. आणि केरळमध्यें तर ती त्याहून हि कमी आहे. अशी देशाची स्थिति आहे. आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं खेडेगांवचे सर्व धंदे व्यवस्थितपणें मोडले गेले आहेत. हें कार्य इंग्रजांनीं तर केलेंच पण त्यांच्यामागें स्वराज्यानंतर हि गेलीं दहा वर्षें तें कार्य चालू आहे. अनेक प्रांतांत साखरेचे कारखाने निघाले. त्यामुळें गुळाचा धंदा बंद झाला. तांदूळ सडण्याच्या गिरण्या निघाल्या. त्यामुळें घरीं तांदूळ सडणें बंद झालें. अशा प्रकारें खेडेगांवचे धंदे बुडत आहेत आणि बुडविले जात आहेत. आसाममधील अनेक संस्थानें भारतामध्यें विलीन झालीं ही फार चांगली गोष्ट झाली. लोकांना ती आकर्षक गोष्ट वाटते आणि तशी ती आहे हि. परंतु नंतर हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांना तेथील पेठा खुल्या झाल्या. तेथील जनतेला बाजारांत जें प्रोटेक्शन होतें तें नाहींसें झालें, परिणामत: ग्रामोद्योगी पदार्थांची आवक दिवसेंदिवस क्षीण झाली. त्याबद्दल अनेक तक्रारी झाल्या पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. राजस्थानमधील संस्थानें भारतामध्यें विलीन झालीं, ही हि एक चांगली घटना झाली. राजेमहाराजांचें राज्य जाऊन लोकशाही झाली. ही उत्साहाची घटना आहे. परंतु नंतर बाजारपेठा खुल्या झाल्यामुळें मारवाडांत तेव्हां भरपूर आणि चांगलें तूप मिळत होतें तें नाहींसें होऊन तिथें डालडा आला. पूर्वीं तेथील बाजारपेठांना रक्षण होतें. त्यामुळें उत्तम तूप मिळत असे. आतां डालडा मिळतो. अशा गोष्टी आपण पाहत आहोंत.

## ग्रामोद्योगाची चळवळ नव्हे वळवळ

ही प्रक्रिया फार वेगानें चालू आहे. ती थांबण्यासाठीं खादी ग्रामोद्योग वगैरे उपाय सरकारनें काढले आहेत. पण या हालचाली म्हणजे '**अंगुष्ठोदकमात्रेण शफरी फरफरायते**' अशांतला प्रकार आहे. कारण केन्द्रित उद्योगधंदे आणि कारखाने यांच्या वाढीसाठीं अब्जावधि रुपयांचा पूर वाहतो आहे आणि त्याच्या उलट कांहीं कोटि रुपयांचा खादी-ग्रामोद्योगांवर खर्च होत आहे. म्हणून मी त्याला खादी-ग्रामोद्योगाची चळवळ न म्हणतां वळवळ म्हणतों. अशा वळवळींनीं काय व्हायचें आहे ? त्यासाठीं तर गांवांतल्या लोकांनीं च कंबर कसायला हवी आणि म्हणायला हवें कीं आम्ही दिल्ली-वाल्यांवर अवलंबून नाहीं, आमच्या योजना आम्हीं करूं. आम्ही आमच्या डोक्यानें विचार करणार आणि आपल्या गांवांत ग्रामस्वराज्य स्थापन करणार. नाहीं तर मामलेदार आला, एखादा मंत्री आला त्यांची जरा खुशामत करायची आणि काय मिळतील ते चार दोन तुकडे पदरांत पाडून घ्यायचे. अशानें कांहीं व्हायचें नाहीं.

## नवीन खूळ : विजेचे माग

विजेवर चालणारे माग सुरू करायचे, हें एक नवीन च खूळ दोन वर्षां-पासून या लोकांनीं काढलें आहे. त्यासाठीं किती घरांत हातमाग चालतात याची गणती करायची, प्रत्येकानें विजेचा हातमाग घेतला कीं नाहीं याचें सेन्सस करायचें आणि जो या योजनेंत सामील होणार नाहीं तो गुन्हेगार समजायचा, असा कायदा होणार होता. याचा सरळ अर्थ असा होतो कीं ज्या विणकरांची कला आज वर्षानुवर्षें सरकारच्या एका कवडीच्या खर्चाविना जोपासली गेली, ती पैसे खर्च करून सरकार बंद करणार ! कारण वीज सुरू झाली कीं हातांची कला संपली च. अनादि काळापासून विकसित होत असलेली कला यामुळें बंद होणार होती आणि त्यामुळें अनेक लोकांच्या पोटावर पाय आला असता. दहा हजार वर्षांच्यापूर्वी वेदांमधें सुद्धां या कलेचा उल्लेख आहे. "**वस्त्रान पुत्राय मातरः वयन्ति**" आया मुलांसाठीं वस्त्रें विणीत आहेत. असा हा धंदा गिरण्या मारूं शकल्या नाहींत, परंतु विजेच्या मागामध्यें मात्र ती

शक्ति आहे. कारण एक विजेचा माग आला कीं तो चार साध्या मागांचें काम करणार आणि एक विजेचा माग चालू झाला कीं इतर तीन हातमाग बंद पडणार.

तामिळनाडमध्यें विणकरांची संख्या पुष्कळ आहे त्यामुळें त्यांनीं याविरुद्ध जोरदार चळवळ केली. मीं हि तेथील अनेक व्याख्यानांमधून हें सांगितलें. तेथील विणकर माझ्याकडे आले आणि म्हणाले या बाबतींत तुम्ही आमचें मार्ग-दर्शन करा. मी त्यांना म्हणालों, " मी मार्गदर्शन करायला तयार आहें, पण एका अटीवर. तुम्ही तुमचा जो ' विणकर संघ ' आहे तो ' विणकर शेतकरी संघ ' बनवला पाहिजे. कारण विणकर आणि शेतकरी यांचें काम परस्परांना पूरक आहे. शेतकरी पिकवील आणि विणकर त्याचें कापड विणून देईल. तर त्यांतून जी स्वराज्य-शक्ति निर्माण होईल तिनें गांवें हि तरतील आणि विणकर हि तरतील." तसा त्यांनीं नंतर प्रस्ताव केला. पुढें त्याचा परिणाम मद्रास सरकारवर झाला. त्याच वेळीं इलेक्शन आलें. मद्रास सरकारनें हिंदुस्थान सरकारला सांगितलें कीं हा तुमचा कायदा आमच्या राज्यांत लागू करूं नये. त्यामुळें विणकरांवरचें तें संकट टळलें.

एका बाजूनें असे खेड्यांचे उद्योग मारणें आणि दुसऱ्या बाजूनें खादी-ग्रामोद्योगाची चळवळ करणें, यांत सरकारला कांहीं च विरोध दिसत नाहीं. अंबर चरखा काढला तरी हि मजूरी मिळते आणि मिला काढल्या तरी हि मजूरीच मिळते, दोन्ही कापड काढण्याचे उद्योग असें ते समजतात. पण त्यांत ग्रामराज्याची दृष्टि नाहीं हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं त्यामुळें गिरण्या हि चालल्या आहेत, आणि अंबर चरखे हि चालले आहेत, हें चूक आहे.

## ग्रामोद्योगाचें मुख्य सूत्र

दिवसेंदिवस हें लक्षांत येत जाईल कीं ग्रामोद्योगावांचून ग्रामोत्थान शक्य नाहीं. मी दिल्लींत अकरा दिवस होतों. प्लॅनिंग कमिशनपुढें मीं ही गोष्ट मांडली कीं ' खेड्यांत जो कच्चा माल तयार होतो, त्याचा पक्का माल तिथें च तयार झाला पाहिजे तर च त्याचा टिकाव लागेल. कच्चा माल

खेड्यांत तयार व्हावयाचा आणि त्याचा पक्का माल शहरांत बनायचा ही योजना खेड्यांना तारक नाहीं, मारक आहे. कापूस गांवांत तयार होतो तर कापड हि गांवांत च तयार झालें पाहिजे. ऊस गांवांत पिकतो तर त्याचा गूळ हि गांवांत च तयार झाला पाहिजे. मग तो वाटल्यास सुधारलेल्या अवजारांनीं करा, त्याला माझी हरकत नाहीं. असें न झाल्यास भारतांतील सर्वांना रोजगारी देणें शक्य नाहीं.' म्हणून म्हणतों कीं गावकऱ्यांनीं स्वतः च आपल्या गांवच्या योजना आंखल्या पाहिजेत. जमीन गांवाची केली पाहिजे. असें कराल तर हें सरकार तुमच्या योजनेच्या विरुद्ध जाणार नाहीं. सरकारमधें ती हिंमत नाहीं आणि तसें करायला सरकार मूर्ख हि नाहीं. सरकारमधें सहानुभूति आहे.

आपल्या शेतकऱ्यांमध्यें जीनिअस आहे ती मामुली नाहीं. शेतकऱ्यांना महामूर्ख म्हणणें सोपें आहे. परंतु हजारों वर्षें त्यांना सायन्सची मदत नाहीं. ज्ञान देखील नाहीं मग विज्ञान कुठलें ! अशा परिस्थितींत हि ते चांगली शेती करीत आहेत. आमचा शेतकरी मेहनती आहे यांत वाद च नाहीं. डोंगरउतारावर बांध घालून शेती करतात. अशा शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे, त्यांना नवीन ज्ञानाची जोड दिली पाहिजे.

भूदानांतून ग्रामदान आल्यावर येलवाल परिषद झाली. पं. नेहरूंपासून नंबुद्रिपादपर्यंत, ज्यांचा कधीं मेळ बसत नाहीं असे नेते, तेथें दोन दिवस एकत्र बसले आणि त्यांनीं मान्य केलें कीं ग्रामदानाशिवाय गांवांचा उद्धार होणार नाहीं. भूदान, ग्रामदानावरचा आक्षेप आतां संपला आहे. ग्रामोद्योगांनीं च ग्रामस्वराज्याची उभारणी केली जावी ही कल्पनाहि मान्य केली गेली. जयप्रकाशजी वगैरे सर्व-सेवा-संघाची मंडळी समाज-विकास-योजनेच्या अधिकाऱ्यांना भेटली. त्या अधिकाऱ्यांनीं कम्युनिटी प्रॉजेक्टचा उद्देश ग्रामस्वराज्याच्या कल्पनेनुसार बदलून घेतला. गांवांतील कच्च्या मालाचा पक्का माल तिथें च बनला पाहिजे, ही दृष्टि अगोदर नव्हती. परंतु समाज-विकास-योजनेचे अधिकारी श्री. डे मला म्हणाले कीं 'ग्रामदानानें ग्रामसमाज बनतो म्हणून समाज-विकास-योजना ग्रामदानाच्या पायावर उभ्या केल्या पाहिजेत. आज ग्राम-समाज नाहीं च. नुसतीं घरें आहेत. प्रत्येक-

जण आपापलें बघतो. आम्ही गरिबांना मदत देऊं इच्छितों, पण आमची मदत त्यांना न मिळतां ज्यांना ती स्वशक्तीनें खेंचून घेतां येते अशांच्या च कडे ती जाते. म्हणून ग्रामदान करून सहकार्यानें काम करणें आवश्यक आहे.'

गांवांत झगडे झाले तर त्यांचा न्याय गांवांत च झाला पाहिजे, त्यासाठीं कोर्टांत जाण्याची गरज नाहीं. आमच्या शिक्षणाची योजना, ग्रामोद्योगांची योजना आम्ही गांववाले च करूं असा निश्चय कराल तर च टिकाल. तुमचें नशीब तुमच्या हातांत आहे. छोटे मालक मोठ्यांच्या मालकीचे आधार आहेत. पण मालकी कधीं टिकली आहे काय ? इंग्रजांच्या राज्यावर सूर्यास्त होत नसे अशी ख्याति होती. पण आतां तो मावळूं लागला. ती मालकी जशी गेली तशी ही हि जाणार. पण आम्ही लहान लहान मालक मालकीहक्काला बिलगून बसलों आहोंत म्हणून ती जात नाहीं. तुम्हीच मोठ्या मालकांची मालकी कायद्यानें उचलून धरली आहे. तुम्ही आपल्या लंगोट्यांचा अभिमान राखून त्यांच्या पाटलोणींची सोय करून ठेवली आहे.

## ग्रामोद्योगांचा पाया ग्रामदान

ग्रामदानाच्या पायावरच ग्रामोद्योग उभारले गेले पाहिजेत. अन्यथा आम्ही गांवांत ग्रामोद्योग काढूं, अंबरचरखे चालवूं पण त्यांतून निर्माण होणारा माल आम्ही न वापरतां तो मुंबईला पाठवूं, आणि सरकारनें मदत देऊन सुद्धां तेथें तो माल विकला गेला नाहीं पडून राहिल, तर सरकार आपली मदत काढून घेईल. म्हणून आम्ही गांवांत बनविलेल्या वस्तु गां तच वापरूं असें ठरवाल तरच ग्रामोद्योग टिकतील. '**पराधीन सपनेहु सुख नाहिं**' तुलसीदासानें असें म्हटलें च आहे.

आज समजा लढाई सुरू झाली आणि आयात निर्यात बंद झाली तर पंचवार्षिक योजना पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळून पडेल, आणि खेडेगांवच्या लोकांची उपासमार होईल. मागें बंगालमध्यें दुष्काळ पडला, त्यावेळीं आपण इंग्रजांना दोष देत होतों. पण आतां कोणाला दोष देणार ? आतां तर आपलें सरकार आहे. म्हणून गांवच्या लोकांनीं स्वतःच्या पायावर

उभे राहिले पाहिजे, तरच त्यांचा बचाव आहे आणि त्यांत च हिंदुस्थानचा हि टिकाव आहे.

आंबें (कोल्हापूर) ता. २९-४-५८

## सगळ्या फौजा बेकार होतील : २ :

साऱ्या लोकांना माहीत आहे कीं भू-दान आणि ग्रामदानाचा विचार घेऊन गेलीं सात वर्षें आमची पदयात्रा देशामध्यें चालू आहे. आणि ईश्वर जोंपर्यंत पायांमध्यें बळ देणार आहे तोंपर्यंत ही यात्रा चालायची आहे. ही यात्रा चालू राहणारच आणि रहावी, अशी माझी इच्छा आहे. ग्रामदानाची आवश्यकता कशासाठीं आहे असें इथें जमलेल्या सर्व बायां वगैरेंना वाटत असेल. माझें अगदीं साधें उत्तर आहे. मी विचारतों तुम्ही आज सुखी आहांत काय ? सुखी असाल तर तुम्हांला सांगण्यासारखें माझ्याजवळ कांहीं नाहीं. सगळे सुखी असाल तर भेटीचाच आनंद आहे. पण जर तुम्हांला दुःख असेल तर तुम्ही माझें म्हणणें ऐका.

### देवाची करणी आणि माणसाची करणी

आपण सगळे काय म्हणतों ? परमेश्वर आपला मायबाप आहे. त्यानें आपणाला जन्म देऊन हें जग दाखविलें. कोणताहि बाप आपल्या मुलासाठीं काय योजना करतो ? आपल्या मुलाचें जीवन दुःखी व्हावें अशी योजना तो करील काय ? तुम्ही सगळे बाप आहांत, आया आहांत तुमचें काय उत्तर आहे ? मुलांचें जीवन सुखी व्हावें अशी तुमची इच्छा आहे कीं त्यांना तकलीफ व्हावी, त्रास व्हावा अशी तुमची इच्छा आहे ? आईबाप दुःखी असले तरी त्यांचा असा प्रयत्न असतो कीं त्या दुःखाची झळ मुलांना लागूं नये, त्यांनीं सुखी असावें. त्याचप्रमाणें आपल्या मुलांना सुख मिळावें अशीच परमेश्वराची हि इच्छा आहे. त्यानें आपल्यासाठीं सुखाची च योजना केली आहे. तो दुःखाची योजना करणें शक्यच नाहीं. बापानें मुलासाठीं

द्राक्षाचा मळा तयार केला आणि मुलानें त्या द्राक्षाची दारू काढून प्यायला आरंभ केला. आतां बाप काय रडेल! त्यांत बापाचा काय दोष आहे! त्यानें उत्तम मळा केला तेव्हां त्या मुलानें सुखीच व्हायला पाहिजे. पण मुलानें जर दुःख ओढून घेतलें तर त्याची जबाबदारी बापावर राहील काय? बापानें मुलाला उत्तम गाय दिली. मुलानें त्या गाईच्या दुधाचा उपयोग जमीन सारवण्याकडे केला आणि शेणाचा उपयोग खाण्यासाठीं केला. किंवा गाईचें दूध पिण्याऐवजीं तिलाच कापून खाऊन टाकली तर त्याला बाप काय करील? ती मुलाची करणी झाली. बापाची योजना नव्हे. असें असूनहि बाप आणि मुलामध्यें कोर्टकचेऱ्या, मारामाऱ्या होतात. असा असंतोष कां राहतो? गांवामध्यें रोगराई वगैरे कां होते? हें सगळें देवानें केलें असें म्हणायचें काय? हें आमचें आम्हींच केलें. देवानें सुखाची योजना केली पण आम्ही दुःखी झालों. देवानें स्वच्छ मोकळी हवा दिली, पण मी घराचीं दारें बंद करून चोरीच्या भयामुळें आंत जाऊन निजतों. देवानें हवा दिली ती कां नको? याचें कारण हवेपेक्षां आपण धनाला जास्त महत्त्व दिलें. देवानें पाणी निर्माण केलें; आणि माणसानें नदीमधें जाऊन पाणी घाण करायला सुरवात केली. त्यामुळें रोग झाला. गंगानदीवर सुद्धां लोक जाऊन घाण करतात. एवढी पवित्र गंगा, जिच्या. दर्शनानें, स्पर्शानें मोक्ष मिळतो अशी श्रद्धा आहे, त्या गंगेच्या घाटावर लोक शौचाला जातात. देवानें जमीन दिली, जमिनीमधें उत्तम पीक निघूं शकतें आणि ती सर्वांना उपलब्ध व्हावी अशी च त्याची इच्छा आहे, पण माणसानें काय केलें? एक म्हणतो मी पन्नास एकरांचा मालक, दुसरा म्हणतो मी दहा एकरांचा मालक. जमिनीचे मालक आम्ही झालों!

मातेच्या उदरांत जन्म घेतलेल्या प्रत्येक मुलाला लहानपणीं प्रेम मिळतें. प्रेम आणि रक्षण हें दोन्ही मुलाला लहानपणापासून मिळत असतें. तुकाराम महाराज म्हणतात **कोणें केली बाळा दुग्धाची उत्पत्ति। वाढवी श्रीपति सवे दोन्ही।** ईश्वरानें आपल्यासाठीं सुख निर्माण केलें आणि आपण ईश्वराच्या विरुद्ध वागून राहिलों. अशा तऱ्हेनें वागून कोणी सुखी होईल काय?

## शक्तीची बेरीज नाहीं, वजाबाकी होत आहे

तुम्हांला दोन हात आणि मला दोन हात आहेत. तुम्ही आणि मी दोघे एकत्र झालों तर चार हातांचा विष्णु भगवान् होईल. परंतु आपण जोडण्याऐवजीं एकमेकांचे हात तोडतों. मग दोन आणि दोन चार हात होण्याऐवजीं दोन उणे दोन बरोबर शून्य होतात. समजा माझी आठ शेर आणि तुमची दहा शेर शक्ति आहे. तुम्ही माझी आठ शेर शक्ति कापली तर काय होईल ? माझी तर शून्य होईल च, पण तुमचीसुद्धां दहा शेरांतली आठ शेर ताकत कमीच होईल. दहा अधिक आठ अठरा करण्याऐवजीं आपण दहा उणे आठ करतों. म्हणजे आपण बेरीज न करतां वजाबाकी च करतों. समाजामधें अशी एकमेकांच्या शक्तीची वजाबाकी चालली आहे. मग सुख कसें लाभणार ?

आज कांहीं ख्रिश्चन लोक मला भेटायला आले होते. त्यांची ईश्वरावर श्रद्धा आहे. तशी हिंदूंची ईश्वरावर श्रद्धा आहे, मुसलमानांची ईश्वरावर श्रद्धा आहे. परंतु परस्परांत एकमेकांचें जमत च नाहीं. हिंदूंमधें शैव आणि वैष्णव, कृष्ण-भक्त आणि राम-भक्त. तसेच ख्रिश्चन लोकांमधें प्रॉटेस्टंट आणि कॅथॉलिक, असे भेद आहेत. म्हणजे शक्ति एकवटतच नाहीं. बेरीज नाहींच, वजाबाकीच चालू आहे. हरिजन आणि ब्राह्मण, हिंदु आणि ख्रिश्चन, शहरवाले आणि गांववाले, मालक आणि मजूर, हिंदुस्थानची शक्ति आणि पाकिस्तानची शक्ति, अमेरिका आणि रशिया, यांच्या गणित-शास्त्रामध्यें वजाबाकीच वजाबाकी आहे. यांना बेरीज कोणी शिकविलीच नाहीं ! वास्तविक पापाची वजाबाकी आणि पुण्याची बेरीज व्हायला पाहिजे. एकमेकांचीं पापें एकमेकांनीं कापलीं पाहिजेत. ज्या शक्ति परमेश्वरानें आपल्याला दिल्या आहेत, त्यांचा उपयोग अशा तऱ्हेनें केला पाहिजे. देवानें आपल्याला प्रेम दिलें आहे, तें आपण वाढविलें पाहिजे. तें प्रेम आपण वाढवूं तर पूर्ण सुखी होऊं.

## ग्रामदानी गांव म्हणजे वाहतें प्रेम.

ग्रामदान म्हणजे गांवाचें एक मोठें कुटुंब करायचें असा त्याचा अर्थ नाहीं. कुटुंबामध्यें लोक भांडतात, कारण कुटुंबामध्यें हक्काची भाषा असते.

मुलाचा हक्क, बापाचा हक्क. आजवर मुलींना हक्क नव्हता, पण तोहि आतां कायद्यानें दिला आहे. प्रेमाबरोबर हक्काची भाषा कुटुंबांत असते. हें सारें कायद्यामुळें झालें, पूर्वी असें नव्हतें. पूर्वी कुटुंबामध्यें कर्तव्याची भावना होती. हक्काची भावना ज्या दिवशीं कुटुंबांत शिरली त्या दिवशीं कुटुंबें मेलीं आणि स्मशान झालें. तसें ग्रामदानांत नाहीं. मुलगा आजारी पडला तर त्याच्यासाठीं जागावें, हें आईचें कर्तव्यच आहे. शंकराचार्य महाज्ञानी होते. त्यांनीं म्हटलें आहे ' **कुपुत्रो जायते क्वचिदपि कुमाता न भवति** ' कुपुत्र निघूं शकेल पण कुमाता कधींहि निघणार नाहीं.

लोक मला विचारतात, ईश्वरावर आमचा विश्वास नाहीं तें चालेल ना ? मी त्यांना म्हणतों कीं तुझा ईश्वरावर विश्वास नसला तरी ईश्वराचा तुझ्यावर विश्वास आहे म्हणून चालून जाईल. तसें नसतें तर मग प्रश्न आला असता. आमचें जर एकमेकांवर प्रेम नसेल तर आम्हांला एकामेकांचें प्रेम मिळणार नाहीं, पण देवाचें तसें नाहीं. तुम्ही देवाला प्रेम दिलें नाहीं तरी देव तुमच्यावर प्रेमच करणार. प्रेम नेहमीं पाण्यासारखें वाहतें राहिलें पाहिजे. वाहतें पाणी सडत नाहीं, तसें वाहतें प्रेम सडत नाहीं. प्रेमाला कोंडून ठेवलें कीं त्याला काम-वासनेचें रूप येतें. त्यांतून पवित्रता जाते. तुकारामानें म्हटलें आहे. " **दया करणें जे पुत्रासी तेचि दासा आणि दासी** " तो म्हणतो, जें प्रेम तुम्ही मुलावर करता, तेंच प्रेम तुम्ही चाकरावर करा. आपला मुलगा मेला म्हणून आई रडत बसते. आपला आधार गेला असें तिला वाटतें. पण शेजारच्या घरांत जो मुलगा आहे त्याचा आधार ती घेत नाहीं. याचें कारण त्या आईनें शेजारच्या मुलावर प्रेमच केलें नाहीं. शेजारचीं मुलेंबाळें असून नसून सारखींच. माझा मुलगा गेला असा कपाळकरंटेपणा, दळभद्रेपणा, दरिद्रपणा कां ? प्रेम गोड आहे कीं कडू ? घरामध्यें तुम्हीं प्रेम चाखलें आहे. तें कडू असेल तर मग तुम्हीं तें घरांत तरी कां करतां ? पण तुम्हीं घरांत प्रेम करता त्यावरून त्याचा अनुभव तुम्हांला चांगला आला आहे. तेव्हां तेंच प्रेम तुम्ही घराबाहेर आणा. त्याला घराबाहेर वाहूं द्या. नामदेवानें परमेश्वराच्या नांवाचें कौतुक केलें आहे. तो म्हणतो '**नाम बरवें, रूप बरवें दर्शन बरवें कानडीयाचें । नामा म्हणे**

**तुझें अवघेंचि बरवें, त्याहूनि बरवें, प्रेम तुझें '** जी गोडी घरांत चाखली ती गांवांत चाखा. यांत न होण्यासारखें काय आहे ? प्रेम करायला काय लागतें ? द्वेष करायला कांहीं करावें लागतें. हातीं तलवार घ्यावी लागते, सावध रहावें लागतें, पाळतीवर रहावें लागतें इत्यादि उपद्व्याप करावे लगतात. प्रेम करायला हें कांहींच लागत नाहीं. असें विनतक्रारीचें काम जर जमत नाहीं तर मग काय जमणार आहे ? हें सर्वांत सोपें काम आहे.

## प्रेम करून पहा

प्रेम करून पहा. मग तुम्हांला दिसेल कीं तुमच्या गांवांतून भांडणें पळून गेलीं. पोलीस निघून जातील, त्यांची गरजच राहणार नाहीं. आज तुमच्यामागें भांडणापायीं पोलीसांचा, कोर्टाचा ससेमिरा लागला आहे. सतत कोर्टाच्या तारखापायीं शहराच्या खेपा घालाव्या लागतात. शेतांतलीं महत्त्वाचीं कामें टाकून वारंवार जावें लागतें. त्यापायीं दगदग होते, वेळ जातो आणि महत्त्वाचीं कामें बाजूला पडतात. पण ग्रामदानांत ह्यांतलें कांहीं सुद्धां नाहीं. जें प्रेम घरामध्यें करता तेंच गांवांत करा. मग गांवाचें घरच बनेल. त्यानें आपली शक्ति वाढेल. ग्रामदानी गांवामध्यें जितकीं मुलें असतील तीं सर्व माझीं आहेत असें प्रत्येक आईला वाटेल. आणि गांवांत जितक्या आया आहेत तितक्या सर्व माझ्याच आहेत, असें मुलाला वाटेल. या प्रेमाच्या विरुद्ध कांहीं कायदा आहे काय ? हें धर्माविरूद्ध आहे काय ? मग हें करायला कठिण काय आहे ? परदेशाचीं माणसें आमच्या यात्रेंत येत असतात. इंग्लंड, फान्स, स्वित्झर्लंड, हॉलंड, नार्वे, स्वीडन, रशिया, आस्ट्रेलिया, चीन, जपान, अमेरिका किती तरी देशाचीं माणसें येऊन गेलीं, याचें कारण काय ? असें आम्हीं काय काम करतों आहोंत ? आमच्या कामानें त्यांना काय लाभ मिळणार आहे ? पण हें प्रेमाचें काम आहे, त्यानें नैतिक शक्ति वाढेल आणि त्याचा जगावर परिणाम होईल असा त्यांना विश्वास वाटतो, म्हणून ते लोक आमच्या यात्रेंत येतात, राहतात, पाहतात. हा प्रेमाचा मार्ग आहे. या मार्गाचा परिणाम असा होईल कीं सगळ्या फौजा बेकार ठरतील. हिंसेंतून, भयांतून, अधर्मांतून, पापांतून मुक्तता होईल.

**बोरपाडलें** (कोल्हापूर) ता. २-५-५८

पन्हाळा महाराष्ट्राच्या इतिहासामध्यें अनेक कारणांमुळें प्रसिद्ध झालेला आहे. इथें पंत अमात्यांची समाधि आहे. त्याशिवाय ज्याविषयीं सबंध देशाला आदर आणि प्रीति वाटली पाहिजे अशा आसपासच्या क्षेत्रांत पुष्कळच घटना झालेल्या आहेत. अशा स्थानीं भूदानयात्रेंत असतांना माझें येणें झालें आणि तुम्हां सर्वांचें दर्शन झालें, ह्याचा मला फार आनंद होत आहे. मी पूर्वीं एकदां इथें आलेलों आहें. दुसऱ्यांदा आज येणें होत आहे.

## कवि मोरोपंतांचें जन्मस्थान

हें स्थान जसें कांहीं वीर पुरुषांच्या नांवानें प्रसिद्ध आहे तसें तें एका महाकवीच्या नांवानें हि प्रसिद्ध आहे. मराठी भाषेंत मोरोपंतांचें नांव हें पांच पन्नास वर्षांनंतर जीं नांवें अजरामर राहणार आहेत त्यांपैकीं एक आहे. त्यांचें हें निवासस्थान होतें. त्यांचा जन्म व अध्ययन इथेंच झालें. काव्यप्रतिभा हि त्यांना इथेंच लाभली. मग पुढें ते बारामतीला गेले. त्यांचें पुढचें लिखाण बारामतीला झालें. तरी पण निःसंशय बारामतीपेक्षां काव्यप्रतिभेला अनुकूल स्थान पन्हाळा च आहे. परंतु काव्यप्रतिभा लाभलेला महाकवि, कुठें जरी गेला व कांहीं जरी बोलला तरी तो कवितेंतच बोलणार. त्यांनीं पुष्कळ कविता लिहिली. बारामतीला ते एका चांगल्या सरदाराच्या आश्रयाला राहिले होते. शेंवटपर्यंत ते बारामतीलाच राहिले. आज मी इथें येत आहें ह्या निमित्तानें त्यांची रामनामाचा महिमा सांगणारी कविता, १०८ आर्यांची '**रामनाम आर्या**' येथल्या पाध्यांनीं प्रकाशित केली आहे आणि तें पुस्तक माझ्या हातानें तुमच्या समोर मांडायचें आहे. मला हें काम करतांना फार आनंद होत आहे. मोरोपंताच्याविषयीं माझ्या मनांत एक प्रकारची आपुलकी आहे. कवि ह्या नात्यानें त्यांची योग्यता काय ठरते, हा काव्याची चिकीत्सा करणाऱ्या चिकीत्सकांचा विषय आहे. पण माझा त्यांचा संबंध फार जिव्हाळ्याचा आहे. कारण हायस्कूल कॉलेजमध्यें माझी दुसरी भाषा संस्कृत नव्हती, फ्रेंच

होती. त्यामुळें त्यावेळीं मीं फ्रेंच भाषेचें चांगलें अध्ययन केलें होतें. परंतु मराठी भाषेचा मला नाद होता आणि मराठी भाषेचें यच्चयावत् सर्व साहित्य, प्राचीन ग्रंथकारांनीं लिहिलेलें, मिळेल तितकें वाचावें अशी माझी तळमळ होती. ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत अनेक संतांच्या आणि कवींच्या ग्रंथांचें अध्ययन करण्याचा अवसर मला लहानपणींच मिळाला आणि जरी हायस्कूल मध्यें मी फ्रेंच भाषा शिकलों असलों तरी पण त्यावेळीं मीं अधिकाधिक अध्ययन मराठीचेंच केलें. त्यावेळीं हायस्कूल कॉलेजच्या परीक्षेला जरी त्याची गरज नव्हती तरीहि मीं तें केलें.

## माझी संस्कृतभाषा-प्रवेशिका

कारण मला अध्ययनाचा नादच होता. आज हि माझें लेखन अध्ययन इत्यादि सर्व मराठींतच चालतें. मोरोपंतांनीं संस्कृत भाषेंत माझा प्रवेश करून दिला. त्यांच्या चार पांच हजार आर्या मला मुखोद्गत आहेत. आर्याभारत, कृष्णविजय, केकावली, आर्याकेकावली इत्यादि जेवढी म्हणून त्यांची कविता निघाली ती मीं वाचली होती. त्यांच्या कांहीं ग्रंथांचा मीं मोठ्या आवडीनें अभ्यास केला होता. मोरोपंतांचा व माझा संबंध भाषेच्या प्रेमामुळें आला. त्यांचा माझ्यावर दुसरा उपकार झाला तो म्हणजे माझ्या चित्तावर, माझ्या बालमनावर त्यांच्या कवितेच्या भावनांचा चांगला संस्कार उमटला. लहानपणीं मी केकावली वगैरे फार मोठ्यानें म्हणत असें. त्यांच्या कांहीं केका काढून १०० केकांचें 'केकाशतक' नांवाचें पुस्तक मीं प्रसिद्ध केलें आहे. त्याला मीं लहानशी प्रस्तावना लिहिली आहे. अशी नुकतीच चार, पांच वर्षांपूर्वी मोरोपंताची सेवा मीं भदानयात्रेंत असतांनाच केली. कारण मला राष्ट्रीय शिक्षणाचा नाद होता. मुलांना शिकविण्याचें काम मीं सतत केलें आहे म्हणून त्यांच्या उपयोगासाठीं 'केकाशतक' प्रसिद्ध केलें.

मोरोपंतांचे गुण अनेक आहेत. परंतु संस्कृत-भाषा-प्रवेश हा मी त्यांचा फारच मोठा उपकार मानतों. त्यानंतर मीं खोल अध्ययन संस्कृतचें केलें. आणि आज जरी मला पंधरा वीस भाषा येतात तरी संस्कृत व मराठी याशिवाय दुसऱ्या कशाचें मला जास्त ज्ञान नाहीं. आणि मला मराठी

चांगलें येत असलें तरी पण माझें गंभीर चिंतन संस्कृतमध्येंच होतें. वेदापासून आधुनिक काळापर्यंत सर्व साहित्याचें अध्ययन मीं केलें आणि संस्कृतांतच मी अधिक रमलों. त्यासाठीं मोरोपंतांची जी मदत मला झाली, ती झाली नसती, तर संस्कृतमध्यें माझा प्रवेश झाला नसता आणि मी हें एवढें वाचूं हि शकलों नसतों.

## मोरोपंत वीरकवि व भक्तकवि

मोरोपंत हा वीरकवि आहे, व भक्तकवि आहे. हे दोन मुख्य रस त्यांच्या काव्यांत आहेत. कवीच्या काव्यांत इतर हि अनेक रस असावे लागतात ते त्यांच्या काव्यांत आहेत. पण त्यांना जो रस साधला आहे तो वीररस आणि भक्तिरस. म्हणून च कोणीतरी त्यांचें वर्णन करतांना म्हटलें आहे "वीर कवींचा असा कोणी नायक होईल काय ?" त्यांच्या काव्यांत संस्कृत शब्द फार असतात म्हणून पुष्कळांना त्यांचें काव्य कठिण वाटतें. पण मला त्यांची कविता वाचतांना वाटे कीं मी संजयाबरोबर हिंडतों आहें. धृतराष्ट्राला संजयानें युद्धाचा रिपोर्ट केला, तो रिपोर्ट प्रतिभेच्या दृष्टीनेंच केला होता असें म्हणतात. पण मला मात्र वाटे कीं मी संजयाचा साथीच आहें. मी मोरोपंतांचें काव्य वाचत नसून संजयाबरोबर महाभारताचें निरीक्षण करतों आहे असेंच मला वाटें.

**त्या सौभद्रावरि बळ-सागर गरगर गदेसि फिरवीत ।**
**दुःशासनसुत धांवें निज-भूज-भुजग-प्रताप मिरवीत ।।**

हें वाचलें कीं वाटे कीं जणूं कांहीं तलवारीचा खणखणाट चालू आहे. एकमेकांच्या डोक्यावर तलवारी हाणून राहिले आहेत, असा आवाज, असा ध्वनि त्या काव्यांतून च निघतो. त्यांच्या कवितेंत इथून तिथें कुठें हि अश्लीलता सांपडायची नाहीं. इतर अनेक जुने नवे कवि मीं पाहिले. त्यांत मला हेंच आढळून आलें कीं रसाच्या नादांत वाहत जाऊन त्यांची एक मर्यादा सुटत असते. पण मोरोपंतांच्या काव्यांत मात्र कुठें हि मर्यादेचा भंग झालेला नाहीं. ह्या बाबतींत त्यांची तुलना उत्तर हिंदुस्थानांतल्या तुलसीदासांशीं च होऊं शकते. तुलसीरामायणांत एक ओळ अशी नाहीं कीं जिच्यांत मर्यादेचा भंग होतो. मुलेंबाळें, आईबाप, सगळे एकत्र बसून वाचायला अडचण

वाटण्यासारखा एकहि उद्‌गार त्यांत नाहीं अशी मर्यादा त्यांनीं ठेवली आहे. हा त्यांचा फार च मोठा गुण आहे. मोरोपंतांच्या हि काव्यांत हा गुण आहे. त्यांच्यापेक्षां अधिक प्रतिभावान् कवि मराठी भाषेंत झाले आहेत. ज्ञानेश्वराची तुलना कुणाशीं च होऊं शकत नाहीं. मोरोपंत पहिल्या वर्गात जरी येत नसले तरी दुसऱ्या वर्गांत त्यांचा दर्जा चांगलाच मोठा आहे. त्यांच्या काव्याचें क्षेत्र हि मोठें आहे. त्यांतल्या चांगल्या कविता जरी निवडून काढायच्या म्हटल्या तरी त्या इतरांच्या सबंध ग्रंथाहून जास्त होतील. इतका परिश्रम जो त्यांनीं केला तो अंतःकरणाच्या तळमळीनें आणि चित्तशुद्धीच्या हेतूनेंच केला आहे म्हणून त्यांच्यामधें अत्यंत नम्रता दिसते.

## मोरोपंतांची नम्रता

बहुधा असें दिसतें कीं मोठमोठे कवि जरी असले तरी त्यांच्यांत अहंकाराचा भास होतो. कुणी तर मला असें हि सांगतात कीं अहंकाराशिवाय कविता होईल तरी कशी ? पण तें कसें हि असलें तरी मोरोपंतांच्या ठिकाणीं अहंकाराचा लेश हि नाहीं. त्यांनीं संतांची आणि कवींची स्तुति केली आहे आणि जे कवि निःसंशय त्यांच्यापेक्षां खालच्या दर्जाचे मानले जातील त्यांचा हि त्यांनीं गौरव केला आहे. महाराष्ट्राच्या सगळ्या कवींची आणि सज्जनांची त्यांनीं जी स्तुति केली आहे त्यांत त्यांची शालीनता, नम्रता आणि विनयशीलता स्पष्ट दिसते. हा त्यांचा आदर्श मला फार उत्तम वाटतो. तो सर्वांनीं घेण्यासारखा आहे. यापेक्षां मोरोपंतांच्या विषयीं अधिक काय सांगावें ? त्यांच्या स्फुट कवितांचा कांहीं भाग अजून छापायचा बाकी आहे. त्यांनीं स्वहस्तें लिहिलेल्या कवितांचीं पुस्तकें छापणें चालू आहे. अजून तीन भाग प्रकाशित होतील एवढा मजकूर छापायचा शिल्लक आहे. महाराष्ट्राच्या मंडळींनीं ह्यांत लक्ष घालायला पाहिजे. येथें त्यांचें स्मारक केलें आहे ही चांगली गोष्ट आहे. ही गोष्ट खरी कीं त्यांचें ग्रंथ सर्व लोकांना समजत नाहींत. श्रीधराचें काव्य घरोघर वाचलें जातें तशी स्थिति मोरोपंतांच्या काव्याची नाहीं. तरी पण त्यांचें मराठी कवितेंत एक विशेष स्थान आहे. त्यांची अप्रकाशित कविता प्रकाशित व्हायला पाहिजे. स्वराज्यानंतर लोकांमधें अशी भावना जागृत होत असते तशी ती झाली आणि होईल.

## आज बुद्धाचा जन्मदिवस

आजचा हा भगवान् गौतम बुद्धाचा जन्मदिवस आहे. त्या निमित्तानें सबंध आशिया आणि जगाच्या दुसऱ्या हि कांहीं भागांत आज उत्सव होत आहेत. भगवान् बुद्धानें लोकांना जी करुणा शिकवली ती असामान्यच होती. करुणेचें मूळ वासना-मुक्तींत आहे, वासना सुटल्याशिवाय म्हणजेच व्यापक विश्वभावना केल्याशिवाय आणि निर्वैर वृत्तीशिवाय करुणा अशक्य आहे, असें त्याला दर्शन झालें. आणि वैरानें वैर कधीं हि शमत नाहीं, हा सिद्धांत अत्यंत स्पस्ट शब्दांत पहिल्या प्रथम कोणी मांडला असेल तर तो गौतम बुद्धानें मांडला. त्यापूर्वी वेदामध्यें, उपनिषदांमध्यें प्रेमाचा महिमा, शांतीचा महिमा, अहिंसेचा महिमा, निर्वैरतेचा महिमा गायलेला आहे; परंतु जितक्या स्पष्ट रीतीनें निःसंदिग्ध शब्दांत गौतमबुद्धानें तो मांडला, तितका तो कुणी मांडला नाहीं. त्याच्या प्रचारासाठीं तो आयुष्यभर फिरत राहिला. जितक्या निःसंदिग्ध रीतीनें त्यानें हा विचार मांडला तितक्याच निःसंदिग्ध शब्दांत त्यानंतर येशूनें मांडला. मग हिंदुस्थानच्या संतांनीं ही गोष्ट सांगितली. त्यांच्या ग्रंथांत निर्वैरता शांति आणि प्रेम यांचा महिमा वाचायला सांपडतो. त्याचें उत्तम उदाहरण म्हणजे ज्ञानदेव. त्यानें शांति निर्वैरता आणि अहिंसा यांची जी शिकवण दिली त्याहून उज्ज्वल शिकवण मराठी भाषेंत कुणी दिली नाहीं आणि तशी ती कुणी देईल अशी आशा करायची गरज हि नाहीं.

## संत वाक्याचें विकृतीकरण

सर्वांशीं समान तऱ्हेनें वागावें या विषयीं ज्ञानेश्वरांनीं दृष्टांत दिला आहे. **"गाईची तृषा हरूं। कां व्याघ्रा विष होऊनि मारूं। ऐसें नेणेचि गा करूं तोय जैसें"** ज्याप्रमाणें गाईची मात्र तहान मिटवूं आणि वाघाला विष होऊन मारून टाकूं कारण वाघ कूर जनावर आहे, तो पाप करतो, असा विचार पाणी करत नाहीं, त्याप्रमाणें समोरचा माणूस कसा आहे त्याचें रूप पाहून त्याचा आरसा आपण बनायचें, त्याच्या नाकाला शेंबूड असेल तर आपल्या हि नाकाला शेंबूड लावावयाचा, असला विचार सत्पुरुषानें कधीं हि करूं नये. असा विचार ज्ञानदेवांनीं सांगितला आहे. दुसरा दृष्टांत त्यांनीं असा दिला आहे कीं, पृथ्वी उत्तम माणसाचें ओझें

उचलतें त्याप्रमाणें अधमाचें हि ओझें ती उचलते, त्याचा तिरस्कार करत नाहीं; त्याप्रमाणें आपण वागावें. "**उत्तमातें धरिजे। अधमातें अव्हेरिजे। हें कांहींचि नेणिजे। वसुधा जेवीं**" वसुधेला, पृथ्वीला हें माहितच नाहीं कीं अधमाला धारण करूं नये व उत्तमाला धारण करावें. त्याप्रमाणें भगवद् भक्त, साधुपुरुष अत्यंत निर्वैर असतात, ते आपला स्वभाव कधींच सोडत नाहींत.

चित्रशाळा प्रेसनें मुलांमुलींसाठीं तऱ्हेतऱ्हेच्या म्हणी छापून काढल्या आहेत. त्यांतल्या कांहीं म्हणी मीं पाहिल्या. त्यांत ज्ञानेश्वरींतली एक ओळ छापिली आहे "**उत्तमातें धरिजे। अधमातें अव्हेरिजे**" झालें आटोपलें. एवढीच ओळ घेतली त्याचा पुढचा भाग त्यांनीं छापला च नाहीं. पृथ्वी जसा भेदभाव करीत नाहीं तसा आपण हि करूं नये, असें ज्ञानदेव सांगतात. आणि यांनीं ठीक त्याच्या उलट अर्थ होईल एवढीच म्हण छापली आहे. म्हणजे 'डोंट किल्' च्या ऐवजीं 'डोंट' काढून फक्त 'किल्' तेवढें ठेवलें. किती विलक्षण प्रकार आहे! अगदीं असामान्य उदाहरण आहे. एका महाकवीच्या वचनाचा अर्धा भाग कापून अर्धा च भाग छापायचा, ज्यामधें अगदीं उलटा अर्थ होतो, अशी हिंमत कुणीहि केलेली माझ्या पाहण्यांत नाहीं.

## सर्वधर्मांची एकच शिकवण

मला हें सांगायचें होतें कीं बुद्धभगवानाची शिकवण असामान्य आहे. तत्पूर्वींच्या लोकांनीं ती आपल्या ग्रंथांत लिहिली होती. उपनिषदांत, वेदांत ती आहे. पण अत्यंत स्पष्ट शब्दांत बुद्धानें ती सांगितली आणि तसें जीवन तो जगला. हा त्याचा अत्यंत उपकार आहे. इथें मिशनरी लोक येत असतात. मी त्यांना म्हणतों तुम्ही शिकवायला येता, खूप शिकवा. आम्ही प्रेमानें शिकूं. ख्रिस्ताची शिकवण अधिक प्रेमानें आम्ही वाचूं. पण कृपा करून असें समजूं नका कीं हें लोक रानटी आहेत, यांना कांहींतरी शिकवलें पाहिजे. यांना कांहीं कळत नाहीं, अशा उद्धटपणानें इथें येऊं नका. अहिंसेचा उपदेश मला ज्ञानेश्वरीपेक्षां दुसऱ्या कोणत्या हि ग्रंथांत अधिक सांपडला नाहीं. गौतमबुद्धानें तीच शिकवण दिली,

ख्रिस्तानें हि तीच शिकवण दिली. या दोघांच्या शिकवणींत अहिंसेचा विचार जितका सांपडतो तितकाच तो ज्ञानेश्वरींत आला आहे म्हणून मराठी भाषेवर ज्ञानेश्वरांचा फार मोठा उपकार झाला आहे.

मला सर्व धर्मांची शिकवण समान वाटते, त्यांचा गाभा उत्तम आहे. बायबलचा मीं फार प्रेमानें अभ्यास केला आहे. न्यू टेस्टामेंट-मधला कांहीं भाग मला फार आवडतो, तो माझ्या कंठांत आहे. काल कांहीं प्रॉटेस्टंट मिशनरी मला भेटायला आले होते, फार प्रेमानें आमचें बोलणें झालें. ते म्हणाले आज तुम्हांला आमचीं मुलें भजन गाऊन दाखवितील. त्याप्रमाणें आतां च त्यांनीं फार सुंदर भजन गाऊन दाखविलें. बुद्धभगवानाचा जन्मदिवस, येशूख्रिस्ताचें गाणें आणि ज्ञानेश्वरीचा एक विचार मीं तुमच्यापुढें मांडला. यावरून तुमच्या लक्षांत येईल कीं, ज्ञानेश्वर, गौतमबुद्ध आणि येशूख्रिस्त यांनीं एकच शिकवण दिली आहे. कांहीं लोक दुसरे तिसरे ग्रंथ पहायला च तयार नसतात, ते एकच ग्रंथ वाचतात. पण हिंदुधर्माचा हा मी एक मोठा गुण समजतों कीं हिंदुधर्म कोण्या एका ग्रंथाला हाच आमचा धर्मग्रंथ असें मानत नाहीं. अमुकच एक ग्रंथ वाचायचा असा त्यांचा आग्रह नाहीं. तुलसीरामायण वाचणारा भागवत पाहणार नाहीं उपनिषद वाचणारा रामायण बघणार नाहीं, गीता वाचणारा उपनिषद पाहणार नाहीं, असें हिंदुधर्मांत नाहीं. हा हिंदुधर्माचा गुण आहे. हिंदु-धर्मांत तसे कांहीं दोषहि आहेत, ते दोष काढून टाकले पाहिजेत गुण वाढवले पाहिजेत. इतर हि धर्मांत कांहीं गुण आहेत व कांहीं दोष आहेत. पण हिंदुधर्म एक असा धर्म आहे कीं जो एका व्यक्तिविशेषाच्या नांवाशीं व ग्रंथाशीं बांधला गेलेला नाहीं. हा त्याचा मोठा गुण आहे, हें भारताचें वैभव आहे.

मला लोक विचारतात कीं तुम्ही इतकीं भाराभर पुस्तकें कशाला वाचतां ? सगळ्यांनीं जर एकच मत सांगितलें आहे तर इतकीं पुस्तकें वाचायचीं कशाला ? त्या सर्वांत एक च विचार मांडला आहे तेव्हां तें सर्व वाचण्यांत आपला वेळ वायां गेला असा तुम्हांला पश्चात्ताप नाहीं का होत ? मी त्यांना सांगतों कीं, समजा कोर्टांत एक केस आहे, त्या केसमध्यें पन्नास साक्षीदारांनीं एकच एक गोष्ट सांगितली तर ती केस पक्की होते

कीं नाहीं ? जितके साक्षीदार अधिक तितकी ती केस मजबूत. तशी परमेश्वरावर श्रद्धा ठेवण्याची ही केस आहे आणि त्याकरितां ख्रिस्त जें सांगतो तेंच कृष्ण बोलतो आहे, ज्ञानदेव तेंच सांगतो आहे, कबीराचें तेंच म्हणणें आहे. त्यामुळें ती केस पक्की होईल कीं नाहीं ? माझी श्रद्धा यामुळें दृढ होते. आणि हिंदु या नात्यानें माझ्या हिंदुपणाला कांहीं हि कच्चेपणा आला नाहीं.

## नास्तिकतेचें कारण

आज एवढी नास्तिकता कां आहे ? याचें कारण आस्तिक लोकांचें आपआपसांत जमतच नाहीं. हिंदुधर्मांत कोणी कृष्णाचें नांव घेतो, कोणी रामाचें नांव घेतो,कोणी शंकराचें नांव घेतो, हे सर्व आस्तिक आहेत. मुसलमानामध्यें अल्लाचें नांव घेणारे लोक आहेत ते हि आस्तिक आहेत.ख्रिस्तीधर्मांत गॉडचें नांव घेणारे, जुहोवाचें नांव घेणारे लोक आस्तिक आहेत. पण हे त्या त्या आस्तिक धर्मांतले एका ठिकाणीं बसतच नाहींत. देवाचें नांव घ्यायचें आहे तर एका जागीं कां बसूं नये ? देव हा तुकडे पाडणारा, भेद करणारा असा कां व्हावा ?

## देवाच्या नांवानें भेद नको

देवाच्या नांवानें अभेद होण्याऐवजीं भेद कां होतो ? इतर रीतीनें भेद होत आहेत, तसे ते देवाच्या हि नांवानें व्हायला लागले आहेत. मला एक गोष्ट आठवते. सहाशें वर्षांपूर्वीची गोष्ट आहे, औरंगाबादला एक साधु होऊन गेला, त्यानें एक मंदिर बांधलें. त्या मंदिरांत सर्वांनीं यावें अशी त्याची इच्छा होती. पण त्या मंदिरांत हिंदुच तेवढे जाऊं लागले मुसलमान जाईनात. मग त्यानें मंदिर पाडलें व त्या मंदिराचें परिवर्तन मशिदींत केलें. मग हिंदु जाईनासे झाले, मुसलमान तेवढे जाऊं लागले. मुसलमान खुष झाले, हिंदु नाराज झाले. कांहीं दिवस त्या साधूनें हें पाहिलें व नंतर त्यानें मशिद पाडून टाकली व त्या जागीं पायखाना बांधला. ही गोष्ट बादशहाला कळल्यावर तो रागावला. देवळाचें मशिदींत रूपांतर केलें तेव्हां त्याला बरें वाटलें व मशिदीच्या जागीं पायखाना बांधला तेव्हां मात्र तो चिडला. त्या साधूला पकडन बादशहाकडे नेलें. बादशहानें त्याला विचारलें, तं

असें कां केलेंस ? तेव्हां साधु म्हणाला "देऊळ बांधलें तेव्हां मुसलमान त्यांत येइनात. मशिद बांधली तेव्हां हिंदु त्यांत जाइनात. आतां पायखाना बांधला तेव्हांपासून दोघे हि येतात." पुढें त्या साधूला बादशहानें काय केलें मला माहित नाहीं.

## सर्व धर्मांनीं एकवटावें

धर्माच्या नांवानें आम्ही एकवटूं शकत नाहीं आणि सेक्युलर स्टेटच्या नांवानें एक होतों. ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. सेक्युलर स्टेट ही फार चांगली कल्पना आहे. परंतु धर्मवाल्यांनीं सुद्धां आपआपसांत प्रेम राखलें पाहिजे, ही अक्कल अजून आपल्याला आली नाहीं. कोणा एकाचें नांव घेतलें कीं दुसऱ्याचें पित्त खवळतें. ही काय अवदसा आहे ! काय अवलक्षण आहे ! मीं पाहिलें मौनाची प्रार्थना सर्वांना आवडते. पण विशिष्ट नाम कोणी घेतलें कीं लागलीच क्रोध येतो. असें कां ? मला ख्रिस्ताचें नांव आवडतें म्हणून मीं तें घेतलें यांत काय बिघडलें ? कोणी कृष्णाचें नांव घेतलें तर मीं कां चिडावें ? जें कांहीं होतें तें अमच्या सत्पुरुषाच्या चरणशरणतेनें होतें, असा आग्रह कां राखावा ? म्हणून सगळ्यांनीं जरा विचार करावा. सर्व धर्म-समभावनेची भूमिका आली तरच जगांत आस्तिक शक्ति वाढेल. सत्य, प्रेम, करुणा, या शक्ति एकवटल्या पाहिजेत. यांच्यामध्यें जर फूट पडेल तर आस्तिकता वाढणार नाहीं. नास्तिकता वाढेल. त्यासाठीं जितक्या पुण्य-शक्ति आहेत त्या एकवटल्या पाहिजेत. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध, ताओ, लाओत्से हे सगळे एकवटले पाहिजेत आणि एकवटून त्यांनीं नास्तिकतेवर, दुराचारावर, कु-मनोवृत्तीवर प्रहार केला पाहिजे तर जगाचें भलें होईल. हा संदेश बुद्धभगवानाकडून आजच्या दिवशीं आपण घ्यावा.

## सत्पुरुषांची जात एकच

बुद्धभगवानांच्या धम्मपदांत २६ अध्याय आहेत. त्यांत एका, ज्ञानी पुरुषाचें वर्णन करतांना म्हटलें आहे, अशा प्रकारचा सदाचार करणारा मनुष्य श्रमण आहे, ब्राह्मण आहे, भिक्षु आहे. श्रमण हा त्या काळचा जैन शब्द, ब्राह्मण हा त्या काळचा हिंदूंचा शब्द आणि भिक्षु हा बौद्धांचा त्या काळचा

शब्द. बौद्धाच्या काळीं तीन धर्मप्रवाह होते. पहिला बुद्धधर्माचा प्रवाह, दुसरा जैनधर्माचा प्रवाह, तिसरा हिंदुधर्माचा प्रवाह. हे तीन्ही प्रवाह एकच आहेत अशा प्रकारचें स्पष्ट कथन ह्या वाक्यांत बुद्धानें केलेलें आहे, हें आपण शिकलें पाहिजे.

ख्रिस्तानें म्हटलें आहे, 'गॉड' म्हणत राहिल्यानें कांहीं होणार नाहीं. तुम्हीं काम केलें तरच होईल. मी एकाच बंगल्यांत रहात नाहीं. माझे अनेक बंगले आहेत. महंमदानें हि असेंच म्हटलें आहे. आम्ही रसुलांच्यामध्यें फरक.करत नाहीं. परमेश्वराचे जे प्रेषित जगामध्यें आलेले आहेत, त्यांच्यामध्यें अमक्यापेक्षां तमका मोठा अशा तऱ्हेचा फरक आम्ही करीत नाहीं. जितके पैगंबर जिथें जिथें निर्माण झाले, त्यामध्यें कांहीं सुद्धां फरक नाहीं. हें अरबी कुराणामधलें वाक्य आहे. आणि एके ठिकाणीं असें वाक्य आहे कीं, ही सगळी एक जात आहे. जगांत जितके सत्पुरुष झाले आहेत त्यांची एकच जात आहे. त्यांत भेद नाहीं, हे सर्व एक करण्यासाठीं त्यांना तळमळ होती. सगळे सत्पुरुष हृदय एक करण्यासाठीं तळमळत होते. पंथ वनविण्यासाठीं, अलग अलगपणा वाढविण्यासाठीं त्यांनीं काम केलें नाहीं. उलट हृदय जोडण्यासाठीं त्यांनीं कामें केलीं आणि जगांत अभेद नांदावा हीच इच्छा केली. सगळी मानवता एकवटावी असा त्यांचा प्रयत्न होता. त्या दृष्टीनें आपण काम करूं या. बुद्धभगवानांचा जन्मदिवस असा एकीचा प्रयत्न करण्यासाठीं आपल्याला उपयोगी पडेल.

## गोप बाबू

आणखी एक महत्त्वाची गोष्ट मला तुम्हांला सांगावयाची आहे. आतांपर्यंत तुम्ही शांतीनें वसून व्याख्यान ऐकलें, तसें च आणखी थोडावेळ बसून तुम्ही ऐकाल अशी आशा करतों.

या भूदान कार्यामध्यें सात वर्षें झालीं मी हिंडतों आहें. अखंड यात्रा परमेश्वराच्या कृपेनें चालली आहे. या अवधींत आमचे एक एक साथी आम्हांला सोडून गेले. किशोरलाल भाई गेले. नंतर जाजूजी गेले. त्यानंतर बाबा राघवदास गेले. सतत तीन वर्षें उन्हातान्हांत, पाण्यापावसांत

थंडीत सतत फिरत होते. फिरतां फिरतांच ते गेले. आणि आजच कळलें कीं श्री. गोपबंधु चौधरी गेले. ओरिसाचे आजच्या युगाचे सर्वश्रेष्ठ पुरुष, असेंच त्यांचें वर्णन करणें शक्य आहे. सबंध ओरिसा त्यांना महात्मा समजतो. त्यांचें महात्म्य कशांत आहे? सात वर्षें ते सारखे हिंडत होते एवढ्यांत त्यांचें महात्म्य नाहीं, तें वेगळ्याच गोष्टींत आहे.

हृदयपरिवर्तनाची प्रक्रिया दुनियाभरांत चालते, पण कुटुंबांत चालत नाहीं. कारण कुटुंबांत नवरा बायको, मुलेंबाळें वगैरे नात्याचें संबंध असतात. त्यांना एकमेकांचें सगळें माहीत असतें. हा विनोबा बाहेर गेला, उत्तम भाषण दिलें कीं लोक समजतात कीं हा चांगला संतपुरुष आहे. पण घरांत भावाला बहिणीला त्याची वागणूक माहीत असते, परिचय दाट असतो त्यामुळें आंतली योग्यता पोकळ आहे कीं भरीव आहे हें त्यांना चांगलें कळतें. इतरांचें तसें नसतें.

अलीकडे तर संत आणि आचार्य या दोन्ही पदव्यांची खैरात च चाललेली असते. विनोबा दोन्ही आहे. संत आणि आचार्य! म्हणजे डबल इंजीन. उठल्यासुटल्या अशा पदव्या कां देतां? साधा तुमच्यासारखा माणूस मी. प्रेमानें गोष्ट सांगायला तुमच्याजवळ आलों. हवी असेल तर घ्या नको असेल टाकून द्या. यापेक्षां जास्त उपाधी हव्या कशाला?

पण मला सांगायचें होतें हें कीं गोपबाबूंचें असें उदाहरण आहे कीं त्यांच्या कुटुंबांत एक हि असा माणूस नाहीं जो सार्वजनिक सेवेला लागला नाहीं. तमाम सर्वांचें हृदयपरिवर्तन गोपबाबूंच्या आचरणानें झालें आहे. त्यांच्या पत्नी रमाबाई सर्वांत श्रेष्ठ स्त्री म्हणून ओरिसांत घरांघरांत त्यांना लोक ओळखतात. राष्ट्रसेवेशिवाय कोणतें हि काम त्यांनीं केलें नाहीं व आज हि करीत नाहींत. कस्तूरबानिधीचें काम त्यांनीं केलें, खादीचें काम केलें, शिक्षणाचें काम केलें, स्त्रियांच्या उत्थानाचें काम करीत होत्या व आज हि करीत आहेत. आणि भूदानच्या कामांत तर त्या आहेत च. त्यांचा मुलगा मनमोहन देशसेवेशिवाय कांहींहि करीत नाहीं. चाळीस वर्षांचें त्याचें वय आहे. आज सारखा तो कामांत आहे. गोप बाबूंचे भाऊ नवकृष्ण चौधरी ओरिसाचे मुख्य प्रधान होते. ते दोन वर्षें सारखे म्हणत होते, मला या बंधनांतून सोडा. परंतु काँग्रेस वर्किंग कमिटीनें त्यांना दोन वर्षें सोडलें नाहीं. कारण त्यांच्याशिवाय काम अडलें होतें. पण

मग त्यांनीं सोडलें. दोन वर्षें झालीं. तेव्हांपासून सारखे ते वणवण हिंडत आहेत. गौतमबुद्धाच्या हातीं राजसत्ता असतांना त्यांनीं ती सोडली, हें जसें एक उदाहरण तसें च नवबाबूंचें हि हें उदाहरण आहे. हातीं असलेली सत्ता त्यांनीं सोडली आणि आतां बंधनांतून सुटल्यासारखे ते प्रेमानें आणि हौसेनें फिरत आहेत आणि तळमळीनें काम करीत आहेत. त्यांची पत्नी मालतीदेवी फारच मोठी कार्यकर्ती आहे. गोपबाबूंचें जांवई सेवाकार्य करीत आहेत. परिसाच्या संगतीला जें जें लोखंड लागलें त्याचें सोनेंच झालें त्याप्रमाणें त्या महापुरुषाच्या संगतीला जे आहेत, ते महापुरुष झाले. यापेक्षां दुसरी काय कसोटी करणार? ज्याच्या पत्नीनें ओळखलें हा महात्मा आहे, ज्याच्या भावानें ओळखलें हा महात्मा आहे, ज्याच्या मुलानें ओळखलें हा महात्मा आहे, ज्याच्या मुलीनें, जांवयानें ओळखलें हा महात्मा आहे, याशिवाय दुसरा कोणता मोठा महात्मा होऊं शकतो ? आणि एवढें ओळखून ते अलग राहिले नाहींत, तर त्या च मार्गांत काम करीत राहिले. या कुटुंबासारखें दुसरें उदाहरण सबंध हिंदुस्थानांत मला माहित नाहीं. एवढा हा महात्मा सतत भूदान ग्रामदानाचें काम करीत गेला आहे.

आतां निजधामाला जो गेला तो मुक्त झाला पण मागच्यानें काय करायचें ? त्यासाठीं पुढचा गेला रे गेला कीं त्याची जागा भरणारा मागून आलाच पाहिजे. तेव्हां पन्हाळा गांवांत बसून बुद्धभगवानाचें पवित्र स्मरण करून येथील बायांना पुरुषांना मी प्रार्थना करीत आहें कीं, भूदान ग्रामदानावर आक्षेप घ्यायचा उद्योग सोडा, त्याचा अभ्यास करा, जें चाललें आहे तें अवलोकन करा, डोळे झांकून घेऊं नका. ज्या कार्यानें जगाचें लक्ष वेधून घेतलें गेलें त्या कार्याविषयीं उपेक्षा राखाल तर तें बुद्धीचें लक्षण होणार नाहीं, अबुद्धीचें होईल.

आतां आपण पांच मिनिटें प्रार्थना करूं या. आजच्या प्रार्थनेंत भगवंता-बरोबर गोपबाबूंचें हि स्मरण आपण करूं. त्यांच्या सत्कार्यानें त्यांना सद्‌गति मिळणारच आहे. परंतु आपण आपल्यासाठीं भगवंताबरोबर भक्ताचें स्मरण करूं, आणि आपला भक्तिभाव दृढ करूं.

पन्हाळा ( कोल्हापूर ) ता. ३-५-५८

# किरकोळ हिंसा अधिक घातक

सात वर्षांची सतत पदयात्रा करून आणि अर्धा अधिक भारत संपवून तुमच्या या ऐतिहासिक आणि पुण्य नगरीमध्यें मी आज आलों आहें. तुम्हा लोकांच्या दर्शनानें माझें हृदय संतृप्त आहे. जेव्हां जेव्हां मी जनसमूहासमोर उभा रहातों तेव्हां तेव्हां माझ्या हृदय-समुद्रांत आनंदाच्या लाटा उसळतात. एखाद्या लहान बालकाला जशी विश्वदर्शनाची उत्सुकता असते, तशीच मला विश्वदर्शनाची उत्सुकता आहे. म्हणून माझ्या श्रोत्यांच्या चेहऱ्यामध्यें कांहीं तरी संतोष देणारी वस्तु मला उपलब्ध होते.

## श्रोत्यांच्या चेहऱ्यांत, आत्मदर्शन

माझा चेहरा आरशांत पाहण्याची विशेष संधि मला लाभत नाहीं. त्याची गरज हि नाहीं. पण हे जे विविध चेहरे आहेत, ते सर्व वैविध्यानें नटलेला मी च मला पाहत आहें अशी माझी भावना आहे. आणि गेलीं सात वर्षें मी हा सतत अनुभव घेत आहें. ज्या प्रांतांत माझी भाषा लोकांना समजत नव्हती, त्या प्रांतांत माझ्या भाषणांचें कसें तरी भाषांतर तेथील लोकांना ऐकावें लागे. त्या प्रत्येक प्रदेशांत हि आत्मदर्शनाचाच अनुभव मला आला आणि याचा पडताळा म्हणजे लोकांचा हि अनुभव तोच होता. जिथें जिथें मी गेलों तिथें तिथें मी दुसऱ्या प्रांतांतून आलों आहें असें लोकांनीं मुळींच मानलें नाहीं. उलट जितक्या आत्मीयतेनें महाराष्ट्राचे लोक मला चाहतात तितक्याच आत्मीयतेनें बिहार, बंगाल, ओडिसा, आंध्र, तमिलनाड, केरळ आणि कर्नाटक या सर्व प्रांतांचे लोक चाहतात.

## तरुणांचें आकर्षण

विशेषतः कोणत्या कारणामुळें माहित नाहीं, पण तरुणांचें मला आकर्षण वाटतें. त्यांचें चित्त माझ्याकडे खेंचलें जातें. ज्या ज्या शहरांबद्दल मला सांगत कीं या शहरांत जितक्या सभा होतात त्या सभांमध्यें तरुण लोक गडबड करतात असा त्या शहरांच्या सभांचा इतिहासच आहे,

त्याच शहरांमध्यें माझ्या सभा अतिशय शांततेनें पार पडल्या. त्या सभांमध्यें तरुण मंडळींची संख्या जास्तींत जास्त असे. कारण क्रांतिकारक पृष्ठभूमि असलेला एक विचार माझ्याजवळ आहे, हें त्यांनीं ओळखलें होतें. स्वराज्य-प्राप्तीनंतर लोकहृदयांमध्यें एक सुप्त आणि गुप्त पण लुप्त नव्हे अशी आकांक्षा होती आणि ती त्यांची आकांक्षा बोलून दाखवणारा आणि त्या आकांक्षेच्या तृप्तीचा उपाय सांगणारा संदेश देणारा, हा मनुष्य आला आहे अशा भावनेनें लोकांनीं पाहिलें आणि अतिशय शांतीनें सभा झाल्या. मुसळधार पावसांत देखील सभा झाल्या पण कोणी धावाधाव पळापळ केली नाहीं. दरभंगा जिल्ह्यांत जेव्हां मी गेलों होतों, तेव्हां १५० मैल लांब आणि १७० मैल रुंद पुराच्या पाण्यानें भरलेला तो प्रदेश होता. तेथील लोक सांगत कीं ५० वर्षांत असा पूर झाला नाहीं. त्या वेळीं कंबरभर पाण्यांतून पुष्कळ वेळां आणि छातीभर पाण्यांतून हि कांहीं वेळां जाण्याचा प्रसंग आला. तेव्हां सुद्धां लोक सभांना येत होते. एक दिवस तर मला आठवतें कीं त्या पाण्यांत २०० होड्यांत बसून लोक आले होते आणि त्यांत मुलांना घेऊन बाया आल्या होत्या, आणि अतिशय शांततेनें भूदानाचा आणि सर्वोदयाचा संदेश ऐकत होत्या. पुष्कळांनीं मला सांगितलें कीं हा कार्यक्रम तुम्ही तूर्त रद्द करा. कारण आतां पुराचे दिवस आहेत. मीं त्यांना म्हटलें हा परमेश्वरानें योजलेला कार्यक्रम आहे. तो आतां रद्द होणार नाहीं. मग ते मला असें हि म्हणायला लागले कीं तुमचें भाषण ऐकायला कोण येणार ? परंतु अनुभव अगदीं च उलटा आला आणि हें त्याच लोकांनीं कबूल केलें. इतर वेळां जितके लोक सभा ऐकायला येत असत त्यापेक्षां निःसंशय जास्त लोक आमच्या सभांना आले. एवढ्या आपत्तीत कंबरभर पाण्यांत हा मनुष्य आपल्याकडे आला आहे. त्याला पाहण्यासाठीं परम श्रध्देनें लोक येत होते आणि जमीन दान देत होते. लाखो एकर जमिनीचें दान त्यावेळीं मिळालें.

## एक गैरसमज

लोकांचा असा समज आहे कीं बिहारमध्यें खूप जमीन आहे आणि ती रद्दी आहे म्हणून तेथें लाखों एकर दान झालें. परंतु तिथें गंगेच्या

खोऱ्यांत उत्तर बिहारमध्यें सुपीक जमीन आहे, तिची ५००० रुपये एकर किंमत आहे. आणि तिथें लोकसंख्या हि कांहीं कमी नाहीं. इतकें असून हि लोकांनीं जमिनी दान दिल्या.

## लोकांना सर्वोदयाची तहान आहे

हें सर्व कशासाठीं? माझ्याजवळ कोणती शक्ति होती? माझ्याजवळ कांहीं सुद्धां शक्ति नाहीं, सत्ता नाहीं, संस्था नाहीं, कुठल्या हि संस्थेचा मी सभासद नाहीं. एक मनुष्य मात्र मी आहें, आणि त्याच नात्यानें मी माणसांकडे पाहतों. लोकांचें हि हृदय माझ्याजवळ मोकळें होतें. आणि ते मला आपल्यांतलाच हा एक माणूस आहे असें समजूं लागतात, आणि माझीं भाषणें एकाग्रतेनें तन्मयतेनें ऐकतात. लोकांच्या हातीं प्रचाराची विविध साधनें आहेत. त्यांच्या हातांत प्रेस आहेत शहरांतले प्लॅटफार्म आहेत परंतु हा जो नवीन प्लॅटफॉर्म भूदान ग्रामदानाचा तयार झाला आहे, तें साधन, माझ्याच हातीं आहे हें मीं पाहिलें. उन्हाळ्यामध्यें जमीन तापून तृषित झालेली असावी आणि पहिलें पावसाचें पाणी पडलें कीं ती जसें तें शोषून घेते, तसे ते सर्व श्रोते सर्वोदयाचा संदेश शोषून घेत असतात, पीत असतात, आणि त्यानें त्यांची तहान भागत आहे असा मला भास होतो.

तमिळनाडमध्यें माझ्या भाषणांचें भाषांतर होत होतें आणि त्या भाषेचें मला ज्ञान असल्यामुळें भाषांतर बरोबर होत नाहीं हें हि मला कळत होतें. तरी हि माझें म्हणणें तिथल्या लोकांनीं ऐकून घेतलें. त्या दौऱ्यांत गीताप्रवचनाच्या एक लाख प्रति गेल्या. लोकांनीं फारच प्रेमानें त्यांचें स्वागत केलें. हें सर्व कशासाठीं ? भारताला एक तृषा होती, स्वराज्यप्राप्ती-नंतर जो कार्यक्रम देशांत चालू होता त्यानें लोकांची तृप्ति होत नाही हें अगदीं स्पष्ट दिसत होतें. परंतु सर्वोदयाच्या संदेशानें लोकहृदयांत असलेली तृष्णा तृप्त होऊं लागली. कारण सर्वोदयाचा संदेशच तृप्त करणारा आहे. ती तृष्णा साऱ्या विश्वामध्यें आहे. सर्वोदय-विचार केवळ भारतापुरताच सीमित नाहीं. तर सबंध विश्वांत तो पसरूं शकतो आणि विश्वाची हि तृष्णा तृप्त करूं शकतो.

आज भारत हा विश्वापासून अलग तुकडा होऊं शकत नाहीं. विश्व आणि भारत यांचेमध्यें कोणता हि पडदा राहूं शकत नाहीं. विश्वांतला कोणता हि विचार भारतांत आल्यावांचून राहणार नाहीं आणि भारतांतला कोणता हि विचार बाहेर विश्वांत गेल्याशिवाय राहणार नाहीं. अशा दोन्ही बाजू आहेत. आणि म्हणून मला मोठा आनंद होत आहे. हें सबंध विश्व माझ्याकडे अत्यंत वेगानें येत आहे. लोहचुंबकाचा पहाड आहे व लोखंडाचें जहाज आहे. त्या जहाजाला लोहचुंबकाच्या पहाडावर जाऊन पडणें भागच असतें. त्याप्रमाणें सबंध विश्वाला माझ्याकडे येणें भागच आहे. यांत मला लेशमात्र हि शंका नाहीं.

## अॅटम् बाँबचें मला भय वाटत नाहीं

या विश्वाच्या कोलाहलांत ज्याची बुद्धि शाबूत राहील तोच टिकेल. आणि बुद्धि शाबूत ठेवणारा सर्वोदय-विचार असल्यामुळें ह्या सर्वोदय विचाराकडे सारें जग धांव घेत आहे. अॅटम् आणि हायड्रोजन बाँबचें मला कांहींच भय वाटत नाहीं. उलट हें जग माझा विचार घेणार आहे आणि आतां अहिंसेला मार्ग मिळाल्यावांचून गत्यंतर च नाहीं असा माझा निश्चय होतो. मी अॅटमचें स्वागत करतों आणि त्याला भूभार हरण करणारा भगवंताचा अवतार मानतों.

## छोटचा हिंसेवरील श्रद्धा भयानक आहे

मात्र मला जर कशाचें भय वाटत असेल तर तें तिरकमठा, पिस्तूल, तलवार यांच्यासारख्या लहान लहान शस्त्रांचें आणि मुलांच्या तोंडांत मारणाऱ्या पालकांच्या हाताचें व विद्यार्थ्याला छडी मारणाऱ्या शिक्षकाच्या छडीचें.

लहान मुलाला त्याची आई सांगते "अरे हा चंद्र आहे." तर तो एकदम श्रद्धेनें तें मानतो. इतका श्रद्धावान् मुलगा देवानें दिला ; त्याला सुद्धां मारायची गरज आईबापांना वाटते. शाळेंत हि शिक्षक मुलांना मारतात. ही जी छोटचा हिंसेवर श्रद्धा आहे ती अत्यंत भयानक आहे.

जगांतल्या मुत्सद्यांची श्रद्धा मोठ्या हिंसेवरून उडाली आहे. कारण त्यानें संहार च होईल अशी त्यांना भीति वाटते. म्हणून त्यांची अॅटम विरुद्ध तक्रार आहे. त्यांचा मर्यादित हिंसेवर विश्वास आहे कारण त्यांना जगावर सत्ता चालवायची आहे. त्यासाठीं त्यांना बंदुका व लाठ्या हव्यात. या शस्त्रांच्या आधारानें च त्यांना आपली सत्ता टिकवितां येईल म्हणून अण्वस्त्रांचे प्रयोग बंद असावेत अशी ते विनंति करीत आहेत.

अॅटम जर चालले तर जगाला अहिंसेशिवाय गती च राहणार नाहीं. हिंसक राज्यें चालणार च नाहींत. म्हणून अॅटम आणि हायड्रोजन बॉम्बचा जोर चालूं दे असें माझें म्हणणें आहे. त्यानें सारें जग अहिंसेकडे येईल. अॅटम जर चालला तर मानवाचा संहार होईल अथवा मानव अहिंसेची दिशा घेईल. परंतु दगडफेंक आणि गोळीबाराची श्रद्धा जोंवर राहील तोंपर्यंत अहिंसेला मुळींच जागा राहणार नाहीं.

## हें काम अमृतबिंदु आहे

ह्या ज्या लहान लहान हिंसा गोळीबार लाठी हल्ल्यासारख्या आपल्या देशांत चालतात त्या प्रगतीला अत्यंत घातक आहेत. त्यामुळें अहिंसा आणि विश्वशक्ति दुरावत चालली आहे. गेल्या सात वर्षांत जें भूदान ग्रामदानाचें काम झालें त्यानें प्रेमशक्ति जागृत करण्याचें कार्य केलें आहे पन्नास लाख एकरांवर जमीन, सहा लाखांवर दानपत्रें आणि साडेतीन हजार ग्रामदानें मिळालीं हें कांहीं तसें फार मोठें काम नाहीं. अल्पच काम आहे, परंतु अल्प असलें तरी तो अमृताचा बिंदु आहे व तो जगाला हि तारणार आहे.

**कोल्हापूर,** ता. ५-५-१९५८

## मी अजून लहानच आहें

लहान मुलांच्यामध्यें बसून बोलण्याचा जेव्हां कधीं मला प्रसंग येतो तेव्हां माझें मन एका विशेष प्रकारानें मोकळें होऊन जातें आणि मला फारच आनंद होतो. तें पाहून एक गृहस्थ म्हणाले कीं लहान मुलांच्या संगतींत तुम्हांला लहानपणची आठवण येत असावी. मीं म्हटलें, लहानपणची आठवण कुणाला होणार ? जो मोठा असेल त्यालाच लहानपणची आठवण होणार! मी मोठा नाहीं. मी लहानच आहें. आतां तुम्हां मुलांना कधीं लहानपणची आठवण होते काय ? तुमच्यापैकीं जो कोणी मोठा होईल त्याला लहानपणची आठवण येईल. पुष्कळ लोक म्हणतात कीं लहानपणीं ते दिवस कसे गेले कळलें सुद्धां नाहीं. खूप खेळावें, उनाडक्या कराव्या, पावसांत खेळावें आईबापांनीं सांभाळ करावा. आणि जबाबदारी कांहींच नाहीं. मी आठवण करतों तर मला आपली एक आठवण येते. मी उन्हांत हिंडत असें, पावसांत उनाडक्या करीत असें आणि डोंगर चढत असें. आज मीं हेंच करीत आहें.

परवां पन्हाळगडचा डोंगर चढून गेलों. एक मोटारचा रस्ता होता, दुसरा बैलगाडीचा होता. मीं म्हटलें हे रस्ते मोठ्या लोकांकरितां आहेत. आपण आपलें सरळ नाकाचा शेंडा धरून जावें. आणि आम्ही तो पन्हाळगड चढून गेलों, तेव्हां लोकांना आश्चर्य वाटलें. म्हणूं लागले हा म्हातारा मनुष्य म्हातारपणीं पोरासारखा पोरकटपणा कसा करतो ? मीं म्हटलें, मी पोर च आहें. तेव्हां पोर पोरकटपणा करणार नाहीं तर काय करणार ? मुलांना दोन च गोष्टी आवडतात. डोंगर चढणें आणि पावसांत खेळणें. मग आई जरी पकडायला आली तरी मुलगा कांहीं थांबायचा नाहीं.

सात वर्षें झालीं मी पावसामध्यें फिरतो आहें. लोक म्हणतात, तुम्ही या वयांत पावसांत कां फिरतां? मी म्हणतों पावसानें सर्वांनाच लाभ मिळतो. कोणी म्हणतात, पावसामध्यें फिरल्यानें प्रकृति बिघडते. वास्तविक

प्रकृति बिघडण्याचें कारण असतें दुसरें च पण खापर फुटतें पावसाच्या डोक्यावर. मोठमोठे लोक मला सांगतात कीं या उन्हापावसांत फिरूं नका, डोंगर चढूं नका, म्हाताऱ्या माणसांना हें सोसतें काय ? मी म्हणतों तुम्ही म्हातारे आहांत, मी म्हातारा नाहीं. इंग्रजीमध्यें एक विशेष गोष्ट आहे. त्या भाषेंत चार वर्षांचा म्हातारा असतो. फोर इयर ओल्ड, फाईव इयर ओल्ड, म्हणतात. किती वर्षांचें तुम्ही म्हातारे आहांत ? मी अठरा वर्षांचा म्हातारा आहें. अशीं प्रश्नोत्तरें इंग्रजींत चालतात. आणि आपल्याकडे सत्तर वर्षांचा तरुण, ऐंशीं वर्षांचा तरुण असतो. आपल्यामध्यें तर एक शंभर वर्षांचे तरुण सुद्धां आहेत. (विनोबाजींनीं मुलांना विचारलें कीं शंभर वर्षांचा तरुण कोण आहे ? त्यांपैकीं कांहीं मुलांनीं एकदम उत्तर दिलें अण्णासाहेब कर्वे )

आपलें हें जें लहान मुलांचें जीवन आहे, तें मोठें गोड आहे. कारण रात्री आपण जे झोंपतों ते अगदीं मेलेल्या माणसासारखे असतो. शेंवटीं आई, अरे, ऊठ रे, म्हणते, तरी मुलगा उठतच नाहीं. शेंवटीं त्याचें अंग धरून गदगदां हलविते. लहान मुलांना अशी झोंप आली पाहिजे कीं कांहीं ऐकूंच येतां कामां नये. गदगदा हालविलें तरच झोंप उघडली पाहिजे. अशी मुलांची गाढ झोंप पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी की एकदां झोंपलें कीं स्वप्नच पडूं नये. स्वप्न पडलें तर तुम्ही म्हातारे आहांत, असें होईल. मला दोन, तीन महिन्यांतून क्वचित एखादें स्वप्न पडतें तेव्हां मला अशी शंका येऊं लागते कीं मी म्हातारा तर झालों नाहीं ! माझ्या लहानपणांत कांहीं उणीव तर आली नाहीं ! म्हणून रात्रीं निःस्वप्नच झोंप यायला हवी ही दुसरी गोष्ट लक्षांत ठेवा.

## लहान मुलांचें पांच मित्र

लहान मुलांनीं आणखी कांहीं गोष्टी लक्षांत ठेवाव्या. थंडी म्हणजे आपला मित्र नंबर एक, पाऊस म्हणजे मित्र नंबर दोन, ऊन म्हणजे मित्र नंबर तीन, वारा म्हणजे मित्र नंबर चार, हे चारहि आपले मित्र च आहेत. लोक यांना आपले शत्रु समजतात. पण तुम्ही मात्र यांना शत्रु मानूं नका म्हणजे झालें. तेव्हां हे आपले चार मित्र आहेत. आणि पांचवा सुद्धां एक आहे. तो कोण ? तो पांचवा म्हणजे मी स्वतः ! असे हे पांच मित्र

आहेत. पांच पांडव आहेत. यांना कधीं भिऊं नये. झोंप नेहमीं गाढ घ्यावी आणि खूप खेळावें. पण लहान मुलांनासुद्धां कधींकधीं चिंता करावी लागते. घराचा भार उचलावा लागतो. कोल्हापूरसारख्या शहरांत राहणाऱ्या मुलाला काम नसतें. पण खेड्यांत मीं अशी लहान लहान मुलें पाहिलीं आहेत, ज्यांचा बाप मजुरी करतो, आई घरकाम करते आणि पांच वर्षांचा मुलगा म्हशीला घेऊन शेतामध्यें चरायला नेतो. पण सक्तीचें प्राथमिक शिक्षण असलें म्हणजे मुलाला जबारदस्तीनें शाळेंत आणतात. मग म्हशीला सांभाळायला कोणी नाहीं. ती विकून टाकावी लागते. म्हैस होती तेव्हां तिचें दूध, लोणी, ताक तरी मिळत होतें. लोणी विकायचें आणि ताक प्यायचें. पण आतां तें घरचें ताक हि गेलें आणि जी थोडीशी मदत मिळत होती ती हि गेली. आणि शेती अशी किती असणार ! मजुरांना शेती नाहींच. आतां कसें होईल या मुलांचें ? तेव्हां जसा आईच्या डोक्यावर आणि बापाच्या डोक्यावर चिंतेचा भार असतो तसा कांहीं लहान मुलांच्या डोक्यावर हि चिंतेचा भार असतो.

## ग्रामदान मुलांसाठींच आहे

ग्रामदान आणि भूदान लहान मुलांसाठीं आहे. मोठमोठे लोक म्हणतात, जगांत समानता झाली पाहिजे, शोषण व्हायला नको. सर्वांना खायला प्यायला ल्यायला समान मिळायला पाहिजे. मी म्हणतों मोठ्यांना समान मिळायला जरा वेळ लागला तरी निदान लहान मुलांना तरी समान मिळत गेलें पाहिजे. पण गरीबांचीं मुलें आणि श्रीमंतांचीं मुलें असा मुलामुलांत फरक केला जातो. तसें पाहिलें तर दोन्हीं मुलेंच आहेत. पण श्रीमंताच्या मुलाला रक्षण, शिक्षण, पोषण, सर्वच मिळतें. ग्रामदानामध्यें आम्हीं असें सांगतों, कीं आम्हीं मुलांकरितांच फिरत आहोंत. मुलांना समान शिक्षण, रक्षण आणि पोषण मिळायला पाहिजे. दोन्ही घरच्या मुलांना एका जागीं राहण्याची सोय करावी. आणि जसे बाल-गोपाल एका जागीं राहत होते तसें राहून गोपाल-काला करून मुलांनीं खावा. आपल्या देशांत पूर्वीं असा गोपालकाला खाऊन बाल-गोपाल राहत होते. तेंच पुन्हां सुरू व्हावें आणि मुलांना दूध, लोणी मिळावें. यासाठीं च भू-दान आणि ग्रामदान आहे. इतरांना मिळायला

वेळ लागूं दे, पण मुलांना समान रक्षण आणि समान शिक्षण मिळायलाच पाहिजे. हा माझा आग्रह आहे. त्यासाठीं माझी यात्रा चालली आहे.

### झोंप आणि पाठांतर

मुलांनीं वेळेवर निजावें. रात्रीं मुलांनीं आठ वाजतांच झोंपावें. कारण बाबासुद्धां आठ वाजतांच झोंपतो. तो एक लहान मुलगाच आहे. म्हणून रोज बाबाची आठवण करून बाबा आतां निजला असेल असें म्हणून आठ वाजलें कीं एकदम झोंपत जा. आणि पहांटे मी फारच लवकर उठतों. कारण मला यात्रा करायची असते. पण तुम्ही पांच वाजेपर्यंत खुशाल झोंपा. पांच वाजतां उठून तोंड वगैरे धुवून अभ्यास करा. रामदासांचे मनाचे श्लोक म्हणा. तुकारामाचे अभंग पाठ करा. रोज एक श्लोक पाठ कराल तर महीन्याचे तीस, वर्षाचे तीनशे साठ आणि दहा वर्षांचें तीन हजार सहाशे श्लोक पाठ होतील. दहा वर्षाच्या लहान लहान मुलांनीं पाठांतर केलें पाहिजे. बाबा ६३ वर्षांचा आहे. पण अजूनहि पहांटे पाठ करीत असतो. एखादा तरी अभंग तुम्हीं रोज पाठ करा. आणि निदान दहा वर्षांपर्यंत हा कार्यक्रम करा. म्हणजे पुढें जन्मभर त्याचा तुम्हांला उपयोग होईल.

कोल्हापूर, ता. ६-५-१९५८

## मुलें गुन्हेगार असत नाहींत : ६ :

हीं रिमांड होमचीं मुलें समोर बसलीं आहेत त्यांच्यासाठीं सभेच्या सुरवातीला चार शब्द सांगतों.

यांच्यासाठीं एक शाळा चालवली आहे, पण तिला शाळेचें रूप आहे, कीं या लहान मुलांनीं अपराध केलेला आहे आणि त्यांना सुधारण्यासाठीं ती शाळा आहे असें तिचें रूप आहे? माझ्या मतें मुलें अपराध कधींच करीत नाहींत. जो अपराध होतो तो मुलांचा नसतो, अज्ञानाचा असतो. अज्ञान हें बुद्धींत राहतें हातापायांत राहतें. परंतु मुलांचा संबंध त्या अपराधाशीं नसतो. कांहीं चुका मुलांच्या हातून झाल्या असतील आणि त्या सुधारतील हि. पण आतां

असें पहा घरामध्यें चोरी केली नाहीं अशीं किती मुलें असतील ? असें जर विचारलें तर क्वचितच एखादा नाहीं म्हणणारा निघेल. मला आठवतें आमच्या घरांत एका मुलानें चोरी केली. मग आजीनें आजोबांजवळ तक्रार केली कीं या मुलानें चोरून गूळ खाल्ला. तेव्हां आजोबा म्हणाले 'त्यानें चोरी केली नाहीं. त्यानें न मागतां गूळ खाल्ला इतकेंच. याला कांहीं चोरी म्हणत नाहींत. हें घर हि त्याचें आहे आणि गूळ हि त्याचा आहे. मागूनसुद्धां त्याला गूळ मिळाला असता, न मागतां हि त्याला गूळ मिळालाच.' आणि मग ते त्या मुलाला म्हणाले–"हें बघ तूं केव्हां हि गूळ माग तुला तो मिळेल हं.आणि गूळ घेतांना तूं हात धुतले होतेस काय?" मुलगा म्हणाला, नाहीं. मग त्याला त्यांनीं समजावलें हात धुऊन आणि ते फडक्याला पुसून मग गूळ घ्यायचा. तेव्हांपासून त्याची दिवसेंदिवस चोरी करायची संवय गेली. त्याला कुणी कांहीं हि म्हटलें नाहीं. चोरी म्हणजे काय, ती कोण करतो हें एक गहन शास्त्र आहे. म्हणून अमक्यानें चोरी केली असा आरोप आपण कधीं हि करूं नये. बुद्धीचे दोष असतात ते शिक्षणानें जातात. हातापायाचे दोष असतात ते वळणानें जातात. तेव्हां कांहीं शिक्षण लागतें कांहीं वळण लागतें. त्यासाठींच आश्रमसारख्या संस्था हव्यात.

## एक आडदांड मुलगा

एकदां एका बापानें आपला आडदांड मुलगा माझ्याकडे आणला आणि म्हणाले 'तुम्ही याला आपल्या आश्रमांत ठेवतां काय?' तेव्हां मीं त्यांना चटकन् म्हटलें कीं 'मला आडदांड मुलगा हवाच पण त्याची इच्छा असेल तर पहा. कृष्णाच्या खोड्या लोक प्रेमानें गातात. त्याच्या आडदांडपणाला कोणी विचारांत घेत नाहींत. या लहान मुलानें दुसऱ्याच्या घरांतली वस्तु घेतली असें म्हणता. त्याला कसला दुसरा परका भेद ! त्याच्याजवळ हा भेदच नाहीं. अशीं मुलें मला फार आवडतात. म्हणून माझ्याकडे त्या मुलाला अवश्य ठेवा' हें ऐकून तो मुलगा खूष झाला. कारण आडदांड मुलगा पाहिजे असें म्हणणारा त्यानें दुसरा पाहिला नव्हता. तो मुलगा आमच्या आश्रमांत आला, त्यानें काहीं हि आडदांडपणा केला नाहीं

तो सगळीं कामें करी. लोक म्हणत तो सुधारला. मी म्हणायचा तो विघडला नव्हता, सुधारलेला च होता.

## मुलांना गुन्हेगार म्हणणें हाच गुन्हा

एखाद्या मुलाच्या नाकांतून शेंबूड वहातो, त्याला 'कायरे तूं शेंबडचा!' असें म्हणतात. खरोखर का तो शेंबडा आहे? त्याच्या नाकाला शेंबूड आहे ही गोष्ट खरी, पण तो तुम्हीं काढला तर तो स्वच्छ होईल. मग त्याला शेंबडा म्हणतां येईल काय? तुम्हीं चारपांच वेळा त्याचा शेंबूड धुऊन दिला तर शेंवटीं तो आपोआपच धुऊं लागेल. तो शेंबडा नाहीं. आंतून तो शुद्ध निर्मळ आहे. तो परमेश्वराची मूर्तिच आहे, हरीचें रूप आहे. बाळकृष्ण आहे म्हणून त्याच्या नाकाला शेंबूड आहे. तो अवश्य धुतला पाहिजे. पण 'तूं शेंबडा' असा आपण मुलावर आरोप करतों. हा आपण एक गुन्हाच करतों. माझ्यापाशीं आठ दहा वर्षांचीं लहान लहान मुलें आलीं, तेव्हां मीं त्यांना गीता आणि उपनिषद् शिकविलें आहे. माझा अनुभव आहे कीं मोठ्यांना जें कठिण जातें तें लहान मुलांना जात नाहीं.

हीं समोर बसलेलीं मुलें मला फार छान दिसतात. कोण सांगूं शकतो कीं यांच्यांतून ध्रुव प्रह्लाद निघणार नाहींत म्हणून! त्यांच्या हातून एकदां दोनदां, चारदां चुका झाल्या तरीपण त्यांचें कांहीं बिघडलें नाहीं. हा देह रोज घाणेरडा होतो, तरीपण आपण त्याला रोज धुतों. ६३ वर्षें झालीं मी रोज आंघोळ करतों. माझा देह रोज मळतो पण मीं कांहीं हार खाल्ली नाहीं. तो म्हणतो मी रोज मळणार; मी म्हणतों मी तुला रोज धुणार. तो आपला हट्ट सोडत नाहीं म्हणून 'जाऊंदे मी त्याला धुणार नाहीं. चार दिवस राहिला घाण तर राहूंदे,' असें कांहीं मी म्हणत नाहीं. अशी हारच मी खात नाहीं. ज्याच्या हातून चुका होऊं शकतात त्याच्या हातून पुण्य हि होऊं शकतें. हा लाउडस्पीकर आहे, हा दगड आहे, ते पाप हि करूं शकत नाहींत, पुण्य हि करूं शकत नाहींत. जो चुका करूं शकतो तो त्या सुधारूं हि शकतो. आणि जो पाप करूं शकतो तो पुण्य हि करूं शकतो. म्हणून हातानें भगवंताचें काम करायचें आणि तोंडानें भगवंताचें नांव घ्यायचें असें शिक्षण मुलांना मिळालें पाहिजे.

मात्र फक्त त्यांनाच कामाला लावून उपयोगाचे नाही, त्याच्यावरोबर आपण हि काम केलें पाहिजे. असें होईल तर हीं मुलें महान् होतील. ज्या महापुरुषांनीं आपलीं चरित्रें लिहिलीं आहेत त्यांच्यापैकीं कांहींनीं त्यांच्या लहानपणच्या चुका लिहिल्या आहेत. म्हणून या मुलांमधून हि महान् पुरुष निघू शकतील. माझ्यामतें या मुलांना परमेश्वराचीं लेकरें समजून त्यांची सेवा व्हायला हवी. त्यासाठीं त्यांना एखाद्या ऋषीच्या आश्रमांत ठेवलें पाहिजे. तीं खोडकर मुलें जरी असलीं तरी तीं ज्ञानी निघू शकतील. ज्ञानी माणसाच्या संगतींत त्यांचें ज्ञान वाढेल, माझें तर असें मत आहे कीं माणसांना सुधारण्यासाठीं जेल, शिक्षा, दंड वगैरेंचा कांहीं हि उपयोग नाहीं, त्यानें कांहीं हि काम झालेलें नाहीं. त्यासाठीं आश्रमच हवेत.

रुकडी (कोल्हापूर) ता. ८-५-५८

## भारताला जग जिंकण्याची संधि आली आहे : ७ :

### ' दुर्लभं भारते जन्म '

या भरतखंडांत जन्म मिळणें मोठें भाग्याचें आहे.' दुर्लभं भारते जन्म.' ऋषी याच्यापुढें जाऊन म्हणतो— ' मानुष्यं तत्र दुर्लभं ' त्यांतल्या त्यांत मनुष्याचा जन्म मिळणें फारच भाग्याचें. म्हणजे पहिल्या वाक्यावरून भारतांत किडा मुंगीचा जन्म लाभण्यासाठीं सुद्धां मोठेंच भाग्य लागतें असा ध्वनि निघतो. मातृभूमिसंबंधी असा उद्गार दुसऱ्या भाषेंतील साहित्यांत माझ्या पाहण्यांत नाहीं. इंग्रजी फ्रेंच जर्मनी या भाषेचीं राष्ट्रगीतें मीं पाहिलीं आहेत. पण कुठें हि मला असा उद्गार पहायला सांपडला नाहीं. असें हें विलक्षण वाक्य आपल्या पूर्वजांनीं लिहिलें. तें कां लिहिलें असेल? हा काय खुळेपणा आहे ? अशा तऱ्हेचें या मातींत विशेष आहे तरी काय कीं ज्यामुळें घोडा मुंगी किडा यांचा जन्म सुद्धां भाग्याचा ठरावा ! याचें कारण या भूमींत सत्पुरुषांनीं निरंतर यात्रा केल्या आहेत, हजारों वर्षांपासून

त्या चालू आहेत. अशा सत्पुरुषांच्या पादस्पर्शानें ही माती पावन झाली आहे. म्हणून या भूमींत किडयाचा सुद्धां जन्म धन्य मानला जातो. इथल्या जमिनींत चांगलें पीक येतें, मोठमोठे डोंगर आहेत, मोठमोठ्या नद्या आहेत अशा तऱ्हेचें भौतिक सृष्टीचें वैभव, अभिमान वाटण्यासारखें, इथें नाहीं. कारण दुसऱ्या देशांत इथल्यापेक्षां मोठमोठे पर्वत व नद्या आहेत. परंतु इथला विशेष हा कीं पावसासारखी सत्पुरुषांची सुद्धा अखंड वृष्टि येथें झाली आहे. महाराष्ट्र काय, तमिळनाड काय, ओडिसा काय, बिहार काय, आंध्र काय, असंख्य सत्पुरुषांचा विहार या भूमींत झाला. म्हणून या भूमींत परोपकारासाठीं आपला जन्म झाला आहे असें ऋषीला सुचवायचें आहे. ही संतांची भूमि आहे म्हणून आपण धन्य आहोंत. भोगविलासासाठीं आपला जन्म या भूमींत झाला नाहीं. नरदेह हा उन्नतीचें साधन आहे. अनेक सत्पुरुषांनीं या भरतखंडांत जन्म घेतला आहे आणि या भूमीला पावन केलें आहे. इथें सत्पुरुषांचेंच नांव शिल्लक आहे. इतर असंख्य राजे महाराजे होऊन गेले, पण त्यांचें नांव निशाण शिल्लक नाहीं. 'ज्ञानबा-तुकाराम' हा उद्‌घोष मद्रास कोइमतूर मदुरा या शहरांत सहा सहा मैल तीन तीन मैल मीं ऐकला. एके काळीं महाराष्ट्रामधून तमिळनाडमध्यें महाराष्ट्रीय मंडळी जाऊन तिथेंच स्थायी झाली आहेत आणि 'ज्ञानबा-तुकाराम' चा जय बोला करणारी ही मंडळी महाराष्ट्रांतून गेलेली मंडळी असावी, असें मी समजलों होतों. पण चौकशी केल्यावर मला कळलें कीं ती मराठी मंडळी नसून तमिळनाडची तमिळ मंडळी आहेत. तेंव्हा अशा या भूमींत नरदेहाचा जन्म घेऊन आपण परोपकार करणार नाहीं, आपला देह व देह-संबंधींचें तेवढें पाहूं तर नरदेहाचा लाभ आणि या देशांतल्या जन्माचा लाभ आपण घेतला नाही असें होईल.

## स्वराज्यानंतर भारताचा आवाज प्रभावी झाला आहे

स्वराज्यानंतर जगामध्यें आपली गणती होऊं लागली आहे. पूर्वी भारताचा नकाशा लालच लाल रंगाचा होता. हिन्दुस्थानच्या मोठ्या नकाशांत कोपऱ्यांत लहानसें इंग्लंड दाखवीत, इतकें ते आपल्याला अपमानीत करीत. म्हणजे इतका लहानसा इंग्लंड देश पण एवढ्या मोठ्या हिंदुस्थानवर त्याचें

कसें साम्राज्य पसरलें आहे, हें दाखवण्याचा त्यांतला हेतु. त्यावेळीं मानवामध्यें आपली गणना च होत नसे. आम्हांला कांहीं महत्त्व आहे, विचार आहे, याची गणतीच नव्हती. आतां जगांत हिन्दुस्थानचा आवाज ऐकू येतो. आतां बाहेरच्या जगांत तुम्ही गेलांत, व मी बंगालचा आहें, मी गुजरातचा आहें, मी बिहारचा आहें, महाराष्ट्राचा आहें असें कांहीं त्यांत सांगतां येणार नाहीं. त्यांना तुमचें हें म्हणणें समजणारच नाहीं. काश्मीर ते कन्याकुमारी आपला देश एकच आहे. तेव्हां 'आंध्रमाता की जय,' 'कर्नाटक माता की जय' असें लहान लहान माता की जय करून चालणार नाहीं. भारतमाता सुद्धां आजच्या युगांत अपुरी पडणार आहे. हें सारें विश्व आमचें आहे. कारण व्यापक भावना झाली पाहिजे ही आजच्या विज्ञानयुगाची गरज आहे. म्हणून यापुढें 'भारत माता की जय' ही घोषणा सुद्धां कमीच आहे. आम्ही जर असे लहान झालों तर या युगांत टिकणार नाहीं.

## क्षुद्र बनूं नका

शाळेंत लहान मुलांना भूगोल शिकवितांना प्रथम तालुक्याचा मग जिल्ह्याचा मग प्रांताचा असें करीत करीत शेंवटीं जगाचा भूगोल शिकवितात. असा उलटा कारभार चालतो. त्या ऐवजीं प्रथम साऱ्या जगाचा भूगोल शिकविला तर च त्यांची दृष्टि विशाल होईल, त्यांचीं हृदयें महान् होतील. सबंध विश्वांत चन्द्र तारे वायु आकाश हें सर्व आहे आणि त्यात ही छोटीशी पृथ्वी हि आहे. तुकारामानें सांगितलें "**अमुचा स्वदेश भुवनत्रयामधें वास**" "**संकोचोनि काय झालासी लहान। घेईं आपोषण ब्रह्मांडाचें**" संकोचून तूं असा लहान कशाला झालास ? ह्या सर्व विश्वाचें आपोषण घे. असें तुकाराम सांगतों. आणि शाळेंत जिल्ह्याचा भूगोल, अमक्या अमक्याचा मरतुकडा, इतिहास शिकवितात. बाबर, औरंगजेब, अकबर हे सर्व मरून गेले. आम्ही जिवंत आहोंत. मेलेल्यांच्या मरणाचा भार आम्हीं आमच्या डोक्यावर कशाला घ्यायचा ? म्हणून लहान मुलांना विश्वव्यापक दृष्टि शिकविली पाहिजे. त्याशिवाय जगांतल्या पुण्यशक्तींचें भान होणार नाहीं.

एके काळीं जपान व अमेरिकेला तोडणारा पॅसिफिक महासागर आज जोडणारा झाला आहे. जपानला पूर्वीं फारईस्ट–अति पूर्व–आणि अमेरिकेला

फारवेस्ट-अति-पश्चिम-असें म्हणत. समुद्रानें ते दोन्ही प्रदेश आज जोडले गेले आहेत. दोन्ही राष्ट्रें शेजारी मानलीं जातात. इतकी व्यापकता विज्ञानानें आली आहे.

आमच्या आत्मज्ञानी पुरुषांनीं सुद्धां सांगितलें, **एतद्देशप्रसूतस्य सकाशात् अग्रजन्मनः। स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः।** 'पृथ्वींतील माणसें चारित्र्याची आणि पुण्याची शिकवण या देशांतील मानवाकडून घेतील,' असें भविष्य मनूनें वर्तविलें होतें. येथील महापुरुषांच्या मुखानें जगाला चारित्र्याची शिकवण मिळेल हा त्यांचा विश्वास होता. तेव्हां आज आतां अशा विशाल विज्ञानाच्या व्यापक युगांत जन्म घेऊन भारत संकुचित झाला आणि आमचा महाराष्ट्र देश, आमचा बंगाल देश असें बोलूं लागला, असा विचार करूं लागला तर तो मार खाईल आणि हार खाईल. एकीकडून आत्मज्ञान आणि दुसऱ्या बाजूनें विज्ञान या दोन्हींचें एक मत झालें आहे. त्या एकमतापुढें आम्ही उलटें वागूं आणि वर मार खाणार नाहीं व हार खाणार नाहीं असें ज्यांना वाटतें ते डोळे असून आंधळे आहेत. आत्मज्ञान आणि विज्ञान यांनीं गट्टी केली आहे. असें असून हि ज्यांनीं संकुचित अभिमान राखला आहे त्यांना दोन डोळे असून एका हि डोळ्यांत दृष्टि आली नाहीं असेंच म्हणावें लागेल.

## विश्वभाषा कोणती ?

एकदां एके ठिकाणीं बोलतांना मीं असें म्हटलें होतें कीं यापुढें जगामध्यें एकच भाषा टिकेल आणि ती म्हणजे गीतेंत सांगितलेली स्थितप्रज्ञाची भाषा– "**स्थितप्रज्ञस्य का भाषा**" संस्कृत बंगाली मराठी ही कांहीं ती भाषा नाहीं. ती भाषा आहे प्रेमाची, समतेची, शांतीची. एक दिवस विजेसारखी चमक डोक्यांत आली आणि एक अद्‌भूत विचार सुचला. मीं सांगितलें, आज जगामध्यें इंग्रजी भाषा चालते. यापुढें ज्या भाषेंत सायन्स जास्त आहे, त्या भाषेंत साहित्यहि जास्त होईल, परंतु त्या सगळ्या भाषांपेक्षां जी भाषा जगांत प्रेमाचा आणि शांतीचा संदेश देईल, त्या च भाषेचा प्रचार जास्त होईल. समजा जर्मन लोकांनीं असें ठरविलें, कीं आजवर शस्त्रास्त्रांची वाढ केली आणि दुसऱ्या देशावर स्वाऱ्या केल्या पण आतां ती सर्व शक्ति

सेवेच्या आणि प्रेमाच्या कामीं लावायची आणि दुसऱ्या देशांना शस्त्राऐवजीं प्रेमानें आणि सेवेनें जिंकायचें, तर मी भविष्य सांगतों कीं जर्मन भाषा जगामध्यें चालेल. मग जर्मनीमध्यें भांडणें होणार नाहींत, कोर्ट कचेऱ्या राहणार नाहींत, आणि भूमिमालक कोणी असायचा नाहीं असें होईल. पूर्वीं साम्राज्यवाद्यांनीं आपली भाषा चालवली पण आतां साम्राज्याऐवजीं जगामध्यें साम राज्य करूं, राम राज्य करूं आणि शांतीचें राज्य करूं असें जी भाषा बोलेल आणि त्याप्रमाणें आचरण करील ती च भाषा जगांत चालेल. म्हणून मराठी भाषेच्या लोकांना हें एक आवाहन आहे. ज्या भाषेंत ज्ञानेश्वर बोलला ती भाषा जगाची होऊं शकते. जर आपण या प्रांतांतील मालकी वाटून टाकूं, प्रत्येकाच्या वाटचाला कमी येईल तर येईल पण वाटून खाऊं असें झालें तर इथें शांति होईल आणि विलक्षण शक्ति प्रगट होईल. ज्ञानदेवानें ज्ञानेश्वरी कोणाला अर्पण केली? 'माझ्या मराठीच्या प्रेमळ वाचकांना मी हा ग्रंथ अर्पण करतों'– असें कांहीं त्यांनीं म्हटलें नाहीं "**आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावें पसायदान हें ।।**" माझ्या या वाग्यज्ञानें माऱ्या विश्वाला प्रसन्न वाटलें पाहिजे अशी च इच्छा त्यांनीं प्रगट केली आहे. आणि लोकमान्यांनीं "श्रीशाय जनतात्मनें" असें लिहून गीतारहस्य अर्पण केलें आहे. त्यांची ती भूमिका होती म्हणून तो शब्द त्यांच्या मुखांतून निघाला. परंतु ज्ञानदेवांच्या मुखांतून काय निघालें? "विश्वात्मके देवें" सर्व त्रिभुवनांतले च लोक तोषवावे अशी त्यांची प्रतिज्ञा होती. अशी विशाल भाषा जो बोलला ती जगभर पसरूं नये का? ही मराठी भाषा लोकांनीं शिकावी अशी हौस तुम्हांला वाटत नाहीं काय? म्हणून म्हणतों कीं शांतीची आणि प्रेमाची भाषा जे बोलतील आणि त्याप्रमाणें आचरण करतील त्यांची च भाषा जगांत चालेल हें तुम्ही तुमच्या डायरींत लिहून घ्या.

## भारताला जग जिंकण्याची संधि आहे

म्हणून या मराठी प्रांतांत मालकी नाहीं, भांडण नाहीं. "असा हा प्रांत तुम्हीं बनविला तर या प्रांताची भाषा जगाला प्रिय होईल मग मराठी भाषा अद्भूत आहे रे, त्या भाषेचे लोक परस्पर सहकार्यानें आणि प्रेमानें रहातात. ती भाषा आपण शिकूं या" असें लोक म्हणतील. माझ्या म्हणण्याचा भावार्थ

असा आहे कीं हिंदुस्थानला जग जिंकण्याची संधि मिळाली आहे. तूं ॲटम राखणार तर मी माझी सुरी फेकून देतों– असें म्हणूं तर आपली शक्ति प्रकट होईल. म्हणून प्रेमाच्या शक्तीनें, शांतीच्या शक्तीनें, अहिंसेच्या शक्तीनें जग जिंकण्याची संधि आपल्याला आली आहे. आपण ग्रामदानाचें काम करूं आणि हिंदुस्थान तें काम करूं शकतो, असें माझें म्हणणें आहे आणि तसा माझा दावा आहे.

हा विचार परदेशच्या माणसांना मान्य होतो म्हणून अमेरिका जर्मन रशिया इंग्लंड वगैरे देशांतील लोक कुतूहलानें येतात व हा विचार त्यांना पटला असें सांगुन जातात. वास्तविक भारतांत फार मोठें काम झालेलें नाहीं पण जें कांहीं थोडें काम झालेलें आहे त्याचें त्या लोकांना कौतुक वाटतें. जगाचें लक्ष त्यानें वेधून घेतलें आहे. म्हणून आपण इंग्रजांना जसें 'क्विट इंडिया' म्हटलें तसें आतां म्हटलें पाहिजे– 'हे बये ! हे मालकी ! तूं येथून निघून जा' 'हे राक्षसिणी मालकी सोड ! हिंदुस्थान, आपापसांत जर आपण प्रेम ठेवूं तर मालकीला आपण असें सांगू शकूं. शस्त्रशक्तीनें अथवा संपत्तीनें तें होणार नाहीं, प्रेमानें च तें होऊं शकतें असें माझें मत आहे.

रुकडी, (कोल्हापूर) ता. ८-५-१९५८

# सर्वोदय- पात्र आणि शांति-सेना : ८ :

इचलकरंजीचें संस्थान कोल्हापूरसकट भारतांत विलीन झालें, पण एके काळीं तें टुमदार आणि लहानसें संस्थान म्हणून प्रसिद्ध होतें. इथल्या जनतेमध्यें जागृतीची भावना पुष्कळ आहे ही गोष्ट मला पूर्वींपासून माहीत होती. आणि मी इथें आल्यानतर मला अनुभव हि तसा च आला. आज दिवसभरांत निरनिराळे लोक भेटले आणि त्यांच्याशीं अनेक प्रकारची चर्चा झाली त्यावरून गांवांत जागृतीची भावना आहे याचा स्पष्ट ठसा माझ्या चित्तावर उमटला. कांहीं स्त्रिया हि आल्या होत्या. त्यांनीं सर्वोदय-पात्राचा आरंभ केला आहे. सर्वोदय-पात्राची योजना शांति-सैनिकांसाठीं केलेली आहे. या विषयावर मी अनेकदां पूर्वीं बोललेलों आहें परंतु आज मला पुन्हां सांगण्यांत आलें कीं मीं पुन्हां या विषयावर बोलावें. म्हणून "**विवरलें चि विवरावें**" या शिकवणीप्रमाणें पुन्हां एकदां या तुमच्या नगरीमध्यें बोलतों.

## हल्लींच्या हवेंत च अशांतता

आज विश्व-समाचारमध्यें एक बातमी मीं वाचली. विश्व-समाचार नांवाचें एक दैनिक आमच्या यात्रेंतल्या मंडळीमध्यें निघत असतें. अनेक दैनिकें वाचण्याचा माझा श्रम वाचावा म्हणून कृपाळु होऊन आमच्या मित्रांनीं हें चालू केलें आहे. त्यामध्यें नलगोंड्याची बातमी होती. नलगोंडा हें आमचें प्रिय स्थान आहे. त्या जिल्ह्यांत च प्रथम भूदान-यज्ञ सुरू झाला. त्या ठिकाणी आमचें दोनदां जाणें झालें. तो आमचा खास जिल्हा आहे. त्याची बातमी आज विश्व समाचारांत होती.' शाळेमध्यें पेपर कठिण निघाला त्यामुळें रिझल्ट कडक लागला आणि जेवढीं मुलें पास व्हायला पाहिजे होतीं, त्यापेक्षां कमी च पास केलीं अशी तक्रार विद्यार्थ्यांनीं केली. त्याला अनुसरून पासांचें प्रमाण वाढवून ३२ वरून ४० वर नेलें. पण तेवढ्यानें विद्यार्थ्यांचें समाधान झालें नाहीं, आणि त्यांनीं दगडफेंक केलीं. अशी ती बातमी आहे. थोड्या दिवसांपूर्वी औरंगाबादला हाच नमुना

घडला होता. विषय हाच होता. पद्धति ही च होती. असे च प्रकार ठिकठिकाणीं चालू आहेत. आपल्या या देशामध्यें अशी एक हवा १९४२ च्या आंदोलनापासून सुरू झाली आहे. त्या आंदोलनामध्यें याचें बीज पेरलें गेलें.

आतां आपण सबंध विश्वाचे नागरिक झालों आहोंत. पूर्वी आपल्याला कांहीं स्थानच नव्हतें. भारताच्या नकाशावर एकच लाल रंग पसरला होता आणि भारत एका साम्राज्याचें एक अंग होता. पण आतां भारत स्वतंत्र झाला आहे आणि विश्वांत त्यांचें कांहीं कार्य आहे. इथें जें कांहीं घडतें त्याचा पडसाद जगामध्यें उमटतो याचें भान अजून आपल्याला झालेलें नाहीं. शहरांमधून अनेक निमित्तानें या असल्या प्रकारच्या दंगली होत असतात.

## मग सैन्य-संभार कसा कमी होणार ?

माझ्या डोक्यांत असा विचार येतो कीं असेंच जर इथें चालायचें असेल तर सरकारला " तुम्ही सैन्य कमी करा, सैन्याचा भार कमी करा " असें सांगायला मला हिंम्मत च होणार नाहीं. भारताचा तीनशें कोटि रुपयांचा खर्च आज सैन्यावर होत आहे, आणि हा खर्च बरा च जास्त आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. तथापि असे दंगलीचे प्रकार आज सर्वत्र चालू असतांना आणि त्या त्या ठिकाणीं अंतर्गत शांतीसाठीं पोलीसांची मदत घेण्यांत येते अशी एकूण स्थिति असतांना, सैन्य-संभार कमी करा, असें सांगण्याची मला हिंमत होईल कशी ? आज तीनशें कोटि रुपयांचा लष्करावर खर्च म्हणजे तुमच्या आमच्या रक्षणासाठीं सरकारवर केवढें मोठें हें ओझें ! असाच तिकडे पाकिस्तानमध्यें लष्करावर खर्च होतो. तें राष्ट्र लहान म्हणून त्यांचे शंभर कोटि रुपये लष्करावर खर्च होतात. दोन्ही मिळून देश एकच, आपले च ते भाऊ आणि दोघांचा मिळून चारशें कोटींचा खर्च ! हा सारा खर्च परस्परांचा अविश्वास आणि भय यामुळें होऊन राहिला आहे.

## देशाचे षड्रिपु

भारत कृषिप्रधान देश आहे असें अर्थशास्त्री म्हणतात आणि याच वाक्यापासून ते आपलें लिहिणें सुरू करतात. परंतु त्या कृषिप्रधान भारताची

अशी दशा आहे कीं देशाला लागणारें धान्य कांहीं तिथून पुरें निघत नाहीं ! याचें कारण धान्याचे जे षड्रिपु, ऊंस कापूस ज्यूट तंबाखू हळद मिरची, यांची च वाढ केली जाते. ही जी सर्व यादी मीं सांगितली तीं सारीं पैशाचीं पिकें आहेत. आणि पैसा कशासाठीं हवा तर परदेशांतून धान्य आणण्यासाठीं ! जमीन कमी पडते त्यामुळें धान्य कमी पैदा होतें, धान्य कमी पैदा होतें त्यामुळें परदेशांतून तें मागवावें लागतें, त्यासाठीं पाहिजे पैसा आणि पैसा मिळतो तंबाखू ज्यूट मिरची कापूस या सारख्या पिकांतून. म्हणून असलीं पिकें काढायचीं असें हें सर्व उलटें चाललें आहे. भारताचा विकास करायचा हा मार्ग नव्हे बाबा ! त्याच्या विकासाचें साधन निराळें च आहे. ही जी सैन्य-शक्ति आहे त्यांतून सुटका झाल्याशिवाय भारताचा विकास शक्य नाहीं.

स्वराज्यापूर्वी आपण म्हणत असूं कीं इंग्रजांचा आपल्यावर अविश्वास आहे म्हणून त्यांना सैन्य जास्त ठेवावें लागतें आणि त्यासाठीं त्यांना खर्च करावा लागतो. आमच्या हातीं सत्ता आली तर हा खर्च आम्ही निम्म्यावर आणूं अशा प्रकारचे ठराव हि पूर्वी काँग्रेसनें केलेले आहेत. परंतु स्वराज्य-प्राप्तीनंतर आपण जो सैन्यावर खर्च करतों तो कमी न होतां उत्तरोत्तर वाढत च राहिला आहे. 'आमचा देश फार मोठा त्याची फ्रंट मोठी' या गोष्टी सांगून कांहीं उपयोग नाहीं. इंग्रजांच्या राज्यापेक्षां हा भार कमी झाला नाहीं, ही गोष्ट खचित. याचें कारण हि जनतेमध्यें च आहे स्वराज्यानंतर जनता अधिक अनाथवत् बनली आहे आणि आपलें हि कांहीं कर्तव्य आहे असें न मानतां ती सर्वस्वी सरकारच्या मदतीवर विसंबून आहे.

हिंदुस्थान स्वतंत्र झाला असें बोललें जातें. परंतु ज्या योजना बनत असतात त्यांचा अर्थ इतका च कीं आम्ही अजून गुलाम आहोंत. ही गुलामगिरी गेल्याशिवाय देशाची उन्नति कशी होणार ? अंतरगत शांतीचा भार पोलीस आणि लष्करावर न पडतां त्यासाठीं शांति-सेना उभी झाली पाहिजे आणि आपलें रक्षण करण्याकरतां जनतेनें तयार झालें पाहिजे असें मीं सुचविलें आहे आणि त्याप्रमाणें शांति-सेनेंत लोक दाखल होऊन राहिले आहेत.

## सर्वोदय व्यावहारिक आहे

सात वर्षांपूर्वी असें बोललें जात होतें कीं सर्वोदय फार चांगला आहे पण तो अव्यवहार्य आहे मग त्याचा उपयोग काय ? पण सात वर्षांनंतर आतां देशामध्यें सर्वोदयाविषयीं श्रद्धा वाढूं लागली आहे. येलवालला एक परिषद झाली, त्या परिषदेला भारतांतल्या विविध पक्षांचे नेते आले होते. त्यांनीं एकमतानें असें सांगितलें कीं "या आंदोलनानें राष्ट्राचें भौतिक आणि नैतिक उत्थान होत आहे, म्हणून सर्वांनीं याला सहकार्य द्यावें." म्हणजे सर्वोदय हा नुसता चांगला च राहिला नाहीं तर तो चांगला असून व्यावहारिक आहे अशी मान्यता त्याला व्यावहारिक नेत्यांनीं दिली. मला सर्वोदय प्रिय च आहे कारण मुलाला आपली आई प्रिय च असते. पण व्यावहारिक नेत्यांनीं देखील, सर्वोदयामध्यें देशाची नैतिक आणि भौतिक उन्नति दिसते आणि म्हणून तो देशाला हवा आहे असें म्हटलें त्यानें माझें मूठभर मांस वाढलें आहे व आतां मी एक पाऊल पुढें टाकूं शकतों, असें वाटूं लागलें आहे. अशा प्रकारें सर्वोदयाची प्रतिष्ठा सिद्ध झाल्यानंतर सर्व-सेवा-संघ आणि सरकार यांच्या सहकार्याचा करार झाला. आतां सरकार-पुढें सर्व-सेवा-संघाचा हिशोब काय ? सबंध देशाच्या मताचें सार्वभौम सरकार कुणीकडे आणि दुसऱ्या बाजूला हा वामनरूपी सर्व-सेवा-संघ कुणीकडे ! पण त्याच्या नैतिक शक्तीला मान्यता मिळाली आणि सरकारनें त्याला अनुसरून कम्युनिटी प्रॉजेक्टचा उद्देश बदलून ग्रामस्वराज्याला तो जसा हवा तसा करून घेतला. ही केवढी मोठी घटना आहे ! ही क्रांति नाहीं तर काय आहे ?

## सर्वोदयाची नैतिक शक्ति शांति स्थापील

एका मोठ्या सार्वभौम सरकारनें सर्व-सेवा-संघासारख्या एका लहानशा संस्थेचें सहकार्य घ्यावें आणि कम्युनिटी प्रॉजेक्टचा उद्देश च बदलावा ही घटना सामान्य नव्हे. विचार-परिवर्तनाची प्रक्रिया किती सूक्ष्म रीतीनें होते त्याचें हें दर्शन आहे. पंचवार्षिक योजनेसाठीं सरकारनें अनेक गोष्टींवर कर बसविला आहे, आणि तोंड वांकडें करून कां होईना लोकांनीं तो मान्य केला आहे. परंतु भूदान आणि संपत्तिदानमध्यें जी रक्कम दिली जाईल

तिच्यावर कर राहणार नाहीं अशी बातमी विश्व-समाचारांत मला वाचायला मिळाली. हिंदुस्थानचें सरकार संपत्तिदानावर कर घेणार नाहीं ही घटना काय दर्शविते ? व्यापाऱ्यांना हें एक प्रकारचें आवाहन च दिलें गेलें आहे. नैतिक शक्तीला किती वाव दिला आहे हा ! वाव केव्हां दिला ? जेव्हां हा कार्यक्रम नुसताच चांगला नाहीं तर व्यवहार्यदेखील आहे असें सिद्ध झालें तेव्हां. अशा प्रकारें नैतिक शक्तीला वाव देणें लोक-सरकारचें कर्तव्य ठरतें आणि लोक-सरकारला तें काम करावें च लागतें.

आतां लोक मला म्हणतात कीं " तुम्ही सैन्य कमी करा म्हणून म्हणतां परंतु देशांत जी अशांति चालते त्यावर तुम्ही कांहीं करूं शकतां काय ? करूं शकत असाल तर करा." असें सांगण्याची हिंमत आतां देशाला वाटूं लागली आहे. ते म्हणतात " सर्वोदयामधें अशी एक शक्ति आहे—नैतिक शक्ति—जिच्या जोरावर देशामध्यें शांति नांदेल अशी श्रद्धा, असा विश्वास हिंदुस्थानांत आला आहे. सर्वोदयाचे विचारक कोणत्या हि एका पक्षाचे नाहींत, ते सर्व पक्षांत आहेत आणि रचनात्मक कार्यांत हि आहेत तसे च ते जनतेमध्यें हि आहेत तेव्हां अंतर्गत शांतीची जबाबदारी तुम्ही उचलतां काय ? तुम्ही ती जबाबदारी उचलूं शकत नसलां तर सर्वोदयाचें राज्य कसें होईल ? कारण ज्या शक्तीनें रक्षण होईल तिचें च राज्य चालेल. जी शक्ति रक्षण करणार नाहीं तिचें अधिराज्य होईल च कसें ? अहिंसा, करुणा, दया हें सर्व मान्य पण हे सर्व बचाव करणारे हि आहेत असें झालें तर च या गुणांचें अधिराज्य व्हायचें " हें त्यांचें म्हणणें बरोबर आहे, आणि त्यासाठींच शांति-सेना उभी केली पाहिजे.

## सर्वोदय-पात्र ठेवणें म्हणजे सर्वोदयाला पात्र होणें

या शांतिसेनेसाठीं सर्वोदय-पात्राची योजना आहे. पण हें सर्वोदय-पात्र म्हणजे साधें एक घरांतलें भांडें नव्हे. लोक आजवर समजले होते कीं सर्वोदय-पात्र म्हणजे एक भांडें आहे आणि त्या भांड्यांत रोज मूठभर धान्य टाकायचें आहे, एवढाच त्याचा अर्थ नाहीं. सर्वोदयपात्र मी स्वतःच व्हायचें आहे आणि त्याचें चिह्न म्हणून घरांत सर्वोदय-पात्र ठेवायचें आहे. माझ्या

घरांत पात्र ठेवण्याची जबाबदारी माझी च आहे. " अशांति होण्याला मी वाव देणार नाहीं आणि शांति राखण्याचा सतत प्रयत्न करीन या भावनेचें प्रतीक म्हणून त्या पात्रांत रोज मूठभर धान्य घालीन " असा निश्चय त्यांत गृहीत आहे. शांति-सेनेच्या योगक्षेमासाठीं सर्वोदय-पात्राचें आयोजन आहे.

आज पोलीस रक्षक आणि तुम्ही रक्ष्य असें आहे त्याऐवजीं आतां बिनदंडुक्याचे शांति-सैनिक तुमचें रक्षण करतील अशी भावना तुम्ही करूं नका. अशी भावना कराल तर आज भारतांत स्त्रियांना जसें रक्ष्य मानलेलें आहे, त्यांचें रक्षण आम्हीं करायचें आहे, त्यांच्या हातांत बांगड्या घालून त्यांच्या रक्षणाची जबाबदारी आम्हीं पुरुषांनीं घेतलेली आहे, त्या स्वरक्षित नाहींत तसें तुमचें होईल. म्हणून शांतिसेना रक्षक आणि तुम्ही रक्ष्य असें त्याचें स्वरूप नाहीं.

माझ्या मित्रांनो ! मला जें सांगायचें होतें तें मीं सांगितलें. शांति-सेनेची आज अत्यंत आवश्यकता आहे तो काय विचार आहे तें तुम्हीं जाणून घेतलें पाहिजे. समाज स्वरक्षित झाला पाहिजे. भीतीला मुळींच स्थान नको. एवढें कार्य सर्वोदयानें करायचें आहे.

इचलकरंजी (कोल्हापूर) ता. ९-५-५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५७०८ वि: निबंध
क्रमांक ........ नों. दि: १०.१२.६३

## पृथ्वी पादाक्रांत करण्याची उमेद मला आली आहे : ९ :

आज दिवसभर माझ्या मनामध्यें जो विचार घोळत होता, तेवढाच मी तुमच्यापुढें मांडणार आहें. तशी आज अनेक प्रकारची चर्चा वेगवेगळ्या मंडळींबरोबर झाली, परंतु ती करीत असतांना व एकांतांत असतांना हि एक च विचार घोळत होता. तो च तुमच्यासामोर मांडावा असें मला वाटतें. माझी एका विषयांत तन्मयता आहे. अवांतर फारसे विचार सुचत नाहींत. भूदान, ग्रामदान, सर्वोदय यांचें गाणें मी अनेकविध प्रकारांत गात असतों. परंतु आज मात्र अनेकविध विचार मांडण्याची माझी मनःस्थिति नाहीं. आज सकाळीं आम्ही या गांवीं येत होतों, वाटेंत बातमी ऐकली कीं, डॉ. खानसाहेब–पाकिस्तानचे माजी पंतप्रधान–यांची हत्या झाली. डॉ. खानसाहेब हे स्वातंत्र्याच्या चळवळींतले एक फार मोठे थोर नेते होते. सबंध जीवन त्यांनीं देशकार्याला वाहिलें होतें. हिंदुमुसलमान ऐक्याचे ते पक्षपाती होते. हिंदुस्थानची जेव्हां विभागणी झाली, तेव्हां ते पाकिस्तानांत गेले. कांहीं काळ पश्चिम पाकिस्तानचे मुख्य मंत्री होते. त्यांचे वडील बंधु खान अब्दुल गफारखान हे हि फार मोठे पुरुष आहेत. त्या दोघां हि भावांनीं आपलें जीवन देशसेवेंत घालविलें. खानसाहेबांची हत्या झाल्याची बातमी ऐकल्यापासून–अवांतर गोष्टी मी जरी बोलत होतों तरी, माझ्या मनांत एक च विचार घोळत होता.

### माझें भय

पंचाहत्तर वर्षांचें त्यांचें वय आणि खून करणारा तीस वर्षांचा. दोघे हि मुसलमान. कांहीं तरी स्वार्थी हेतु त्यामध्यें असेल असें मानणें स्वाभाविक च आहे. त्या प्रांतांत हिंदु-मुसलमानांचा झगडा आतां नाहीं. कारण हिंदु तेथें नाहींत. परंतु द्वेष ही वस्तु अशी आहे कीं, ती एकदां चित्तांत शिरली की सबंध चित्ताला व्यापते. द्वेष मर्यादित राहूं च शकत नाहीं. त्याचा स्वभाव च पसरण्याचा आहे. अशा घटना ठिकठिकाणीं घडतात. परंतु महात्माजीनंतर पूज्य आणि आदरणीय नेत्याचा खून व्हावा, अशी ही दुसरी

घटना आहे. स्वार्थांधतेनें हें कृत्य झालें असेल आणि राजनैतिक पक्षबाजी त्याच्यामागें नसेल अशी आपण आशा करूं या. परंतु ही हिंसावृत्ति साऱ्या जगांत कशी भरून राहिली आहे, याचें हें उदाहरण आहे. मी नेहमींच हें सांगत आलों आहे. आठ नऊ वर्षे झालीं त्या वेळीं हें भूदान आंदोलन सुरू झालें नव्हतें. सेवाग्रामला जागतिक शांतता-परिषद भरली होती. मी त्यावेळीं आजारी होतों. परंतु संदेश पाठविला होता. " मला मोठ्या हिंसेचें भय नाहीं. अल्पप्रमाणावरच्या हिंसेचें मला मोठें भय वाटतें. मी वर्ल्ड वॉरला डिव्हाईन समजतों. अशीं युद्धें माणसें घडवून आणीत नाहींत. अल्प हिंसा जी सर्वत्र पसरली आहे, त्याची मला चिंता वाटते. " हा विलक्षण संदेश जेव्हां मीं पाठविला तेव्हां त्याच्यावर पुष्कळ च चर्चा झाली आणि शेंवटीं किशोरलालभाईंना हरिजनमध्यें त्यावर लिहावें लागलें.

अण्वस्त्रें बंद करा अशी मागणी करण्यांत येते, परंतु केवळ त्यानें मानवाच्या प्रश्नाची सोडवणूक होणार नाहीं. उलट मामुली अस्त्रें च जास्त हिंसक आहेत आणि मोठीं अस्त्रें अहिंसेच्या जास्त जवळ आहेत. कारण मोठीं अस्त्रें आल्यानंतर जगापुढें दोन च मार्ग उरले आहेत. एक तर मानवाचा संहार करावा अथवा अहिंसेला जागा द्यावी. याशिवाय तिसरी गति शोधण्याची जी कांहीं लोकांची धांदल चालते ती माझ्या लक्षांत येत नाहीं. अण्वस्त्रें बंद करावी, आणि हिंसेची मधली दशा टिकून रहावी हें मला पूर्वीं पटलें नाहीं, आज हि पटत नाहीं. विज्ञानाशीं अहिंसा जोडली पाहिजे तर च विज्ञान टिकेल, हें आज विज्ञान च सांगून राहिलें आहें. अध्यात्म आणि अहिंसा यांचें शिक्षण विज्ञान सक्तीनें देत आहे. गीतेनें सांगितलें आहे ' ऐकण्याची इच्छा नसेल त्याला कोणती हि गोष्ट सांगूं नये ' परंतु विज्ञान आतां आपली ऐकण्याची इच्छा असो वा नसो सक्तीनें तें ऐकविणार आहे. विज्ञानाची च जर प्रगति कुंठित झाली, तर मात्र अहिंसेला लवकर जागा मिळणार नाहीं.

## विज्ञानाचा आविष्कार

विज्ञानशक्ति आपला आविष्कार स्वतः होऊन व्यापक स्वरूपांत करून राहिली आहे. आत्मज्ञान आणि अहिंसेच्या मदतीला तें धावून आलें आहे.

त्यामुळें मला जोर आला आहे. पृथ्वी पादाक्रांत करण्याची उमदे मला आली आहे. कारण विज्ञान आतां स्वतःचे आविष्कार स्वतः च येऊन मानवापुढें करीत आहे. सूर्य उगवला आणि आपण किती हि डोळे झांकून घेतले म्हणून काय होणार ? सूर्यवत् विज्ञान स्वयमेव प्रकाशमान झालें आहे. लहानपणीं आम्हांला यंत्रें वगैरेच्या बाबतींत कांहींच कळत नसे. परंतु हल्लीं आठ आठ दहा दहा वर्षांचीं मुलें अगदीं गुंतागुंतीचीं यंत्रें किती सहजतेनें हाताळतात ! याचा असा अर्थ नव्हे कीं आम्हांला जी अक्कल होती त्यापेक्षां यांना फार अक्कल आली आहे. त्याचा अर्थ एवढा च, कीं विज्ञानदेवता आतां फार प्रसन्न झाली आहे आणि आपण होऊन च प्रकट होत आहे. विज्ञानाची प्रगति थांबवतां येणार नाहीं. त्याचा विकास निरंतर होत राहील. त्यामुळें च अहिंसेला आशा आहे. नाहीतर बिचारी अहिंसा महापुरुषांच्या हृदयांत व चार आचार्यांच्या मठांत रहात होती. तिला आतां विज्ञानानें अवकाश दिला आहे. मला कांहीं लोक विचारतात, "आज विज्ञानाचा इतका जोर असतांना तुमचें हें ग्रामदान कसें चालणार ?" मी त्यांना म्हणतों, "अरे, विज्ञान वाढलें आहे म्हणून च तर ग्रामदान चालणार. नाहीं तर त्याला पुसत होता कोण ?" सुरी लाठी पिस्तूल यांवरचा आपला विश्वास अजून उडाला नाहीं. हीं छोटीं हत्यारें म्हणजे भुतें च आहेत. मोठया देवतेवर विश्वास ठेवण्याऐवजीं या क्षुद्र देवतांवर, भुतांखेतां-वर आपला विश्वास बसला आहे. त्यामुळें तमोगुण वाढला आहे आणि भगवद्-श्रद्धा कमी झाली आहे. भुतांखेतांवर विश्वास असल्यापेक्षां नास्तिकता परवडली ! अशा भोळ्या आणि मूढ श्रद्धेपेक्षां नास्तिकता भगवद् उपासनेला जास्त जवळची. क्षुद्र देवतेचा उपासक हा परमेश्वरापासून दूर असतो. नास्तिकाच्या चित्तावर थोडासा जरी संस्कार झाला कीं झाला च तो आस्तिक ! त्यामुळें अगदीं नास्तिक शिरोमणी मला अहिंसेच्या अगदीं जवळचा वाटतो. परंतु हे क्षुद्र हिंसापूजक, लाठी पिस्तूल बंदूक यांच्यावर श्रद्धा असणारे अहिंसेचे वैरी आहेत, आणि अहिंसेला धोका देणारे आहेत.

## कल्याणकारी शक्ति

अण्वस्त्रें आणि परमाणुशक्ति हीं ईश्वराच्या अगदीं जवळचीं आहेत. ती नवीन जग निर्माण करू शकते, ती परम देवता आहे. जगाला उत्तम

स्थितींत राखूं शकते किंवा जगाचा संहार हि करूं शकते. म्हणून ती ब्रह्मा-विष्णु-महेशाच्या शक्तीसारखी आहे. त्यासाठींच ती जवळची आहे. परंतु त्यांच्याऐवजी आपण छोटीं छोटीं शस्त्रें घेऊन बसतों. तीं वापरण्याचें आपण बंद केलें, क्षुद्र हिंसा बंद झाली तर मोठीं शस्त्रें तावडतोब बंद होतील. आणि तो 'अणु' सहज च चैतन्याचा दर्शक ठरेल. 'बाप रखुमा-देवीवरु अणुप्रमाण भासला,' सगुण आणि निर्गुण प्रत्यक्ष भगवंत अणुप्रमाणें भासला. अणूची संहारक शक्ति नाहींशी केली व तिचा उपयोग विधायक कार्याकडे लावला, तर ती भगवंताप्रमाणें कल्याणकारी ठरेल. आणि मग अणुशक्ति मानवाच्या जीवनाला मदत देणारी होईल. अग्नीनें आगहि लावतां येते आणि त्याच्यावर रसोई हि करतां येते. जर लोकांनीं ठरविलें कीं, अग्नीचा दुरुपयोग करायचा तर जेवढ्या वेगानें लोकांनीं घरें बांधावीं, त्यापेक्षां कितीं तरी वेगानें तीं जाळून टाकता येतील. पण आज तसें होत नाहीं. चुकून आग लागते. कारण लोकांनीं ठरविलें आहे कीं, अग्नीचा उपयोग रसोईकडे च करायचा.

## अणुशक्तीवर सूक्त लिहावें लागेल.

'**अग्निमीळे पुरोहितम्**' येथून च ऋग्वेद सुरू होतो. मानव अग्नीचा उपयोग चांगल्या कार्यासाठीं करूं लागल्याची, हा मंत्र म्हणजे, सुरुवात आहे. त्याच ऋग्वेदांतील दोन स्कंदांमध्यें जवळ जवळ दोनशें सूक्तें अग्नीवर आहेत. त्याचप्रमाणें अणुशक्तीचा उपयोग आतां चांगल्या कार्याकडे च करावा लागेल. नाहींतर टिकाव लागणार नाहीं. जशीं अग्नीवर सूक्तें आहेत तशीं अणुशक्तीवर नवीन सूक्तें लिहावीं लागतील. आणि त्याचा आद्यप्रणेता कदाचित् ज्ञानेश्वर च ठरेल असें मला वाटतें. अणुशक्ति ही देवता आहे, कीं राक्षसी आहे हें मनुष्य तिला कसें वापरणार त्यावर ठरणार आहे. ती उभय-शक्ति वर्जित आहे. तिला हिंसा-अहिंसा स्पर्श करूं शकत नाहीं. नीति-अनीति, स्पर्श करीत नाहीं. ती तटस्थ आहे. म्हणून अहिंसेची जोड जर त्या शक्तीला दिली तर या पृथ्वीवर स्वर्ग येईल आणि येशु ख्रिस्ताची प्रार्थना "**हे देवा, तुझें आकाशांत जसें राज्य आहे तसें पृथ्वीवर येवो**" प्रत्यक्ष सृष्टींत येईल.

**मुख्य प्रश्न**

हा प्रश्न फार मोठा आहे. त्यापुढें इतर सारे प्रश्न मला गौण वाटतात. जरी इतर प्रश्नांना प्रसंगोपात फार महत्त्व येत असलें आणि साऱ्या समाजाची तन्मयता त्यांत होत असली, तरी ते गौण आहेत आणि हा प्रश्न मूलभूत स्वरूपाचा आहे. म्हणून समाज-शास्त्रज्ञांनी, राजनैतिकांनीं, धार्मिकांनीं, तत्त्ववेत्त्यांनीं, साहित्यिकांनीं, सर्वांनी मिळून त्यावर प्रहार केला पाहिजे. राजनैतिक चळवळी करतांना कोणते निर्बंध असावेत, साहित्यांत काय मर्यादा असाव्यात, सरकारच्या पोलिसांनीं लोकांशीं वागतांना कसें वागावें, हें सर्वांनीं ठरविलें पाहिजे. सामाजिक, राजनैतिक, साहित्यिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्यें कोणत्या मर्यादा पाळाव्यात हें ठरलें पाहिजे. त्यामध्यें जबरदस्ती असूं नये. कारण, जबरदस्ती आली कीं मर्यादा अमर्यादा बनतात. साहित्यिक, शैक्षणिक, धार्मिक. राजनैतिक क्षेत्रांत प्रगति करायची असेल तर कांहीं मर्यादा पाळल्या पाहिजेत.

कुरुंदवाड, ता. १०-५-१९५८

## मराठी साहित्यिकांशीं हितगुज : १० :

बेचाळीस वर्षांपूर्वी मी घर सोडून निघालों. तत्पूर्वी मी बडोद्याला होतों, आणि हायस्कूल कॉलेजमध्यें अभ्यास चालला होता तोंपर्यंत जितकें मराठी साहित्य उपलब्ध होतें त्यांतील पुष्कळसें साहित्य माझ्या पाहण्यांत होतें. अर्वाचीन साहित्य सुद्धां माझ्या पाहण्यांत होतें. परंतु गृहत्यागानंतर ज्या जिज्ञासेनें गृहत्याग केला होता, त्या जिज्ञासेला अनुसरून च चिंतन, मनन, अध्ययन आणि जीवनसाधना चालली. त्यामुळें १९१६ नंतरचें साहित्य माझ्या पाहण्यांत आलें नाही. आणि तेव्हांपासून आजपर्यंतच्या काळांत साहित्याचें अध्ययन तर झालें परंतु तें आधुनिक मराठी साहित्याचें नाहीं. संस्कृतमध्यें जें आध्यात्मिक साहित्य आहे आणि मराठींत हि जें आहे व इतर हि हिंदुस्थानच्या भाषा शिकलों त्यांत जे अत्युत्तम ग्रंथ मानले गेले,

त्यांचा थोडाबहुत परिचय सेवायोग आचरीत असतांना आणि ध्यानादिका-मध्यें जीवन जात असतांना जो अवकाश मिळाला त्यांत माझ्या वाचण्यांत तें आलें. परंतु आतां सांगितल्या प्रमाणें ४२ वर्षांतील साहित्याचा स्पर्श मला झाला नाही. आणि म्हणून तुम्हां लोकांचा दर्शन-योग मला लाभला ही माझ्या दृष्टीनें एक विशेष घटना आहे. या पूर्वी भूदान यात्रेमध्यें ज्या ज्या प्रांतांतून मी गेलों तिथें सगळीकडे साहित्यिकांशीं माझा संवाद झाला.

## साहित्यिकांविषयीं मला आदर आहे

विश्वसाहित्याचा जरी मी अभ्यासू आहें तरी माझी गणना मी कांहीं साहित्यिकांत करूं शकत नाहीं. मी एक सेवक आहें, साधक आहें, आणि शोधक हि आहें. साहित्यिक हा या तिहींहून वेगळा हि असूं शकतो, तिहीं-पैकीं हि असूं शकतो. साहित्याविषयीं आणि साहित्यिकांविषयीं मला आदर आहे आणि तो असामान्य आहे. म्हणजे त्यांच्याविषयीं ज्या प्रकारचा आदर मला आहे त्या प्रकारचा आदर इतरांविषयीं नाहीं. इतरांविषयीं दुसऱ्या प्रकारचा आदर आहे. येलवालला ग्रामदानाचा विचार करण्यासाठीं परिषद भरली होती. तेव्हां तिथें देशांतले मोठ्यांतले मोठे नेते आले होते. पण त्यांच्यासमोर बोलतांना मला विशेषसा संकोच वाटला नाहीं. अनेक थोर पुरुषांशीं माझा समागम झाला, त्यांच्याशी हि बोलतांना मला संकोच वाटायचा नाहीं पण साहित्यिकांशीं बोलतांना मला थोडा सकोच होतो. या वरून तुमच्या लक्षांत येईल कीं, साहित्यिकांविषयीं माझ्या मनांत एक विशेष प्रकारचा आदर आहे.

मराठी भाषेचा मीं बारकाईनें अभ्यास केला आणि पुढें संस्कृतचें अध्ययन मराठीच्या ओघाओघानें, आत्म्याच्या समाधाना-साठीं झालें. पण त्याहि वेळीं निरुक्तीचा व व्युत्पत्तीचा मला नाद होता. शब्द कसे बनले, त्यांची कुलपरंपरा कशी चालली, याचा शोध करतांना आणि विचाराचा शोध करतांना शब्दाची हि परंपरा बघावी लागत होती. त्यासाठीं हि अनेक भाषांचा अभ्यास जरूर होता. पण मुख्यतः जनतेच्या हृदयाशीं संबंध यावा म्हणून मीं हिंदुस्थानच्या सर्व भाषांचा अभ्यास केला. सरकारच्या पत्रकांत १४ भाषा आहेत, त्यांतली

काश्मिरी सोडून सर्व भाषांचे अध्ययन माझें झालें आहे त्याशिवाय प्राचीन भाषांचें अरबी, फारशी, अर्धमागधी, पाली या भाषांचें अध्ययन झालें. आणि आज हि तें माझें अध्ययन संपलें नाहीं. या यात्रेमध्यें सुद्धां तें चालू च आहे या यात्रेंत च चिनी भाषेचें अध्ययन मीं केलें. मध्यें एक जपानी गृहस्थ तीन महिने यात्रेंत राहिले होते. त्यांच्याजवळ रोज तासभर मी जपानी शिकलो आणि नुकती च एक जर्मन मुलगी आली आहे, तिच्या मदतीनें अलिकडे माझें जर्मन भाषेचें अध्ययन चालू आहे. हें सर्व शिकण्यांत शब्दांशीं संबंध येतो. आणि शब्दांच्या शक्तीचें जितकें भान मला आहे तितकें भान साहित्यिकांमधे सुद्धां मीं पाहिलें नाहीं. वास्तविक त्यांना भान असायला पाहिजे, परंतु तसें मला दिसलें नाहीं. अशा रीतीनें माझा साहित्याशीं उत्तरोत्तर परिचय झाला.

लहानपणीं मला कविता करण्याचा नाद होता. एक कविता झाली कीं मनाचें समाधान होईपर्यंत मी ती दुरुस्त करीत असें. लहान मुलाच्या अकलेप्रमाणें तें समाधान हि लहानसें होतें. मग ती कविता दोन-तीन वेळां गावी आणि अग्निनारायणाला अर्पण करावी, असें माझें चालत असें. आई मला म्हणायची, "अरे हें काय चाललंय् ?" मी म्हणायचा मी कविता प्रकाशित करीत आहें. एखाद्या वेळीं ती म्हणायची, " मीं कांहीं तुझी कविता पाहिली नाहीं, तेव्हां मला ऐकवीत जा आणि मग वाटल्यास अग्नि-नारायणाला अर्पण करीत जा." तेव्हां एखादी कविता तिला म्हणून दाखवावी आणि मग अर्पण करावी असें मी करीत असें. माझ्या कांहीं कविता अग्निनारायणाला समर्पिल्या जातील या भीतीनें मित्रांनीं लांबविल्या, त्या अजून उपलब्ध आहेत. मी जेव्हां काशीला होतों तेव्हां तिथें ज्या कविता करीत असें त्या सुद्धां अशाच एक-दोन वेळां गाऊन गंगेमध्यें अर्पण करीत होतों.

## माझी भूक

माझ्या मनाची अशी भूक आहे कीं विचार पचवावा, जिरवावा आत्मसात करावा. जशी वाफ असते– तिची शक्ति लोकांच्या तोंवर लक्षांत आली नाहीं जोंवर तिला कोंडून ठेवलें नव्हतें. परंतु वाफेला कोंडण्याचें लक्षांत

आलें तेव्हां वाणीची शक्ति लक्षांत आली. तशी विचाराची शक्ति मुद्दां कोंडण्यानें प्रगट होते. विचार कोंडावा च लागतो. म्हणजे वाङ्मयसिद्धीसाठीं मौनाची आवश्यकता लागते. रूढ च उपमा द्यायची झाली तर ज्याप्रमाणें उत्तम पुत्ररत्नाच्या प्राप्तीसाठीं ब्रह्मचर्याची गरज लागेल त्याप्रमाणें उत्तम वाङ्मयसिद्धीसाठीं मौनाची गरज आहे. आणि असें मौन साधल्याशिवाय शब्द हि आपलें तत्त्व प्रगट करीत नाहींत. ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरीमध्यें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे--"**शब्दतत्त्वसारज्ञा । पैं तेचि देखणी प्रज्ञा । जे क्षेत्रक्षेत्रज्ञा । अपाडु देखे ।**" क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ, देह आणि आत्मा बाह्य आकार आणि अंतर्गत प्रकार यांत जें अपार अंतर आहे तें ज्या प्रज्ञेनें ओळखाल ती प्रज्ञा शब्दतत्त्वसारज्ञ होय शब्दामध्यें जें तत्त्व आहे तें त्या शब्दापासून अलग आहे. जसा देहापासून आत्मा अलग आहे. म्हणून ज्ञानदेव वारंवार सांगत असतात, शब्द जरा बाजूला साराल, तर तुम्हांला आनंद कळेल. "**शब्देविण संवादिजे । बोलाची वालीफ फेडिजे आत्मा अवतरिजे ।**" गीतेमधलीं जीं अक्षरें आहेत तीं मंत्र आहेत. मंत्रानें देवतेला अवतीर्ण व्हावें लागतें. ज्या देवतेला उद्देशून मंत्र बोलला जाईल त्या देवतेला समोर येऊन उभें रहावें लागतें. आपला आविर्भाव प्रकट करावा लागतो. गीतेचीं अक्षरें आत्म्याला अवतरविणारीं आहेत. गीता शब्दशास्त्र आहे. याच्याइतकें अद्भुत शास्त्र दुसरें नाहीं. म्हणून गीता वाक्‌यज्ञ आहे, ती प्रभूची वाङ्मयीन मूर्ति आहे असें ज्ञानदेव सांगत असतात. शब्द प्रकट होण्याला शब्दाला बाजूला सारून आंतल्या तत्त्वाचें ग्रहण व्हावें लागतें. असें ग्रहण तो शब्द पचविल्याशिवाय, रिचविल्याशिवाय, मनन करून त्याचा अनुभव घेतल्याशिवाय लाभत नाहीं, अशी माझी श्रद्धा होती. पुढें मी गीता वाचली. गीतेंत अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. हें जाळा, तें जाळा अशी जाळपोळ गीतेंत पुष्कळ दिसते. आतां मी जें जाळलें तो यज्ञ झाला कीं काय हें मला माहीत नव्हतें. पण असें वाटतें कीं तो एक यज्ञ च झाला. तेव्हां मला साहित्याविषयीं गोडी होती आणि साहित्याचा परिचय हि झाला होता. आतां जो विश्वसाहित्याशीं परिचय झाला आणि इतक्या भाषांचा हि जो परिचय झाला, तो लाभाचा च झाला. त्यानें एक व्यापक दर्शन आलें आणि अहंकार मावळला. परवांच एकानें मला लिहिलें आहे, ' तुम्ही आम्हां महाराष्ट्रीयांना

अभिमानासाठीं दोष देतां, पण मराठ्यांना आणि बंगाल्यांना अभिमान करण्यासारख्या गोष्टी आहेत, बाकीच्यांना नाहींत त्याला आम्ही काय करणार ? " पत्र लेखकानें मोठाच उपकार केला कीं बिचाऱ्या बंगाल्यांना तरी वाव दिला ! परंतु दोन हजार वर्षांपूर्वीची तमिळ भाषा आहे. अपार साहित्य त्यांत आहे. दोन हजार वर्षांपूर्वीचें त्या भाषेचें व्याकरण हि उपलब्ध आहे. तमिळ लोक मला म्हणायचे, " प्राचीन असून अर्वाचीन अशी तमिळ सोडून दुसरी एखादी भाषा आहे काय ? " संस्कृत प्राचीन आहे, मराठी बंगाली अर्वाचीन आहेत. मीं त्यांना आठवून आठवून सांगितलें कीं कदाचित् चिनी भाषा तशी असेल. परंतु तें हि थोडें शंकास्पदच आहे कारण आज जी एक चिनी भाषा आहे आणि पूर्वी जी होती ती एक च आहे किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. तमिळभाषेचे दोन हजार वर्षांपूर्वीचे ग्रंथ अजून हि लोकांना समजतात. तेव्हां प्राचीन असून हि अर्वाचीन अशी आमची एकच भाषा आहे असें ते म्हणत, आणि मला वाटतें कीं त्यांच्या म्हणण्यांत अर्थ हि आहे. आतां आम्हांला त्यांच्या भाषेचें ज्ञान नाहीं, पण एक तमिळ कवि म्हणतो, " आम्हांला ज्या भाषा माहीत आहेत त्यांत तमिळ भाषेसारखी मधुर भाषा नाही. " आतां असें म्हणणाऱ्या कवीला पांच सात भाषा येत असाव्यात. ते मला विचारीत, 'तुम्हांला तमिळ भाषा मधुर वाटते काय ?' मी म्हणायचा, हो, ती मला मधुर वाटते. कारण माझा कान शब्दशक्ति जाणतो. आणि तमिळचें मला ज्ञान असल्यामुळें तिच्या मधुरतेचें भान मला होतें तसेंच ज्याची त्याची मातृभाषा ही प्रत्येकाला मधुर लागणार हें निःसंशय, निर्विवाद आहे. कारण आईनें ती दुधाबरोबर च ऐकविलेली असते. म्हणून ज्याच्या त्याच्या मातृभाषेंत माधुर्य असणार च. आणि मराठीसारखी भाषा जेव्हां ज्ञानदेवांच्या हातीं जाते तेव्हां तर तिला अपूर्व माधुर्य येनें यांत संशय च नाहीं. परंतु व्यापक ज्ञान नसल्यामुळें व्यर्थ अभिमान मात्र राहतो. सर्व धर्मांचें ज्ञान नाहीं, सर्व भाषांचें ज्ञान नाहीं, सर्व इतिहासांचें ज्ञान नाहीं, आणि आपल्या च धर्माचें, भाषेचें, इतिहासाचें ज्ञान असलें तर प्रगति खुंटेल. तेवढ्यासाठीं च सत्यदर्शन फार महत्त्वाचें आहे.

## समग्रतेशिवाय सौंदर्य नाहीं

आतां च तुमच्यापैकीं कोणीतरी मला प्रश्न विचारला आहे की "जें सत्य असतें तें सुंदर असतें काय व सुंदर असतें तें सत्य असतें काय?" सौंदर्य हें समग्र दर्शनाशिवाय होत च नाहीं. नाक कापून अलग ठेवलें तर तें सुंदर वाटणार नाहीं. तें त्या सकलांग देहाचें सौंदर्य वाढवणारें अंग आहे या नात्यानें राहील तर च तें सुंदर दिसेल. झाडाचा पाला कधीं कधीं कापून आमच्या स्वागतासाठीं लावून ठेवतात. मला मोठें विलक्षण वाटतें. ही कापाकापी आमच्या स्वागतासाठीं कां? तीं पानें सुकून जातात. कारण त्यांचा जो अंशी त्या अंशीपासून तो अंश जर अलग ठेवला तर तो क्षीण होतो. म्हणून सौंदर्य हें सामग्र्याशिवाय समजत नाहीं. आणि समग्रतेशिवाय आकलन होत नाहीं. ज्याला सत्य म्हणतात तें एकांगी असत नाहीं. त्यानें कधीं हि सत्य कळणार नाहीं. आंगोपांगांसकट सत्याचें ज्ञान होतें त्यावेळेस त्याचें आकलन होतें. म्हणून समग्रतेशिवाय सौंदर्य नाहीं, आणि सत्याचें ज्ञान हें च समग्रज्ञान आहे, हें लक्षांत आलें म्हणजे सौंदर्याचा सत्याशीं काय संबंध आहे तें कळेल. माझी आई आहे, अगदीं सर्वांगसुंदर. पण त्या सर्व सौंदर्यापेक्षां तिचा माझा जो संबंध आहे तो सर्वांत सुंदर आहे. ती माझी आई आहे, ही एक गोष्ट बाजूला सारली तर बाकीचें तमाम सौंदर्य गौण आहे. नामदेवानें परमेश्वराच्या सौंदर्याचें वर्णन केलें आहे. त्यानें सुंदर या अर्थानें 'बरवा' शब्द वापरला आहे. नामदेवानें म्हटलें की "**नाम बरवें, रूप बरवें। दर्शन बरवें कानडियाचें। नामा म्हणे तुझें अवघें चि बरवें। त्याहूनि बरवें प्रेम तुझें॥**" नामदेव म्हणतो, हा कानडा विठ्ठल, याचे गुण समजायला च कठिण. याचें नाम सुंदर आहे, रूप सुंदर आहे, दर्शन सुंदर आहे, परंतु त्या सर्वांहून त्याचें प्रेम सुंदर आहे. जसें आईचें प्रेम जर बाजूला सारलें तर तिचें सौंदर्य फिकें पडेल, तसें च नामदेवाचें म्हणणें आहे. म्हणजे सौंदर्य समग्रतेशिवाय असूं शकत नाहीं. समग्रता थोडी जरी कमी पडली तरी तें सौंदर्य सुंदर होणार नाहीं. आणि हें सत्याशिवाय होत नाहीं. म्हणून सत्याचा शोध जे करतात त्यांना सौंदर्य कुठें कुठें लपलें आहे तें हि कळतें. जितका सत्याचा शोध होईल आणि जेवढी जीवनाची समग्रता लक्षांत येईल,

तितकें खोल सौंदर्य प्रकट होईल. तेव्हां शब्द पचवावा आणि जीवनामध्यें तो आचरावा, या एका च भावनेनें मी माझें लिखाण अग्निनारायणाला आणि गंगेला अर्पण करीत होतों. त्याचा मला कधीं पश्चात्ताप झाला नाहीं.

एकदां एका गृहस्थानें मला १०० पानांचें एक कवितेचें पुस्तक दिलें होतें. आजकाल जसें छापतात तसें च तें छापलें होतें. पानाच्या मध्यभागीं मजकूर लिहून चारी बाजूंची जागा मोकळी सोडली होती. तें मीं थोडें वाचलें. ते गृहस्थ माझ्यासमोर बसले होते. त्यांना मीं म्हटलें, 'तुमच्या या शब्दांत जें काव्य दिसतें त्यापेक्षां अधिक काव्य तुमच्या या शिल्लक राहिलेल्या रिकाम्या जागेंत दिसतें. तें सौंदर्य अधिक खोल दिसतें. तुमच्या लिखाणांत जी सखोलता आहे ती थोडीशी मर्यादित आहे. पण जो रिकामा भाग आहे तिथें ती मर्यादित रहात नाहीं.'

## साहित्याची व्याख्या

तसें च मौनानें देखील सुंदर व्याख्यान देतां येतें. मौनानें संशय कसे जातात यासंबंधीं एक प्रसिद्ध कहाणी ब्राह्मण ग्रंथांत आहे. गुरूला शिष्यानें विचारलें, ब्रह्म कसें आहे ? गुरूनें त्याला 'अवचने च ब्रह्म प्रोवाच' अवचनानें ब्रह्माचें प्रवचन दिलें. परंतु शिष्याला तें समजलें नाहीं त्यानें दुसऱ्यांदा विचारलें, तिसऱ्यांदा विचारलें तरी गुरूनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. मग चौथ्यांदा जेव्हां पुन्हां विचारलें तेव्हां गुरु म्हणाले, "ज्या भाषेत उत्तम रीतीनें समजावून सांगत होतों त्या भाषेंत सांगून सुद्धां तुला समजलें नाहीं, म्हणून आतां मोडक्या तोडक्या भाषेत सांगतों. '**प्रशांतवै आत्मेति**' आत्मा प्रशांत आहे. इतकें बोलून मीं त्याची प्रशांति कमी केली. आतां तूं च बोलायला लावलेंस त्याला काय करायचें ? "

अवचनाने उत्तम प्रवचन होऊं शकतें, तर ज्ञानेश्वरीमध्यें मोठें च प्रवचन, कीर्तन, धर्मसंकीर्तन केलें आहे. "**किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्तन हें सिद्धी गेलें ॥**" त्यांना आंतून प्रेरणा होती की मराठी भाषेंत धर्म उमटला पाहिजे. त्याप्रमाणें त्यांनीं तें केलें. नंतर पुढें ते जेव्हां ग्रंथ-समाप्तीजवळ येतात तेव्हां त्याचा सुरुवातीचा उत्साह मावळल्यासारखा दिसतो. 'मीं हें

निवेदन काय लिहिलें ? अप्रकट अशी वस्तु प्रकट केली का ? ' अशी चर्चा त्यांनीं केली आहे. ' मी जर नसतों बोललों तरी तें प्रकाशित होतें च. बोलण्यानें त्याचा प्रकाश वाढला हि नाहीं आणि कमी हि झाला नाहीं. तेव्हां मौन च राहिलों असतों तर नुकसान कांहीं झालें नसतें.' " **म्हणौनी माझी वैखरी मौनाचें हि मौन करी.** " मौनाचें मौन असें त्यांनीं नांव दिलें. नसतों बोललों तरी चाललें असतें, पण गुरूची आज्ञा होती म्हणून न बोलण्याचा तरी अहंकार कशाला ? म्हणून हें मौनाचें मौन केलें. मौनाचा आग्रह राखला नाहीं.

पुष्कळ लोक म्हणतात ज्ञानेश्वरींत जें साहित्य आहे तें अमृतानुभवांत दिसत नाहीं. मी म्हणतों खरें आहे. ज्ञानेश्वरींत तें दिसतें आणि अमृतानुभवांत तें आहे. दिसत नाहीं. दोहोंमध्यें मोठा फरक आहे. न दिसणें हें फार च मोठें असणें असतें. दिसण्यांत जें असतें, प्रकट होतें त्यापेक्षां न दिसण्यांत जें असतें तें फार मोठें असतें. साहित्य दिसत नाहीं. त्याचें जितकें सूक्ष्म चिंतन करूं तितकें आपल्याला तें व्यापक दर्शन देईल, आणि त्याची व्याख्या करणें जड जाईल. तरी पण तें साहस मीं केलें आहे. ' साहित्य म्हणजे तमाम सर्वांच्या सहीत जें जाईल, सर्वांच्या सहीत जें असेल तें साहित्य. ' सदासर्वदा आपल्याबरोबर तें असावें असें वाटेल तर तें फार च मोठें साहित्य होय आणि असें थोडा हि वेळ कां होईना तें आपल्याबरोबर असावें असें लोकांना वाटलें तर तें सहीत ' म्हणजे साहित्य होय.

वाल्मीकीरामायणाचें गद्य भाषांतर पूर्वी कधीं झालें नव्हतें, कारण इतकी अरसिकता आपल्या देशांत पूर्वी कधीं हि नव्हती. परंतु त्याचें गद्य भाषांतर आतां झालेलें आहे. आणि ज्यांनीं ज्यांनीं रामायण लिहिलें त्यांनीं त्यांनीं त्याचें रूपांतर केलें आहे. आपल्या काळाला हवें तसें रूपांतर त्यांनीं केलें. तुलसीदासांनीं तुलसीरामायण हें एक रूपांतर केलें तें उत्तर हिंदुस्थानांत चालतें. भिन्न भिन्न रूपांत पण रामायण वाचलें पाहिजे असें हिंदुस्थानांत सर्वांना वाटतें. मोरोपंतांनीं एके ठिकाणीं वर्णन केलें आहे. विश्वामित्र वसिष्ठांच्या आश्रमांत गेले तेव्हां कामधेनूनें त्यांचें स्वागत केलें. त्यांच्याबरोबर मोठी च सेना होती. परंतु विश्वामित्रांना

सैन्यासकट आणि परिवारासकट उत्तम तृप्ति लाभली. ती तृप्ति कशी आहे याचें वर्णन मोरोपंतांनीं केलें आहे. "**वाल्मीकीच्या कवनीं जसा जन, तृप्तीस पावे कुळासकट**" परिवारासकट लहानांना गोड लागेल, मोठ्यांना हि गोडच लागेल, प्रत्येकाला आपापल्या परी कांहीं तरी मिळतें असें वाल्मीकीचें रामायण आहे. त्यानें मुलांसकट सर्वांना तृप्ति होते. मोरोपंतांनीं निरनिराळ्या छंदांत तें लिहिलें आहे. त्यांच्या 'परंतु रामायणांतला' पहिलाच 'परंतु' मोठा गोड आहे. "**श्रीराम चरित करितें मुक्त सुकृत किमपि सेविता भावे । पार न लागे दशशतवदना हि, परंतु वाटतें गावें ॥**" भक्ति नसून हि याचें थोडें जरी सेवन केलें तरी मुक्ति देण्याची शक्ति या रामायणांत आहे. परिपूर्ण जर सेवन केलें तर '**पार न लागे**'-- सहस्त्र-वदनांनीं कांहीं पार लागत नाहीं. "परंतु वाटतें गावें."--

रामायण हें 'साहित्य' एवढ्यासाठीं च कीं, तें सगळ्यांना आपल्या बरोबर निरंतर असावें असें वाटतें. पूर्वी सुद्धां वाटत होतें आणि आज सुद्धां वाटतें. कोण्या एका कवीनें लिहिलें आहे कीं जोंवर गंगा-यमुनांच्या धारा राहतील तोंवर रामकथा प्रचलिक राहतील. निरनिराळ्या रूपांत चालत राहतील. आज सुद्धां भारतांतून रामकथा काढून घेतली तर भारताचा आत्मा तडफडेल. त्याला तें असह्य होईल. सबंध हिंदुस्थान--रामायण = ० असें होईल.

आतां ही जी मीं व्याख्या केली,--व्याख्या करणें म्हणजे धटिंगण-पणाचें काम आहे आणि साहित्य इतकें नाजूक असतें कीं धटिंगणपणा त्याला सहन होईल किंवा नाहीं मला माहीत नाहीं--ती त्या शब्दांतून च निघते.

## समाधीशिवाय साहित्य नाहीं

साहित्यिक कधीं हि अहंकारी असूं शकत नाहीं. आणि साहित्यांत दंभ असत नाहीं. जिथें अहंकार आला तिथें साहित्य खुंटलें च समजावें. मी लेखक, मी साहित्यिक असा 'मी' जेथें आला तिथें साहित्य राहूं च शकत नाहीं. 'मी' मावळल्यावर च साहित्य उगवतें. समाधीशिवाय साहित्य

नाहीं. अनुभवाहून अलग झाल्याशिवाय साहित्य लिहितां च येत नाहीं. थर्मामिटर हा उत्तम साहित्यिक आहे असें माझें मत आहे. त्याला ताप नसतो म्हणून इतरांचें ताप मापण्याचें काम तो करूं शकतो. त्याला ताप नसल्यामुळें तो तापमापक झाला. त्याप्रमाणें सबंध जीवनाचें विविध अनुभव विकार, विचार, भाव या सर्वांचें यथावत् आकलन व्हायचें असेल तर त्याहून अलग झाल्याशिवाय तें होणार नाहीं. मला च जर ताप आला आहे तर दुसऱ्याचा ताप मी कसा मापेन ? थोडासा मापूं शकेन पण नीट मापूं शकणार नाहीं. म्हणून साहित्यिक हे निर्विकार च असले पाहिजेत. तर च ते सर्वांच्या विचाराचें नीट आकलन करूं शकतील. त्यांनीं केवळ साक्षीरूपानें असलें पाहिजे.

## साहित्यिकांनीं 'साक्षी' बनलें पाहिजे

एकदां एक गृहस्थ मला म्हणत होते, 'संसार सारा दुःखमय च आहे. तरी पण हें सर्व संत, सत्पुरुप तो आनंदमय आहे असें म्हणतात, हें काय आहे ?' समुद्रकांठीं आम्ही दोघे बोलत बसलों होतों. मीं त्याला समुद्र दाखवला आणि म्हटलें हा आनंदाचा देखावा आहे. पण त्यांत जर आपण गटांगळ्या खात असतों तर त्या समुद्राचें सौंदर्य आपल्याला किती ग्रहण झालें असतें ? समुद्र किती सुखमय वाटला असता ? नाकातोंडांत पाणी जातांना काय आनंद वाटला असता ? परंतु आपण तीरावर आहोंत. आपण साक्षी आहोंत. म्हणून लाटांसकट, त्याच्या भयानकतेसकट, त्याच्या रौद्र रूपासकट, तुफान उठलें असेल तर तुफानासकट, तो सुंदर आहे, आनंदमय आहे, सुखमय आहे. पण हें सुख आपण तीरावर आहोंत म्हणून पाहूं शकतों पुष्कळ लोक म्हणतात, आम्ही वास्तव वर्णन करणारे आहोंत. मी म्हणतों वास्तव या नांवावर अवास्तव वर्णन नका करूं म्हणजे झालें. परंतु ही प्रतिज्ञा चुकीची आहे. किंबहुना वास्तव वर्णन ही उक्ति पुनरुक्ति च आहे. कारण वर्णन हें वास्तविक च असतें. तेव्हां तें अवास्तव होऊं नये एवढी च काळजी घ्या. तुम्ही वास्तववादी, रियालिस्टिक होऊं पाहतां, परंतु त्याचें आकलन न झालें तर कसें कराल ? आकलनासाठीं विश्वाला शरिरासकट दूर कराल आणि तुम्ही द्रष्टे व्हाल तर च तुम्ही पाहूं

शकाल. माझें कधीं तरी पोट दुखतें. पांच सात वर्षांपासून त्याचा चिकाटीनें कार्यक्रम चालला आहे. आणि मीं हि माझा कार्यक्रम चिकाटीनें धरला आहे. माझा चालण्याचा कार्यक्रम मीं चालू च ठेवला आहे. पोटांत दुखलें तरी पायांनीं चालायचें ठरवलें आहे. अशा तऱ्हेनें पाय आणि पोट अलग करून टाकले आणि यात्रा चालू ठेवली आहे. आतां पाय च जर गळून पडले तर मग चालायचें बंद होईल. पण पोट दुखूं लागलें म्हणजे मी विचार करतों कीं काय कारण आहे ? कारणाशिवाय तर कांहीं होत च नाहीं. आणि कारणाचा शोध लागला कीं, मला मोठा आनंद होतो. कारणाचा शोध घेण्याची वृत्ति होऊन माझा आनंद वाढतो. पोटांत दुखून राहिलें आहे आणि आनंद होतो आहे, हें काय आहे ? कारण तो गुरु आहे. तो ज्ञानदाता अगदीं पोटामधें आला असतांना त्यापासून लाभ न घेणें ही किती दुःखाची गोष्ट आहे ! म्हणून मला पोट दुखणें ही गोष्ट दुःखाची वाटत नाहीं. त्याचें कारण न कळलें तर मात्र दुःख वाटतें. मग ही पोट दुखण्याची एक अनुभूति आणि पोट न दुखण्याची दुसरी अनुभूति अशी स्थिति लाभली तर पोट न दुखतांना सुंदर काव्य लिहितां येईल. तसें च पोट दुखत असतांना हि काव्य लिहितां येईल. साक्षीत्व लाभल्यामुळें तें शक्य होईल.

साहित्याची ही जी मीं आतां व्याख्या केली त्याची आतां छाननी करतों. त्यांत एक गुण म्हणजे अहंकार नसावा, दुसरा गुण दंभ नसावा आणि तिसरा गुण साक्षित्व आणि निर्विकारत्व असावें. समजा, देहाला विकार झाला—देह असतांना देहाला विकार च होऊं नये हें कठिण जातें, तें साधलें पाहिजे पण साधत नाहीं—जितका वेळ आपण त्या विकारांत राहूं तितका वेळ काव्य-गुण आम्हीं गमावला. हें ओळखून मागून तरी त्यापासून अलग होण्याची सोय झाली पाहिजे.

खलिफा उमरची गोष्ट आहे. तो महंमद पैगंबराचा शिष्य होता. त्याचें एकाशीं धर्मयुद्ध चालू होतें, उमरनें त्याची तलवार तोडली आणि त्याला खालीं पाडून त्याच्या छातीवर तो बसला. तलवार उगारली, आणि त्याचा शिरच्छेद करणार एवढ्यांत तो चित झालेला आणि खालीं पडलेला माणूस उमरवर थुंकला. त्याबरोबर उमर अलग झाला आणि तंबूंत निघून

गेला. त्याचे साथी म्हणाले, "हें तूं काय केलेंस ? तो चांगला तुझ्या हातांत आला होता. आणि तो तुझ्या तोंडावर थुंकला तरी तूं त्याला मारलें कां नाहींस ?" तेव्हां उमर म्हणाला "मी धर्मयुद्ध खेळत होतों. तो माणूस थुंकल्यामुळें मला राग आला, त्यामुळें धर्मयुद्धाचा मी अधिकारी राहिलों नाहीं. कारण मग तें धर्मयुद्ध झालें नसतें."

ही दृष्टि साहित्याला असली पाहिजे. "मी विकार-वश आहें, मी आतां साक्षी नाहीं. तेव्हां या वेळीं मी जी कृति करेन ती सगळ्यांच्या बरोबर जाणारी, सहीत जाणारी होणार नाहीं, तुटून पडेल अलग पडेल," हें जाणा. ही जी उमरची गोष्ट आहे कीं, क्रोध आला असतांना मी शासन कांहीं करूं शकत नाहीं, धर्मयुद्ध करूं शकत नाहीं. हें त्यानें ओळखलें, तसा साहित्यिकांनीं विचार केला पाहिजे कीं, काम, क्रोध, मोह लोभ असतांना मी लिहूं शकत नाहीं. आतां या वेळा जर वगळल्या, कारण काव्य-लेखनाला त्या वर्ज्य होतात, तर काव्य-लेखनासाठीं कोणत्या वेळा शिल्लक राहतात हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. तथापि, जे भाग्यवान असतील त्यांचा असा वेळ शिल्लक राहत असेल त्यांनीं तो वेळ वाढवीत जावा. जसजसा तो वेळ वाढेल तसतसें साहित्य अधिक वाढेल.

रामायणांत सीतेच्या पावित्र्याचें सौंदर्याचें आणि गुणांचें वर्णन येतें. तें वर्णन वाचून विकार उत्पन्न झाला असें कोणीं सांगितल्याचें मला आठवत नाहीं. कारण त्या सौंदर्यवर्णनांत वाल्मीकीची दृष्टि फार पावन आहे. तें वर्णन करीत असतांना तो अलग झाला आहे. इतर हि जीं वर्णनें त्यानें केलीं आहेत त्यावेळीं तो आपल्याला त्या विकारांत बुडवीत नाहीं, तें वर्णन करीत असतांना तो तुम्हांला सविकार करीत नाहीं. दर्शन घडवितो पण बुडवित नाहीं. याचें कारण तो तटस्थ आहे.

## विश्वपावन साहित्य

महाभारतांत व्यास नांवाचें एक पात्र मधें मधें लुडबुड करीत असतें. पण ज्यानें महाभारत लिहिलें तो व्यास महाभारताच्या शेंवटीं तीन श्लोक लिहितो. त्याला '**भारतसावित्री**' असें नाव आहे. पांडवांच्या गुणदोषांचें वर्णन त्यानें तटस्थपणानें केलें आहे. आणि स्वत:विषयीं त्यानें जें वर्णन

केलें आहे तें अगदीं नागडें उघडें केलें आहे. आपली उत्पत्ति कशी झाली, आपल्या हातून काय काय दोष घडले आणि आपण ते गुण समजून कसे अमलांत आणले, नंतर पश्चात्ताप कसा झाला इत्यादि सर्व वर्णन केलें आहे. आणि मला वाटतें सत्याचा प्रयोग करणारा असा क्वचित् च कोणी निघाला असेल. कारण, आपल्या च जीवनाचें तें वर्णन असें त्यानें मानलें नाहीं. मी अगदीं अलग आहें, तिऱ्हाईत माणसानें वर्णन करावें तसें अगदीं नागडें उघडें वर्णन लोकांसमोर त्यानें ठेवून दिलें. लोक म्हणतात हा ज्ञानी होता आणि असा कसा वागला ? मी म्हणतों, तो असा वागला म्हणून ज्ञानी नव्हता–तर असें वागलों हें हि तो सांगू शकला म्हणून ज्ञानी आहे.

वाल्मीकीची प्रतिभा, व्यासांची प्रज्ञा आणि शुकदेवाचें प्रेम तिन्ही मी नेहमीं साधत असतों. तीन गुणांत तिन्ही अग्रेसर आहेत, शिरोमणी आहेत. त्यामुळें ते तटस्थ राहिले. तसें साहित्यिकांनीं जें वर्णन करायचें तें तटस्थ राहून करावें. तुम्ही मर्यादेंत रहा असें कांहीं मी तुम्हांला सांगणार नाहीं. कारण ऋग्वेदांत म्हटलें आहे '**यावत् ब्रह्म विष्ठितम् तावत् वाक्यम्**' जितकें ब्रह्म वेष्ठित आहे, व्यापक आहे, तितकी वाणी व्यापक आहे. त्यामुळें साहित्यिकांना अमुकच एक वर्णन तुम्ही करावें अशी मर्यादा मी घालणार नाहीं. 'मी साक्षी होतों अशा क्षणांत मीं तें लिहिलें आहे, निर्विकार असतांना लिहिलें आहे' एवढें च तुम्ही मला सांगा. मी साक्षी होतों, निर्विकार होतों अशी तुम्ही मला ग्वाही दिली तर मी तुम्हांला दुसरी ग्वाही देईन कीं, तुमचें जें वर्णन असेल तें विश्वपावन होईल आणि सबंध विश्वाला तें आपल्या सहीत असावें असें वाटेल.

## साक्षित्व प्रकटलें पाहिजे

मला तुमच्यापैकीं कोणीतरी विचारलें आहे कीं, भूदान, ग्रामदान या वस्तु साहित्यांत येतील काय ? मागें एकदां साहित्यिकांशीं बोलतांना 'तुम्हीं भूदानावर लिहा असें भलतें च मी तुम्हांला सांगणार नाहीं,' असें त्यावेळीं सांगितलें होतें. तें च आज पुन्हां सांगत आहें. तुम्हीं भूदानावर लिहा हें भलतें च सांगणें होईल, जें तुम्ही ऐकूं च नये. साहित्यिकानें काय लिहावें तें त्याला कोण सांगणार ? ज्यांत साक्षित्व प्रकट होईल अशी कृति त्यांनीं करावी.

त्यांत जो वाक्प्रचार तें प्रकट करतील तो मला मान्य आहे. त्याचा परिणाम हि असा होईल की त्यांत भूदानाचें नांव नसलें तरी भूदानविचाराचे लोक तें पुस्तक जवळ ठेवतील आणि इतरांना हि असें च वाटेल कीं, हें पुस्तक सदासर्वदा आपल्याजवळ असावें. " **ऐसा पुरुष वाटे पहावा । जनास वाटे तो असावा । जो परोपकार करित चि गेला ।।** " असा परोपकार करीत गेलें पाहिजे. या प्रकारानें जें साहित्य निर्माण होईल, तें कोणत्या हि विषयावर असलें तरी मला तें मान्य आहे. म्हणून सर्वांना जें उपयोगी होईल, तो च सर्वोदय. तुम्ही अनेक गोष्टी पाहतां, ऐकतां, भूदान हि तुमच्या पाहण्यांत ऐकण्यांत असावें, विश्वाचा तो एक अंश तुमच्या पाहण्यांत असावा, यापलीकडे मी कांहीं सांगणार नाहीं.

रामायणामधें रामानें सीतेचा परित्याग लक्ष्मणाच्या हातून केला आणि तिला जंगलांत सोडून ये असें सांगितलें. आणि अशा च योजनेनें तिला सोडलें कीं, वाल्मीकीचा आश्रम जवळ च असावा. क्रूर कृति सुद्धां थोडी प्रेमानें च केली, पण तिला सोडून देतांना तिला कांहीं हें माहित नव्हतें. तिचा निरोप घेतांना लक्ष्मणानें म्हटलें, 'देवी ! मला क्षमा कर. पण रामाची आज्ञा म्हणून तुला सोडून मला आतां गेलें पाहिजे.' तेव्हां सीता त्याला म्हणाली कीं, 'माझा एक निरोप त्या राजाला सांग' माझ्या पतिदेवाला सांग असें कांहीं ती म्हणाली नाहीं. ती म्हणाली,– त्या राजाला माझा निरोप सांग कीं " जरी पति या नात्यानें तुझें माझें कांहीं लागत नाहीं, कारण ज्याअर्थीं तूं ठरवलें आहेस त्याअर्थीं तें मान्य आहे. परंतु तूं राजा आहेस आणि मी आतां तपस्वी होणार, तेव्हां सर्व तपस्व्यांची जी काळजी तूं घेशील त्या काळजीचा एक अंश मला उपलब्ध झाला पाहिजे. " तसें मी तुम्हांला सांगणार आहें. (हें ऐकून सर्व मंडळी हंसू लागली म्हणून विनोबाजी म्हणाले मी तुम्हांला काय सांगणार हें तुम्हांला कळलेलें दिसतें.)

## जीवनस्पर्शी कार्य

महाराष्ट्रांत येतांना मीं असें जाहिर केलें कीं, मी निरुपाधिक होऊन येत आहें. आतां हें काय नाटक आहे ? अमक्या अमक्या तारखेपासून मी निरुपाधिक होणार असें कांहीं होतें काय ? भूदानकार्य चालवीत असतांना

ती कल्पना सतत विकसित होत गेली, आणि एक गुंठ्यापासून लाख एकरापर्यंत दान मिळालें. घरांत पांच मुलें असतील तर मी सहावा आहें असें समजून मला सहावा हिस्सा द्या, असा आरंभ करून हवा, पाणी आणि सूर्याचा प्रकाश यांसारखीच जमीन आहे आणि म्हणून ती सर्वांना मिळाली च पाहिजे असें मी सांगत असें. आणि त्यानंतर पुढें जाऊन ग्रामदान हा एक समाजाला स्वेच्छेनें अर्पण करण्याचा कार्यक्रम सुरू केला. ग्रामदानांत समाज ही कृष्णदेवता आहे. तिला समर्पण करून प्रसाद वांटून घ्यावा. अशा रीतीनें भूदानापासून ग्रामदानापर्यंत आणि ग्रामदानापासून समर्पणा-पर्यंत जसजसा त्या कल्पनेचा विकास होत गेला तसतसे जे आक्षेप होते ते सगळे कमी होत गेले आणि शेंवटीं मी येथपर्यंत आलों. ग्रामदान म्हणजे कोणीतरी 'हॅव्ज' आहेत, आणि कुणीतरी 'हेव नॉट्स' आहेत. कोणीतरी संपन्न आणि कोणीतरी विपन्न आहेत, तेव्हां संपन्नांनी विपन्नांना मदत करावी असें कांहीं ग्रामदान नाहीं. मला एक शोध लागला आहे, जो सात वर्षांपूर्वी लागला नव्हता. सत्यांत अशी एक खुबी असते कीं, एकदां तें कळल्यानंतर मला तें इतके दिवस कां कळलें नव्हतें असें वाटण्याइतकें तें साधें असतें. मला जो शोध लागला तो असा कीं, जगांत हॅव नॉट्स कोणी हि नाहीं. कोणापाशीं पैसा आहे, कोणापाशीं बुद्धि आहे, कोणापाशीं श्रमशक्ति आहे. पण ह्यांपैकीं एक हि ज्याच्याजवळ नाहीं असा एक रोगी जर्जर होऊन दवाखान्यांत पडला आहे, तो सुद्धां देऊं शकतो. त्या रोग्याला मुलगा, बायको, आई भेटायला आले कीं त्याच्या डोळ्यांना प्रेमाची धार लागते. तेव्हां तो असें प्रेमदान करूं शकतो. तो सतत लोकांची सेवा घेत असला तरी पण तो प्रेम देतो. माझें त्या प्रेमी जीवाला एवढें च सांगणें आहे कीं त्यानें आपलें प्रेम बायकोमुलापुरतें च मर्यादित न ठेवतां इतर हि जे कोणी भेटतील त्यांना पाहून हा माझा सखा मला भेटला असें समजून नयनांतून नीर वाहूं दे. याहून अधिक दानाची मी कल्पना च करूं शकत नाहीं. ज्याच्यापाशीं जें आहे तें त्यानें देऊन टाकावें. येल्वालच्या परिषदेंत जे नेते आले होते ते व्यावहारिक होते. माझ्यासारखे बिनपंखानें उडणारे नव्हते. त्यांनीं सांगितलें कीं हा तुमचा विचार सर्व प्रकारे उत्तम आहे. त्याच्यामुळें देशाचें नैतिक आणि भौतिक उत्थान होईल. त्यानंतर

आतां तिसरें कोणतें उत्थान शिल्लक राहिलें ? त्यांच्याकडून इतका पूर्ण आशीर्वाद मिळाल्यानंतर माझ्या मनानें मी पूर्ण मोकळा झालों. आतां माझ्या विचाराची काय विल्हेवासलात अथवा व्यवस्था लावायची असेल ती लावा. कारण मी आतां हें कार्य लोकांवर सोंपवून मोकळा झालों आहें. आतां मी साक्षीरूपानें राहीन. म्हणून भूदान, ग्रामदानाचा मी साक्षी झालों आहें, प्रणेता नाहीं प्रणेतत्त्व गेलें. कन्या जांवयाला समर्पिली तेव्हां जांवई अडकला आणि बाप सुटला. तेव्हां आतां मी च साहित्यिक झालों आहें. कारण भूदान ग्रामदानाचा मी साक्षी झालों. म्हणून यावर तुम्ही लिहा असें टुमणें तुमच्या पाठीशीं मी कसें लावीन? तें योग्य हि नाहीं. आणि शक्य हि नाहीं.

माझ्या मित्रांनो ! भूदान आणि ग्रामदान हें कार्य संकुचित नाहीं, जीवनव्यापी आहे. तें जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारें आहे. म्हणून साहित्यिकांची हि त्यांतून सुटका होणार नाहीं एवढेच सांगतों.

जयसिंगपूर (कोल्हापूर) ता. ११-५-१९५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 35७२८...... वि: निबंध
नों दि: ११ ७
क्रमांक ........................

## राजनीतींतून लोकनीतीकडे

### राज्य संस्था

आपला हा मानवसमाज कांहीं लाख वर्षांचा आहे असें वैज्ञानिक सांगतात. परंतु प्रत्यक्ष जो इतिहास उपलब्ध आहे तो जरी विचारांत घेतला तरी १०।५ हजार वर्षें त्याचा विकास होत असलेला दिसतो. अगदीं पूर्वी राज्यसंस्था नव्हती, राजा हि नव्हता. परंतु पुढें मानव-समाजाला व्यक्तींचें आपापसांतले संघर्ष टाळण्यासाठीं आणि व्यवस्था बरी राखण्यासाठीं राज्यसंस्थेची गरज भासली म्हणून राज्यसंस्था अस्तित्वांत आली. त्यांत राजा असे. त्याची सरदार मंडळी असे. मग त्यांचे मंत्री वगैरे त्यांनीं बनविले. अशा रीतीनें राज्यकारभाराची व्यवस्था केली. त्या काळीं दंड-शक्ति नांवाची एक शक्ति मान्य केली. अव्यवस्था, स्वैरहिंसा जी लोकांमध्यें चालते त्याहून वेगळी, नियंत्रित, विशिष्ट नियमांत राहणारी, कायदे-कानूनें बांधलेली जी शक्ति तिला दंडशक्ति असें नांव देऊन ती लोकांनीं

मान्य केली. त्या काळीं राज्यसंस्था ही फक्त संकट निवारण्याच्या कामीं आणि भांडणें मिटविण्याच्या कामीं च मुख्यतः मदत करीत असे. तिचा उद्देश तितका च होता. व्यापाऱ्यांचीं, शेतकऱ्यांचीं, उत्पादक धंदेवाईक लोकांचीं आपापलीं कामें आपापल्या प्रेरणनें चाललीं च होतीं. त्यामुळें राज्यावर संकट आलें म्हणजे ती राज्यव्यवस्था त्यांचें निवारण करीत असे. या व्यतिरिक्त कांहीं नियंत्रण हि करीत असे. राज्याच्या अंगप्रत्यंगांचें पूर्ण-तया नियंत्रण शक्य हि नव्हतें अणि इष्ट हि नव्हतें. व्यक्ति-स्वातंत्र्य पुष्कळच होतें. धर्म-संस्था अलग होत्या. शिक्षण देणारे गुरु आणि शिक्षण घेणारे विद्यार्थी स्वतंत्र च होते. व्यापार-व्यवहार स्वतंत्र होता. एकूण लोक-जीवन च स्वतंत्र होतें. स्वराज्यावर संकट आलें म्हणजे सैन्य उभें करून प्रजेचा बंदोबस्त करायचा, दुसऱ्यांदा आक्रमण झालें म्हणजे मग पुन्हां त्याला तोंड देण्याकरतां सैन्य उभें करायचें असें इतिहासभर चाललें होतें.

**प्राज्य-संस्था**

पुढें माणसांनी विचार करून ठरविलें कीं राज्यसंस्था व्यक्तीच्या वंशाच्या हातीं राहते त्यामुळें त्या राजाचे वंशज च प्रजेवर राज्य करतात. त्याने फार गडबड होत होती. एखादा राजा चांगला निघाला तर प्रजेला सुख होई, एखादा राजा वाईट निघाला कीं प्रजेला दुःख होई. अशा रीतीनें प्रजेचें नशीब राजावर अवलंबून ठेवणें धोक्याचें आहे असें ठरवून राज्य-संस्था बंद केल्या. आज कांहीं राज्यसंस्था आहेत पण राजसंस्था नाहींत. लोकांनीं प्रतिनिधि निवडायचे आणि मग त्यांनीं राज्यें चालवायचीं अशी एका अर्थानें राज्यसंस्था किंवा तिला प्राज्यसंस्था म्हणा सुरू झाली. म्हणजे प्रजेचे प्रतिनिधि प्रजेसाठीं व्यवस्था करूं लागले. आणि आज तीच चालू आहे. आपल्या हि देशांत तीच चालू आहे. आतां ही लोकसंस्था लोकांवर राज्य करीत आहे असें तिचें स्वरूप मानलें आहे.

हिंदुस्थानांत आणि इतर हि पुष्कळशा देशांत लोकशाही आहे. यांत काय चाललें आहे ? पूर्वीच्या राज्यसंस्थेमध्यें आणि आजच्या लोकशाहीमध्यें कांहीं गोष्टींत विलक्षण साम्य आहे. आज पार्टी असतात. त्यांचा अंकुश चालतो. मग त्या पार्टीचा कोणी एक प्रधान मंत्री निवडला जातो. त्यानें

मग बाकीचे मंत्री निवडायचे. प्रधानमंत्री पार्टीनें च निवडायचा, आणि तो सबंध देशासाठीं असायचा. अशा पद्धतीचें एक तंत्र चालू आहे. परिणाम-स्वरूप राजांच्या हातांत आणि त्याच्या दोन चार प्रधानांच्या हातांत पूर्वी जी सत्ता होती त्याहून फार च व्यापक आणि सर्वकप सत्ता आज मूठभर लोकांच्या हातांत आहे. परंतु ती पांच वर्षांपुरतीच असते एवढेंच त्यांत समाधान आहे. पण आजच्या जमान्याचीं पांच वर्षें म्हणजे पूर्वीचीं पन्नास वर्षें होत. विज्ञानयुगांत दसपट गति वाढली आहे. निरनिराळीं वेगवान साधनें उपलब्ध झालीं असल्यामुळें दसपट वेग वाढला आहे. पूर्वी एखाद्या राजाचें राज्य ५० वर्षें चाललें असतांना जे बरे वाईट परिणाम होत ते आज पांच वर्षांत होतात, आणि ते व्यापक प्रमाणांत होतात. वाईट परिणाम व्यापक प्रमाणांत होणें हें जास्त वाईट.

## सर्वकष नियंत्रण

सर्वच बाबतींत आजची राज्यव्यवस्था नियंत्रण करीत आहे. लग्नविधि, बाजारभाव, व्यापारधंदे, मंदिर, मस्जिद, मठ या सर्वांचें नियंत्रण चालू आहे. साहित्य, नाटक, कला, संगीत यांवर हि नियंत्रण आहे. हे सगळें आपल्या राज्याचें अंग झालें आहे. किती विलक्षण स्थिति आहे ही !

दुसरी गोष्ट म्हणजे पूर्वी एका राष्ट्रांतल्या घडामोडींचा परिणाम दुसऱ्या राष्ट्रावर होत नसे. १७६१ सालीं हजार वर्षांत झालें नव्हतें एवढें मोठें युद्ध झालें पण त्या युद्धाचा परिणाम जगावर कांहीं च झाला नाहीं. आणि जपानला तर त्याचा पत्ता हि नव्हता. आज जगांतल्या कुठल्या हि कोपऱ्यांत कांही हि हालचाल झाली, जरा खुट्ट झालें कीं सबंध जगाला त्याची माहिती कळते, त्याचे परिणाम हि जाणवतात. सुवेझ कालव्याचा प्रश्न असो, कोरियाची हालचाल असो कीं अल्जेरियाचा प्रश्न असो एकदम सर्व जगावर त्यचा परिणाम होतो आणि सगळीकडे हालचालींना सुरुवात होते. असा सगळा विचार केला म्हणजे त्यांत परिवर्तन करण्याची आवश्यकता तीव्रतेनें जाणवते.

## परिवर्तन करण्याची आवश्यकता

हिंदुस्थानांत किती कापूस पिकवायचा हें सरकार ठरविणार आणि त्याचा भाव न्यूयॉर्कहून येणार ! ता. १२ ला २ वाजतां २४२ रु. भाव, २ वाजल्यानंतर कापसाची गाडी आली तेव्हां २४२ रु. चा भाव २३० रु. वर आला. ता. ४ ला २३६ रु. भाव. हा झाला दुपारचा भाव. संध्याकाळीं ७ वाजतां २३० रु. भाव. त्या बिचाऱ्या गाडीवाल्याच्या हें लक्षांत च येत नाहीं. तो म्हणतो मी काय अपराध केला ? माझ्या कापसानें काय अपराध केला ? क्षणाक्षणानें हा कसा काय फरक होतो ? कुणाचा अपराध आणि कुणाला दंड ! अशी ही सर्वत्र स्थिति असतांना आणि इतक्या विश्वशक्ति एकत्र काम करीत असतांना, साधनें तीव्र असतांना, विज्ञानाचें युग आलें असतांना, आज काय होईल आणि उद्यां काय होईल याचा नेम नसतांना सत्तेसाठीं दिलेलीं पांच वर्षें किती तरी काम करूं शकतात. शिवाय एखादी घटना घडल्यास दोन-दोन तीन-तीन वर्षें निवडणुका लांबणीवर टाकाव्या लागतात. इतकें च नव्हे तर निवडणुका न होतां सुद्धां सत्ता बेमुदत चालू शकतात. आतां तुम्ही च विचार करा कीं यांत कांहीं परिवर्तन करण्याची आवश्यकता तुम्हांला वाटते काय ?

## सत्तेच्याद्वारां सेवा म्हणजे परावलंबन

आज जो उठला तो म्हणतो देशसेवा सत्तेद्वारां झाली पाहिजे तसा त्यांचा विश्वास आहे. एक लहानसें उदाहरण देतों. या तुमच्या सांगलीला स्वच्छता करायची ती कुणी करायची ? म्युनिसिपालीटीनें. म्हणजे स्वच्छता म्युनिसिपालिटीच्या हातांत. माणसांच्या हातीं नाहीं. धर्म हा देवावर सोंपवला आणि भिक्षुसंस्थेवर सोंपवला त्यामुळें धर्म हा त्या संस्थेच्या हातीं गेला, व्यक्तीच्या हातीं राहिला नाहीं. म्हणजे विवेकबुद्धीची जागा देवळांतल्या पुजाऱ्यांनीं घेतली, स्वच्छतेची जागा म्युनिसिपालीटीनें घेतली, दानाची जागा टॅक्सनें घेतली, निर्भयतेची आणि शौर्याची जागा सैन्यानें घेतली, ज्ञानाची जागा युनिव्हर्सिटीनें घेतली, दयेची जागा दवाखान्यानें घेतली. अशा जागा बदलल्या म्हणजे पुरुषार्थ शिल्लक राहतो काय ? इथें आजारी लोक आहेत त्यांच्या सेवेची योजना करावी लागली तर चहा सूप प्यावा

लागेल मग सरकारला टॅक्सचे पैसे मिळतील आणि त्यांतून सरकार दवाखाना काढेल म्हणजे दयाभावनेची गरज नाहीं. टॅक्स देणें हें च काम. भोगवासना वाढली म्हणजे दोन्ही सोयी होतील. सरकारला टॅक्स मिळेल, लोकांना दवाखाना मिळेल ! भोग वाढल्यामुळें रोग वाढून दवाखाना अखंड सौभाग्यवान होईल !

व्यक्तिगत कारुण्याची अथवा दयेची जागा दवाखान्यानें घेतली तर समाज सुखी होईल काय ? पुरुषार्थाचें कोणतें हि कार्य नागरिकांनीं हातीं ठेवलें नाहीं. धर्मकार्य आणि समाज-सेवा यांच्यासाठीं विविध प्रतिनिधि निवडून त्यांच्यामार्फत तें करायचें आणि आपण त्यांच्या अंकावर डोकें टेकून निश्चित निद्रा घ्यायची ! परिणाम, शंभर वर्षांचा भारताचा इतिहास त्यांत स्वातंत्र्यानंतरचीं हीं दहा वर्षे. म्हणजे इतिहासकाळांत कांहीं खिजगणती च नाहीं. अनंत काळांत दहा वर्षें म्हणजे काय हें सांगायला शाळेंतल्या गणितमास्तरची जरूर नाहीं. परंतु विज्ञान-युगांतलीं स्वातंत्र्यानंतरचीं हीं दहा वर्षे आहेत. या दहा वर्षांत समाज पालटला जाईल असा कोणता पुरुषार्थ केला? कांहीं धरणें बांधलीं, सडका केल्या, शरणार्थींना स्थिरस्थावर केलें अशा तऱ्हेचीं च कामें झालीं. पण जें काम व्हायला हवें होतें तें कांहीं झालें नाहीं.

## सेवेची स्वतंत्र योजना म्हणजे लोकनीति हवी

सेवेची स्वतंत्र योजना व्हायला पाहिजे. त्यानंतर कांहीं थोडी सेवा सरकारच्या हातांत राहिली तर ती चालेल. आपलीं जीं नेहमींचीं कामें आहेत– आपली झोंप, आपलें जेवण तीं प्रतिनिधींवर तुम्हीं सोंपवलीं आहेत काय ? महत्त्वाच्या गोष्टी प्रतिनिधीवर सोंपवून चालणार च नाहीं, हें जसें आपल्याला चांगलें कळलेलें आहे त्या च प्रमाणें राज्य-व्यवस्था हें कांहीं किरकोळ कार्य नाहीं. तें जर तुम्ही तुमच्या हातांत ठेवणार नाहीं तर तुमच्या जेवणावर सुद्धां आघात होईल. म्हणून सेवेचीं महत्त्वाचीं कामें आपल्या च हातीं राखलीं पाहिजेत. मुख्य कामें जनतेच्या हातीं व शेष कामें सरकारच्या हातीं सोंपवूं तर च आपण सुरक्षित आहोंत अन्यथा नाहीं.

आज जगाला आग लावायची असेल तर २-४ लोकांच्या डोक्यांत आग भडकली कीं झालें. राजीखुषीनें, अक्कल हुशारीनें आम्हांला लोकांनीं

निवडणुकींत निवडून दिलें असें ते म्हणतात. रशिया आपलीं शस्त्रास्त्रें वाढवून राहिला आहे; कारण त्याला अमेरिकेची भीति वाटते. तिकडे अमेरिकेला रशियाची भीति वाटते म्हणून तो आपलीं शस्त्रास्त्रें वाढवीत आहे. आर्थिक क्षेत्रांत त्या देशांनीं फार प्रगति केली आहे. आणि तेथील काँग्रेसचे लोक सुद्धां म्हणतात कीं आपल्याला शस्त्रें वाढविलीं च पाहिजेत, कारण रशिया शस्त्रें वाढवीत आहे. उद्यां हिंदुस्थानांत प. नेहरूंची मति पालटली, त्यांच्या डोक्यांत दुसरी देवता येऊन बसली आणि त्यांनीं पार्लमेंटला सांगितलें कीं आपल्याला सैन्य वाढविलें पाहिजे तर पार्लमेंटची काय बिशाद आहे त्यांना विरोध करण्याची ? आज कांहीं मॉडरेट लोक जरी सैन्य वाढवा म्हणत असले तरी पं. नेहरू च त्यांना जरा आवरीत आहेत. कारण त्यांचा लढाईवर विश्वास नाहीं. पण समजा त्यांचा विश्वास असता तर मग सैन्य वाढविल्यावेरीज गत्यतर च नव्हतें. म्हणजे मूठभर लोक जो विचार करतील तो च चालायचा. अशी ही पराधीन दशा सगळ्या लोकशाही राष्ट्रांत दिसते. तमाम सर्वत्र हें च दर्शन होतें. मत देण्याचें स्वातंत्र्य असलें तरी शिक्षण आदि महत्त्वाचीं कामें सरकारच्या हातीं असल्यामुळें जनतेला खरें स्वातंत्र्य नाहीं. पूर्वीच्या राजांपेक्षां हें आजचे निवडून आलेले मंत्री सुलतान राजे झाले आहेत. आणि वर लोकमान्य असल्यामुळें त्यांच्या योजना पाळायला ते जनतेला विवश करतात. पूर्वी असें नव्हतें. पूर्वीचे सुलतान बोलत होते तेव्हां त्यांची केवळ दाढी च हलायची, दळ हालत नसे. पूर्वी औरंगजेबला एखादा हुकूम त्याच्या सरदाराला पाठवायचा झाला तर तो पाठवितां पाठवितां च चार महिन्यांचा काळ जायचा. व त्यांतून हि किती हि मोठा सुलतान असला तरी सरदारानें त्याचा हुकूम पाळला च पाहिजे असें नव्हतें. एवढी सत्ता त्या काळच्या सुलतानाजवळ नव्हती. त्यावेळीं जनता अशिक्षित होती पण आज शिक्षित असून हि तिची अधिक दयनीय स्थिति झाली आहे. त्याला उपाय हाच कीं मुख्य कामें जनतेनें आपल्या हातांत ठेवून गौण कामें सरकारच्या हातीं सोपवावीं, आणि तीं हि सरकारच्या हातांतून हळूं हळूं कमी करीत जावीं. शेवटीं ती सत्ता जीर्ण होऊन नाहींशी होईल. ही एक प्रक्रिया च आहे. ती सुरू करणें अगत्याचें आहे. हें त्वरेनें केलें पाहिजे.

**सांगली**, ता. १२-५-५८

## समाज-शास्त्र अजून निश्चित बनलेलें नाहीं

कालच्या व्याख्यानांत आजची भूमिका मीं मांडली आहे. समाज-व्यवस्थेचा विचार जेव्हांपासून आला तेव्हांपासून तो विकसित होत गेला परंतु अजून हि त्याचें शास्त्र कांहीं बनलें नाहीं. जसें गणितशास्त्राचे नियम झाले आहेत तसे समाज-शास्त्राचे अजून नियम हातांत आले नाहींत. परंतु समाज-शास्त्र निश्चित बनविण्यासारखी अजून स्थिति आली नसली तरी कांहीं गुणांविषयीं निष्ठा मात्र सुरू झाली आहे. म्हणजे सहयोग, सहकार्य, करुणा, प्रेम, सत्यनिष्ठा या सर्व गुणांची गरज आहे हें सर्वमान्य झालें आहे. त्याविषयीं दुमत नाहीं. आतां या सर्व गुणांचा विकास कसा होईल याचा हि विचार केला गेला पाहिजे. परिस्थितिनुसार समाज-शास्त्र बदलत च राहील. ही विकासाची प्रक्रिया आहे आणि ती नित्य प्रचलित राहील. तूर्त जी व्यवस्था आहे तिचा आपण विचार करूं.

आजपर्यंत समाज-शास्त्राविषयीं जे विचार केले गेले आहेत त्याहून भिन्न विचार करण्याची हिंमत केली पाहिजे आणि तें जमलें पाहिजे. इतकें च नव्हे तर तें आजचें आपलें कर्तव्य आहे. पूर्वीच्या स्मृतिकारांनीं आणि राजनीतिज्ञांनीं जी कांहीं समाज-व्यवस्था केली असेल त्या नियमांना चिकटून राहण्यांत त्यांच्याविषयींचा आदरभाव आणि पूज्यभाव राहतो असें असलें तरी त्या पूर्वजांवर मोठा च अन्याय केल्यासारखें होईल. म्हणून आपलें हें कर्तव्य आहे कीं त्यांच्या काळीं, त्या वेळच्या परिस्थितीला अनुसरून त्यांनीं जी समाज-रचना केली, त्याहून वेगळी आपल्या काळीं आपल्याला जशी गरज असेल तशी रचना केली पाहिजे. म्हणून नवीन विचार करणारीं आणि नवीन विचार मांडण्याची हिंमत करणारीं माणसें निघालीं पाहिजेत.

काल मीं सांगितलें कीं प्रतिनिधींच्या हातीं सर्व सत्ता देऊन त्यांच्या-कडून सेवा करवून घ्यायची ही आजपर्यंत मानलेली व्यवस्था आहे. प्रति-निधींना आपण निवडून द्यावें पण आपल्या जीवनाचीं सर्व च कामें त्यांच्यावर

सोंपवूं नयेत. जीवनाच्या सर्व अंगांचें नियंत्रण करण्याचा अधिकार आपण मूठभर लोकांच्या हातीं दिला तर आपल्या गुणांचा विकास होणार नाहीं. त्यासाठीं प्रत्यक्ष लोकशाही सुरू करावी लागेल. म्हणजे जनतेच्या हातांत मुख्य कामें ठेवून प्रतिनिधींच्या हातांत विशिष्ट कार्य, उर्वरित सत्ता सोंपवावी लागेल.

## शिक्षण समाजाच्या हातीं पाहिजे

शिक्षणाचें कार्य समाजाच्या हातांत असलें पाहिजे. सरकारी नियंत्रण शिक्षणावर असतां कामा नये. ही अगदीं प्राथमिक गरज आहे. शिक्षण म्हणजे आज जें शाळा कॉलेजांत मिळतें तें नव्हे. आज गणिताचें कॉलेज असतें, इंजिनियरिंगचें कॉलेज असतें, हें सर्व बिनरंगी शिक्षण आहे. जिथें रंग दिसत नाहीं तिथें हृदयें विकसित होत नाहींत. जीवनाच्या रंगानें रंगलेलें जें शिक्षण आहे तें लोकांच्या हातांत पाहिजे. तें शिक्षण सरकारच्या हातांत नको. ही एक नवीन गोष्ट मी सांगतों आहे असें नाहीं. पूर्वीच्या समाज-शास्त्रांत हि अशी च व्यवस्था होती. प्राचीन काळीं शिक्षणावर जो अंकुश होता तो ज्ञानी माणसांचा होता, राज्याचा नव्हता. भारताची ही विशेषता होती कीं येथील ज्ञानी पुरुषांनीं आपल्या हातीं शिक्षण-व्यवस्था ठेवली होती. ती स्थिति आज यायला पाहिजे. आज शिक्षक म्हणजे एक नोकर समजला जातो. तो चांगलें शिकवील तर चांगला नोकर आहे आणि वाईट शिकवील तर वाईट नोकर आहे. जीवनांत शिक्षणाला कांही स्थान च नाहीं. आज काय होतें ? एखादी महत्त्वाची घटना आपल्या जीवनांत घडली तर आपण ती आपल्या मित्राला सांगूं,आईला सांगूं वडिलांना सांगूं परंतु तसल्या कठिण प्रसंगीं शिक्षकांची कधीं कोणी सल्ला घेत नाहीं. आतां अगदीं च एखादा असामान्य शिक्षक असेल– कीं ज्याच्या जीवनाचा परिणाम शिष्यावर होत असतो, त्याचें कांहीं मार्गदर्शन ते मिळवितील, परंतु आज साधारणपणें शिक्षकाला कोणी सल्लागार असें मानलें नाहीं. वास्तविक कठिण प्रसंगीं सर्वोत्तम सल्ला गुरु च देऊं शकतो. आईबाप प्रेमानें सल्ला देतात. त्यांना पूर्ण ज्ञान नसतें. परंतु गुरु च असा एक आहे कीं ज्याच्या ठिकाणीं पूर्ण ज्ञान आणि पूर्ण प्रेम या दोन्ही गोष्टी एकवटतात. त्याचा सल्ला बचाव करणारा असतो परंतु तो गुरु च आज आपण गमावला आहे.

शिक्षक म्हणजे नोकर मानला जातो. कॉमर्स कॉलेजमध्यें शिकवणाऱ्या शिक्षकाला व्यापाराचें काय ज्ञान असतें? त्याला दहा रुपयांचे पंधरा तरी करतां येतील काय? दहाचे पांच तो अवश्य करील. पण दहाचे पंधरा करण्याची अक्कल त्याला नाहीं. डिग्री घेतात, बी. कॉम, एम. कॉम, पण काम कांहीं करतां येत नाहीं. असा अननुभवी शिक्षक, ज्यानें जीवनांत कांहीं हि पुरुषार्थ केलेला नाहीं असा शिक्षक, मुलांना काय ज्ञान देणार? आणि त्याच्या जीवनाचा मुलांवर काय प्रभाव पडणार? वस्तुत: शिक्षकाचा आश्रम हा गृहस्थाश्रम नाहीं च. त्याचा आश्रम म्हणजे वानप्रस्थाश्रम. उत्तमांतले उत्तम अनुभवी पुरुष आपल्या समाजांत आहेत. अशा अनुभवी पुरुषांकडून जर शिक्षण मिळालें तर विद्यार्थींना खरें शिक्षण मिळेल. पुरुषार्थाच्या वयांत पुरुषार्थ करावा आणि त्यानंतर शरीर जीर्ण होण्याच्या आधीं, शरीरामधें थोडें चैतन्य असतांना, जीवनाचा रस शिल्लक असतांना, त्यांनीं शिक्षकाचें काम करावें. कारण त्यांच्याजवळ अनुभवाचा सांठा आहे.

## शिक्षणावर सरकारी नियंत्रण नको

शिक्षण-विभाग हा नागरिकांच्या हातीं असावा. सर्वांनीं मिळून आपल्या मुलांना कसलें शिक्षण द्यायचें तें ठरवावें. त्यांच्या स्वतंत्र पदव्या असाव्यात. या पद्धतीला सरकारनें मदत करावी, म्हणजे डिग्रीचा संबंध नोकरीशीं लावूं नये. त्या त्या खात्यांच्या स्वतंत्र परीक्षा असाव्यात आणि मग त्यांत निवड करून नोकरी द्यावी. अमुक एका डिग्रीचा च मनुष्य असला पाहिजे असें सरकारनें डिग्रीला उत्तेजन देऊं नये. हा विचार सरकारनें मान्य केला आहे. आपलें सरकार हिंदुस्थानच्या संस्कृतीला विसरूं शकत नाहीं. व्यक्तिगत स्वातंत्र्य ही भारतीय संस्कृति आहे. प्राचीन काळीं सांदीपनीच्या घरीं कृष्णाला वसुदेवानें पाठविलें परंतु वसुदेवानें सांदीपनीला, कृष्णाला काय शिक्षण द्यायचें हा आदेश कांहीं पाठविला नव्हता. विश्वामित्राकडे रामाला ठेवलें पण त्याला काय शिक्षण द्यायचें हा आदेश दशरथ त्याला देऊं शकत नव्हता. ऋषींच्या आश्रमांत राजाचा आदेश चालत नव्हता. याच्या उलट आजची स्थिति आहे. आजच्या शिक्षकाला वरून येणारे सर्व आदेश, अगदीं

कोणत्या तासाला काय शिकवायचें आणि कोणत्या विषयाला किती वेळ द्यायचा, निमूटपणें पाळावे लागतात.

पूर्वी एखाद्या राजाला अडचण उद्भवली म्हणजे तो ऋषींच्या आश्रमांत जाई आणि ऋषींची सेवा करी. ऋषि हि ध्यानादींच्या साह्यानें राजाला सल्ला देई. शाकुंतल नाटकांत दुष्यन्त राजा कण्वऋषींच्या आश्रमांत शिकारीकरतां जातो. तो तेथील हरिणावर बाण मारणार, तेवढ्यांत आश्रमचा एक लहान बालक समोर येऊन म्हणतो, हा आश्रमचा हरिण आहे याची शिकार तूं करूं शकत नाहींस. हें ऐकून राजा एकदम थांबतो. एक लहानसा बालक राजासमोर येऊन उभें राहण्याची हिंमत करतो आणि त्याला अडवतो. आश्रमच्या मुलांत हें धैर्य कसें आलें? केवढें हें स्वातंत्र्य आहे! आणि तें स्वातंत्र्य त्या वेळच्या राजानें मान्य केलें. तें स्वातंत्र्य भारताला हवें आहे. याची जाणीव आपल्या सरकारला आहे. नेत्यांना हें पटलें आहे. आतां तें अमलांत कसें आणायचें याचा विचार होईल.

समजा आपण अशी शाळा काढली कीं ज्या शाळेमध्यें एक तासभर मुलांना वेद शिकविला, दोन तास शेतींत काम केलें, बाकी दोन-तीन तास इतर उद्योगांत गेले तर तीं मुलें जग जिंकण्यासारखीं विद्वान आणि ज्ञानी बनतील अशी माझी खात्री आहे. मात्र त्या मुलांबरोबर शिक्षकानें हि काम केलें पाहिजे. सांगलीमध्यें अशा प्रकारची शाळा कां निघूं नये? आज शाळेमधें शिकून डिग्री तेवढी हातांत येते बाकी ज्ञानाच्या नावानें शून्य. पण अशा शाळा आपण काढल्या तर मुलांना शेतीचें ज्ञान होईल, वेदाध्ययन होईल, विज्ञानाचें हि ज्ञान होईल. अशा प्रकारें भिन्न भिन्न शाळेमध्यें मुलें शिक्षण घेतील आणि त्या त्या ठिकाणीं शिक्षणाचे नाना प्रयोग झाल्यामुळें सर्वोत्तम बुद्धीचीं माणसें निघतील. नाहींतर आजच्या शिक्षणामध्यें ठराविक बुद्धि मुलांना लाभते. त्याचा एक सांचा च ठरून गेला आहे. त्यामुळें मुलें पुरुषार्थहीन बनतात. म्हणून माझी अशी इच्छा आहे कीं शिक्षण लोकांनीं आपल्या हातांत घ्यावें. वास्तविक या कामासाठीं आंदोलनच करायला हवें. परंतु मीं तें केलें नाही कारण आजचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न मीं हातीं घेतला आहे.

३५०२८ ........ दि: १७.९.७५
क्रमांक ........................ नों: दि: २०.९

## शिक्षणावर धनिकांचें हि नियंत्रण नको

शिक्षणावर सरकारचें नियंत्रण नको तसें धनिकांचें हि नको. धनिकांनीं जी काय मदत द्यायची असेल ती द्यावी पण नियंत्रण करूं नये. नियंत्रण करण्याचें काम ज्ञानी माणसाच्या हातीं सोंपविलें पाहिजे. शिक्षकाचा पगार वाढला पाहिजे त्यापेक्षां शिक्षकानें च स्वयंभू बनावें, आणि त्याची स्वयंभू प्रतिष्ठा आहे हि. ती च त्याला लाभावी याची चिंता सर्वांनीं करावी. लोकांनीं सूचना कराव्यात परंतु शिक्षकांना स्वतंत्रपणें योजना करायची असल्यास त्यांनीं ती करावी.

## राज्यकारभार लोकांच्या हातीं आला पाहिजे

दुसरी गोष्ट राज्यकारभाराची. ती फार कठिण गोष्ट आहे. आज मूठभर लोकांच्या हातीं सत्ता आली आणि बाकी प्रजेच्या हातीं कांहीं हि राहिलें नाहीं. ही स्थिति गेली पाहिजे. राज्य-कारभार लोकांच्या हातीं च आला पाहिजे. गांवाचा कारभार गांवच्या लोकांनीं च चालविला पाहिजे. गांवांतील सर्व सत्ता गांवच्या लोकांच्या हातीं राहील, गांवागांवांत ग्राम-राज्य स्थापन होईल, गांवाचा कारभार गांवचे लोक करतील, असें सत्तेचें विकेंद्रिकरण झालें तर च ग्रामस्वराज्याची स्थापना होईल. गांवांतील आयात निर्यात गांवकरी ठरवितील. गांवामधें ग्रामसभा स्थापन होईल. त्या सभेमधें गांवांतील प्रत्येक स्त्रीपुरुष सभासद राहतील. आजकाल गांवांमध्यें ज्या पंचायती असतात त्यांनीं अगदीं पंचाइत करून टाकली आहे. त्या पंचायतींत, असे च लोक असतात, ज्यांच्या हातांत जास्त पैसा, जास्त जमीन आहे. सरकारदरबारीं ज्यांचें वजन आहे अशांच्या च हातीं ग्रामपंचायती येतात त्यामुळें गांवांत भांडणें राहतात. म्हणजे केन्द्रित शोषणाच्या ऐवजीं ही विकेन्द्रित शोषण- योजना सुरू केली, यावर एक च उपाय आहे. तो म्हणजे गांवांतील जमीन सर्वांची होऊन सर्व गांव ग्रामदानी व्हावें.

## जमिनीसाठीं खून होतात यावर इलाज ग्रामदान

या दक्षिण साताऱ्यांत पांच-पंचवीस ग्रामदानें झालीं आहेत. पण या पांच-पंचवीस गांवांनीं कांहीं होणार नाहीं. तालुके तालुके दान झाले

पाहिजेत. आज इथले जजसाहेब भेटायला आले होते. सांगत होते, ‘ या जिल्ह्यांत खून फार होतात. बेबंदशाही माजली आहे आणि खून झाले तरी पुरावा कांहीं मिळत नाहीं. खून होतात पण पुराव्याच्या अभावीं न्याय च होत नाहीं. पुरावा सांगायची किंमत च कोणी करीत नाहीं, कारण पुरावा सांगितला तर आपल्याला च धोका आहे अशी त्यांना भीति वाटते. त्यामुळें लोकाना न्याय मिळण्याची कांहीं सोय नाहीं. ’ मीं विचारलें खून कशासाठीं होतात ? तर ते म्हणाले ‘ पुष्कळसे खून जमिनीसाठीं च होतात आणि कांहीं थोडे खून जुनीं घराण्याचीं भांडणें असतात त्यामुळें होतात. ’ मीं म्हटलें याला इलाज एक च आहे. तो म्हणजे ग्रामदान. ग्रामदानाचें वातावरण झालें आणि ग्राम-रचनेचें कार्य सुरू झालें तर असल्या प्रवृत्तींना आपोआप आळा बसेल. मग खून, मारामाऱ्या होणार च नाहींत. त्यासाठीं सरकारची जितकी सत्ता लोकांच्या हातीं येईल तितकें हें कार्य सोंपें जाईल. तेंच कार्य मीं हातीं घेतलें आहे आणि तें तडीस जाईल अशी आशा राखून आहें

## देशाची अंतर्गत शांतता शांति-सेनेनें

तिसरें जें कार्य आहे तें जनतेनें हातीं घेतलें पाहिजे. तें आहे देशाच्या अंतर्गत शांततेचें. देशाच्या अंतर्गत शांततेसाठीं पोलीसांची गरज नाहीं असें झालें पाहिजे. आणि त्यासाठीं मीं असें सुचविलें आहे कीं दर पांच हजारांमागें एक या हिशोबानें पंच्याहत्तर हजार शांति-सैनिक देशामध्यें उभे झाले पाहिजेत. ही सेना उभी झाली तर फार मोठी शक्ति निर्माण होईल. हे लोक प्रसंगीं मरण्यास तयार होतील, शांतीचें वातावरण कायम ठेवण्यास मदत करतील आणि घरोघर जाऊन सेवा करतील. त्यामुळें नेहमींसाठीं हे सैनिक सेवा-सैनिक म्हणून राहतील आणि प्रसंगीं शांति-सेना म्हणून काम करतील. या सैनिकांसाठीं च घरोघर सर्वोदय-पात्राची योजना सुचविली आहे. सर्वोदय-पात्र हें लोक-संमतीचें चिह्न आहे. त्या आधारावर शांतिसेना उभी राहील. आणि मग पोलीसांची गरज राहणार नाहीं. त्यामुळें हिंदुस्थानची नैतिक शक्ति वाढेल.

त्या तुमच्या सांगलीला पन्नास हजार लोक म्हणजे दहाहजार घरें आहेत. तेव्हां आतांपर्यंत निदान पांचहजार घरांत तरी सर्वोदय-पात्र कां सुरू केलें नाहीं, असा आळस कां केला असें इथल्या भगिनींना मी विचारतों. आतां लवकर च पंढरपूरला सर्वोदय-संमलन आहे तेव्हां त्या संमेलनासाठीं तुम्ही या, पण रिकाम्या हातानें येऊं नका. विठोबाच्या चरणीं झालेलें काम अर्पण करण्यासाठीं या. किती हजार सेवक तुम्ही उभे करूं शकतां आणि किती सर्वोदय-पात्र तुम्हीं सुरू केलें हें तिथें येऊन जाहीर करा. असें कराल तर इतर ठिकाणच्या लोकांना हि प्रेरणा मिळेल. हें कार्य एकटचा दुकटचानें होणारें नाहीं. त्याकरतां कार्यकर्त्यांची जमात उभी झाली पाहिजे. याला जीवन देणारे कार्यकर्ते मिळाले पाहिजेत. प्रेम, करुणा, दया हे गुण समाजामध्यें आले पाहिजेत. आज करुणा दासी बनली आहे. तिचें राज्य हवें असेल तर प्रेमाच्या आणि करुणेच्या शक्तीचें दर्शन व्हावयाला पाहिजे. म्हणून ज्यांच्यामध्में प्रेम, करुणा आणि अहिंसा भरली आहे अशा लोकांनीं पुढें आलें पाहिजे. जर असें झालें नाहीं तर सैन्यांतून आपली सुटकाच होणार नाहीं. आणि सैन्य जर वाढवावें लागलें तर गरिबांची सेवा होणार नाहीं. म्हणून हें कार्य आपण हातीं घेतलें पाहिजे आणि ही सेवा-सेना उभी केली पाहिजे.

## तीन मुख्य गोष्टी

एकूण तीन गोष्टी मीं तुम्हांला सांगितल्या (१) शिक्षण (२) राज्य-कारभार (३) अन्तर्गत शांति. हीं तीन्ही कार्यें जनतेनें हातीं घेतलीं पाहिजेत. यांपैकीं पहिल्या गोष्टीचा मी प्रचार करीत आहें. तें कार्य मीं हातीं घेत-लेलें नाहीं. दुसरें राज्य-कारभाराचें काम ग्रामदानाच्या रूपानें मीं हातीं घेतलें आहे आणि तिसरें अंतर्गत शांतीचें काम हातीं घेऊं पाहत आहें. या तीन गोष्टी जनतेनें आपल्या हातांत ठेवून उर्वरित कार्य सरकारला सोंपवावें.

असें जेव्हां होईल तेव्हां पुढें हळू हळू प्रत्यक्ष लोकशाही येईल. आणि 'स्टेट विल विदर अवे' या भाषेप्रमाणें राज्य नाहींसें होईल. म्हणून मी म्हणतों कीं ही सरकार झिजवण्याची क्रिया आजपासून सुरू झाली पाहिजे. त्यासाठीं मीं असा कार्यक्रम बनविला आहे. (१) भूमि-समस्या (२) शांति-

सेना, (३) शिक्षण. सत्ता कमी न करतां या गोष्टी होऊं शकतात. अन्तर्गत शान्तीसाठीं पोलीसांची गरज नाहीं असें होऊं शकतें. पुढें कधीं काळीं लढाई झाली, आणि आयात निर्यातीवर परिणाम होऊन धान्य महाग झालें तर त्याचा परिणाम फार वाईट होईल. म्हणून ग्रामदान हें डिफेन्स मेजर आहे. असें सांगितलें ग्रामदानाचा बेसिस घेऊन च पुढचें सर्व निर्माण कार्य वाढलें पाहिजे. त्यानें च देशाची शांति वाढेल, आणि मग नेहरूनंतर काय असा पुरुषार्थहीन विचार कोणी करणार नाहीं.

**सांगली**, ( दक्षिण सातारा )
ता. १३-५-१९५८

•

## आतां कुंपणें नकोत : १३ :

### जुनी आठवण

४० वर्षांपूर्वीं मिरजेला माझें येणें झालें होतें आणि तुमची ती अंबाबाई तालीम आहे तिथें माझें एक व्याख्यान हि झालें होतें. त्या वेळीं मी तरुण च होतों. आणि देश-निरीक्षण करण्यासाठीं पायीं हिंडत होतों. अनुभवी होतों असें नाहीं. २३ वर्षांचें माझें वय होतें आणि गीतेवर व्याख्यानें देत होतों. आतां ती गीता मला किती समजत होती तें त्या भगवान् कृष्णाला च माहीत. पण मी मात्र अगदीं जिवाभावानें, तळमळून सांगत असें. गीते-विषयीं आज हि माझी भक्ति अशी च आहे. गीताईचिंतनिकेच्या पुढच्या आवृत्तीसाठीं माझें लेखन चालू आहे. गीतेचा अभ्यास १९१३ पासून सुरू केला. त्यापूर्वीं ज्ञानेश्वरी माझ्या पाहण्यांत होती च आणि ज्ञानेश्वरी म्हणजे च गीता. म्हणजे आज ४५ वर्षें झालींत माझा गीतेचा अभ्यास चालला आहे; आणि तो मला पुरून उरणार आहे. कारण तो अनुभवाचा ग्रंथ आहे. एक एक अनुभव उमलतां उमलतां नवीन दर्शन लाभतें. असा अगदीं अद्भुत ग्रंथ आहे तो. आज मला त्या ग्रंथाचा महिमा सांगायचा नव्हता, नुसती जुनी कहाणी सांगायची होती कीं मी गीतेवर व्याख्यानें देत होतों, किल्ले

पाहत होतों आणि सत्पुरुषांच्या गाठी भेटी घेऊन कांही ज्ञान मिळवीत होतों. त्या वेळीं मला लोक विशेष जाणत नव्हते. म्हणून त्याचा लाभ मला मिळत होता. तो एक विशेष च लाभ होता. कारण पोटांत शिरून ज्ञान मिळवावें लागतें.“ **रिघावे पोटांत । पायां पडूनि घ्यावा अंत** ” असें तुकारामानें सांगितलें आहे, तसें मी करीत होतों. पण आतां मला पायां पडायला सांपडत च नाहीं उलट लोक च माझ्यावर जुलूम करतात. पायां पडून कंटाळा आणतात. त्यामुळें आतां मी कधीं कोणाच्या पायां पडणार नाहीं असें ठरवून टाकलें आहे. कारण त्याचीं फळें मी चाखतों आहे तीं इतकीं वाईट आहेत कीं अशी तकलीफ कोणत्या हि मोठ्या माणसाला देणें अयोग्य च ठरेल.

त्या वेळीं मी लोकांजवळ जाऊन गुपित ज्ञान घेण्याचा प्रयत्न करीत असें. जुन्या पोथ्या पाहत असें. असा अनेक प्रकारचा नाद होता. इतिहास-संशोधनाचा, विशेषत: जुने आध्यात्मिक ग्रंथ पाहण्याचा नाद होता. तो नाद घेऊन मी हिंडत होतों. त्यावेळीं इथें हि येऊन पोंचलों. त्याची आठवण मला आहे. आतां त्या वेळची आठवण असणारे कुणी नसतील. दुसरे कोणी असो वा नसो पुंडलीकजी मात्र त्यावेळीं हजर होते; आणि आज हि आहेत. त्यांना ती आठवण आहे. आज ती संस्था पाहण्यास गेलों होतों. प्रचंड इमारत झाली आहे. त्याचें कलेवर वाढलें आहे. शरीर वाढलें म्हणजे आंतला उत्साह कमी होतो. तेव्हां त्या काळीं जो उत्साह होता तो वाढीला लागला पाहिजे. कारण भारत आतां स्वतंत्र झाला आहे. तेव्हां आतां केवळ देहाची तालीम घेऊन उपयोगाचें नाहीं. काया वाचा मनाचा योग साधला पाहिजे. आसन, प्राणयाम, मारुतीची—ब्रह्मचर्याची—उपासना हें तर हवें पण त्याला जोडून च विचार-संशोधन हि झालें पाहिजे. म्हणजे ज्याला आम्ही योग म्हणतों तो योग तिथें साधला पाहिजे- म्हणजे मग उत्साह येईल.

## अन्य धर्मियांना मंदिर प्रवेश

त्या संस्थेबद्दल मला कांहीं सांगायचें नव्हतें पण त्या निमित्तानें गांव पाहणें झालें; आणि मल्लिकार्जुनाच्या मंदिरांत जायला मिळालें. त्याचा मला फार आनंद झाला. मी मंदिर व्यवस्थापकांना म्हणालों होतों कीं माझ्याबरोबर अन्यधर्मीय लोक आहेत. आमची जर्मन मुलगी हेमा आमच्या

बरोबर आहे तिला जर तेथें प्रवेश मिळणार नसेल तर मीं तेथें जाणें शोभणार नाहीं ' म्हणून मी कांहीं तेथें येत नाहीं. पण ते म्हणाले कीं, तिला घेऊन तुम्ही येऊं शकतां. म्हणून त्या जर्मन मुलीसह मी तेथें गेलों. मागें अशी च उदारता प्रसिद्ध तीर्थक्षेत्र गोकर्ण महाबळेश्वरला अनुभवाला आली होती. तेव्हां आमच्यावरोबर एक मुसलमान मित्र होता. त्या वेळीं मीं त्यांना विचारलें कीं याच्यासकट मला प्रवेश मिळेल काय ? तेव्हां ते 'हो' म्हणाले आणि त्याच्यासह मी मंदिरांत गेलों. मूर्तीवर आणि मंदिरांवर माझी श्रद्धा आहे. तिथें मला भगवद्दर्शन मिळतें. केवळ तेथें च मिळतें असें नाहीं तर मूर्तीच्या बाहेर समाजांत हि तें दर्शन व्हावें अशी माझी इच्छा आहे. मूर्तींत हि तें होऊं शकतें. कारण असंख्य भक्तांनीं त्या मूर्तीची उपासना केली आहे. त्याचा लाभ मला मिळतो म्हणून मी तेथें जाऊं इच्छितों परंतु माझ्या बरोबर जर अन्यधर्मीय लोक असतील तर मीं त्यांना सोडून येणें शक्य नाहीं. हें मला, हिंदुधर्माचा जो सर्वोत्तम ग्रंथ--महाभारत--त्यानें शिकविलें. स्वर्गारोहणाच्या वेळी धर्मराजावरोबर एक कुत्रा होता, पुढें तो यमधर्म च निघाला, पण त्यावेळीं धर्मराजाला तें माहीत नव्हतें. त्या वेळीं त्या कुत्र्याला स्वर्गांत प्रवेश करण्यास मनाई केली तेव्हां युधिष्ठिर म्हणाला " माझ्या बरोबरच्या कुत्र्याला स्वर्गांत प्रवेश करण्याची मनाई असेल तर मी स्वर्गांत येणार नाहीं." पुढची कहाणी तुम्हांला माहीत च आहे.

आतां थोड्या च दिवसांनीं मी पंढरपूरला पोंचणार. तेव्हां पंढरपूरला विनोबा आला म्हणजे परधर्मियांना घेऊन तो विठोबाच्या मंदिरांत घुसणार आहे, असें कांहीं वर्तमानपत्रांत आलें आहे. पण मी घुसणार तर नाहीं च कारण देवळाच्या आंत देव आहे आणि देवळाच्या बाहेर देव नाहीं असें कांहीं मला वाटत नाहीं.

**द्वारका पंढरी देवयात्रा करी । सर्वत्र न धरी तोचि भाव ॥**

एकनाथ म्हणतात त्याप्रमाणें हें अभद्र लक्षण आहे. आणि ईश्वर-कृपेनें हें लक्षण माझ्यांत नाहीं. मला सगळीकडे च परमेश्वर दिसतो. तुम्ही सर्व बसले आहांत, तुमच्या मुखांत तो अधिक च उज्ज्वल दिसतो. तसाच ज्या स्थानांत अनेक भक्तांनीं तपस्या केली आहे तिथें हि भगवान् उज्ज्वल दिसतात म्हणून तिथें मी जात असतों.

जगन्नाथपुरीची माझी कहाणी नवीन नाहीं. बाबा नानक पंजाबचे महापुरुष, ज्यांच्या नांवानें शीख रात्रंदिवस प्रार्थना करतात, ते यात्रा करीत करीत पुरीला आले असतांना त्यांना तिथें प्रवेश मिळाला नाहीं. ४५० वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. म्हणजे ४५० वर्षांपूर्वी आपले लोक जेथें होते त्याच ठिकाणीं आज हि आहेत त्यांच्या बुद्धींत परिवर्तन झालेलें नाहीं. जग कोठल्या कोठें निघून गेलें आहे आणि हे लोक जागेवरच कायम आहेत.

## उदार धर्म

दीडशें वर्षांपूर्वी काश्मीरमध्यें लष्कराच्या मदतीनें जबरदस्तीनें हिंदूंना मुसलमान केलें गेलें, त्यांना बाटवलें. पुढें त्या हिंदूंना पश्चात्ताप होऊन त्यांनीं हिंदुधर्मात आम्हांला परत घ्या अशी काशीच्या पंडितांकडे मागणी केली. परंतु त्या वेळेस त्या पंडितांनीं सांगितलें कीं, आमच्या धर्मात बाटले-ल्यांना परत घेण्याची सोय नाहीं. एवढें म्हणून काश्मीरच्या असंख्य लोकांना, ते आपल्या धर्मांत परत येत असतांना काशीच्या पंडितांनीं त्यांना परत घेतलें नाहीं. त्यांनी कांहीं हौसेनें तो धर्म स्वीकारला नव्हता. त्यामुळें त्यांना परत घ्यायला कांहींच हरकत नव्हती. वास्तविक या मार्गानें मुसलमानधर्म स्वीकार-ण्याला जबरदस्ती करणें हें त्या धर्माच्या तत्त्वांत नाही. पण वेडाच्या भरांत तें काम केलें गेलें त्या नंतर १० वर्षांपूर्वी काय घटना घडली? नोआख-लीला महात्मा गांधी गेले असतांना तेथें अनेक हिंदूंना जबरदस्तीनें बाटविलें असल्याचें त्यांना दिसलें. त्यावेळीं काशीचे पंडित म्हणाले, "त्यांनीं प्रायश्चित घेऊन परत या धर्मांत यावें, आम्ही त्यांना घ्यायला तयार आहोंत." म्हणजे १००-१२५ वर्षांनंतर बाबा विश्वनाथाच्या कृपेनें त्यांना एवढी अक्कल आली. पण गांधीजींनीं त्यावेळीं वेगळा च हट्ट धरला. ते म्हणाले, "यांना जबरद-स्तीनें बाटविलें आहे, म्हणून प्रायश्चित्त घेण्याची कांहीं गरज नाहीं. आम्ही हिंदु आहोंत असें ते म्हणतात, म्हणजे ते हिंदुच आहेत. अशा स्थितींत त्यांच्यावर प्रायश्चित्त लादण्याची गरज काय?" परंतु कांहीं अपरिवर्तनवादी जुने लोक असे कांहीं हट्टी असतात आणि त्यांची बुद्धि इतकी संकीर्ण झालेली असते कीं, ते एवढ्या मोठ्या उदार धर्माचे अगदीं हाल हाल करून टाकतात. आणि इतकें असून हि या धर्मातून महात्मा गांधी, रामकृष्ण परमहंस यांच्यासारखे

सत्पुरुप निघाले आहेत. म्हणून च त्याची मान उंच आहे. नाहीं तर शरमेनें तोंड खालीं घालण्याची पाळी आमच्या लोकांनीं आणली आहे.

## भांडणानें ऐक्य होणार नाहीं

मशिदीमध्यें आणि चर्चमध्यें आम्ही गेलों, तर आम्हांला प्रेमानें बसवतात. चर्चमध्यें हातांत बायबल हि देतात. मी कितीतरी वेळां चर्चमध्यें प्रार्थनेला गेलों आहें. त्यांनीं माझ्या हातांत बायबल दिलें आहे आणि अमुक अमुक गीत चालू आहे तें हि सांगितलें आहे. हें आम्ही कसें व कधीं लक्षांत घेणार ? आपल्याला अधिक उदारता दाखविली पाहिजे. कारण आपल्या धर्मांत वेदान्त असल्यामुळें अमकाच एक गुरु, अमका च एक ग्रंथ, अमका च एक पंथ अशी कांहींच गोष्ट नाहीं. आज च एका ख्रिश्चन गृहस्थांशीं चर्चा झाली. 'ख्रिस्ताला शरण गेल्याशिवाय मुक्ति नाही असें ख्राईस्टनें स्वतः म्हटलें आहे, या विषयीं तुमचें काय मत आहे? असें त्यांनीं विचारलें. मीं म्हटलें," मी ख्रिस्ताला एक महापुरुष समजतों. मला त्याच्याविपयीं आदर हि आहे, परंतु ख्रिस्त म्हणजे एक पर्सनॅलिटी आहे आणि त्या पर्सनॅलिटीला शरण गेल्याशिवाय मुक्ति नाहीं, असें मानायला मी कांहीं तयार नाहीं. तो एक भगवत् आविर्भाव होता असें मानायला माझी कांहीं हरकत नाही आणि ख्राईस्ट म्हणजे व्यक्ति नसून एक विचार आहे ह्या अर्थानें त्याला शरण जायला मी तयार आहें. भगवद्गीतेंत हि कृष्णानें म्हटलें आहे '**सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज**' सर्व सोडून मला शरण ये. मग आतां काय करायचें ?" तेव्हां ते गृहस्थ म्हणाले आतां कोण लबाड बोलतो तें ठरवा. मी स्वतः च लबाड आहें, पुरेसा लबाड आहें. तेव्हां कृष्ण लबाड बोलतो कीं ख्राइस्ट लबाड बोलतो हें तराजूंत तोलून कोण लबाड बोलतो आहे हें मी कोण ठरविणार ? मी असें ठरवितों आणि मला असें वाटतें की, गीतेमध्यें 'मला शरण ये' असें जें भगवान् कृष्ण म्हणतात तो त्यांचा 'मी' इम्पर्सनल आहे. त्याचा अर्थ तो एक विचार आहे. तसें च 'मला शरण ये' म्हणणारा ख्राईस्ट इम्पर्सनल आहे. तसें च बौद्ध धर्मांत 'बुद्धं शरणं गच्छामि' असें म्हणतात. तेव्हां बुद्धाला शरण जाणें, कृष्णाला शरण जाणें, ख्रिस्ताला शरण जाणें असा च

अर्थ घेऊं आणि तिथे हि भांडत बसू तर समाजांत कधी हि ऐक्य साधणार नाहीं. धर्मांनीं धारण केलें पाहिजे. म्हणजे सर्वांना एकत्र आणलें पाहिजे. समाजांत प्रेम निर्माण केलें पाहिजे, त्याऐवजीं जे धर्म समाजामध्यें विद्वेष करायला तयार होतात त्यांना धर्म च कसें म्हणतां येईल ? तेव्हां ते गृहस्थ म्हणाले "तुमचें म्हणणें मला कांहीं पटत नाहीं."

## हिंदुधर्माचें स्वरूप

भगवद्गीता वाचणारा भागवत वाचणार नाही. कोणी कृष्णाचें नांव घेईल, कोणी विष्णूचें. तरी सुद्धां तो तरून जाईल. पण अमुक च एक ग्रंथ वाचावा आणि अमुक च एका व्यक्तीला शरण जावें असें हिंदुधर्मांत नाहीं. जसें बायबल वाचलें नाहीं तर तो ख्रिश्चन होऊं शकत नाहीं. बायबल गेलें कीं ख्रिश्चन गेला. कुराण गेलें कीं मुसलमान गेला. असें हिंदुधर्मांत नाहीं. मी उपनिषद वाचतों पण गीता वाचीत नाहीं तर चालेल काय ? चालेल. मी भागवत वाचतों, गीता उपनिषद वाचत नाहीं तर चालेल काय? चालेल. मी वेद वाचतों. चालेल काय ? चालेल, मी कांहीं च वाचीत नाहीं फक्त तुकारामाची गाथा वाचतों चालेल काय ? चालेल. असा हा धर्म आहे. त्यांत कांहीं असें म्हटलें नाहीं कीं, ती संस्कृत गीता च वाचली पाहिजे. मनाचे श्लोक वाचले तरी चालेल. त्यानें माझ्या बुद्धीला सात्विकतेचा लाभ होतो. तेवढ्यानें हि मी मोक्षाचा अधिकारी होऊं शकतों. कोणत्या हि ग्रंथाचा, व्यक्तीचा आग्रह हिंदुधर्मांत नाहीं. ख्रिश्चन धर्म हा ख्राईस्टभोंवतीं, बौद्ध धर्म हा बुद्धाभोंवतीं, इस्लाम धर्म हा महंमदाभोंवतीं उभा आहे. परंतु त्या बुद्धाचा ख्राईस्टचा आणि महंमदाचा अर्थ व्यापकच घेतला पाहिजे. तसें जर आपण करणार नाहीं, तर आपण संकुचित होऊं. एखाद्या गुरुपंथासारखें माझा गुरु मला सर्वस्व आहे असें एखादा म्हणील तर तें मी समजू शकतों. माझी आई मला परमप्रिय आहे, माझ्यावर तिचे अनंत उपकार आहेत, ती माझी सर्वस्व आहे हें म्हणणें निराळें परंतु माझी आई सगळ्या आयांपेक्षां श्रेष्ठ आहे असें म्हटलें तर कसें चालेल ? तसेंच माझा गुरु मला सर्वस्व असला तरी सर्वांना तो च सर्वस्व आहे असें म्हणण्याचा उपद्व्याप जर मीं केला, तर कसें चालेल ?

माझ्या आईला तुमच्या डोक्यावर कसा लादूं ? तुम्ही काय बिन-आर्यांचीं मुलें आहांत ? हा विचार जिथें धर्म नाहीं, जिथें पुस्तक नाहीं, तिथें सांगूं शकतों, परंतु जिथें पुस्तक आहे, धर्म आहे, साधु सत्पुरुष होऊन गेले आहेत, अवतार आहेत, तेथें तुम्ही अमुक च एक पुरुष पतकराल तरच तराल ही संकुचितता आणून कसें चालेल ? या संकुचित विचाराला हिंदुधर्मांत आणि वेदांतांत लेश हि थारा नाहीं. इतका हा अगदीं मुक्त धर्म आहे.

## अंतःशुद्धि हवी

आणि मुक्तीला काय लागतें ? केवळ अंतःशुद्धि तेवढी असली कीं इतर कसल्या हि कर्मकांडाची गरज नाहीं. मग ती संध्या नको, जप नको एकादशी नको आणि प्रार्थना नको असें सबंध वेदान्त सांगतो. परंतु एखाद्याला त्याची मदत हवी असेल तर ती घ्यावी, पण एकादशी करीत नाहीं म्हणून नरकगतिशिवाय गति च नाहीं असें कांहीं हिंदुधर्म म्हणत नाहीं. अशा तऱ्हेच्या अत्यंत व्यापक आणि विशाल धर्माच्या लोकांनीं संकुचितता राखली, बंधनांतून ते मुक्त झाले नाहींत तर, तो धर्म आणि ती भारतीय संस्कृति कशी टिकेल ? भारतीय संस्कृतीनें जगाच्या संस्कृतींना पचनीं पाडण्याचें मोठें कार्य केलें आहे. तें आपण मोडून टाकलें तर आपण जुन्या रानटी काळांत गेल्यासारखें होईल. म्हणून कोणत्या हि प्रकारच्या संकुचितपणाला जो वश होत नाहीं असा जो निरुपाधिक धर्म तोच टिकेल. कृष्णाचे भक्त भगवान् कृष्णाला पूर्णावतार मानतात. सबंध ईश्वर त्यांत प्रकटला आहे असें त्यांना वाटतें. मी त्यांना म्हणतों कीं, तसें तुम्ही मानू शकता. माझ्या हि जवळ लहानसा शालीग्राम आहे त्यामध्यें सुद्धां सबंध विश्व आणि विश्वेश्वर सामावला आहे. हा लहानसा गोटासुद्धां सर्व विश्वाचा प्रतिनिधि होऊं शकतो. पण जो हें मानणार नाहीं त्याला कांहीं आपण अहिंदु म्हणणार नाही. शंकराचार्यांनीं अत्यंत भक्तीनें भगवद्गीतेवर भाष्य लिहिलें आहे. त्यांत "देवकीच्या उदरांत परमेश्वराच्या एका अंशानें अवतार घेतला" असें वाक्य आहे. एवढ्या भक्तीनें जरी शंकराचार्यांनीं लिहिलें असलें तरी त्यांनीं त्याला परिपूर्ण अवतार मानलें नाहीं. एका अंशानें च

अवतार घेतला असें त्यांनीं म्हटलें. परंतु त्याला जर कोणाला परिपूर्ण अवतार मानायचा असेल तर त्यांनीं तो मानावा. मला हरकत नाहीं, कारण "**पूर्णमदः पूर्णमिदम्**" हें पूर्ण आहे व तें पूर्ण आहे. तेव्हां कांहीं च हरकत नाहीं. पण माझ्यावर जबरदस्ती कराल तर मी कांहीं तें मानायला तयार नाहीं. मी त्याला अंशतः च अवतार मानतों.

## मोक्षाला कारावास

ख्रिस्ती लोकांचा आरंभीं यूरोपमध्यें फार छळ झाला. त्याचें कारण हें च असेल कीं, ख्रिस्त हाच एक भगवंत आहे आणि त्याला शरण गेलें च पाहिजे असें सांगणें त्यांनीं सुरू केले असेल. म्हणजे ख्रिस्ताचे विचार सांगण्या-ऐवजीं त्या व्यक्तीला शरण गेलें पाहिजे हें च ते सांगत होते. हें च त्यांच्या छळाचें कारण असेल. आज सुद्धां आपण तें च म्हणूं तर चूक करूं.

मोक्ष म्हणजे कांहीं कुणाची मालकी हक्काची इस्टेट आहे काय? अमक्या अमक्या रस्त्यानें च जा, असें डोकें चालवा, अमकें करूं नका, अमकें करा, मंत्र म्हणा, म्हणजे असें बंधन पत्करा तर च मोक्ष मिळेल! पण मोक्ष म्हणजे तर बंधनांतून सुटका, मग अशीं बंधनें घालून कसें चालेल? मोक्षाला च कारागृहांत टाकलें तर कसें होईल?

सारांश धर्म हा व्यापक असेल, त्याच्यांत अविरोध असेल जगांत शांतता नांदण्यासाठीं, चित्तशुद्धीसाठीं, असेल तर च तो टिकेल. आपण त्यांचा समन्वय करणार नाहीं तर ते सगळे आपापसांत लढून नाहींसे होतील.

**मिरज** (द. सातारा), ता. १४-५-५८

# नव विचारानें भारलेला वर्ग निर्माण व्हावा 

आमची यात्रा रत्नागिरी जिल्हा कोल्हापूर जिल्हा पार करून आतां दक्षिण सातारा जिल्ह्यांत आली आहे. यानंतर पंढरपूरचें संमेलन होईल आणि नंतर ती मराठवाड्यांत जाईल, असा कार्यक्रम योजलेला आहे. हे जे दक्षिण महाराष्ट्राचे जिल्हे आहेत ते फार शक्तिशाली जिल्हे आहेत. रत्नागिरी काय किंवा कुलाबा काय, सांगली कोल्हापूर काय किंवा सोलापूर काय प्रत्येक जिल्ह्यानें फार मोठा पराक्रम केलेला आहे. रत्नागिरींत कित्येक रत्नें निर्माण झालीं. साऱ्या भारतांत त्यांची ख्याति आहे. साऱ्या हिंदुस्थानला त्याचा अभिमान आणि आदर वाटतो. त्या जिल्ह्याच्या लोकांनीं काम हि चांगलें केलें आहे. पूर्वी त्यांनी ६०-७० ग्रामदानें मिळविलीं होतीं. आतां आमची यात्रा चालू असतांना ७० ग्रामदानें तिथें आणखी मिळालीं. यापुढें हि असेंच तेथें काम चालेल अशी मला उमेद आहे.

कोल्हापूरला रत्नागिरीपेक्षां कमी शक्ति नाहीं. तेथील लोक उदार आहेत, पराक्रमाबद्दल त्यांची ख्याति आहे. शौर्य आहे हिंमत आहे परंतु तेथें काम झालें नाहीं. पुढें होईल अशी आपण आशा करूं या. तसें च सांगली मिरज कुरंदवाड या छोट्या छोट्या संस्थानच्या लोकांनीं पूर्वी केवढा पराक्रम केला आहे! तेथील लोक जागरूक आहेत, त्यामुळें सबंध भारताला त्यांच्याबद्दल आशा आणि अपेक्षा आहेत. तिथें हि ग्रामदानाचें काम व्हायला पाहिजे. सोलापूर ही एक मोठी बाजारपेठ आहे आणि पंढरपूरवर साऱ्या महाराष्ट्राचें सांस्कृतिक केन्द्रस्थान आहे. या सर्वांबद्दल मी आशा राखून आहें.

## शिक्षित वर्ग निष्क्रिय झाला आहे

परंतु एकंदरींत मला असें दिसतें कीं याच भागांत नाहीं तर एकूण महाराष्ट्रांच्या शिक्षित वर्गात निष्क्रियता आली आहे. हा भूदान ग्रामदानाचा सर्वमान्य विचार खेडोपाडीं पोंचवावा असा उत्साह त्यांच्यामध्यें दिसत नाहीं.

तसें काम करूं शकणारा असा हा च एक वर्ग असल्यामुळें आमच्या साऱ्या च चळवळी त्या वर्गावर अवलंबून असतात. माझ्यासारख्या बाहेरून आलेल्या माणसाला खेड्यांतील प्रत्येक माणासापर्यंत जाणें शक्य नसतें, आणि जायचें ठरविलें तरी एकटा जाऊन जाऊन किती खेड्यांत जाणार? म्हणून शेंवटीं त्या त्या ठिकाणच्या शिक्षित वर्गानें च हें काम करायचें आहे पण कोणतें हि पुरुषार्थाचें काम आपण करूं शकूं असें त्यांना वाटत च नाहीं. सारें कांहीं सरकार करील आणि सरकार करीत नसेल तर त्याच्यावर टीका करायची, निष्क्रिय चर्चा, चिकित्सा करायची. अशा रीतीनें चर्चा, चिकित्सा आणि टीका यांच्या पलीकडे कांहीं नवीन पुरुषार्थ ते करतील असा विश्वास च वाटत नाहीं. म्हणून मीं हल्लीं सारा भरंवसा साहित्यावर ठेवला आहे. साहित्य घरोघरीं पोंचेल आणि त्यापासून लोकांना चेतना मिळेल अशी मला आशा आहे. तेव्हां तें साहित्य तुम्ही वाचा, आणि त्याचें मनन करा.

मला सांगायचें हें होतें कीं इतकी जी निष्क्रियता हल्लीं दिसून येते ती हल्लींच्या शिक्षण-पद्धतीमुळें आहे. या शिक्षणपद्धतीमुळें सुशिक्षित वर्ग वावदूक बनला आहे. तोंडाळ आणि वाचाळ झाला आहे. त्याला हातानें काम करायला शिकविलें नाहीं इतकें असून हि स्वराज्य-प्राप्तीच्या वेळीं त्यानें कांही काम केलें. कारण त्यावेळीं स्वराज्य प्राप्त केलें पाहिजे ही भावना होती. राष्ट्रीय शाळा त्यांनीं काढल्या. राष्ट्रीय शिक्षण संस्था महाराष्ट्रांत हि निघाल्या. समर्थ विद्यालय ही संस्था अगदीं पहिली जरी नसली तरी पहिल्या १४-१५ शाळांपैकीं आहे. त्यांतील शिक्षक पुस्तकांतील किडे बनले नाहींत. त्यांनीं स्वातंत्र्यासाठीं चळवळी केल्या, रचनात्मक कामें केलीं, मार खाल्ला. असा सर्व इतिहास आहे. पण आतां काय झालें? ज्या सरकारी शिक्षण संस्था होत्या त्या च स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय शिक्षण संस्था बनल्या. आणि ज्या राष्ट्रीय शिक्षण संस्था टिकून होत्या त्या हि राष्ट्रीय सरकारी शाळांत विलीन झाल्या. त्यांनीं स्वतःला युनिव्हर्सिट्यांना जोडून घेतल्यामुळें शिक्षणाचा स्वतंत्र प्रयोग करणाऱ्या संस्था च राहिल्या नाहींत, आणि विद्यार्थ्यांत नवचैतन्य निर्माण करण्याची प्रेरणा उरली नाहीं. आतां परमेश्वराच्या प्रेरणेनें, कृपेनें, आणि स्वयंस्फूर्तीनें

कोणी आमच्या या कामाकडे आला तरती गोष्ट निराळी. ही निर्मला काय, कुसुम काय केरळमधील राजम्मा काय ह्या मुली सरकारी शाळांतून निघालेल्या आहेत. गेलीं सात वर्षें माझ्या बरोबर फिरत आहोत. सबंध विचार त्यांनीं समजून घेतला आहे आणि काम करीत आहेत. जास्त नांवें मी घेत नाहीं पण अशीं कांहीं माणसें आलीं आहेत.

असें असलें तरी क्रांतिनिष्ठ आणि नवविचारानें भारलेला एक वर्ग निर्माण केला जावा अशी योजना आजच्या शिक्षणपद्धतींत नाहीं. आतां आपला देश स्वतंत्र झालेला आहे मी असा विचार करतों कीं क्रांतिकारक विचारांची आज आपल्या देशाला आवश्यकता नाहीं काय? आजचें आपलें सरकार जरी लोकशाही असलें तरी समाजाला क्रांतीच्या दिशेनें पुढें नेण्याची ताकत त्याच्यांत नाहीं. लोकांना जी गोष्ट पाहिजे असेल ती तें पुरविणार. समाजाला ज्या प्रकारची सेवा पाहिजे असेल त्या प्रकारची सेवा तें सरकार देईल. समजा, समाजाला सिगरेट हवी असेल तर तंबाखू पुरविण्याचें काम सरकार करील. परंतु सिगरेट ओढणें वाईट आहे, ती ओढू नका असें सांगण्याची शक्ति सरकारमध्यें नाहीं. अमेरिकेंतील सरकार तर निवडणुकींत दारू हि पुरवितें. तेथील निवडणुकी 'वेट' आणि 'ड्राय' या मुद्यावर च आधारलेल्या असतात. एक पक्ष म्हणतो आम्हांला निवडून दिले तर तुम्हांला वेट करूं. दुसरा पक्ष म्हणतो आम्हांला निवडून दिलें तर तुम्हांला अगदीं ड्राय करूं. असें असल्यामुळें लोकशाही सरकार क्रांतिकारक सुधारणा करूं शकत नाहीं.

## आजची गरज

म्हणून आतां गरज ही आहे कीं स्वतः सर्वस्वाचा त्याग करून, खेडोंपाडीं जाऊन तेथील लोकांना समजावून सांगणारे, ज्ञान-प्रचार करणारे, कार्यकर्ते पाहिजेत. एक स्टेज झाली आहे, विचार सर्वमान्य झाला आहे पण आतां तो घरोघर पोंचवायचा आहे. जसा आपण प्रथम स्वराज्याचा विचार केला. परंतु १९०६ सालीं स्वराज्याचा उच्चार झाला. त्यानंतर १९२१ सालीं स्वराज्य कल्पना सर्वमान्य झाली. परंतु स्वराज्य मिळवायला १९४७ साल उजाडलें. हा ४५ वर्षांचा काळ मध्यंतरीं कां गेला? स्वराज्याची कल्पना

सर्वमान्य झाल्यावर सर्व लोकांत ती कल्पना पोंचवायला जो काळ गेला तो च हा काळ होता. परंतु स्वराज्याचा विचार होता सोपा. त्यामध्यें कांहीं तरी मिळवायचें होतें. भूदानाच्या विचारामध्यें प्रत्येकाला कांहीं तरी द्यायचें आहे. म्हणून हा विचार आतां सर्वमान्य झाल्यावर आतां एक-निष्ठेनें आणि निष्काम वृत्तीनें काम करणारे कार्यकर्ते मिळाले पाहिजेत. मग तो विचार अमलांत यायला ५-२५ वर्षे कां लागेनात पण आम्ही त्यांत पडूं, त्यांत आमचें जीवन घालवूं आणि तें काम पूर्ण करूं च अशा विचारानें ते भारलेले असले पाहिजेत. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं तें काम पूर्ण करायला ५-२५ वर्षें लावायचीं ! आपण तर एका च वर्षांत तें पूर्ण करणार अशा तळमळीनें, निष्ठेनें काम केलें पाहिजे.

त्यासाठीं प्रत्येक घर आणि प्रत्येक माणूस गांठला पाहिजे. बिहारमधील कार्यकर्ते – जेव्हां मी तिथें फिरत होतों तेव्हां—सांगत होते कीं या चळवळीमध्यें आम्ही बिहारमधील जितक्या गांवांत पोंचलों त्याच्या दशांश गांवांत सुद्धां स्वराज्याच्या चळवळींत पोचलों नव्हतों. परंतु हा केवळ पांच लाख खेड्यांत पोंचण्याचा प्रश्न नाहीं, तर सात कोटि घरांत जाण्याचा प्रश्न आहे. सात कोटि घरांत भूमिदान, संपत्तिदान, बुद्धिदान, संमतिदान यापैकीं कांहीं ना कांहीं झालेलें असलें पाहिजे. निदान साहित्य तरी प्रत्येक घरांत गेलें असलें पाहिजे. आणि खानेसुमारींत जसा प्रत्येक घरावर शिक्का बसतो – घ नं. अमुक अमुक – तसा प्रत्येक घरावर आपला शिक्का बसला पाहिजे. या घरांतून संपत्तिदान मिळालें, या घरांतून संमतिदान झालें, या घरांतून भूमिदान प्राप्त झालें आणि या घरांत साहित्य गेलें अशी प्रत्येक घरांतून पावती घ्यावी लागेल. इतक्या व्यापक प्रमाणावर कार्य करायचें आहे त्यासाठीं कार्यकर्ता निर्माण झाला पाहिजे. त्यांच्या शिक्षणाची योजना केली गेली पाहिजे. त्यासाठीं कांहीं संस्था लागतील, कांहीं सतत फिरणारीं माणसें लागतील. अशा रीतीनें कांहीं लोक एका च ठिकाणीं राहून प्रयोग करणारे आणि कांहीं सतत फिरत राहून ज्ञान-प्रचार करणारे असें जेव्हां होईल तेव्हां च कार्य परिपूर्ण होईल.

## अध्ययनाची योजना

त्यासाठीं विचारांचें सतत अध्ययन झालें पाहिजे. त्यांतून च कार्यकर्ते मिळतील म्हणून अध्ययनाची योजना हवी. मीं कर्नाटकांत असतांना कार्यकर्त्यांना महिन्याला किमान पांच रुपयांचें तरी साहित्य मिळावें अशी सूचना केली होती. जरूर वाटल्यास संपत्तिदानांतून हि साहित्य द्यायला हरकत नाहीं असें सांगितलें होतें. माझी सूचना स्वीकारून कार्यकर्त्यांना साहित्य देण्याची योजना तेथें झाली आहे. आपल्याला कोणतें साहित्य पाहिजे हें कार्यकर्ते लिहून देतात. अशी योजना जेव्हां झाली तेव्हां मला वाटलें कीं आतां कांहीं काम येथें होऊं शकेल. नाहीं तर वीज चमकली म्हणजे क्षणभर लख्ख प्रकाश पडून पाठीमागून अधिक अंधार होतो तसें मी तेथें असतांना क्षणभर वीज चमकल्यासारखें होऊन नंतर जास्त अंधार झाला तर काय उपयोग? सूर्यप्रकाश जसा सतत मिळतो त्याप्रमाणें सातत्यानें काम झालें पाहिजे. त्यासाठीं पक्षरहित, वासनारहित, दक्ष, निष्काम, सत्य-अहिंसेवर विश्वास असलेले कार्यकर्ते मिळाले पाहिजेत. असे कार्यकर्ते महाराष्ट्र मला किती पुरवणार आहे हें मी महाराष्ट्राला विचारतों. ते जितके मिळतील तितकी ही यात्रा सफल झाली.

## बाबा नेहमीं अशक्य गोष्टी काढतो

आज मी तुमच्या गांवांत आलों. तुमच्या गांवांत काय नवीन गोष्ट झाली? तुमच्या फायद्याची, कल्याणाची, कोणती गोष्ट झाली? समजा तसें कांहीं झालें नाहीं तर त्याचा अर्थ असा होणार नाहीं कीं बाबाचें जीवन व्यर्थ झालें. कारण बाबाला माहीत आहे कीं कार्य करावें पण फलाची आसक्ति ठेवूं नये. झांशीच्या राणीला स्थूल दृष्टीनें अपयश आलें परंतु इतिहास ती यशस्वी झाली असें च म्हणेल. परतु मला तर मीं अयशस्वी व्हावें अशी च इच्छा आहे. त्यामुळें मी बेताचें कार्य कधीं बोलत च नाहीं. भलतें च बोलतों. मीं सांगून टाकलें आहे की भारतांतलीं पांचलाख खेडीं ग्रामदान झालीं पाहिजेत. मी जर असें म्हणालों असतों कीं ५० लाख एकर जमीन मला मिळाली पाहिजे तर १०० टके मी यशस्वी झालों असतों. परंतु मीं मागणी केली कीं पांच लाख गांवें ग्रामदान झालीं पाहिजेत आणि

७ कोटि घरांत सर्वोदय पात्र दाखल झालें पाहिजे. हें काम सोपें हि आहे आणि कठिण हि आहे. प्रत्येक घरांतून मूठ मूठ धान्य सर्वोदय-पात्रांत टाकणें काय कठिण आहे? पण ७ कोटि घरांत त्याचा प्रचार झाला पाहिजे, प्रत्येकांकडून तें पाळलें गेलें पाहिजे. म्हणून तें कठिण हि आहे. तसें च ७५००० शांति-सैनिक म्हणजे कांहीं जास्त नव्हे पण गांवांत भांडण झालें, कोणी मारायला आला तरी मारणाऱ्याबद्दल जरा हि राग न येतां, डोकें फुटलें तरी मरायला तयार असणें हें त्यांत मुख्य आहे. एकूण बाबाचें नशीब च असें आहे कीं. त्याला अशक्य गोष्टी बोलल्या म्हणजे च आनंद होतो.

राममनोहर लोहीया मागें एकदां आमच्या चळवळीबद्दल बोलतांना म्हणाले होते कीं " या पद्धतीनें चळवळ केली तर भूमीचा प्रश्न सुटायला १०० वर्षें लागतील. " ज्या गांवीं ते बोलले त्याच गावीं कांहीं दिवसांनीं मी गेलों तेव्हां तेथील कांहीं लोक म्हणाले तुमच्या चळवळीबद्दल लोहीया असें असें म्हणाले, त्यावर तुमचें काय म्हणणें आहे? मी त्यांना म्हटलें ' मी आहें गणिती. समजा मीं अगदी फार च जोर मारला आणि लोकांवर त्याचा परिणाम झाला, तर कुठें एका वर्षांत मला एक लाख एकर जमीन मिळेल. आणि मला तर मिळवायची आहे ५ कोटि एकर जमीन. तेव्हां माझा प्रोग्राम आहे ५०० वर्षांचा. आणि ज्या अर्थीं लोहियांनीं तो ३०० वर्षांवर आणून ठेवला आहे त्या अर्थीं त्यांचा मला मदत वगैरे करण्याचा इरादा दिसतो !

बिहारमध्यें जेव्हां मीं प्रवेश केला तेव्हां तेथील कार्यकर्ते मला म्हणाले की येथें तर ४-५ लाख एकर च जमीन मिळेल परंतु मीं त्यांना सांगितलें कीं मला येथें ५० लाख एकर जमीन मिळाली पाहिजे. तेव्हां एक गृहस्थ मला भेटले आणि म्हणाले बिहारमध्यें सुमारें १५० लाख एकर जमीन आहे त्याचा चौथा हिस्सा होतो. ४० लाख एकर. तेव्हां तेवढी च मागणी तुम्हीं करावी. मीं म्हटलें बरें आहे. तरी सुद्धां चांडिलला मी आजारी पडलों तोंपर्यंत ५-५० हजार एकर जमीन गोळा झाली होती. तेव्हां बिहारचे वैद्यनाथ बाब मला म्हणाले ४० लाख एकर नको, ३२ लाख एकराची मागणी करा. मीं म्हटलें हरकत नाहीं. ३२ लाख! आणि ती मागणी तिथें पुरी झाली.

त्यावेळीं कॉंग्रेसनें या आंदोलनाला अनुमोदन दिलें होतें. पण प्रत्यक्ष काम मात्र कुठें च सुरू केलें नव्हतें. परंतु बिहार कॉंग्रेसनें ठरावच केला कीं बिहारमध्यें दोन वर्षांत ३२ लाख एकर जमीन गोळा करायची आणि त्यासाठीं कॉंग्रेसनें सर्व प्रकारचें सहकार्य द्यायचें. शेंवटीं दोन वर्षांच्या प्रयत्नानें ३२ लाख एकर जमीन गोळा झाली. हें कांहीं कमी यश नाहीं. पण बाबा ४० लाखांची गोष्ट करीत होता त्या विचारानें हें अपयश च म्हणायचें.

म्हणून माझ्या मित्रांनों, मला माझ्या यशाची चिंता नाहीं. मला थोडेंसें यश मिळतें असें दिसलें कीं मी दुसरा अशक्यप्राय प्रोग्रॅम काढणार च. येलवालमध्यें सारे नेते आले आणि ग्रामदानाचा विचार सर्वमान्य झाला. थोडीशी यशाची शंका मला आली आणि लगेच मीं ७५००० शांतिसैनिकांची मागणी केली. आणि मला सांगायला आनंद वाटतो कीं आतांपर्यंत सव्वाशें शांतिसैनिक मिळाले आहेत. यामध्यें मोठीं मोठीं माणसें आहेत, आणि त्यांनीं लिहिलें आहे कीं आम्ही नेहमीं आपल्या क्षेत्रांत सेवेचें काम करूं च पण जेव्हां तुम्ही बोलवाल तेव्हां शांतीच्या कामासाठीं कुठें हि जायला तयार आहोंत. कामें गणितानें होत नसतात, अगणितानें होत असतात. महाराष्ट्राला मी आतां सवाल टाकणार आहे कीं आतां किती दिवस निष्क्रिय राहणार ? महाराष्ट्रांत राष्ट्र-सेवा-दल आहे, कॉंग्रेस सेवादल आहे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आहे. अशी सगळी दलदल आहे. त्यांतून सक्रीय कार्यकर्ते देणार कीं दलदल च चालणार ? काय करणार ? सर्वांनीं जर सर्व पक्षांना मान्य असा कार्यक्रम हातीं घेतला, ग्रामदानाचें कार्य हातीं घेतलें तर सक्रियता येईल. परस्परांचे गैरसमज दूर होतील. असें सक्रिय सहकार्य ते मला देतील अशी मला आशा आहे

महाराष्ट्रांत येऊन आतां दीड महिना झाला. आतां कांहीं विचार करण्याची वेळ आली आहे म्हणून हें मीं तुमच्यासमोर मांडलें. याचें उत्तर मला महाराष्ट्र देईल व '**अर्थं वा साधयेत देहं वा पातयेत**' असें म्हणणारे कार्यकर्ते मला मिळतील अशी मी आशा करतों.

**कवलापूर** ( द. सातारा), ता. १५-५-५८

## एक जुनी आठवण

तुमच्या या लहानशा सुंदर नगरीमधें ४० वर्षांपूर्वी माझें येणें झालें होतें. त्यावेळी महाराष्ट्रांतील ५-६ जिल्ह्यामधे ज्ञानप्राप्तीसाठीं मी पायीं फिरलों होतो. किल्ले पहावे, संतांचीं स्थानें पहावीं, चांगल्या लोकांच्या भेटी गांठी घ्याव्यात, लोक-निरीक्षण करावें असा माझा हेतु होता. लोकांची कांहीं सेवा घडावी म्हणून भगवद्गीतेवर व्याख्यानें देत असें. कुणाच्या घरी जुन्या पोथ्या असल्यास त्या पहाव्यात हा हि मला नाद होता. अशी कांहीं विविध कामें ५-६ महिने पदयात्रेंत केलीं. एका गांवीं एक च दिवस रहायचें, लोकांची अधिक ऐकण्याची इच्छा दिसली तर तीन दिवस रहायचे. मात्र तीन दिवसांपेक्षां जास्त रहायचें नाहीं असा माझा नियम होता. परंतु या तुमच्या तासगांवला मात्र मी सात दिवस राहिलों होतों. कारण मी येथें आलों त्यावेळीं पायाला एक करट झालें होतें त्यामुळें चालणें कांहीं जमेना. पहिले तीन दिवस तर तें सतत २४ तास दुखलें. मग त्याचें केलें ऑपरेशन. त्यामुळें सात हि दिवस बैलगाडींत बसून मी व्याख्यानाच्या ठिकाणीं जात असें. परंतु मौजेची गोष्ट अशी कीं श्रोते जमले आणि व्याख्यान सुरू झालें म्हणजे करट दुखणें बंद होई आणि व्याख्यान संपून श्रोते घरोघर निघून गेले म्हणजे दुखणें सुरू होई. त्या माझ्या सात दिवसांच्या मुक्कामांत सबंध ब्रह्मसूत्र-शांकरभाष्य मीं वाचून काढलें. दिवसभर वाचायचा. असे हे सात दिवस मुक्काम केलेलें तासगांव आहे.

आज येथें त्यावेळीं माझ्या व्याख्यानाला हजर असत असे एक गृहस्थ भेटले. स्त्रियांची सभा झाली, कारखानदारांशीं बोलणें झालें, संध्याकाळीं आध्यात्मिक मंडळींशीं चर्चा झाली. येथें ज्ञान देणारे ग्रंथ वाचावे ऐकावे अशी लोकांना आवड आहे, हें ऐकून मला फार आनंद झाला. आज मीं कोणत्या विषयावर बोलावें याचा विचार करीत होतों तेव्हां मला वाटलें कीं ४० वर्षांपूर्वी ज्या विषयावर मी बोलत होतों त्याच विषयावर आज हि

कां बोलू नये ? म्हणून प्रथम दहा मिनिटें मी गीतेवर बोलेन आणि नंतर इतर कांहीं गोष्टी सांगेन.

## ज्ञानाचें पीक

आपलें हें भाग्य आहे कीं येथें जेवढें धान्याचें पीक येतें त्याच्यापेक्षां जास्त येथें ज्ञानाचें पीक आलेलें आहे. तसे भारतापेक्षां सुपीक असे अमेरिके-सारखे कितीतरी देश आहेत. परंतु भारताची अपूर्वता यांत च आहे कीं येथें आध्यात्मिकता जन्मास आली. येथें ज्ञानाचें जे पीक आलें तें अमोल, अमाप आहे. रेव्हरड टिळकांनीं लिहिलें आहे,

**तुझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी**
**झालों तरी हि तृषा मन्मनाची कधीं हि कधीं हि न होणें कमी**
**आई गुरुस्थान अंतीं जगाचें तुझ्न यांत शंका न कांहीं जरी**
**सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी तसें पाहिलें मीं न कोठें तरी**

'तुझ्या महान् उदार सारस्वताच्या महासागरांत मी मासा झालों तरी माझी तृषा मपणार नाहीं.' १२-१४ संपन्न भाषा येथें आहेत. शिवाय संस्कृत आहे, पाली आहे, अर्ध-मागधी आहे, या भाषात फार मोठें साहित्याचें पीक आलें आहे. जगा-च्या आध्यात्मिक साहित्याचा आरंभ ज्या ग्रंथापासून झाला तो ऋग्वेद ग्रंथ संस्कृ-तांत आहे. इतक्या विचारांनीं परिपूर्ण असलेल्या समाजांत गीता आली. आणि तिच्यावर समाजाची जी नजर खिळली तितकी भारतांतल्या कोणत्या हि ग्रंथावर खिळली नाहीं. तसें च गीतेला जे भाष्यकार लाभले त्यांचें हि वैशिष्टच आहे. ते समाजाचे नेते होते. पूर्वीच्या काळीं आणि अर्वाचीन काळीं हि गीतेला जे भाष्यकार लाभले ते नुसते पंडित किंवा तत्त्वज्ञानी नव्हते तर समाजनेते होते. सबंध समाजांत परिवर्तनाची वृत्ति निर्माण करण्याची हौस बाळगणारे आणि समाजाला रंग देण्याची योग्यता राखणारे असे ते होते. शंकरा-चार्य, रामानुज, मध्व यांनीं समाजाचा रंग पार बदलून टाकला. तसें च अर्वाचीन काळात लोकमान्य, अरविंद, गांधीजी झाले. हे सारे केवळ चिंतन करणारे आणि एकांतांत साधना करणारे योगी नव्हते तर साधनासंपन्न असून सुद्धां समाजाचें नेतृत्व त्यांनीं केलें. जें लिहिलें तें हि समाजासाठीं लिहिलें. शंकर,

रामानुज मध्व हीं हिंदुस्थानच्या इतिहासांत फार प्रचंड नांवें आहेत. विद्वत्तेच्या क्षेत्रांत च नव्हे तर सामाजिक क्षेत्रांत हि त्यांनीं कामगिरी केली. आणि आपल्या कर्तृत्वानें त्यांनीं धर्माला, समाजाला, भक्तीला, कर्तृत्वाला आकार दिला. असे मोठमोठे भाष्यकार गीतेला लाभले.

## गीता प्रवचनें

गीतेवर मी व्याख्यानें देत असें परंतु त्यावेळीं मीं अगदीं तरुण होतों. त्यावेळीं गीता मला काय समजत होती तें एका कृष्णाला च माहीत. परंतु मी मात्र व्याख्यानें देई. त्यांत माझा हेतु केवळ जपाचा होता. महादेवाच्या पींडीवर जसा थेंब थेंब अभिषेक होत असतो त्याप्रमाणें विचाराचा सतत जप होत गेला तर विचार चित्तावर ठसतो या भावनेनें मीं व्याख्यानें दिलीं.

त्यानंतर चार वेळां संपूर्ण गीता मी मर्यादित समाजापुढें सांगतला आहे. त्यापैकीं धुळें जेलमधें एकदां सांगितली. तेव्हां सानेगुरुजी तेथें होते. त्यांच्या आणि माझ्या हृदयांत कांहीं सुद्धां अंतर उरलें नव्हतें. इतके आम्ही भावनेनें एकरस झालों होतों. ते श्रोते होते आणि टिपून हि घेत होते. ते जर नसते तर हीं गीताप्रवचनें मिळालीं नसतीं. आज तीं सगळ्या प्रांतांमधें गेलीं असून त्याच्या लाखों प्रति खपत आहेत. त्यांनीं लोक-जीवनांत प्रवेश केला आहे. आणि चित्तशुद्धीला प्रेरणा दिली आहे. याचें श्रेय माझ्यापेक्षां सानेगुरूजींनाच अधिक आहे. कारण ते जर नसते तर तीं प्रवचनें जिथल्या तिथें च जिरून गेलीं असतीं. तसेंच गीताई नांवाचें गीतेचें समश्लोकी रूपांतर केलें आहे. तें हि व्याख्यानरूपानें च सांगितलें आहे. अशा तऱ्हेनें गीता-माउलीची सेवा माझ्या हातून सतत होत गेली आहे.

## गीता हें शब्दाचें शास्त्र नाहीं

गीता हें शब्दाचें शास्त्र नाहीं. ती वाचली म्हणजे पांडित्य मिळेल असें नाहीं. तो एक मंत्र आहे आणि ज्याला फलश्रुति म्हणतात, जसें लग्नार्थ्याचें लगीन लागेल आणि पुत्रार्थ्याला पुत्र लाभेल असली निष्फळ फलश्रुति गीतेंत कोठें च नाहीं. अभ्यास न करतां गीता वाचली तर, त्यानें विद्यार्थी कांहीं परीक्षा

पास होणार नाहीं आणि लगीन लावण्याचें सामर्थ्य गीतेंत मुळींच नाहीं. उलट लगीन तोडून पाडण्याचें सामर्थ्य गीतेंत आहे गीता निष्कामता शिकविते. तो जीवनाचा ग्रंथ आहे. रामदासांनीं म्हटलें आहे '**सकामासी नावडे गीता**' असा हा अगदीं वेगळा च ग्रंथ आहे.

कांहीं ज्ञानी लोकांच्या आचरणाचें वर्णन लोक कधीं कधीं करतात. एक ज्ञानी असा आहे जो सर्वांना काठी घेऊन झोडपीत सुटतो, कोणी असा आहे जो बसल्या जागींच मलमूत्र विसर्जन करतो त्यांत च राहतो त्याची पर्वा करीत नाहीं. वगैरे वगैरे.

## ज्ञानी हा अनुकरणीय आदर्श

परंतु ज्ञानी हा कधीं हि एकांगी ध्यानी अथवा ज्ञानी नसतो. जीवनाच्या सर्व अंगांसंबंधीं समतोल विचार केलेला आणि ज्याच्या वृत्तीमध्यें साम्य आलें आहे, समत्त्व आलें, कसला हि अतिरेक नाहीं असा तो असतो. त्याचें बसणें, उठणें, बोलणें, लिहिणें, वाचणें प्रत्येक कृति अनुकरणीय असते. असा सर्वांग परिपूर्ण ज्ञानी जो असतो तो च सर्वांचा आदर्श असावा अशी गीतेची दृष्टि आहे.

## गीतेचा अनुभव इथल्या इथें च

गीतेंत सकामतेला, परलोकविषयींच्या भलभलत्या कल्पनेला थारा नाहीं. गीता पर-लोक मानते आणि इह-लोक हि मानते. पण तिची मुख्य दृष्टि चित्तशुद्धि आहे. समाजाची आणि व्यक्तीची चित्त-शुद्धि इथल्या इथें साधावी असें ती म्हणते. मेल्यानंतर साधावी असें काहीं ती म्हणत नाहीं. तुलसीदासांनीं म्हटलें आहे, "**को जाने जै हैं जम को सुर-पुर पर-धाम को। तुलसिहि बहुत भलो लागत जग जीवन राम गुलामको** " या जगांत इथल्या इथें च रामाचा गुलाम होऊन राहणें हें च तुलसीदासाला फार आवडतें. मेल्यानंतर स्वर्गांत कोण जाणार आणि नरकांत कोण जाणार तें आम्हांला माहीत नाही, तें आम्हांला नको. संत हेंच सांगतात. "**याचि जन्मं येणें चि काळें** " अरे या च ठिकाणीं येथें या जगांत च अनुभव पाहिजे. उधारीचा प्रश्न च नाहीं. वेदान्ताचा आणि गीतेचा अनुभव इथल्या इथें च मिळेल. तो मेल्या-

नंतर च मिळेल असें कांहीं नाहीं उसाचा रस पितांनाच गोड लागतो. असें कांहीं होत नाहीं कीं आतां रस प्या आणि मेल्यानंतर त्याची गोडी चाखा. त्या फळाची अनुभूति इथल्या इथें मिळते. ऐहिक अनुभूति जशी इथल्य इथें मिळते तशी च पारलौकिक अनुभूति इथल्या इथें च अनुभवितां येईल. आत्म-समाधानाचा अनुभव मनुष्याला याच देहांत इथल्या इथें घेतां येतो असे गीता सांगते.

## फल-ज्योतिष नव्हे निष्फळ ज्योतिष

शनिमहात्म्य, गुरु-चरित्र. शिवलीलामृत हें वाचलें म्हणजे मुलगा होईल लगीन लागेल, नोकरी मिळेल असल्या वाह्यात कल्पना करून जे धर्म-ग्रंथ रूढ झाले त्यांनीं धर्माच्या कल्पनांचा अगदीं चुथडा केला आहे. त्यांनीं कांहीं निष्ठा वाढविली नाहीं उलट ती कमी केली आणि नास्तिकतेला उत्तेजन देणारे ते ग्रंथ ठरले. तें शनीमहात्म्य, त्याला किती लोक भितात ! एकदां एक ज्योतिषी माझ्याकडे येऊन माझ्या जन्माच्या वेळीं ग्रहांचा माझ्यावर काय परिणाम झाला हें पाहूं लागला. मीं त्याला म्हटलें अरे, तुम्ही त्या ग्रहांचा माझ्यावर काय परिणाम झाला तें पहातां पण माझा हि त्या ग्रहांवर कांहीं परिणाम झाला असेल च कीं नाहीं? हें कसलें फलज्योतिष ? हें निष्फळ ज्योतिष आहे. तुकारामानें यांच्याविषयीं एक जळजळीत उद्गार काढला आहे. हे शकुन सांगणारे, भूत भविष्य सांगणारे, यांच्याविषयीं ते म्हणतात :

**सांगो जाणती शकुन । भूत-भविष्य वर्तमान ।**
**त्यांचा आम्हासी कंटाळा । पाहो नावडती डोळां ॥**

असे तीव्रतेचे उद्गार तुकोबांनीं जाहीरपणें काढले. असे लोक डोळ्यांनीं पहायला आवडत नाहींत असें ते म्हणतात. जें जें भेटतें तें पांडुरंगाचें च रूप आहे अशी सर्वभूती परमेश्वराची अनुभूति घेणारे तुकाराम त्यांची ही स्थित्ति आहे. कारण या लोकांनीं भोळ्या श्रद्धा निर्माण करून धर्म अगदीं नासून टाकला, त्यामुळें तुकारामाला त्यांची चीड येते. अलीकडे वर्तमानपत्रें सुद्धां, गिऱ्हाईक वाढतील या लोभानें आठवड्याचें राशी भविष्य देत असतात. जनतेची दिशाभूल करण्याची त्यांची हि क्रिया चालू आहे.

## वैदिक मंत्राचा दुरुपयोग

आणि वैदिकांनीं हि त्याला मदत केली आहे. गृहशांति वगैरेसाठीं वेदांत मंत्र नाहींत पण लोक वैदिकांजवळ जातात, आणि अमक्या शांतीसाठीं तमक्या शांतीसाठीं मंत्र सांगा असें म्हणतात. डॉक्टरपाशीं रोगी गेला आणि डॉक्टरनें त्याला औषध च नाहीं म्हटलें तर डॉक्टरची प्रतिष्ठा काय राहिली? म्हणून कांहीं तरी औषध डॉक्टर सांगतो च. तसे हे वैदिक वेद-मंत्राचा आधार घेतात. ऋग्वेदांत " शं नः " अशी सुरुवात करून कांहीं मंत्र सांगितले आहेत. वसिष्ठांचें सूक्त आहे, आम्हांला वारे कल्याणकारक होवोत, आकाश कल्याणकारक होवो, आम्हांला गाई कल्याणकारक होवोत, 'शं नः' म्हणजे आमचें कल्याण, त्याऐवजीं 'शंनः' म्हणजे शनि आमचें कल्याण करो असा अर्थ घेऊन अगदीं चावटपणा करून वेदाचा अत्यंत अपमान केला आहे. मी तर याला वेदहत्या म्हणेन. आणि या सकाम भक्तांच्या नादाला लागून ती हत्या हे वैदिक करतात.

अशा रीतीनें आपल्या धर्माचें स्वरूप बिघडवून टाकलें आहे. धर्म म्हणजे काय याचा विचार च नाहीं. जीवन शुद्ध करायचें असेल, धर्माची प्रतिष्ठा राखायची असेल आणि ईश्वराला जिवंत ठेवायचें असेल तर या भाराभर पोथ्या जाळून टाका आणि एका गीतेचा आश्रय घेऊन तदनुकूल जीवन बनवा.

तासगांव (दक्षिण सातारा), ता. १६-५-५८

# ज्ञानदेवादि संतांची शिकवण फुकट गेली नाहीं : १६ :

येथील स्त्रियांनीं सर्वोदय-पात्राचें काम केलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. सर्वोदय-पात्र म्हणजे प्रत्येक घरांत एक पात्र राहील. त्यांत दररोज घरांतल्या लहान मुलानें एक मूठ धान्य घालायचें आहे आणि तें धान्य सर्वोदय-सेवकाला अर्पण करायचें आहे. सर्वोदय-सेवक गांवाची सेवा करील, विचार समजावून सांगेल, लोकांचीं भांडणें मिटवील अशा प्रकारचीं कामें करील. सबंध हिंदुस्थानभर असे सर्वोदय-सेवक करावयाचे आहेत. त्यांच्यासाठीं सर्वोदयपात्राची योजना आहे. तुम्हीं सुरवात केली फार चांगलें झालें. पण तेवढें पुरें नाहीं. शेंवटपर्यंत तें चाललें पाहिजे. सुरू करायला काय लागतें? परंतु तें न चुकतां अगदीं व्रताप्रमाणें पार पाडाल तर त्यांतून जगाचें कल्याण करण्याची शक्ति गांवामधें येईल.

या तुमच्या गांवाला मी प्रथम च येत आहें. या नंतर मी कधीं येथें येईन तें सांगतां येत नाहीं म्हणजे माझी ही शेंवटची च भेट आहे. म्हणून मी सागतों त्या प्रमाणें तुम्ही गांवाची प्रगति कराल, गांव सुखी करण्याचा प्रयत्न कराल तर च माझा या गांवाला येण्याचा लाभ झाला असें होईल. नाहींतर आम्ही तुमच्या गांवीं आलों, एक दिवस तुम्ही आम्हांला जेऊं घातलें तेवढ्यानें गांवाला काय लाभ होणार? तेव्हां गांव सुखी करण्यासाठीं अमुक एक आम्ही करणार असा संकल्प करा.

इथल्या कांहीं लोकांनीं मला एक प्रश्न विचारला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं " तुकाराम, ज्ञानेश्वर आदि संत पुरुष होऊन गेले. त्यांनीं परोपकार करा, दु:खितांना मदत करा असें सांगितलें पण त्याचा उपयोग काय झाला? तुम्ही सुद्धां ज्ञानेश्वरांसारखें च सांगत आहांत. तेव्हां तुमच्या फिरण्याचा आणि सांगण्याचा काय उपयोग ? " याचा अर्थ असा कीं आम्हीं लोकांनीं ज्ञानदेवाला निरुपयोगी करून टाकलें, तुकारामाला बेकार केलें, एकनाथाचें ऐकलें नाहीं. म्हणजे आपण पक्के दगड झालों! ज्ञानदेव तुकाराम आदि संतांचें आम्हीं ऐकलें नाहीं, तसेंच तुमचें ओरडणें ऐकणार नाहीं,

तुमच्या सांगण्याप्रमाणें वागणार नाहीं, तुम्हांला मुळींच दाद देणार नाहीं असें च जर तुम्हीं ठरविलें असेल तर परमेश्वर च तुमची काळजी घेवो !

## संतांमुळें आम्ही माणसें राहिलों.

माझ्या मित्रांनो ! ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ हे बेकार नाहींत. ते जर नसते तर आपण जनावरें च राहिलों असतों. ते होऊन गेले म्हणून च तुम्हीं माझें स्वागत केलें नाहींतर माझ्यासारख्याला धोंडमार करून गांवांतून काढून लावलें असतें. परंतु माणुसकी तुमच्यामध्यें शिल्लक राहिली आहे, ती कोणामुळें ? ज्ञानदेव वगैरे संतांनीं जो बोध दिला, आपल्यासमोर त्यांनीं जें जीवन ठेवलें, जो आदर्श जगून दाखविला त्यामुळें आम्ही माणसें राहिलों आहोंत. नाहींतर आम्ही जनावरें च राहिलों असतों. भक्ति करा, दान करा, प्रेम करा हें सांगणें तुम्हांला ऐकावेंसें वाटतें, म्हणून तुम्ही इतके सगळे लोक माझ्या व्याख्यानासाठीं आलां आहांत. दान करा, प्रेम करा हें जर मी सांगणार नसतों आणि केवळ भोग करा, मौज करा असें सांगणार असतों तर तुम्ही आलां असतां काय ? परंतु तुम्हांला दानाची, प्रेमाची गोष्ट ऐकण्याची इच्छा होते ती या संतपुरुषांच्या शिकवणीमुळेंच. आज तुम्हांला ती ऐकावीशी वाटते, उद्यां ती करावीशी हि वाटेल. तुम्ही कोणी सभेला आला च नसता तर बाबाची सभा कांहीं झाली नसती. आणि बाबाला अवश्य बेकार करूं शकलां असतां. परंतु ही सर्व ज्ञानदेवांची आणि तुकारामांची कमाई आहे, म्हणून च तुम्हांला ऐकावेंसें वाटतें, म्हणून च इथल्या स्त्रियांना सर्वोदय पात्र सुरू करण्याची प्रेरणा होते आणि गांवाच्या कल्याणाच्या गोष्टी तुम्हांला कराव्याशा वाटतात. म्हणून ज्ञानदेव, तुकाराम, नामदेव हे वायां गेलेले नाहींत. हा बाबा सुद्धां वायां जाणार नाहीं. हा तुमच्या हृदयांत घुसणार. तो पक्का आहे. तो तुम्हांला काय सांगतो, आपला गांव पंढरीसारखा करा, देहूसारखा करा, गोकुळासारखा करा हें च सांगतों. "**धन्य माझा देहूगांव**" हें जसें तुकारामाला वाटत होतें तसें आपल्याला आपल्या गांवाबद्दल वाटावें अशी उमेद आपण धरली पाहिजे. तर च या जगांत धर्म आणि सुख राहील.

## एकवटून राहूं तर च टिकूं

आतां आपल्याला एकवटून राहण्याचे दिवस आले आहेत. यापुढें एकवटूनें राहूं तर च टिकूं नाहींतर शहरांतले सावकार, वकील, सरकारी अधिकारी यांच्या जाळ्यामधें सांपडून तुमचें नुकसान होईल. एकच काटकी असली तर ती तुटते. परंतु पुष्कळ काटक्या एकत्र करून त्यांचा दोर वळला तर त्या इतक्या मजबूत बनतात कीं हत्तीला हि त्यानें बांधतां येतें. त्याप्रमाणें तुम्ही अलग अलग रहाल तर प्रत्येकाला व्यापाऱ्याशीं सावकाराशीं सरकारी अधिकाऱ्याशीं सामना घ्यावा लागेल आणि त्यांत तुम्ही टिकणार नाहीं, उलट चांगला मार खाल. म्हणून एकवटण्यांत लाभ आहे हें लक्षांत घ्या. तुम्ही एक झालांत तर सावकार तुमच्या जवळून व्याज घेऊं शकणार नाहीं. एकट्या दुकट्याकडून जास्त व्याज घेतां येतें, सर्वांच्याकडून नाहीं. वकील तुमच्या दारांत फटकणार नाहीं. लोक जसे कोंबड्या झुंजवितात त्याप्रमाणें माणसांना झुंजविणारीं माणसें म्हणजे वकील. गांवांत भांडणें च नाहींत असें झालें कीं वकील मेला. आजच्या घटकेला हे सगळे रिपु आहेत. परंतु आपण सगळे एकवटूं तर ह्या रिपूंपासून गांवाला कसली हि भीति नाहीं. पण यांची जरी भीति गेली तरी दुसरें आणखी एक भय राहतें च. तें म्हणजे शहरांतल्या त्या अलग अलग पार्ट्यांचें. परंतु आपली हि एक पार्टी असली पाहिजे. तिचें नांव "गांव पार्टी." याशिवाय दुसऱ्या पार्ट्या गांवांत नाहींत च. बाहेरच्या पार्ट्यांपासून गांवाला भय आहे च म्हणून समजा. त्या पार्ट्या गांवांत आणूं च नका. 'आमच्यामध्यें कोणी येऊन भेद करूं शकत नाहीं, आमच्या गांवाचे दोन तुकडे कोणी करूं शकणार नाहीं, असें करणाराचें आम्ही कांहीं हि ऐकणार नाहीं' असें तुम्ही त्यांना सांगा आणि सर्व गांवानें एकवटून काम करण्याचें व्रत घ्या. आपल्या हाताला पांच बोटें असतात. त्यांच्यामधें परस्पर सहकार्य आहे म्हणून या पांच बोटांपासून लाखों कामें मनुष्य घेत असतो. त्या बोटांपासून परस्पर सहकार्यानें काम करण्याचा बोध घ्या. असें कराल तर गांवाला सौख्य लाभेल.

सावर्डे, ता. १७-५-५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३-१५७९८ वि: निबंध
नों दि: २०-९२

## प्रेमाचा आरंभ

हा तुमचा ल्हानसा गांव आहे, पण फार छान आहे. लहान गांवांत राहणारे लोक जर एकमेकांचें प्रेम दृढ करतील तर तें लहान लोक महान् बनतील, त्यांची शक्ति वाढेल. शक्ति वाढविण्याचा मार्ग ग्रामदान हा आहे. इथें जमीन वाटली गेली आहे त्यामुळें या गांवाला प्रेमाचा आरंभ झालेला आहे. प्रेमाचा आरंभ करणें च कठिण असतें. बीं लावलें कीं वृक्ष होणार किंवा पेरलेलें बीं उंदरांनीं किंवा पक्षांनीं खाऊन टाकलें असें होणार. या गांवांत भूदानाचें बीं पेरलें गेलें आहे आणि तें उगवलें हि आहे. त्यामुळें मला आशा आहे कीं, यापुढें तें जोरानें वाढेल. तुम्ही त्याला पाणी घालाल, त्याची जोपासना कराल तर त्या वृक्षाच्या छायेचा, फळांचा, फुलांचा भरपूर लाभ तुम्हांला होईल.

## विज्ञान श्रेष्ठ कीं आत्मज्ञान श्रेष्ठ

आज येथील मंडळींनीं कांहीं चांगले प्रश्न विचारले आहेत त्यांची च मी आतां तुमच्यापुढें चर्चा करतों, म्हणजे विचाराला मदत होईल. त्यांनीं एक प्रश्न असा विचारला आहे. आजचें विज्ञान-युग आहे आणि आपल्याकडे अध्यात्म-विद्येची वाढ झाली आहे तर आतां विज्ञान श्रेष्ठ कीं आत्म-ज्ञान श्रेष्ठ ? हा प्रश्न फार चांगला विचारला आहे. प्रथम विज्ञान म्हणजे काय आणि आत्म-ज्ञान म्हणजे काय हें जाणून घेतलें पाहिजे. यामध्यें अमका श्रेष्ठ आणि अमका कनिष्ठ असें कांहीं नाहीं. दोघांना हि एकमेकांची मदत होते. डोळा श्रेष्ठ कीं कान श्रेष्ठ असें विचारलें तर काय सांगणार ? सतार चांगली वाजते कीं नाहीं हें कान सांगेल. समोर झाड आहे कीं काय, वृक्षाचा रंग कसा आहे, हें डोळा सांगेल. दोन्हींची गरज आहे. दोन्ही मिळून परिपूर्ण ज्ञान उपलब्ध होतें. अध्यात्म सांगतें दया करावी, सर्वांवर आपल्या-सारखें च प्रेम करावें, कोणी दुःखी असेल तर त्याच्या मदतीसाठीं धाऊन

जावें. पूर्वींच्या काळीं एखाद्याच्या पोटांत दुखत असलें तर त्याला किती दुःख सहन करावें लागत असे ? परंतु आतां ताबडतोब औषध देतात, त्यानें रोग बरा झाला तर ठीक नाहीं तर गुंगीचें औषध देऊन ऑपरेशन करून व्याधी काढून टाकतात. ऑपरेशन करतांना त्याला कसला हि त्रास होत नाहीं. हें कशामुळें झालें ? विज्ञानामुळें. ही विज्ञानाची मदत झाली कीं नाहीं ? म्हणजे विज्ञानाची दयेला मदत झाली. अध्यात्मानें सांगितलें दया करा. विज्ञानानें त्याला मदत केली. म्हणून विज्ञान श्रेष्ठ नाहीं, तें आत्मज्ञानाला मदत करणारें आहे. समजा भात करायचा आहे आणि तुम्हीं विचारलें यांत अग्नि श्रेष्ठ कीं पाणी श्रेष्ठ तर काय सांगायचें ? भात करायचा म्हणजे दोन्ही पाहिजे. त्यांत कोण श्रेष्ठ आणि कोण कनिष्ठ ! त्याप्रमाणें अध्यात्म-ज्ञान हि पाहिजे आणि विज्ञान हि पाहिजे. दोन्ही मिळून काम चांगलें होतें.

पूर्वीं लोकांना अग्नीचा शोध लागला त्या वेळीं लांकडांवर लांकडें घासून अग्नि पेटवीत असत. आतां त्या लहानशा आगपेटींत अग्नि राहतो. ती पेटी खिशांत हि ठेवतां येते. पाहिजे तेव्हां अग्नि पेटवावा आणि आपलें काम करून घ्यावें. अग्नीच्या साह्यानें छान स्वयंपाक करतां येतो. त्यामुळें अन्न पचायला पोटाला मदत होते. अग्नि नसता तर कच्चें धान्य खाणें कठिण गेलें असतें. म्हणजे अग्नीची पचनक्रियेला मदत झाली. अग्नीचा शोध हा एक महत्त्वाचा शोध होता. त्यावेळीं तें एक नवीन विज्ञान च निघालें. आत्मज्ञानाला त्याची मदत झाली. विज्ञान कसें आहे? तें ना वाईट ना चांगलें. आतां हा लाउडस्पीकर पहा. त्याच्यासमोर बसून समजा मीं शिव्या दिल्या तर हा त्या शिव्या मोठ्यानें तुम्हांला ऐकवील, आणि मीं भजनें म्हटलीं तर भजनें ऐकवील. जें कांहीं त्याच्यासमोर बोलाल तें तो मोठ्यानें ओरडेल. तो वाईट हि नाहीं, चांगला हि नाहीं. अग्नीचा घराला आग लावण्यासाठीं उपयोग केला तर तो वाईट ठरेल, स्वयंपाकासाठीं उपयोग केला तर तो चांगला ठरेल. तो स्वतः चांगला हि नाहीं, वाईट हि नाहीं. तो देव च आहे. देवाचें लक्षण हें आहे कीं, जसा ज्याचा भाव तसा तो त्याला पावतो. जशी ही भूमि आहे. हिच्यामध्यें तंबाखू पेराल तर तंबाखू उगवेल, आणि केळीं पेराल तर केळीं मिळतील. जें तिच्यांत पेराल तें तिच्यांत उगवेल. तशी

विज्ञान ही देवता आहे. तुम्ही जसा तिचा उपयोग कराल तशी तुम्हांला पावेल.

आतां विज्ञानाचा उपयोग कसा करायचा हें सांगायचें कुणी ? तें सांगण्याचें काम अध्यात्म-विद्येचें. शस्त्रांचा उपयोग जखमा बऱ्या करण्यासाठीं हि करतां येतो आणि लोकांचे गळे कापण्यासाठीं हि करतां येतो. तो कुठें करावा हें अध्यात्मविद्या सांगेल. जमिनींत काय पेरावें हें जमीन नाहीं सांगणार. ती म्हणेल तुम्ही तंबाखू पेराल तर मी तंबाखू देईन, केळीं पेराल तर केळीं देईन. ती तर देवता आहे. तिथें काय पेरावें हें अध्यात्मविद्या सांगेल.

## अध्यात्म व विज्ञान यांची जोड पाहिजे

विज्ञानामुळें हातांत शक्ति आली आहे परंतु ती वापरावी कशी हें आत्मज्ञान सांगणार आहे. घोडा आहे. घोड्याला ताब्यांत ठेवलें त्याला लगाम घातला, तर त्याच्यावर बसून रपेट करतां येईल. नाहींतर स्वार घोड्यावर बसण्याऐवजीं घोडा च स्वाराच्या छातीवर चढेल, कारण स्वाराला लगाम धरतां आला नाहीं. त्या प्रमाणें घोडा म्हणजे विज्ञान आहे आणि लगाम म्हणजे आत्मज्ञान आहे. म्हणून विज्ञानाला आत्मज्ञानाची जोड नसेल तर जगाचा संहार होईल आणि ती जोड दिली तर या पृथ्वीवर वैकुंठ उतरेल.

## ज्ञानदेवांची शिकवण च या काळीं उपयोगी

दुसरा एक फार चांगला प्रश्न असा विचारला आहे, कीं ज्ञानदेवांची शिकवण त्या काळाला फार उपयोगी पडली हें खरें पण आजच्या विज्ञान-युगांत त्यांची शिकवण उपयोगाची आहे काय? ज्ञानेश्वरांची शिकवण त्या काळीं उपयोगाची होती आणि आज हि ती उपयोगाची आहे. ज्ञानेश्वरानें अशी युक्ति साधली आहे कीं ती युक्ति तिन्ही काळीं उपयोगी पडावी. त्यांनीं असें सांगितलें कीं हीं जीं पंचमहाभूतें आहेत ही सृष्टि, ही वाफ, ही वीज, हे अणुपरमाणु हीं सारीं पंचमहाभूतें यांचा जर अक्कल ठिकाणावर ठेवून उपयोग कराल तर तीं तुम्हांला मदत करतील नाहींतर तीं तुमच्या बोकांडीं बसतील.

पूर्वी चाकू हें एक हत्यार होतें. त्याचा उपयोग केला तर काय एखादी जखम झाली असती. त्यानंतर तलवार, पिस्तुल अशीं उत्तरोत्तर तीव्र साधनें येत गेलीं. एकदां एका मुलाच्या हातांत पिस्तुल गेलें. त्याला वाटलें बाप नेहमीं याच्याशीं खेळतो आज आपण याच्याशीं खेळूंया. त्या पिस्तुलाला चाप होता. तो त्यानें ओढला. पिस्तुल भरलेलें होतें, त्यामुळें पिस्तुलांतून गोळी सुटली आणि समोर बसलेल्या आईच्या चिंधडया उडल्या.

म्हणून तीव्र साधनें हातांत आल्यानंतर अक्कल ठिकाणावर राखण्याची जास्त गरज आहे. विज्ञान वाढल्यामुळें आत्मज्ञानाची गरज वाढली हें लक्षांत घेतलें पाहिजे. पुष्कळांना वाटतें आतां विज्ञान खूप वाढलें त्यामुळें आत्मज्ञानाची गरज च नाहीं परंतु हा विचार चूक आहे. उलट जितकी विज्ञानाची शक्ति वाढेल त्याच्यापुढें आत्मज्ञानाची शक्ति असली पाहिजे. अमेरिकेंत विज्ञान पुष्कळ वाढलें आहे पण आत्मज्ञानाचा तेथें तुटवडा आहे. आपल्या देशांत विज्ञान कमी आहे पण अध्यात्म-विद्या भरपूर आहे. त्यामुळें इथें विज्ञान किती हि वाढलें तरी चिंता नाहीं. एका हातांत ज्ञानेश्वरी आणि एका हातांत विज्ञान, मग चिंता कसली ? अमेरिका अजून बाल्यावस्थेंत आहे. तिथें विज्ञान आहे पण तें पोरांच्या हातांत आहे. अमेरिकेचे लोक पोरें च आहेत तिथला इतिहास अवघा ५०० वर्षांचा. युरोपचा २००० वर्षांचा आहे. परंतु हिंदुस्थानचा इतिहास १०००० वर्षांचा आहे. त्यामुळें इथें विज्ञान वाढलें तरी कांहीं भय नाहीं. अमेरिकेंत आत्महत्या पुष्कळ होतात, जरा कांहीं झालें कीं आत्महत्या ! अमक्याशीं प्रेम होतें तें जमलें नाहीं. बाप रागावला, परीक्षा नापास झाली अशा अशा कारणांवरून तिकडे आत्महत्या होत असतात. याचें कारण डोकें ठिकाणावर राहिलें नाहीं. तें कसें राहणार ? आत्मज्ञान नसल्यामुळें अक्कल ठिकाणावर राहत नाहीं, त्यामुळें अशा गोष्टी घडतात. विज्ञान खूप वाढलें परंतु त्याचा उपयोग वाईट कामासाठीं केला तर त्याला विज्ञान काय करणार ? विज्ञानाचा उपयोग कसा करायचा हें कोण शिकविणार ? हें अध्यात्म शिकविणार, ज्ञानेश्वरी शिकविणार. म्हणून ज्ञानेश्वरीच्या शिकवणीची जास्त गरज आतां च आहे. या युगांत माणसाच्या एका हातांत ज्ञानेश्वरी व दुसऱ्या हातांत विज्ञान राहील. मग विज्ञान किती हि वाढलें तरी नुकसान कांहीं च नाहीं.

### विज्ञानयुगामुळें च ग्रामदान हवें

विज्ञान पचवायचें असेल तर ग्रामदानाशिवाय गति नाहीं. आजकाल वर्तमानपत्राचें कोणतें हि पान तुम्ही उघडा, मारामाऱ्या, खून, दरोडे यांची बातमी नसलेलें एक हि पान तुम्हांला मिळणार नाहीं. आणि याच गोष्टी मोठ्या प्रमाणावर घडल्या म्हणजे त्याला नांव देतात राजकारण ! आज जगांत ठिकठिकाणीं काय चाललें आहे ? इंडोनेशिया, फ्रान्स, अल्जेरिया, सर्वत्र अशांतता आहे. जरा कुठें ठिणगी पडली कीं महायुद्ध पेटेल, धान्य-भाव वाढतील. अशा स्थितींत खेड्यांतील लोकांना जर स्वतःला वांचवायचें असेल तर सारें गांव एक झालें पाहिजे. जमीन सारी गांवाची केली पाहिजे. जमिनींत काय काय पेरायचें, गांवासाठीं किती किती काय काय राखून ठेवायचें वगैरे गांवाचें प्लॅनिंग गांववाल्यांनीं केलें पाहिजे.

अशा रीतीनें एका बाजूनें ग्रामदान, ज्ञानेश्वरी आणि दुसऱ्या बाजूनें विज्ञान. मग विज्ञानाची भीति कसली ?

**मांजर्डे** (दक्षिण सातारा), ता. १८-५-५८

## मालकी गेली म्हणजे प्रेमाचें राज्य होईल : १८ :

### दानपत्राऐवजीं प्राप्तिपत्र

आज तुमच्यासमोर एक सुंदर काम झालेलें तुम्हीं पाहिलें. एका गृहस्थांनीं जमीन दिली——ती दुसऱ्यांना देण्यांत आली. तुमच्यासमोर तुमच्या साक्षीनें एक चांगलें काम झालें. पूर्वीं मी दानपत्रें घेत असें. मग कार्यकर्त्यांनीं त्या जमिनीची वांटणी करायची वगैरे. तो हि अनुभव मीं घेतला आहे. कांहीं ४०–५० लाख एकर जमीन आतांपर्यंत मिळाली. परंतु त्यापैकीं ८–१० लाख एकर जमीन वांटली गेली. बाकीची अजून वांटली गेली नाहीं. जी जमीन वांटायची राहिली त्यापैकीं कांहीं जमीन वांटण्यालायक आहे कांहीं निरुपयोगी आहे. तें काम सगळ्यांनीं मिळून केलें पाहिजे. बिहारमध्यें असें काम चाललें आहे. परंतु कासवाच्या गतीनें——हळू हळू चाललें

आहे. जमिनी पहायच्या त्यांची प्रतवारी लावायची, कोणाला किती द्यायची तें ठरवायचें याला वेळ लागतो. बिहारमधें कित्येक जमिनींना नंबर च नाहीं. त्यामुळें जो शासनमुक्त समाज आम्ही स्थापन करूं इच्छितों तो बिहारमधें आधीं च स्थापन झालेला आहे. अशा स्थितींत त्या जमिनी वांटायच्या म्हणजे फार च कठिण काम आहे. त्यामुळें मीं आतां प्राप्तिपत्रें स्वीकारण्याचें ठरविलें आहे. प्राप्तिपत्रें म्हणजे दात्यानें च ज्याला जमीन द्यायची त्याला देऊन जमीन मिळाल्याच्या सहीचें पत्र मला द्यायचें. या प्रकारचीं मंगल कार्ये आतां तुम्हीं केलीं पाहिजेत.

## लग्नांत हुंडा—विहिर

आतां लगीनसराई चालू आहे. या लग्नसराईंत एक हि लग्न दान दिल्याशिवाय होतां कामा नये. दान दिलें नाहीं त्या लग्नाला वेदाचा आशीर्वाद मिळणार नाहीं. हा दान-सोहळा प्रत्येक लग्नांत व्हायला पाहिजे. लग्नांत जर ग्रामदान झालें तर फार च मंगल घटना घडली. आणि लग्नांत जांवयाला कांहीं द्यायचें असतें तें काय देणार ? जांवयाला त्याच्या शेतांत एक विहिर बांधून द्यावी. जेवढीं लग्नें लागतील तेवढ्या विहिरी बांधून होतील. याशिवाय त्याला एक कवडी हि द्यायची नाहीं. असें झालें तर हिंदुस्थानांत पुष्कळ विहिरी बांधून होतील. हिंदुस्थानांत जमीन थोडी आहे. परंतु जमिनीच्या पोटांत पाणी भरपूर आहे, तें बाहेर काढलें पाहिजे. जमिनीच्या पोटांत जें पाणी असतें त्याला सरस्वति म्हणतात. गंगा वरून वाहते सरस्वति खालून वाहते. सरस्वतीचें पाणी बाहेर काढलें म्हणजे शेतीला आनंद होईल. म्हणून तुमच्या घरच्या लग्नांत तुम्ही दोन गोष्टी करा. [१]भूदान, ग्रामदान वगैरे कांहीं ना कांहीं दान करा. आणि [२] जांवयाला दुसरें तिसरें कांहीं न देतां त्याच्या शेतांत विहिर बांधून द्या. परंतु एकाद्या मुलीचा बाप गरीब असला तर ? तर त्याच्यासाठीं आम्ही सगळे मदत करून विहिर बांधून देऊं असें ठरवा. मग बघा कसें भाग्य वर येतें तें !

## प्रेमाच्या दुधांत हक्काचें विष

आज मला एकानें प्रश्न विचारला " सर्वांवर प्रेम करा, संतुष्ट रहा वगैरे तुम्ही ज्या गोष्टी सांगतां त्या सर्व एकदम पटतात. प्रेमासारखें दुसरें

गोड काम आहे ? परंतु अडचण अशी कीं, हें कसें करायचें तें कांहीं कळत नाहीं. " तेव्हां मीं त्यांना कांहीं गोष्टी मागितल्या. मी त्यांना म्हणालों, हें तर खरें ना कीं प्रेम गोड आहे ? मग त्यांत अडचण काय येते ? घरामध्यें सगळ्यांत जास्त प्रेम असतें. पण तिथें सुद्धां पतिपत्नी, बाप-मुलगा भाऊ-भाऊ यांच्यामध्यें झगडे असतात ते कां ? खास प्रेमाची जी जागा तिथें हि झगडे आणि भांडणें कां यावींत ? याचें कारण असें. समजा उत्तम दूध आहे आणि त्यांत थोडेंसें जहर टाकलें तर तें दूध जसें मारक होईल तसें घरांत जरी किती हि प्रेमाचें दूध असलें तरी त्यांत हक्काचें विष कालवलें गेलेलें आहे. अमक्याचा हक्क, तमक्याचा हक्क, बापाचा हक्क, मुलाचा हक्क. कायद्यानें कुटुंबांत हक्काचें जहर कालवलें आहे. मुलगा बापाला म्हणतो " माझा चाळीस एकर जमिनीवर कायदेशीरपणें हक्क आहे ती मला दे नाहीं तर मी कोर्टांत जातों. " मग मुलाच्या बाजूनें निकाल झाला कीं, बिचाऱ्या बापाला जमीन द्यावी लागते. मग प्रेम कुठून राहणार ? कायदा त्या कुटुंबांतील प्रेमाला ठार मारतो. प्रेमाची जी जागा घर ती च द्वेषाची जागा झाली. म्हणून ती द्वेषाची मिसळ म्हणजे मालकी काढून टाकली कीं, मग घरांत हि भांडण राहणार नाहीं आणि गांवांत हि राहणार नाहीं.

तुम्ही जर जमिनीची मालकी साऱ्या गांवाची केलीत तर कायदा, त्याला मान्यता देतो. सरकारचे सारे जमीनविषयक कायदे ग्रामदानापुढें रद्द होतात. हें केवढें सामर्थ्य आहे ! आपला कारभार आपण पाहणार त्यांत कोणी अडथळा करणार नाहीं. पूर्वींचे संत सांगत होते प्रेम करा रे, प्रेम करा. पण प्रेमाच्या मार्गांतील अडथळा दूर करण्याचा उपाय कुठें त्यांनीं सांगितला ? जिथें तिथें मालकी ! मालकी !! मालकी !!! ती प्रेमाच्या मार्गांत अडथळा आणीत होती. त्यावर उपाय संतांनीं सांगितला नव्हता. तो उपाय आपण काढला आहे. सर्वांवर प्रेम करण्याच्या मार्गांतील अडथळा काढून टाकला आहे. हवेबद्दल कधीं भांडण होत नाहीं, पाण्याबद्दल फारसें भांडण होत नाहीं. कारण हवा पाणी यावरची मालकी आपण काढून टाकली आहे पाण्यावर जरी शहरांतून मालकी सुरू झाली असली तरी खेड्यांत

ती नाहीं तशी च जमिनीची मालकी काढून टाकायची आणि सर्वांनी मिळून ती वापरायची असें झालें कीं भांडणाचें, द्वेषाचें मूळ च गेलें. मग काय प्रेम च प्रेम.

वायफळें, (दक्षिण सातारा) ता. १२-५-५८

दसोंडी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 35७२८ ...... वि: निबंध
क्रमांक ...................... नों: दि 2...

## मातृमुखेन शिक्षणम्

: १९ :

आज या तुमच्या शाळेचें उद्घाटन झालें. आजपासून ही शाळा सुरू होत आहे. यापुढें तुम्ही खूप शिका. पण काय शिकाल ? प्रेमानें कसें रहायचें तें शिका. अलीकडे मी पाहून राहिलों आहें कीं लहान लहान ठिकाणीं शाळा सुरू करण्यांत लोकांना मोठा उत्साह असतो. आपलीं मुलें अशिक्षित राहूं नयेत, त्यांनीं खूप शिकावें अशी त्यांना हौस आहे.

स्वराज्यापूर्वी केवळ शिकलेल्यांना च मताचा अधिकार होता. पण तो विचार स्वराज्यानंतर सोडला आणि असें ठरविलें कीं २१ वर्षांचा मनुष्य, मग तो शिक्षित असो वा अशिक्षित, त्याला मत देण्याचा अधिकार आहे. शिक्षण परमेश्वर च देत असतो. ज्यानें २१ उन्हाळे २१ हिवाळे व २१ पावसाळे काढले आणि शिक्षण मात्र मिळालें नाहीं असें कसें होईल ? म्हणून २१ वर्षें ईश्वरानें शिकवल्यानंतर मत देण्याचा अधिकार प्रत्येकाला असावा असें वाटून २१ वर्षांवरील प्रत्येकाला मताधिकार दिला. परंतु लोकांना वाटतें कीं जर लिहितां वाचतां आलें तर बरें होईल. कारण आपण जें मत देतों तें कुणाला देतों, काय समजून देतों तें कळेल. शिवाय त्यांना असें हि वाटतें कीं शिक्षणामुळें आपलीं मुलें सुधारतील, त्यांना ज्ञान मिळेल, पराक्रमी होऊन योग्य जागांवर जातील, पंतप्रधान होतील, राष्ट्रपति होतील. कां नाहीं होणार ? त्यांच्या कुंडलींत लिहिलेलें असेल तर ते तसे हि होतील. अगदीं न शिकलेला सुद्धां राष्ट्रपति होऊं शकतो अशी कायद्यानें तरतूद केलेली आहे. हैदरअल्ली हा शिकलेला नव्हता पण लाखों लोकांचा तो सेनापति होता. त्याची गोष्ट सोडा. न

शिकलेला माणूस हि जगामध किती मोठा होऊं शकतो–अगदीं राष्ट्पतीपेक्षां हि मोठा– याचें सर्वांत मोठें उदाहरण म्हणजे महंमद पैगंबराचें आहे. त्याला कांहीं सुद्धां लिहितां वाचतां येत नव्हतें. परंतु तो जें बोलला त्याला जगांतले ३० कोटि मुसलमान मान देतात.

तरीपण लिहितां वाचतां येण्याचा हि मोठा उपयोग आहे. त्यानें सृष्टीचें ज्ञान करून घेण्याला मदत होते. म्हणून शिक्षण घेतल्यामुळें आपलीं मुलें नांव काढतील, गांवाची ख्याति होईल, अशी हौस असावी. पण मला शिकण्याचा सर्वांत मोठा फायदा हा वाटतो कीं त्यामुळें तुम्ही ज्ञानेश्वरी वाचूं शकाल, तुकारामाची गाथा वाचूं शकाल, सर्वोदयाचीं पुस्तकें वाचूं शकाल. नाहीं तर आज काय–मी येथें तुमच्या गांवीं आलों एक तास व्याख्यान दिलें आणि उद्यां सकाळीं निघून गेलों. आतां मी एक तासांत सांगणार किती आणि तें तुम्ही आपल्या मनांत ठेवणार किती? त्या ऐवजीं वाचतां आलें म्हणजे पुस्तकें विकत घ्याल. मोठमोठ्यांचें ज्ञान पुस्तकांत सांठविलेलें असतें. म्हणून वाचतां येऊं लागलें म्हणजे मग घरबसल्या ज्ञानेश्वर, घरबसल्या तुकाराम, घरबसल्या एकनाथ, बुद्धभगवान् तुम्ही वाचूं शकाल. लहानशा कपाटांत हे मोठमोठे लोक मावतात! म्हणून शिकण्याची हौस चागली आहे.

पण केवळ मुलांना शिकवून चालायचें नाहीं मुलींना देखील शिकविलें पाहिजे. उलट मुलींना मुलांपेक्षां जास्त शिकविलें पाहिजे. कारग असें कीं मुलें मोठीं झालीं म्हणजे त्यांना राबायचें असतें कष्ट करायचे असतात. धान्याचें पीक वाढवायचें असतें. परंतु बायांना मुलें वाढवायचीं असतात. माणसांचें पीक वाढवायचें असतें. आतां तुम्ही च सांगा शेतांतलें पीक वाढविणाराला जास्त शिक्षण हवें कीं मुलांचें पीक वाढविणाराला जास्त शिक्षण हवें? स्त्रिया मुलांना वाढविणार म्हणजे राष्ट्राला वाढविणार. त्यामुळें ज्ञानाची किल्ली त्यांच्या च जवळ पाहिजे. प्रत्येक घरामध्यें अगदीं लहानपणापासून आई-जवळ ज्ञान मिळविण्याची जर सोय झाली तर मग चैन च झाली. लहान मुलांना जें शिक्षण द्यायचें तें शाळेंत नाहीं मिळणार, तें आई च देऊं शकेल. म्हणून स्त्रियांच्या शिक्षणाची सोय गांवांत केली पाहिजे. त्यांना ज्ञानेश्वरी

गीता शिकविली पाहिजे. ज्ञानेश्वरी त्यांच्या कंठांत राहिली पाहिजे. हल्लीं मुलें शाळेंत जातात पण त्यांच्या कंठांत ज्ञान कांहीं च नसतें. नुसतीं पुस्तकें वाचतात. आतां शेतावर जायचें झालें तर भाकरीच्या बरोबर काय पुस्तकांचा गठ्ठा बांधून नेणार ? म्हणून कंठांत च ज्ञान पाहिजे. लहानपणीं किमान दहा हजार तरी कविता पाठ असायला हव्यात. आणि हें सहज शक्य आहे. सहाव्या वर्षा-पासून पाठ करायला सुरवात केली, रोज एक श्लोक पाठ करायचा असें ठरविलें तर वर्षातले दहा-वीस दिवस सोडून दिले तरी ३५० कविता दरवर्षी पाठ होतील. आणि ३० वर्षांत म्हणजे ३६ व्या वर्षी दहा हजार श्लोक पाठ होऊन जातील. ज्ञानेश्वरीच्या दोनतीन हजार ओव्या, तुकारामाचे दोनचारशें अभंग एकनाथी भागवताच्या कांहीं ओव्या, अलीकडच्या कविता असें सर्व पाठांतर असलें म्हणजे मग घरांत आई काम करतां करतां जें म्हणेल तें मुलाला सहज ऐकून पाठ होईल.

मुलींना कसें शिक्षण मिळतें याची परीक्षा त्यांना शाळेंत काय शिकवितात यावरून मी करणार नाहीं तर भक्ति, ज्ञान वगैरे गोष्टींत त्या किती प्रवीण आहेत त्यावरून मी करीन. आजपर्यंत जे जे ज्ञानी संत झाले ज्ञानदेव, तुकाराम, शंकराचार्य वगैरे सर्व पुरुष च होते, आणि एखादीच मुक्ताबाई कुठें मीराबाई, जनाबाई – स्त्री. परंतु आत्मज्ञानामध्यें स्त्रिया पुरुषांच्या पुढें जाऊं शकतात. मीं अनेकवेळां सांगितलें आहे कीं जेव्हां शंकरा-चार्यांसारख्या स्त्रिया निर्माण होतील तेव्हांच हिंदुस्थान पुढें जाईल. त्यांच्या हातांत समाजाचें नियंत्रण पाहिजे. मग बिड्या, सिगरेट, दारू चालेल काय? हे सगळे पुरुषांनीं काढलेले ढंग आहेत. स्त्रिया नेहमीं पुरुषांना क्षमा करतात. म्हणतात, पुरुष च तो, त्यानें कांहीं केलें तरी चालेल. म्हणजे पुरुषाला त्या जनावरासारखा मानतात! जसा एखादा बैल असतो, त्यानें कांहीं केलें तरी आपण म्हणतों, बैल च तो. तसें त्या पुरुषांच्या बाबतींत म्हणतात.

पुरुषांचें नियंत्रण बायांनीं च केलें पाहिजे आणि आपल्या हातांत त्यांनीं अंकुश ठेवला पाहिजे, तर च समाज सुधारणार आहे. पुरुषांनीं आतांपर्यंत मोठमोठीं राज्यें उभारलीं, निवडणुका केल्या, सैन्य उभारलें, लढाया केल्या इतकें सगळें करून हि समाजाला कांहीं आकार आलेला

नाहीं, तो अजुन जागेवर च आहे. यांत बदल केला पाहिजे, पण तो कोण करणार ? मला वाटतें या कामीं बायकांची मदत फार चांगली होईल.

तुम्ही पाहतां च ना कीं जेवढे म्हणून गुण आहेत ते स्त्रिलिंगी आहेत. भक्ति ही बाई आहे, मुक्ति ही बाई आहे, शक्ति हा गुण बाई आहे, नीति बाई आहे. मी हें कांहीं माझ्या पदरचें सांगत नाहीं. नाहींतर तुम्ही म्हणाल यानें कांहीं स्त्रिलिंगी शब्द काढले शोधून आणि ते आम्हांला हा सांगतो आहे. पण तसें नाहीं. हें मी गीतेंतलें सांगत आहें. गीतेंत तो श्लोक आहे ना, "**वाणी श्री कीर्ति नारींत। क्षमा मेधा धृति स्मृति**" ह्या सर्व बाया आहेत. पुरुष पराक्रम करतात परंतु त्यांच्यावर भक्तीचा अंकुश पाहिजे.

कांहीं लोक विचारतात, शाळांमधून धर्म-शिक्षण द्यावें काय ? मी म्हणतों आजच्या शाळांतून धर्म-शिक्षण देणार कोण ? बायांना जर शिक्षक केलें तर मात्र त्या धर्म शिकवतील आणि शाळेंत भक्तीचें वातावरण हि निर्माण करतील. मला माझ्या आईची आठवण येते. मला फार मोठी सत्संगति लाभली आहे परंतु माझ्यावर आईचा फार परिणाम झाला. आई कशी पूजा करीत होती, सकाळीं लवकर कशी उठत होती, जरा वेळ मिळाला कीं देवाचें नांव कशी घेत होती. इतर सटर फटर गोष्टींचा तिच्यावर परिणाम होत च नसे. म्हणून मी अनुभवानें सांगतों कीं सारें लहानपणचें शिक्षण स्त्रियांच्या हातांत असलें पाहिजे.

पूर्वीं अशी समजून होती कीं मारल्यानें विद्या येते. "छडी लागे छम् छम् विद्या येई घम् घम्" आतां तुम्ही च सांगा, छडी मारुन का कुठें विद्या येते ? मास्तरानें छडी काढली कीं विद्या आठवण्याचें तर सोडाच, असलेली विद्याच निघून जायची ! असलेली अक्कल नाहींशीं व्हायची ! विद्या अशी मारण्यानें का येईल ? ती प्रेमानें समजावून सांगण्यानें येत असते. त्यासाठीं मातृमुखांतून ज्ञान मिळालें पाहिजे.

## मातृ हस्तेन भोजनम्

तुम्हांला मी एक गोष्ट सांगतों, भगवान् श्रीकृष्ण ज्या वेळीं सांदीपनीच्या आश्रमांत शिकायला गेले त्यावेळीं त्यांचें वय १६ वर्षांचें होतें.

तोंपर्यंत गोकुळांत च गुरें ढोरें वळण्याचें काम तो करीत होता, मुलांच्या बरोबर खेळत होता आणि कंसादिकांचें कार्य करून चुकला होता. परंतु वसुदेवाला वाटलें, हा एवढा मोठा झाला आतां याला कांहीं लिहितां वाचतां आलें पाहिजे. म्हणून त्याला सांदीपनीच्या आश्रमांत पाठविलें. परंतु तेथें तो सहा महिन्यांत एवढी विद्या शिकला कीं गुरूनें ओळखलें कीं हा ज्ञानी विज्ञानी आहे. त्याला आपण आणखी काय ज्ञान देणार! म्हणून त्यांनीं कृष्णाला सांगितलें तूं स्वयंपाकासाठीं रानांतून लांकडें तोडून आणून देत जा. तें काम तो उत्तम रीतीनें करीत असे. एवढा मोठा ज्ञानी पण किती नम्रतेनें वागतो हें पाहून गुरूंना मोठा संतोष वाटायचा. जेव्हां कृष्णाची विद्या संपली आणि तो घरीं जायला निघाला तेव्हां गुरुजी म्हणाले – "आशीर्वाद माग" कृष्ण म्हणाला "तुम्ही च द्या" तेव्हां गुरुजी म्हणाले– "नाहीं, माझी प्रतिष्ठा राखण्यासाठीं तरी कांहीं माग" कृष्ण म्हणाला "बरें" आणि त्यानें आशीर्वाद मागितला. म्हणाला "**मातृहस्तेन भोजनम्**" मरेपर्यंत मला आईच्या हातचें जेवण मिळावें. दुसरा कोणता हि आशीर्वाद त्यानें मागितला नाहीं. सांदीपनींनीं त्याला तो आशीर्वाद दिला. भगवान् श्रीकृष्ण ११६ वर्षे जगले, आणि ते मेल्यावर त्यांची आई मेली. याच्या उलट आपल्या मुलांची काय दशा! आईच्या हातचें जेवण त्यांना कांहीं मिळत नाहीं. कुठें हॉटेलांत नाहींतर खाणावळीत तीं जेवतात. आईच्या हातचें जेवण ही सगळयांत मोठी विद्या आहे. त्या जेवणामध्यें नुसती तूप पोळी भाजी भाकर च नसते तर त्यांत प्रेम हि असतें. म्हणून भगवान् कृष्णांनीं "**मातृहस्तेन भोजनम्**" असा वर मागितला. "**मातृमुखेन शिक्षणम्**" असें ते म्हणाले नाहींत, तेवढें च माझ्यासाठीं म्हणायला शिल्लक ठेवलें.

असें हें "**मातृहस्तेन भोजनम्**" आणि "**मातृमुखेन शिक्षणम्**" झालें कीं हिंदुस्थानची प्रभा एकदम फाकेल. जगाला आपण शिकवूं शकूं, चारी बाजूला ज्ञान पसरवूं शकूं.

पण हें होणार केव्हां? त्यासाठीं ग्रामदान झालें पाहिजे. गांवांतल्या गांवात पूर्ण ज्ञानाची सोय झाली पाहिजे. दरेक गांवांत प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, युनिव्हर्सिटी, विद्यापीठ असलें पाहिजे. आजच्यासारखें सहा

सहा तास शिक्षण देणें बेकार आहे. तासभर सुंदर शिकावें आणि साऱ्या जन्मभर शिकावें. पण ही सर्वांना शिकण्याची सोय मिळायची कशी ? त्यासाठीं च ग्रामदान हवें. कारण सर्वांना शिकायचें तर प्रथम सर्वांना खायला पोटभर मिळालें पाहिजे. शिक्षणाची चांगली योजना ग्रामदानी गांवांत च होऊं शकते.

तुम्हांला वाटेल हा आपला प्रत्येक वेळीं त्या एरंडेलतेलवाल्या वैद्या-सारखा ग्रामदान पुढें आणतो––एक वैद्य होता. त्याच्याकडे कोणी हि गेला की प्रथम तो त्याला एरंडेल घ्यायला सांगी. त्यामुळें सगळयांना वाटायचें कीं याच्याकडे फक्त एरंडेल च असावें. परंतु त्या वैद्याची अशी रीत होती कीं प्रथम कोणत्या हि रोगावर तो एरंडेल देई. नंतर पोट साफ झाल्यावर दुसरें औषध. तसें माझें ग्रामदान म्हणजे एरंडेल आहे. ग्रामदान झाल्यावर दुसऱ्या गोष्टी करणें सोपें जाईल. ग्रामदानी गांवांत गांवचा कायदा राहील, सरकारी कायदा राहणार नाहीं. गांवामध्यें आम्ही जमीन समान वांटून घेणार, गांवचें सहकारी दुकान आम्ही चालवणार, गांवांत लागणाऱ्या आवश्यक वस्तु गांवांत च तयार करणार, भांडणें गांवांतच मिटविणार, कोर्टांत जाणार नाहीं. गांवचें रक्षण गांवचें शिक्षण आम्ही च करणार. असें जेव्हां कराल तेव्हां च "**मातृहस्तेन भोजनम्–मातृमुखेन शिक्षणम्** होईल.

**नेलकरंजी** (द. सातारा), २०-५-५८

## "एकमेकांस रक्षूनि पावा कल्याण सर्व हि" : २० :

तुमचा हा पांच हजार वस्तीचा गांव आहे. त्यामुळें यावर कांहीं छोटया गांवांचा रंग आहे, तर कांहीं शहराचा रंग आहे. जर तुम्ही येथें दोहोंचे गुण एकत्र केलेत तर गांवाला लाभ होईल व दोष एकत्र केलेत तर हानि होईल. लहान गांवांतल्या लोकांत अंगमेहनत, शरीरश्रम करणें, शेतीची मशागत–म्हणजे देवाची सेवा–करणें, व एकमेकांचा परिचय असणें हे गुण आहेत. शहरांतील लोक विद्या शिकतात, पुस्तकें वाचतात, सबंध जगाची माहिती मिळवतात, जागृत असतात, त्यांना ज्ञानप्राप्तीची इच्छा असते. तुम्ही

या गांवांत दोन्हीकडचे गुण आणले तर गांव पुढें जाईल. शहरांतले दोष म्हणजे भोग, विलास, चैन, व्यसनें, स्वार्थ इत्यादि येथें येऊं देऊं नका. तसें च खेड्यांतील दोष म्हणजे शेतींत सुधारणा करण्याची वृत्ति नसणें, गांवांतले धंदे बाहेर जात आहेत ते गांवांत राखण्याची चिंता न करणें, छोट्या छोट्या कारणावरून भांडणें इत्यादि. तुम्ही जर दोन्हीकडचे दोष एकत्र आणलेत तर हा गांव कचऱ्याचा ढीग होईल. म्हणून सगळीकडचे गुण घ्या.

इथें आमचीं कांहीं पुस्तकें आहेत, त्यांतील शक्य असतील तेवढीं तुम्ही अवश्य घ्या, पण एक लहानसें पुस्तक ' गीताई ' तर जरूर घ्या च. भगवान् श्रीकृष्णानें अर्जुनाला संस्कृतांत सांगितलेली गीता त्यांत मराठींत आहे. त्यामुळें लहान मुलें देखील त्यांतील श्लोक सहज पाठ करूं शकतात. प्रत्येकाच्या जवळ गीताई असायला हवी. लोकांनीं कसें वागावें अडचणीच्या वेळीं हिंमत कशी राखावी, संसार चांगला कसा करावा, भक्ति कशी करावी हें सर्व त्यांत सांगितलें आहे. अर्जुनाला निमित्त करून भगवान् आम्हां सर्वांना सांगत आहेत कीं **" एकमेकांस रक्षूनि पावा कल्याण सर्व हि "** तुम्ही एकमेकांचें रक्षण कराल तर सर्वांचें कल्याण होईल. ज्वारीच्या ढिगांतून एक शेर ज्वारी काढून घेतली तर त्यांत खड्डा पडतो. सारे ज्वारीचे दाणे अडमुठ्यासारखे आपल्या जागीं बसून राहतात. फक्त चार दोन महात्मे दाणे आपली जागा सोडून खड्डा भरण्याकरतां धांवत जातात पण विहिरींतून बालटीभर पाणी काढून घेतलें तर पाण्यांत बालटीच्या आकाराचा खड्डा पडत नाहीं ; कारण पाण्याचे सर्व बिंदु खड्डा भरून काढण्यासाठीं धांवत जातात. त्यामुळें सबंध पाण्याची पातळी थोडी खालीं येते. म्हणून म्हणतों कीं तुम्ही ज्वारीची भाकर खा पण ज्वारीच्या दाण्यासारखे वागूं नका तर पाण्याच्या थेंबासारखे वागा. मी जें ग्रामदान मागतों त्याचा अर्थ बाबाला जमीन देऊन टाकून गांव सोडून पळून जाणें नव्हे. तर ग्रामदान म्हणजे **" एकमेकांस रक्षूनि पावा कल्याण सर्व हि "** सगळी जमीन सगळ्यांची करायची व सगळ्यांनीं प्रेमानें रहायचें.

[या नंतर विनोबाजी म्हणाले कीं गीताईतील " एकमेकांस रक्षूनि–" हा श्लोक मी तुम्हां सर्वांकडून म्हणवून घेणार आहें, तेव्हां तुम्ही सारे न

लाजतां म्हणा. आतां येथें लाजेचें काम नाहीं. लहान मुलांनीं मुलींनीं म्हाताऱ्यांनीं स्त्रियांनीं, पुरुषांनीं साऱ्यांनीं म्हणायचें आहे ' नंतर ते एकमेकांकडे पाहत हंसत म्हणाले ' पिवळे फेटेवाल्यांनीं, लाल फेटेवाल्यांनीं, गुलाबी फेटेवाल्यांनीं, विन फेटेवाल्यांनीं आणि बोडक्यांनीं हि म्हणायचें ' हें ऐकतांच सभेंत हंशा पिकला. मग विनोबाजी ओळ सांगत व सभा त्याचा पुनरुच्चार करी. सगळे लोक म्हणत नव्हते तें पाहून विनोबाजी म्हणाले ' सगळीं तोंडें बोलतांना दिसत नाहींत, मात्र जेवायला तर सगळ्या तोंडांना हवें ' नंतर त्यांनीं कोणाकोणाला पाठ झालें तें विचारलें तेव्हां एक माणूस उभा राहिला. त्यानें श्लोक म्हणून दाखविला. प्राथमिक शाळेचा शिक्षक होता तो. मग विनोबांनीं त्याला सांगायला सांगून सभेला त्याच्या मागून म्हणायला सांगितलें. या प्रमाणें त्यानें तीनदां सांगितल्यावर पुन्हां विनोबाजींनीं विचारले ' आणखी कोण म्हणणार ?' मग एक खेडवळ पण मध्यमवर्गीय भासणारा उभा राहिला. त्याचें संपल्यावर एक पांढराफेटेवाला अशिक्षित उभा राहिला. त्यानंतर विनोबाजींनीं स्त्रियांकडे मोर्चा वळवला. प्रथम एक शिक्षिका उभी राहिली. नंतर आणखी एक स्त्री. ' पुरुष तीन उभे राहिले तर स्त्रिया देखील तीन उभ्या राहिल्या पाहिजेत. स्त्री-पुरुष विषमता मुळीं च नको ' असें विनोबाजींनीं म्हटल्यानंतर एक अशिक्षित प्रौढ स्त्री आपल्या जुनाट इरकली लुगडयाचा पदर सांवरीत संकोचानें उभी राहिली. तिच्याकडे सारे कुतुहलानें पाहूं लागले. तिनें अगदीं शुद्ध स्पष्ट आवाजांत श्लोक म्हटलेला पाहून सर्वांना विशेष च कौतुक वाटलें. विनोबाजी नेहमीं म्हणतात कीं " आत्मज्ञानाच्या विचारांत स्त्री-पुरुष भेद मावळतात, निर्भयता आत्मज्ञानांतून उत्पन्न होते " दोन तीन हजारांच्या सभेसमोर विनोबांनीं सभेंत च शिकवलेला गीताईंतील श्लोक अस्खलितपणें, मोठ्या आवाजांत म्हणणारी ती अशिक्षित स्त्री त्या लहानशा कृतीनें कितीतरी सुचवीत होती. नंतर विनोबांनीं लहान मुलांकडे दृष्टि वळविली. ' मुलांना तर लवकर पाठ होते, ' मग एक छोटासा मुलगा व नंतर एक मुलगी उभी राहिली व त्यांनीं सभेला श्लोक म्हणून दाखविला. सगळ्यांच्या चेहऱ्यावर एक आगळा च आनंद दिसत होता. गाई राखणाऱ्या ब्रह्मविद्येच्या पुतळ्याच्या मुखांतून नघालेल्या ब्रह्मविद्येचें पान सुशिक्षित-अशिक्षित, लहान-थोर, खेडवळ-शहरी,

गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष सारे मुक्तपणें करीत होते. शेंवटीं विनोबाजींनीं या गोड समारंभाचा गोड शेंवट करीत म्हटलें कीं ' नेहमीं मी फक्त गीता प्रवचनांवर च हस्ताक्षर करतों पण आज गीताईवर पण करेन ' सभेनंतर सह्या घेणारांची फार च मोठी रांग उभी होती. ]

**करगणी** (द. सातारा), ता. २१-५-५८

## जमीन गरजेला पुरेशी आहे लोभाला पुरेशी नाहीं : २१ :

हें आटपाडी गांव अनेक कारणांमुळें पुष्कळ वर्षांपासून आम्हांला माहीत आहे. औंधचे राजेसाहेब व त्यांचे चिरंजीव आप्पासाहेबपंत हे दोघे हि मला भेटले होते. त्या दोघांची हि तीव्र इच्छा व तळमळ होती कीं त्यांचें हें औंध संस्थान ग्रामस्वराज्याचें संस्थान व्हावें. राजेसाहेब तर गेले पण त्यांचे चिरंजीव आज हि यथाशक्ति देशसेवा करून राहिले आहेत. आज जें मी तुम्हांला सांगायला आलों आहे ती च आप्पासाहेब व त्यांचे वडील यांची इच्छा होती.

आतांपर्यंत हिंदुस्थानांत साडेतीन हजार ग्रामदानें झालीं आहेत पण अजून या भागांत झालीं नाहींत असें कां ? रत्नागिरी, कडप्पा या जिल्ह्यांत शें दीडशें ग्रामदानें झालीं आहेत. आज च मला तमिळनाडमधून पत्र आलें आहें की तिथें मदुरा जिल्ह्यांत एक सबंध फिरका चांगल्याप्रकारें ग्रामदान होणार आहे. त्यांतील सुमारें ३० गांवें ग्रामदानी झालीं आहेत व त्या ग्रामदानी गांवांतील लोक च स्वत: आसपासच्या गांवांत जाऊन प्रचार करीत आहेत कीं " अरे, आम्ही बिघडलों, तुम्ही बिघडाना. आम्ही ग्राम-दानी झालों तुम्ही व्हारे. "–याचा परिणाम सगळीकडे होत आहे. आतां ते लोक पंढरपूरच्या संमेलनाला येतील तेव्हां सारीं ग्रामदानें घेऊन येऊं अशी उमेद त्यांनीं बाळगली आहे. कडप्पाच्या लोकांनी हि लिहिलें आहे कीं आम्ही पंढरपूरला १०० ग्रामदानें घेऊन येऊं. अशा रीतीनें चारी बाजूला कामें चाललीं असतांना आप्पासाहेबांच्या या आटपाडी गांवाचें गाडें कुठें अडलें आहे याचा विचार करा.

## धरतीमाता पोटभर देईल पेटीभर नाहीं

ग्रामदान हा ग्रामस्वराज्याचा पाया आहे. "**तांतडोची भिंत पायाविण**" पायाशिवायची भिंत टिकेल काय ? ग्रामदान म्हणजे गांवाची सगळी जमीन सगळ्यांची करणें. कांहीं लोक विचारतात, गांवांतल्या सगळ्या लोकांना जमीन पुरेल कशी ? मी उत्तर देतों, गांवांतली जमीन आहे ती सर्वांना पुरली च पाहिजे व पुरणार. आज इथें अमेरिकेचे लोक [एम. आर. ए. चे तरुण कार्यकर्ते] आले आहेत ते कशाला आले आहेत ? तुमचें प्रेमाचें काम पाहण्यासाठीं आले आहेत ते. सबंध जगांत भांडणें लढाया नसाव्यात, प्रेम असावें असा प्रचार ते गाणीं गाऊन करीत असतात. त्यांचें एक गाणें असें आहे कीं "**धेअर् ईज् इनफ् लॅन्ड इन् ध वर्ल्ड फॉर् एव्हरी-बडीज् नीड् बट् नॉट् इनफ् फॉर एव्हरीबडीज् ग्रीड्**" जमीन सर्वांच्या लोभाला पुरेशी नाहीं पण सर्वांच्या गरजेला पुरेशी आहे. माणसाच्या लोभाला कांहीं अंत आहे काय ? ज्याच्याजवळ शंभर आहेत तो म्हणतो हजार पाहिजेत. हजारवाला म्हणतो दहा हजार पाहिजेत, दहा हजारवाला म्हणतो कोटि पाहिजेत कोटिवाला म्हणतो दहा कोटि पाहिजेत. आंकडे अगदीं परार्धपर्यंत जरी नेले तरी वासना कांहीं थांबत नाहीं.

मी देखील असें च म्हणतों कीं ही धरतीमाता सर्वांना पोटभर देईल पेटीभर नाहीं देणार. परमेश्वराची हवा व पाणी सर्वांना पुरे पडते ना ? तशी च ही जमीन आहे. ती सर्वांना पुरी पडली पाहिजे. जमिनींतलें पाणी बाहेर काढलें तर पांच एकरांचें काम एका एकरांत होईल. म्हणून जमीन कांहीं अपुरी पडणार नाहीं. ग्रामदानानें ग्रामस्वराज्याचा पाया मजबूत होईल, व आप्पासाहेबांची ईच्छा पूर्ण होईल.

## गांवांतली खादी बाहेर विकूं नका

इथें पुष्कळ वर्षांपासून खादीचें काम चालू आहे. पण अजून इथें सर्व लोकांच्या अंगावर खादी दिसत नाहीं. हें तुमचें त्या हॉटेलसारखें लक्षण दिसतें. हॉटेलमध्यें खाण्याच्या निरनिराळ्या वस्तु करतात पण त्या लोकांना देण्यासाठीं. स्वतः खाण्यासाठीं नसतात. तशी तुम्हीं खादी करायची आणि

स्वतः मात्र वापरायची नाहीं, हें कसें चालेल ? ग्रामदानानंतर गांवांत खादी-ग्रामोद्योगाचें काम चालेल. त्यांतून निर्माण होणाऱ्या वस्तु गांवांत च खपविल्या पाहिजेत. असें जेव्हां होईल तेव्हां गांवाला खरेंखुरें स्वराज्य मिळालें असें म्हणतां येईल.

## आटपाडीची वाटपाडी करा

आज इथल्या शाळेंत मीं राजेसाहेबांचें एक चित्र पाहिलें. सूर्याला नमस्कार घालीत असल्यावेळचें तें चित्र होतें. सूर्य-नमस्कार ही सगळ्यांना साधणारी गोष्ट आहे. जें सगळ्यांना साधतें तें च करावें. जो सगळ्यांना साधतो तो च धर्म. राजेसाहेबांनीं सूर्योपासनेचा धर्म शिकविला तो प्रत्येकाला साधेल. सूर्य प्रत्येक घरांत जातो. सूर्य हा आपल्या बापाची इस्टेट आहे असें कोणाला म्हणतां येईल ? प्रभु रामचंद्र सूर्यवंशांतले, पण सूर्यनारायण जेवढा रामाच्या मालकीचा होता तेवढा च रावणाच्या हि मालकीचा होता. सूर्याची ही खुबी आहे कीं तो सर्वांवर प्रेम करतो. त्याप्रमाणें गांवामध्यें सगळे सगळ्यांवर जेव्हां समान प्रेम करतील तेव्हां सूर्योपासना होईल. त्या फोटोंत राजेसाहेब उघडे होते. तें पाहून मला फार आनंद झाला. राजाच्या घरांत मूल जन्माला येवो कीं गरिबाच्या घरांत येवो, नागडें च येतें व मेल्यानंतर राजाहि आपला राजवाडा सोडून जातो व गरीब सुद्धां आपली झोंपडी सोडून जातो. जन्मताना व मरताना कांहीं भेद नाहीं, तर मध्यें च हा भेदाभेद कशाला ? हा करंटेपणा देवानें निर्माण केलेला नाहीं ; माणसानें निर्माण केला आहे. तो आपल्याला सोडला पाहिजे. मला राजेसाहेबांच्या त्या चित्रानें शिकविलें, सूर्य चंद्र तारे हे सर्वांकरतां आहेत. सृष्टि आपल्याला अशी समानता शिकविते तेव्हां आपण भेदाभेद ठेवले तर ते घातक ठरतील.

या विज्ञान युगांत तुम्ही औंधचे लोक ग्रामदान करून नवीन वाट पाडा, व आटपाडीचे वाटपाडी होऊं द्या. म्हणजे आटपाडीची कीर्ति सबंध हिंदुस्थानभर पसरेल. त्यानें तुम्ही हि पुढें जाल व देश हि पुढें जाईल.

**आटपाडी,** ता. २२-८-५८

# भारताच्या समस्या सर्वोदयाशिवाय सुटणार नाहींत : २२ :

[मुंबई राज्य. सर्वोदय संचालक शिबिराचें उद्घाटन प्रसंगीं दिलेलें भाषण]

तुम्हा सर्वांच्या दर्शनानें मला फार आनंद होत आहे. सर्वोदय-योजना ही या राज्याची एक विशेषता आहे. परंतु याचा अर्थ असा नाहीं कीं दुसऱ्या राज्यामध्यें जीं सरकारें आहेत तीं सर्वोदय-विचार करीत नाहींत. पण ह्या राज्यांत गांधीजी जन्मले आणि इथें त्यांचे दोन मोठे आश्रम आहेत तेव्हां या सरकारतर्फें सर्वोदय-योजना सुरू झाली नसती तर च आश्चर्याची गोष्ट म्हणवली गेली असती.

## सरकारी सर्वोदय म्हणजे मुळारंभ

कित्येकदां लोक मला विचारतात कीं हा सरकारी सर्वोदय म्हणजे काय आहे? मी उत्तर देतों, " **मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा** " हा आरंभ आहे. यापुढें सारें सरकार च सर्वोदयाचें व्हावयाचें आहे. आजचा हा सरकारी सर्वोदय म्हणजे वाङ्गनिश्चय आहे, यानंतर पुढें लग्न लागायचें आहे. हिंदुस्थानचें सरकार आणि सर्वोदय ही एक झाल्याशिवाय राहणार नाहीं हें अगदीं नि:संशय आहे. कांग्रेसवाले, प्रजासमाजवादी, आमचे मित्र लोहिया आणि त्यांचे साथी हे सारे आजकाल समाजवादाचें नांव घेत असतात. पुष्कळ वेळां लोक मला विचारतात कीं हे लोक समाजवादाऐवजीं सर्वोदयचें च नांव कां घेत नाहींत ? ते तर सगळे गांधीजीचे साथी आहेत, मग त्यांना सर्वोदयाचें च नांव घेण्यांत संकोच कां वाटतो? मी त्यांना सांगतों कीं सर्वोदयाचें वारंवार नांव घेणारे आम्ही जे लोक आहोंत त्यांचें प्रेम आहे आई-मुलासारखें. आई मुलाचें नांव पन्नासदां घेते. माझा बाळ, माझा लाला, माझा लल्लू असें म्हणते . तिचें प्रेम सेवेंत च प्रकट होतें. तरी हि लाडक्या मुलाचें नांव घेतल्यावांचून तिला राहवत नाहीं. पत्नी हि पतीची सेवा करते पण त्याचें नांव घेत नाहीं. तसे हे सगळे समाजवादी पत्नीप्रेम करणारे आहेत, त्यामुळें त्यांना नांव घ्यायचा संकोच वाटतो. मात्र मुंबई-राज्यानें पत्निप्रेमा-

ऐवजीं मातृप्रेमाची हौस बाळगली म्हणून इथें सर्वोदय-केन्द्र चालल्याचा भास होतो.

या राज्यांत ही योजना सुरू झाली ही आश्चर्याची गोष्ट नाहीं. सबंध सरकार च सर्वोदयाची भाषा कां बोलत नाहीं ही खरी आश्चर्याची गोष्ट आहे. पण हें निःसंशय आहे कीं हिंदुस्थानांत जें कोणतें राज्य सबंध जनतेचें हित करणारें असेल तें सर्वोदयाचें झाल्यावांचून राहणार नाहीं, हें ईश्वर बोलून चुकला आहे, आपल्या वहींत लिहून चुकला आहे. हिंदुस्थानच्या समस्या सर्वोदयाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें उलगडणार नाहींत. तेव्हां तुम्हीं मला सरकारी सर्वोदय-योजनेच्या परिषदेचें उद्घाटन करायला सांगितलें तें योग्यच केलें. मी आपल्या मनांत अमुक सरकारी सर्वोदय-वाला अमुक बिनसरकारी सर्वोदयवाला अमुक कम्युनिटी प्रॉजेक्टवाला, अमुक सर्व-सेवा-संघवाला असा भेद च करीत नाहीं. हे सर्व भेद खोटे आहेत. खरें हें च आहे कीं हे सर्व भारतीय आहेत आणि सर्वांना भारताच्या हिता-विषयीं तळमळ आहे.

## हिंदुस्थानच्या हवेंत कोणता हि वाद हिंदुस्थानी रूप घेणार

भारत इतका मोठा आहे आणि त्याच्या समस्या इतक्या विविध आहेत कीं त्या सर्व सोडविण्यामध्यें मतभेद हे होणार च, आणि तें इष्ट हि आहे. त्यानें सत्य-शोधनाला मदत होते. तुम्ही पाहत आहांत कीं हळू हळू कम्युनिस्ट पक्ष सुद्धां या मार्गाकडे येऊं लागला आहे. अनेकांना धास्ती वाटते कीं कम्युनिस्ट पक्षाचें हें सगळें सोंग आहे, बतावणी आहे पण मला अशी धास्ती मुळी च वाटत नाहीं. मी केरळमध्यें चार महिने होतों. तेथें सगळ्या कम्युनिस्ट नेत्यांशीं चर्चा केली. हिंदुस्थानच्या हवेंत जो कोणता वाद येईल तो हिंदुस्थानचें च रूप घेणार यांत मला मुळीं च संशय नाहीं. इथें इस्लाम आला त्याला भारताचें रूप आलें. ख्रिश्चॅनिटी आली तिला हि भारताचें रूप आलें. हें सर्व मला केरळमध्यें दिसलें. तसाच इथें कम्युनिझम् सोशॅलिझम् कोणता हि वाद येवो तो इथल्या संस्कारानें संस्कृत झाल्याशिवाय रहायचा च नाहीं. त्यावर इथला रंग चढायचा च.

आमचे एक मित्र मला सांगत होते कीं आपल्या शेतांत सोयाबीन लावला पण तीन चार वर्षांत त्याला इथल्या डाळीसारखें च रूप येऊं लागलें. मीं म्हटलें मला याचें आश्चर्य वाटत नाहीं. हिंदुस्थानच्या मातीचा जो गुण आहे तो त्यावर चढल्याशिवाय कसा राहील ?

ज्या संस्कृतीनें दहा हजार वर्षापासून अनेक संस्कृतींना, भिन्न भिन्न धर्मांच्या पंथांना पचविलें अशा देशांत जो कोणता विचार आला त्याला भारतीय रंग चढल्याशिवाय तो टिकायचा नाहीं. म्हणून मला लेशमात्र हि शंका नाहीं कीं हिंदुस्थानच्या समस्या सोडविण्याचा विचार करणारे जे कोणी तळमळीचे लोक असतील ते कोणत्याहि राजकीय पक्षाचे असोत त्यांना सर्वोदयाकडे आल्याशिवाय गत्यंतर नाहीं. भारताची परिस्थिति भारताला सर्वोदयाशिवाय दुसऱ्या रस्त्यावर जाऊं देणार नाहीं. मला याची प्रतीति पूर्वीं च आली होती पण लोकांना अगदीं " फूल प्रुफ " हवें असतें. तेव्हां तशी प्रतीति येलवालच्या सर्वपक्षीय ग्रामदान परिषदेनें आली. ज्यांचें एकमेकांशी कधीं पटायचें नाहीं, म्हणजे ज्यांचें शनि मंगळ एकमेकांच्या विरुद्ध च असतात, त्यांनीं एकत्र येऊन एक मसुदा तयार केला आणि त्यावर चर्चा करून तो एकमतानें पास केला. त्यावेळीं ही गोष्ट स्पष्ट झाली कीं भारताची हवा विविध चिंतन करणाऱ्यांना भारताच्या रीतीनें एकत्र आणल्याशिवाय राहणार नाहीं. त्यानंतर पं. नेहरू जपानमध्यें गेले. तेव्हां तेथें ते म्हणाले कीं आमचा देश एक विलक्षण देश आहे आणि नुकता च मी एका " क्यूरिअस कॉन्फरन्स " मधून आलों आहें.

एवढ्या मोठ्या महत्त्वाच्या प्रश्नावर विचार करण्याकरतां विविध राजनैतिक पक्षाचे नेते एकत्र यावेत आणि त्यांनीं एकमतानें ग्रामदानाला पाठिंबा देण्याचा ठराव पास करावा ही गोष्ट दुसरीकडे घडली नसेल. माझ्या मनांत सर्वोदयवाले, कम्युनिस्ट, काँग्रेसवाले वगैरे कांहीं च भेद नाहींत. जे खरे असतील, कळकळीचे असतील ते सर्वोदयाच्या आश्रमांत एकत्र येणार च. ज्याप्रमाणें वसिष्ठ ऋषींच्या आश्रमांत वाघ गाय सारे एकत्र येत त्याप्रमाणें सर्वोदयाच्या आश्रमांत वाघासारखे दिसणारे लोक येवोत कीं गाईसारखे दिसणारे लोक येवोत त्यांच्यावर ऋषींचा रंग चढायचा च.

## खादीचा उलटचा क्रमानें विकास

आतांच श्री रतुभाईनीं सांगितलें कीं ग्रामदान हा सर्व विधायक कार्यांचा पाया आहे. त्यांचें तें निदान खरें आहे. ग्रामदानाशिवाय "**तांतडीची भिंत पायाविण**" अशी स्थिति होईल. गांधीजींनीं १९१८ सालीं विण-कामाचा प्रयोग सुरू केला तेव्हांपासून मी त्या कामांत आहें च. परंतु पुढें लक्षांत आलें कीं केवळ विणकाम करून भागायचें नाहीं सूतकताई करायला हवी. नंतर पेळू हि आपणच करायला हवेत असें लक्षांत आलें. असें करीत करीत नंतर शेवटीं लक्षांत आलें कीं कापसाकरतां जमीन हि हवी. म्हणजे विणकामापासून सुरुवात करून आम्ही जमिनीपर्यंत आलों. अगदीं "**उर्ध्व मूलम् अधःशाखम्**" सारखी उलटी सुरुवात होऊन पुढें विकास होत गेला. खादीचा विचार म्हणजे काय हें देशांतील बहुतेकांच्या लक्षांत च आलें नाहीं. आम्हांला वाटायचें कीं गांधीजींनीं आमच्या गळ्यांत निष्कारण हें लोढणें अडकविलें आहे. फक्त इंग्रजी राज्याच्या विरुद्ध असंतोष निर्माण करण्याचें साधन म्हणून आम्ही खादीला मानीत असूं. पुढें स्वराज्यानंतर कांहीं प्रयोगा-करतां जमीन हवी होती तर ती अॅक्वायर करण्याचा विचार आला. म्हणजे जमीन मागून मिळूं शकते हें आम्हांला माहीत च नव्हतें. पण पुढें ज्ञानाचा विकास होत होत जमीन मागितल्यानें मिळतें तें कळलें.

## ग्रामदान शांतीनें पण तीव्र गतीनें झालें पाहिजे

ग्रामदानाचें काम हें अहिंसेचें काम असल्यामुळें तें शांतीनें च व्हायचें, परंतु हें विज्ञानयुग असल्यामुळें हें कार्य योग्य पद्धतीनें पण अत्यत तीव्र गतीनें व्हायला हवें. तुम्हांला हें विधान परस्परविरोधी वाटेल, पण तें तसें नाहीं. मला घाई नाहीं पण विज्ञानाला घाई झाली आहे. आज जगाची परिस्थिति इतकी स्फोटक आहे कीं विश्व-युद्ध केव्हां सुरू होईल तें सांगतां येत नाहीं. मागें पं. नेहरू अमेरिकेंत आईकशीं बोलून आले आणि मग वर्तमानपत्रांत मोठ्या टाईपांत बातम्या आल्या कीं जागतिक शांततेच्या दृष्टीनें ही फार महत्त्वाची घटना आहे. त्यानंतर पंधरा दिवसांनीं आईकनें मिडलईस्टसंबंधीं एक योजना जाहीर केली. आणि मग पं. नेहरू म्हणाले कीं जागतिक परि-

स्थिति बिघडली आहे. अशा परिस्थितींत केव्हां काय होईल तें सांगतां येत नाहीं. उद्यां युद्ध सुरू झालें तर सारी पंचवार्षिक योजना पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें गडगडून पडेल. मग खेड्यांना कोण वांचविणार ? मागें बंगालमध्यें दुष्काळ पडला तसा जर दुष्काळ पडला तर आपल्या घशांत घास जाईल काय ? त्यावेळीं इंग्रजांच्या डोक्यावर जबाबदारी थापून आपण व्यवस्थित जेवत होतों. पण स्वराज्यांत लोक दुष्काळानें मेले तर ती किती नामुष्कीची गोष्ट होईल ! म्हणून च मला तळमळ लागली आहे. ग्रामदान हें " डिफेन्स मेझर " असें मीं म्हटलें होतें आणि नेहरूंनीं तें अक्षरशः मान्य केलें. युद्धाच्या परिस्थितींत ग्रामदान च आपल्या खेड्यांना वांचवूं शकेल. पं. नेहरूंनीं नुकतें च एका व्याख्यानांत सांगितलें कीं " केन्द्र आणि प्रांतिक सरकारें, कम्युनिटी प्रॉजेक्ट, एक्सटेन्शन सर्व्हिसेस हे सर्व खेड्यांच्या समस्या सोडवितील असें समजून खेड्यांतील लोकांनीं त्यांच्यावर विसंबून राहूं नये. त्यांनीं आपल्या पायावर उभें राहून आपल्या समस्या सोडवाव्यात. "--पण पं. नेहरूंचें हें व्याख्यान खेड्यांमध्यें कांहीं पोंचलें नाहीं. आज हिंदुस्थान दरसाल ३०० कोटि व पाकिस्तान १०० कोटि म्हणजे आम्ही एकूण ४०० कोटि रुपये लष्करावर खर्च करीत आहोंत. शिवाय १५० कोटि रुपयांचें धान्य बाहेरून मागवीत आहोंत. युद्ध नसतांना जर ही स्थिति आहे तर युद्ध सुरू झाल्यावर आपली काय गत होईल ? म्हणून च मला ग्रामदानाविषयीं घाई झाली आहे.

आर्. के. पाटील चीनमधें जाऊन आल्यानंतर म्हणाले कीं 'तेथील सरकारच्या योजनांत जनता उत्साहानें भाग घेते, तसें इथें होत नाहीं.' याचें कारण तिथें एक क्रांति झाली होती आणि सरकारनें लोकांना जमिनी वांटून दिल्या होत्या. तिथें हिंदुस्थानपेक्षां जास्त जमीन नाहीं. तेव्हां वांटपांत प्रत्येक कुटुंबाला एक-दीड एकर च जमीन मिळाली पण त्याचा परिणाम असा झाला कीं तेथील जनता, सरकार आपलें आहे, असें मानूं लागली. सरकारनें प्रथम जमीन वांटून दिली आणि मग लोकांना सहकार करायला सांगितलें. हें सर्व तुम्ही लक्षांत घ्या. माझें तुम्हांला हें च सांगणें आहे कीं तुम्ही हि जितक्या वेगानें ग्रामदानाला उत्तेजन द्याल आणि मिळालेलीं ग्रामदानें सार्थक कराल तितकें देशाचें भलें होईल.

## तिसऱ्या शक्तीचा शोध

१ जानेवारी १९५९ ला गुजराथ सोडून राजस्थानांत प्रवेश करण्याची माझी इच्छा आहे. तेव्हां मी अजून सात महिने तुमच्या प्रदेशांत आहें. तेवढ्या वेळांत तुम्ही कांहींतरी करून दाखवाल अशी अपेक्षा आहे. सरकार, सरकारी सर्वोदय-योजना, कम्युनिटी प्रॉजेक्ट हे सर्व माझे आहेत. कोणी हि माझ्या बाहेरचा नाही. यांतील कोणावर हि यत्किंचित् सुद्धां अविश्वास ठेवून माझें चालणार नाहीं. मला नुकताच एका नवीन शक्तीचा शोध लागला आहे. पूर्वी मी आत्मज्ञान-शक्ति व विज्ञान-शक्ति या दोन च शक्तींचा उल्लेख करीत असें पण आतां मला तिसऱ्या शक्तीचा शोध लागला आहे. ती आहे विश्वास-शक्ति या तिन्हीपैकीं एकहि शक्ति जरी कमी असली तरी काम होणार नाही. आतां राजकारण, लोकजीवन, इत्यादि सर्वांत विश्वास आला पाहिजे. आत्म-ज्ञानाचा, करुणेचा सर्वत्र प्रचार व्हायला पाहिजे. त्याकरितां संतांच्या वचनांची, चरित्राची फार आवश्यकता आहे. मुंबईराज्यानें तुकारामाची गाथा छापली ही फार चांगली गोष्ट आहे. तुकाराम-ज्ञानदेवांच्या काळांत त्यांची काय दशा होती तें सर्वांना माहीत च आहे. तुकारामाला माहीत हि नसेल कीं पुढें त्याचा भाव इतका वाढणार आहे. कारण त्याच्या काळांत त्याला कोणी पुसत हि नव्हता. पण आज सरकारला हि त्याची गरज वाटते आहे. कारण या विज्ञान-युगांत त्याच्यावांचून अडणार आहे. या विज्ञान-युगांत तुमचें कसें चालणार म्हणून लोक मला विचारतात. मी त्यांना म्हणतों, या विज्ञान-युगांत तुमचें कसें चालणार? आमचें तर उत्तम च चालणार आहे. कारण विज्ञान आणि अहिंसा यांच्या सयोगानें पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल. परंतु विज्ञान आणि हिंसा यांचा संयोग झाल्यास सर्वनाश च होईल. तेव्हां विज्ञान हें तुमच्या जीवावर आलें आहे तर तें आमच्या मदतीला आलें आहे.

## सरकारी मदत कमानीच्या टेकूसारखी असावी

सरकारनें खेड्यांना मदत करावयाची आहे. परंतु योजना मात्र खेड्यांतील लोकांनीं च करावयाची आहे. आम्ही योजना करूं तीच खेड्यांत चालेल

असें म्हणणें म्हणजे मोठा अहंकार आहे. खेड्यांना अशी मदत देतां कामा नये कीं ज्यायोगें तीं अनाथ होऊन मदत च मागत राहतील. आज कम्युनिटी प्रॉजेक्टमधें जी मदत दिली जाते त्यांत अमुक च खेड्यांना मदत कां दिली याचें कांहीं कारण नाहीं. अमुक एका मंत्र्याच्या वशिल्यामुळें अमुक एका ठिकाणीं प्रॉजेक्ट सुरू झाला असें लोक म्हणतात व आमच्याकडे कां सुरू केला नाहीं म्हणून तक्रार करतात. म्हणजे लोकांना तक्रार करण्यापलीकडे कांहीं कर्तव्यच उरत नाहीं. म्हणून सरकारी योजनेनुसार लोकांना मदत मिळाली तरी माझा जीव धडधडतो व नाहीं मिळाली तरी धडधडतो. तेव्हां खेड्यांतील लोकांना आपल्या इच्छेप्रमाणें भिन्न भिन्न प्रयोग करण्याचा अधिकार असावा ही च मुख्य काळजी घ्यावी. वरून आम्ही बिनचुक योजना करून सर्व खेड्यांवर लादण्यापेक्षां खेड्यांतील लोकांना चुकीचे प्रयोग करण्याचें स्वातंत्र्य दिलें पाहिजे. गांधीजींनीं स्वराज्याची व्याख्या करतांना म्हटलें होतें कीं स्वराज्य म्हणजे चुका करण्याचा अधिकार. असें हें स्वराज्य खेड्यांना लाभूं द्या. ग्राम-स्वराज्य होऊं द्या. सरकारनें खेड्यांना जी मदत करायची ती अशा कुशलतेनें करावी कीं ती मदत पुढें काढून घेतली तरी हरकत नाहीं. ज्याप्रमाणें कमानी उभारण्याकरितां प्रथम आधार म्हणून कांहीं विटा लावतात व मग कमान मजबूत झाल्यावर त्या विटा काढून टाकतात, त्याप्रमाणें सरकारी मदतीच्या विटा कमानीला टेका देण्यापुरत्या च असाव्या ; व कमान पक्की झाल्यावर काढून टाकाव्यात.

## पद्धतीचा आग्रह नाहीं

निरनिराळ्या कामामध्यें निरनिराळ्या पद्धतींनीं प्रयोग होऊं शकतात. आम्ही कोणत्या हि पद्धतीचा आग्रह धरीत नाहीं. सर्वोदयाचें कोणत्याहि पद्धतीशीं लग्न लागलें नाहीं. त्याचें सत्य-अहिंसेशीं लग्न लागलें आहे. ग्राम-रचनेच्या बाबतींत समाजवाद साम्यवाद इत्यादि निरनिराळ्या विचारधारा-नुसार निरनिराळे प्रयोग चालू शकतात. रोग्याला पद्धतीचा आग्रह नसतो, फक्त रोग बरा व्हावा एवढा च आग्रह असतो. परंतु निरनिराळे उपचार-पद्धतीवाले मात्र आपापल्या पद्धतीचा आग्रह राखतात. आम्ही म्हणतों कीं

खेडयांत निरनिराळे प्रयोग चालू द्या. फक्त मुख्य वस्तु कायम ठेवा ती ही कीं गांवांत मालकी सर्वांची, सर्वांनीं प्रेमानें रहायचें व सर्वांच्या समाधानानें जें होईल तें करायचें.

ग्रामदानानंतर असें करावें कीं तसें करावें याविषयीं मला रतुभाईनीं प्रश्न विचारला. आतां मी जाहीरपणें उत्तर देतों कीं कसें हि करा, जसें सुचेल तसें करा पण हें लवकरांत लवकर करून दाखवा. ग्रामदानी गांवें चांगलीं करून दाखविलीं तर तुम्हीं फार मोठी मदत केली असें मानलें जाईल. या सर्वोदय-योजनेंत चांगलीं, अनुभवी व निष्ठावान माणसें आहेत व त्यांच्यावर सरकारचा तसा विशेष अंकुश हि नाहीं. सरकारी अंकुश म्हणजे फुलांच्या हारांतील धाग्याप्रमाणें असावा. हारांत फुलें च दिसतात, धागा दिसत नाहीं. धागा दिसूं लागला तर फुलें सुकत चाललीं आहेत असें म्हणावें लागेल. तेव्हां शासनाचा अंकुश–धागा–असा असावा कीं त्यांत कुशलतेनें ओंवलेलीं फुलें च तेवढीं दिसावींत.

मोहूद (जिल्हा सोलापूर), ता. २५-५-५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ३५७२८ वि: ...
क्रमांक ............ नों. दि. २०...

## हिंदीच राष्ट्रभाषा होण्याला योग्य : २३ :

[ महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीपुढें दिलेलें पू. विनोबांचें भाषण ]

आतां च श्री. पोतदार यांनीं आपल्यापुढें राष्ट्रभाषा-प्रचार समितीचा अहवाल थोडक्यांत मांडला आणि समिति कोणत्या तत्त्वावर काम करीत आहे त्याचा हि विचार सांगितला. त्यांनीं एक मुख्य गोष्ट अशी सांगितली कीं 'आम्ही हिंदी भाषेची प्रगति करूं इच्छितों आणि हिंदीच्या प्रगतीमुळें अन्य देशी भाषांचें कांहीं नुकसान होईल असें समितीला वाटत नाहीं.' ही फार चांगली गोष्ट आहे. हिंदुस्थानांत अनेक समृद्ध भाषा आहेत हें भारताचें गौरव आहे. आज युरोपची काय अवस्था आहे ? तेथें लिपि एक आहे तरी

अनेक भाषांचीं लहान लहान राष्ट्रें बनलीं आहेत. आपल्या देशांत इतक्या सर्व भाषा असून हि भारत एक राष्ट्र आहे. पण देश मोठा असल्यामुळें प्रांताचा कारभार त्या त्या प्रांतीय भाषांतून चालणें अनिवार्य आहे. परंतु सर्व देशांत परस्पर व्यवहाराकरितां हिंदीच असावी असें आपण ठरविले आहे. हिंदी भाषा इतर भाषांपेक्षां समृद्ध आहे म्हणून ती राष्ट्रभाषा होण्याला योग्य आहे असें माझें म्हणणें नाहीं. परंतु हिंदी भाषा इतर भाषांपेक्षां बोलण्याला फार सुलभ आहे. म्हणून ती राष्ट्रभाषा होण्याला योग्य आहे. हिंदी स्वतः समृद्ध नसली तरी सर्व भाषांच्या मदतीनें तिला समृद्ध बनवायची आहे.

## ज्या भाषांनीं कांहीं सेवा केली त्यांचाच प्रसार झाला

जगांत ज्या भाषा प्रचलित आहेत, त्यांपैकीं ज्या भाषांनी जगाची कांहीं ना कांहीं सेवा केली त्यांचाच प्रसार ज्यास्त झाला हें आपण पहातों च. ज्या भाषेच्या साधनानें दुनियेची कांहीं विशेष सेवा झाली त्याच भाषेचा प्रसार झाला आणि होईल. कांहीं भाषांत विज्ञान अधिक लिहिलें गेलें आहे तेव्हां विज्ञानाची आ ड असणाऱ्या लोकांना स्वाभाविकपणें च त्या भाषेचा आदर वाटतो. जशी विज्ञानामुळें तशीच साहित्यामुळें हि कांही भाषांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. जी भाषा जगांत व्यापार-व्यवहाराला उपयोगी पडते तिचा हि त्या व्यवहारांतल्या लोकाना आदर वाटतो. या प्रमाणें अनेक कारणांमुळें जगामध्यें भाषेचा प्रसार होतो. पण मातृभाषा सोडून सर्व जग ज्या भाषेला मान्यता देईल अशी दुसरी कोणती भाषा असेल ? माझ्या मतें जी भाषा जगाला शांतीचा मार्ग दाखवील तीच भाषा जगन्मान्य होईल. विज्ञान, व्यापार, समाज-शास्त्र राजनीति-शास्त्र अशा अनेक शास्त्रांचें ज्ञान देणाऱ्या भाषेवर आजवर सर्वांनी प्रेम केलें, पण यापुढें जी भाषा शांतीचा मंत्र शिकवील तिचाच गौरव जगांत होईल. मग त्या भाषेंत साहित्य, विज्ञान, आणि दुसरीं अनेक शास्त्रें कमी असलीं तरी चालतील. माझ्या मतें हिंदी भाषेला हें उज्ज्वल भविष्य आहे. हें मी कोणत्या आधारावर म्हणतों ? हिंदीमध्यें मोठा शब्दसंग्रह आहे पुष्कळ साहित्य आहे म्हणून मी असें म्हणत नाहीं. परंतु आज भारतांत,

जगाला शांतीचा रस्ता दाखविणारी जी शक्ति प्रकट होत आहे त्या आधारावर हें माझें विधान आहे.

## शांतीचा मार्ग इंग्लंड किंवा भारतच पतकरील

चार सहा महिन्यापूर्वी मीं एक विचार प्रकट केला होता. तो विचार असा कीं, शांतीचा मार्ग पतकरायला बहुधा इंग्लंड किंवा हिंदुस्थान यापैकीं कोणाला तरी किंवा दोघांना हि तयार व्हावें लागेल. इंग्लंडच्या विशेष परिस्थितीमुळें आणि हिंदुस्थानच्या संस्कृतीमुळें त्यांना या कामीं पुढाकार घ्यावा लागेल. माझ्याबरोबर जर्मन मुलगी हेमा फिरत आहे. तेव्हां जर्मनी पुढाकार घेणार नाहीं असें कोणी सांगावें ! विचार करतां करतां केव्हां वाटतें कीं जपान आज हिंसक शक्तीपुढें नामोहरम झाला आहे तो कां उभा राहूं नये ? याप्रमाणें कधीं या देशाविषयीं तर कधीं त्या देशा-विषयीं आशा उत्पन्न होते. पण भारताविषयीं आशा वाटण्याचा मला विशेष अधिकार आहे. भारताची जी ऐतिहासिक विशेषता आहे ती ध्यानांत घेऊन त्याप्रमाणें जर आपण आपलें जीवन उभें केलें तर हिंदी भाषा सर्व ठिकाणीं चालू लागेल. इंग्लंडच्या पुढाऱ्यांशीं हिंदुस्थानचा पुष्कळ वेळां मत-भेद झाला तरी हिंदुस्थानचें इंग्लंडशीं वागणें प्रेमाचें च होतें. एवढा मोठा इंग्लंडचा इजिप्तशीं सुवेजचे बाबतींत कलह झाला. तो हिंदुस्थानला मुळींच पसंत नव्हता तरी भारत प्रेमानेंच कॉमन्वेल्थमधें राहिला. इंग्लंडला जर अक्कल असेल तर इंग्लडने ज्ञानाकरितां नाहीं तर प्रेमासाठीं दुसरी भाषा म्हणून हिंदी शिकावी असें जेव्हां मीं म्हटलें तेव्हां आमचे मित्र डोनाल्ड ग्रूम, यांना फार च उत्साह वाटला व ते म्हणाले इंग्लंडच्या लोकांनीं जर ही गोष्ट मानली तर जगांत शांतीची शक्ति वाढेल. इंग्लंड अणि हिंदुस्थान एक होणें याचा अर्थ काय ? भारताजवळ आधिभौतिक अशी कांहीं शक्ति नाहीं, जी आहे ती शांतीची आणि प्रेमाची शक्ति आहे. इंग्लंडनें जर ही शक्ति ओळखली तर शांतीची शक्ति वाढेल आणि ती वाढणारच अशी मला आशा आहे. इंग्लंडनें आपली भाषा हिंदुस्थानवर जबरदस्तीनें लादली पण आतां जबरदस्ती गेल्यावर हि इंग्रजी भाषा भारतानें प्रेमानें स्वीकारली. परंतु ती स्वीकारतांना भारतानें आपली बुद्धि ठिकाणावर ठेवली आणि एका

मर्यादेंत तिचा स्वीकार केला. यांत हिंदुस्थाननें इंग्लंडवर कांहीं उपकार केला असें नाहीं. आपल्या कामाकरितांच ती घेतली. तरी पण मला असें म्हणायचें आहे कीं इंग्लंडनें केवळ प्रेमानें च हिंदीचा स्वीकार कां करूं नये? आणि मला विश्वास आहे कीं दुसरी भाषा म्हणून इंग्लंड हिंदीचा अवश्य स्वीकार करील.

तुम्ही आपल्याला केवळ एक भाषा-प्रचारक असें समजूं नका. भाषा एक साधनमात्र आहे. तिच्या साहाय्यानें आपल्याला भारताचा संदेश जगामधें पोंचवायचा आहे या दृष्टीनें तिचा स्वीकार करा. आम्ही स्वतःला नुसते प्रचारक समजू नये. एक विचार देणारे समजावें. मग हिंदुस्थानांतला माणूस त्याची कोणती हि मातृभाषा असली तरी परदेशांत जाईल तेव्हां त्याची भाषा हिंदीच आहे असें मानलें जाईल.

## हिंदीला लोकनीतीचे वाहक बनवायचें आहे

हिंदी भाषा हें एक असें साधन आहे, वाहन आहे कीं जिच्या द्वारा आपण भारताचा मूलभूत विचार जगापुढें ठेवूं शकूं. तो विचार म्हणजे लोकनीतीचा आहे, राजनीति जगांत पुष्कळ दिवस चालली आणि आज हि चालू आहे. आणि तिचे बरे वाईट परिणाम हि जग भोगीत आहे. आपल्याला तर लोकनीतीचें वाहक बनायचें आहे. आत्मशक्ति आणि प्रेमशक्ति हा तिचा पाया आहे. आपण आपल्या देहावर जितकें प्रेम करतों तितकें च प्रेम आपण सर्वांवर केलें पाहिजे हें आपल्याला आपल्या संतांनीं, ज्ञानी महापुरुषांनीं शिकविलें. ती शिकवण अमलांत आणायला हा काळ अनुकूल आहे. हिंसकशक्तीमुळें दुनिया आज तंग झाली आहे, बेजार आहे, तिला कांही सुचत नाहीं. म्हणून दुनिया आज भारताचा संदेश ऐकायला आतुर आहे. भारतांत शांतीची शक्ति प्रकट होत आहे. गांधीजींच्या निर्याणानंतरहि गांधी-विचाराचें उत्थान होत आहे आणि भारत शांतीच्या मार्गानें उन्नति करीत आहे हें ऐकायला सर्व जग अगदीं उत्सुक आहे. आज जगांतल्या मोठ्या देशांनीं विज्ञानांत खूप प्रगति करून शस्त्रास्त्रांत बरीच वाढ केली आहे परंतु त्यांचीं तीं शस्त्रें बेकार ठरली असून तीं भस्मासुराप्रमाणें त्यांनाच भस्म करूं पाहत आहेत. त्यांतून सुटका

होण्याची जग आशा राखीत आहे. त्या आशेची पूर्ति जर भारत करील तर भारताचें तें एक मिशन होईल आणि मग हिंदी ही जगाची प्रेमाची भाषा बनेल. म्हणून मित्रांनो ! आपण केवळ हिंदी भाषेचे प्रचारक आहों असें तुम्ही समजूं नका तर प्रेमाच्या भाषेचे वाहक बना. ज्ञानेश्वरासारख्या अनेक संतांनीं आपल्याला प्रेमाची भाषा शिकविली आहे. ज्ञानेश्वरांना समाजानें किती कष्ट किती त्रास दिला तरी त्यांच्या वाणींतून हिंसेचा एक हि कटु शब्द निघालेला नाहीं. ज्या शिकवणीच्या आधारावर आम्ही विचार प्रचारकाची भूमिका घेऊं पाहतों तो भारताचा विचार फारच उच्च आहे आणि त्याने सर्व जगाची सेवा होईल असें मी मानतों.

## हिंदी भाषा नम्र आहे

हिंदी भाषा नम्र आहे. जे शक्तिशाली असतात ते प्रायः नम्र असतात च. पण माझ्या बाबतींत हिंदीच्या नम्रतेची अगदीं परिसीमा आहे. मला हिंदी तितकीशी चांगली येत नाहीं. माझें हिंदीचें असें खास अध्ययन हि झालेलें नाहीं. माझें हिंदी बेसिक च नव्हे तर तें प्रीबेसिक हि नाहीं. हिंदी शब्द सुचला नाहीं म्हणजे मी संस्कृत शब्द घालून देतों. पण हिंदीवाल्यांनीं हें माझें अज्ञान नुसतें सहन केलें एवढें च नाहीं तर तुमची एक विशिष्ट शैली आहे असा माझा गौरव करून मला पारितोषिक दिलें. ज्या माणसानें हिंदी बिघडविली असें म्हटलें जाईल त्याला पारितोषिक दिलें गेलें आहे. इकडून कोणी बिहार किंवा उत्तर प्रदेशांत गेला आणि कसें हि हिंदी बोलला तरी त्याला कोणी हंसत नाहीं. ही हि एक हिंदीच आहे असें म्हणतात. पुण्यामध्यें जर कोणी 'चांगला' ऐवजीं 'च्यांगला' असा उच्चार केला तर हा काय विचित्र बोलतो आहे असें म्हणून लोक त्याला हंसूं लागतील, टर उडवतील पण हिंदी अशी नम्र आहे कीं ती सारे सहन करते, आणि म्हणून ती लवचिक हि आहे. जी भाषा लवचिक असते, जिच्यांत सहनशक्ति असते तीच भाषा समृद्ध होऊं शकते इंग्रजीबद्दल हि असें च दिसून येईल कीं जगांतल्या सर्व भाषेंतले शब्द तिने पचवून टाकले आहेत. इंग्रजी हि अशी च लवचिक आहे. म्हणून नम्रपणें पण न भितां हिंदी बोलण्याचा सराव केला पाहिजे. मला इंग्रजी बोलायचा कसा अनुभव

मिळाला तें सांगतो. मीं ‘ किंग्ज इंग्लिश ’ या नांवाचें एक पुस्तक वाचलें त्यांत डिकन्ससारख्या बड्या ग्रंथकारांनीं हि कशा कशा चुका केल्या आहेत त्या, त्या पुस्तकांत दाखविल्या आहेत. तेव्हां एवढे मोठे ग्रंथकार हि चुका करतात हें जेव्हां मीं पाहिलें तेव्हां ‘ दी ’ आर्टिकल कोठें असावें आणि कोठें नसावें याची फिकीर न करतां इंग्रजी बोलायला सुरवात केली. त्याप्रमाणें च श्री. रामचंद्र वर्मा यांचें ‘ अच्छी हिंदी ’ पुस्तक मी वाचलें. त्यांत दिलेले नियम कांहीं माझ्या लक्षांत राहिले नाहींत आणि सुचेल तसें बोलत चाललों आहें. आणि जेव्हां हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून मान्य झाली नव्हती तेव्हां स्वामी दयानंद सरस्वतींनीं, त्यांची भाषा गुजराथी होती तरी, आपल्या शैलींत हिंदीमधें पुस्तकें लिहिलीं. या पुस्तकाविषयीं हि असें मानलें गेलें कीं हा हि एक हिंदीचा प्रकार आहे. याप्रमाणें हिंदीमधें सर्वांना सामावून घेण्याची क्षमता आहे.

## हिंदीऐवजीं संस्कृत ?

मध्यंतरी अशी चर्चा चालू होती कीं हिंदीच्या ऐवजीं संस्कृत च राष्ट्र-भाषा कां करूं नये ? ती सर्वांना च आदरणीय आहे. आणि ती शिकायला हि सर्वांना सारखे च कष्ट पडणार आहेत. मला हि वाटतें कीं दिवसेंदिवस संस्कृत भाषा वाढत जाईल, पण राष्ट्रभाषा संस्कृत होणार नाहीं. सुसंस्कृत भाषा राष्ट्रभाषा होईल. म्हणजे ती सुलभ संस्कृत असेल. याचा अर्थ असा कीं त्या भाषेंत संस्कृतमधले पुष्कळ शब्द असतील पण विभक्तिप्रत्यय हिंदीचे राहतील. कारण संस्कृतमधली विभक्तीचीं रूपें गौरव करण्यासारखीं नाहींत. तसें पाहिलें तर संस्कृतमधें शब्दांची फार मोठी टांकसाळ च आहे. ती भाषेची शक्ति वाढविणारी वस्तु आहे. म्हणून आपण संस्कृतचा आधार जरूर घ्यावा.

तुमचें काम धन्यवाद देण्यासारखें आहे. तरी हि जी गोष्ट आपल्या पूर्वजांनीं केली तिचें श्रेय आपण घेऊं नये. काशीच्या पंडितांमधें देवनागरी लिपि स्वीकारावी कीं नाहीं याबद्दल चर्चा झाली तेव्हां हिंदी आणि मराठी भाषांनीं तिचा स्वीकार केला. ही लहान घटना नाहीं. त्यांत दीर्घ दृष्टि आहे, नम्रता आहे कौशल्य हि आहे. कारण आज महाराष्ट्रांतल्या मुलांना

हिंदी शिकणें हा एक खेळच आहे. कारण. हिंदी शिकायला त्यांना दुसरी लिपि शिकावी लागत नाहीं. इतर भाषावाल्यांना ती शिकावी लागते म्हणून मराठी लोकांमधें हिंदीचा प्रचार करणें अगदीं सुलभ आहे. याचें श्रेय आपल्या पूर्वजांना आहे. आपण जसे दोन डोळयांनीं पाहतों त्याप्रमाणें महाराष्ट्राला दोन भाषांचा मुलुख करणें आपलें काम आहे. दोन डोळयांशिवाय चांगलें दर्शन होऊं शकत नाहीं. एकच भाषा येत असेल तर आपण एकाक्षी आहों असें समजलें पाहिजे. आपण या दृष्टीनें हिंदीकडे पहाल अशी मला उमेद आहे.

## भेटीचें आमंत्रण : २४ :

यंदाचें संमेलन महाराष्ट्रांत भरण्याचें ठरल्यानंतर त्याची जागा कोणती असावी याविषयीं चर्चा चालली. त्यावेळीं पंढरपूरचा आग्रह मीं च केला होता. दुसऱ्या अनेक जागांचीं नांवें आलीं होतीं. परंतु पंढरपूरला जर संमेलन होऊं शकत असेल तर माझें चित्त दुसरीकडे जाण्याला तयार नव्हतें.

### इहलोकच्या जीवनाला हि अध्यात्माची गरज

परमेश्वराची कृपा या सबंध देशावर आणि मानवजातीवर आहे. त्यामुळें या देशांत, आणि दुसरीकडे हि, त्यानें वेळोवेळीं असंख्य सत्पुरुष पाठविले आणि त्यांच्या उपदेशानें व शिकवणुकीनें आमचा हा मानव-समूह मानवतेच्या रस्त्यावर कसाबसा टिकून राहिला. या विज्ञान-युगांत मनुष्याच्या हातांत अशीं भयानक शस्त्रास्त्रें आलीं आहेत कीं त्यामुळें सबंध मानवजातीचा संहार होतो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. अशा वेळीं आध्यात्मिकतेची आवश्यकता इहलोकींच्या जीवनाला सुद्धां उत्पन्न झाली आहे. पारलौकिक दृष्टीनें अध्यात्माची आवश्यकता, आत्म्याच्या व्यक्तिगत उन्नतीच्या दृष्टीनें अध्यात्माची आवश्यकता, मुक्तीसाठीं प्रयत्न करणाऱ्या साधकांना अध्यात्म-ज्ञानाची आवश्यकता, या सर्व गोष्टी जुन्या युगांत होत्या, त्या आज हि शिल्लक आहेत. परंतु त्यांच्याबरोबर इहलोकांतलें जीवन

जगायला च आध्यात्माची आवश्यकता आहे अशी आतां स्थिति आली आहे. म्हणजे ही आजची भौतिक गरज आहे. एक विलक्षण पाठबळ आध्यात्मिक ज्ञानाला या युगामध्यें मिळणार आहे.

## पंढरपूरची निवड कां ?

अशा स्थितींत पंढरपूर आम्हांला बचावणार नाहीं तर कोण बचावणार? असा विचार माझ्या मनांत येतो आणि त्या दृष्टीनें मीं ही जागा निवडली आहे. हें एक हिंदूंचें क्षेत्र आहे एवढें च मी समजत नसून हें एक आध्यात्मिक क्षेत्र आहे असें मी समजतों. आणि अध्यात्मविद्येचा अधिकार हिंदूंना, मुसलमानांना, ख्रिस्त्यांना आणि मानवमात्राला आहे. सर्वांची ती गरज आहे. मानवजातीच्या उद्धाराला आवश्यक असलेल्या आध्यात्मिक विद्येचें महाराष्ट्रांतील आदि तीर्थ या दृष्टीनें मीं पंढरपूरची निवड केली आहे.

माझ्यासमोर च पांडुरंगाचें देऊळ आहे आणि त्याचें शिखर येथून मला दिसत आहे. या पंढरपुरांत ६३ व्या वर्षीं प्रथम च मी येत आहें. पण इतके दिवस या ठिकाणीं मी गैरहजर होतों अशी ज्या कुणाची समजूत असेल त्याला माझ्या जीवनाचा पत्ता च लागलेला नाहीं. जेव्हांपासून मला समजूं लागलें तेव्हांपासून आजतागायत मी पंढरपूरला च आहें असा माझा दावा आहे. त्यामुळें हें स्थान सोडून अन्य स्थान संमेलनासाठीं माझ्या चित्तांत बसूं शकत नव्हतें.

## सर्वत्र पांडुरंग

असें असलें तरी सर्व स्थळीं पांडुरंगाचा निवास आहे असें मी समजतों आणि म्हणून सर्व स्थळें मला यात्रेचीं स्थळें च आहेत. एवढ्यासाठीं च मी गांवोगांव हिंडत आहें. लहान लहान खेड्यामध्यें हि मी जातों. तिथलें दर्शन म्हणजे विठोबाचें दर्शन आहे असें समजून वागण्याचा प्रयत्न मी करीत आहें. लोक विचारतात " तुमची पद-यात्रा कुठें चालली आहे ?" मी उत्तर देतों " जनतारूपी देवतेच्या दर्शनासाठीं आमची ही यात्रा चालली आहे. आमचें क्षेत्र फक्त पंढरपूर किंवा रामेश्वर, किंवा मक्का जरुसलेम च

नाहीं. प्रत्येक गांव आणि प्रत्येक घर आमचें तीर्थ-क्षेत्र आहे. आणि तिथें जीं नर-नारी-बाळें राहत असतात त्या सगळ्या आमच्या देवता आहेत. तुकाराम महाराजांनीं हें आम्हांला शिकविलें आहे. लहानपणापासून ती शिकवण आम्ही घोकत आलों आहोंत.

**" नरनारी-बाळें अवघा नारायण**
**ऐसें माझें मन करीं देवा "**

## साने गुरुजींचें स्मरण

तेव्हां अशा तळमळीनें आम्ही येथें आलों आहोंत. आणि आतां कैलासवासी झालेल्या आमच्या परम प्रिय साने गुरुजींनीं ज्या जागीं वसून पांडुरंगाचें देऊळ हरिजनांसाठीं उघडे व्हावें म्हणून उपवास केले होते त्या जागीं आमचा निवास ठेवण्यांत आला याबद्दल मला मोठा आनंद झाला.

१९४२ च्या चळवळीमध्यें ३५ महिने मी जेलमधें होतों. सुटून आल्या-नंतर माझीं जीं व्याख्यानें झालीं त्यांत एकदां मीं पंढरपूरसारख्या मंदिरांत हरिजनांना अजून प्रवेश नाहीं या गोष्टीचा उल्लेख करून म्हटलें होतें कीं " हें होत नाहीं तोंपर्यंत आम्हांला स्वराज्याचा काय अधिकार आहे?"

पंढरपूरची देवता का सामान्य आहे ? इथल्या पुजाऱ्यांनीं मला सांगितलें कीं जेव्हां या ठिकाणीं यात्रा येते तेव्हां लोकांच्या दर्शनासाठीं म्हणून नैवेद्यादि देवाचे नित्य कार्यक्रम हि बंद असतात म्हणजे लोक तर या ठिकाणीं उपवास करून येतात च परंतु ही देवता देखील लोकांच्या दर्शनासाठीं उपवास करते !

## उद्धव-माधवांची पूजा

काय सांगू तुम्हांला ? एकदां भगवान् श्रीकृष्णाच्या भेटीला उद्धव गेले होते. उद्धव आणि माधव लहानपणापासूनचे दोस्त. माधवाच्या घरीं उद्धव गेले तेव्हां घरमालकांनीं सांगितलें कीं भगवान् पूजेला बसलेले आहेत, थोडा वेळ थांबावें लागेल. उद्धव थांबले. भगवान् पूजा-कार्य आटो-पून मोठ्या लगबगीनें उद्धवाला भेटण्यासाठीं बाहेर आले. कुशल प्रश्न सुरू झाले. भगवान् म्हणाले "उद्धवा, तुला पाहून फार आनंद झाला. कोणत्या

कामासाठीं येणें केलेंस ?" उद्धव म्हणाले " तें सांगेन मागाहून. पण आधीं मला हें सांगा कीं आम्ही भगवंताची पूजा करीत असतों, परंतु तुम्ही पूजेला बसलां होतां असें ऐकलें, तर तुम्ही कुणाची पूजा करीत होतां ?" भगवान् म्हणाले " काय सांगूं उद्धवा? मी तुझी पूजा करीत होतों !" उद्धव माधवाची पूजा करतो तर माधव उद्धवाची पूजा करतो.

अशी ही दासानुदास झालेली देवता ; तिचें सुद्धां दर्शन आपण हरिजनांना होऊं देत नाहीं तर मग आपल्याला स्वराज्याचा काय अधिकार ? " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे " हें लोकमान्यांचें वाक्य आमच्या अशा वागणुकीनें टिकेल काय ? असें मी एका व्याख्यानांत म्हणालों होतों. साने गुरुजींनीं तें वाक्य उचललें आणि जाहीर केलें कीं पांडुरंगाचें देऊळ हरिजनांना उघडें होत नाहीं तोंपर्यंत मी उपवास करणार. नीलोकां त्यांना सांगितलें कीं एवढें व्रत घेण्याआधीं तुम्ही सहा महिने लोकांत प्रचार करण्यासाठीं द्या. त्याप्रमाणें सहा महिनेपर्यत सबंध महाराष्ट्रांत या एका च गोष्टीसाठीं त्यांनीं पायपिटी केली आणि हाडाचीं काडें केलीं. त्या नंतर त्या महापुरुषानें येथें येऊन भगवंताच्या दाराशीं नामदेवाप्रमाणें धरणें धरलें. एकदां नामदेवाला हि मंदिरांत प्रवेश मिळाला नव्हता. काय कारण घडलें होतें तें मला माहीत नाहीं. परंतु त्याला परतावें लागलें होतें. तेव्हां तो म्हणाला,

> **" पतित पावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा**
> **पतित पावन न होसि म्हणुनी जातों माघारा**
> **सोडी देवा ब्रीद आतां......"**

नामदेवाच्या भक्तीनंतर त्याला भगवंतापाशीं जागा मिळाली असें म्हणतात. त्याप्रमाणें साने गुरुजींनीं धरणें धरलें आणि शेंवटीं हें देऊळ हरिजनांसाठीं उघडें झालें. ती सर्व कहाणी तुम्हांला माहीत च आहे.

साने गुरुजींचें आणि माझें इतकें प्रेमाचें नातें होतें कीं याहून अधिक प्रेमाचें नातें कसें असतें तें मला माहीत नाहीं. त्यांच्या केवळ स्मरणानें देखील माझे डोळे ओले होतात. आम्ही सहा महिने धुळयाच्या जेलमधें एकत्र होतों त्यावेळीं गीतेवर जीं प्रवचनें झालीं तीं साने गुरुजींनीं जशीच्या-तशीं टिपून घेतलीं. तीं च प्रवचनें "गीता-प्रवचनें" म्हणून आज

हिंदुस्थानच्या सर्व भाषांतून निघालीं आहेत. लाखों लोक तीं प्रवचनें वाचताहेत, भक्तिमार्ग शिकताहेत, आणि हृदय-शुद्धीची दीक्षा घेताहेत. याचें श्रेय साने गुरुजींना आहे. आज मी महाराष्ट्रामधें हिंडत असतांना जीं कांहीं पाठबळें माझ्यापाशीं आहेत त्यामधें साने गुरुजींचें हि एक पाठबळ आहे. आणि माझ्यापेक्षां अधिक पाठबळ घेऊन कोणी हिंदुस्थानांत हिंडत असेल असें मला वाटत नाहीं. पुढें गांधीजींच्या हत्येनंतर साने गुरुजींनीं मला एक पत्र लिहिलें. आणि व्याख्यानांत हि त्यांनीं उघड मागणी केली. त्यांनीं तळमळीनें लिहिलें होतें "विनोबाजी, यावेळीं महाराष्ट्रांत तुमची गरज आहे. आतां तरी तुमचा तो मठ आणि आश्रम सोडा. २५-३० वर्षें तिथें तुम्ही आपल्याला कोंडून घेतलें, ध्यान-धारणा केली, फार मोठी सेवा केली हें मला मान्य आहे. परंतु आतां तुम्ही या." अशी त्यांनीं मला हांक दिली. परंतु मला जाण्याची प्रेरणा झाली नाहीं. आमचे एक मित्र म्हणाले देखील कीं "या गाईला कांहीं पान्हा फुटला नाहीं." मीं साने गुरुजींना लिहिलें कीं, "माझ्या हि पायावर भोंवरा आहे. आणि माझी फिरण्याची वेळ जेव्हां येईल तेव्हां एका भगवंताशिवाय दुसरा कोणी हि माझा पाय अटकवू शकणार नाहीं."

पुढें माझी फिरण्याची पाळी आली. मी तेलंगणांत गेलों असतां एक ईश्वरी संकेत मला मिळाला. त्या दिवसापासून ही माझी यात्रा सतत चालू आहे. ही यात्रा मीं कोणत्या बळावर सुरू केली ? माझ्या बळावर ? कोणतें बळ माझ्यापाशीं होतें? माझ्यापाशीं का संस्था होती कीं सेवक वर्ग उभा होता, कीं मी कोणी नेता होतों ? काय होतें माझ्याजवळ ? परंतु पांडुरंगाची आज्ञा समजून मी कामाला लागलों, आणि सात वर्षें निरनिराळ्या प्रांतांत हिंडत हिंडत आज पंढरपूरच्या देवतेसमोर उभा आहें.

## वैद्यनाथधामचा प्रसाद

मध्यंतरीं बिहारमधें आम्ही वैद्यनाथधामला गेलों होतों. त्या ठिकाणीं आमचे कांहीं हरिजन मित्र म्हणाले 'आम्हांला मंदिरांत घेऊन जा.' मीं म्हटलें 'मंदिराच्या मालकांची परवानगी असेल तर जाऊं, अन्यथा नाहीं.'

मी मंदिराच्या देवतेचा भक्त आहें, माझी देवता-पूजनावर श्रद्धा आहे ही हि गोष्ट खरी आहे. परंतु सर्वत्र परमेश्वर पाहण्याचा हि मला अभ्यास आहे. म्हणून मंदिरांतील लोकांच्या मर्जीविरुद्ध मी आंत जाईन हें संभवनीय नाहीं. मीं मंदिराच्या मंडळींना विचारलें. त्यांना नाहीं म्हणायला संकोच वाटला, कीं सरकारी कायद्याची त्यांना भीति वाटली तें मला माहीत नाहीं, परंतु ते म्हणाले कीं 'तुम्ही येऊं शकतां.' तदनुसार आमच्या बरोबरच्या मंडळींसह मी मंदिरांत गेलों. आमच्या मंडळींत हरिजन व इतर लोक हि होते. आम्ही मंदिराच्या आवारांत पोंचल्याबरोबर तेथील मंडळींनीं आम्हांला तडातड मारायला सुरवात केली. पांच सहा मिनिटेंपर्यंत ते मारीत च राहिले. सर्व माराचा रोख माझ्यावर होता. परंतु मंडळींनीं माझ्या डोक्यावर हात धरून सारा मार आपल्यावर झेलला. कोणीं हि प्रत्युत्तर दिलें नाहीं. माझ्या बरोबरच्या मंडळींची संख्या हि अधिक होती आणि आम यांतली कांहीं मंडळी मजबूत हि होती. जबाब द्यायचा मनांत आणलें असतें तर देतां आला असता. परंतु सर्वांनीं अगदीं शांतीनें मार सहन केला. माझ्यावरचे वार चुकविण्याचा जरी त्यांचा प्रयत्न होता तरी परमेश्वर भक्ताला कांहीं खिरापत दिल्याशिवाय कसा राहील ? एका माणसाचा तडाखा माझ्या डाव्या कानाला ओझरता लागला. मधें च एकानें आपला हात घातला नसता तर त्या तडाख्यानें काय झालें असतें सांगतां येत नाहीं. परंतु जो ओझरता फटका बसला त्यानें माझा आधीं च अधू असलेला कान पूर्ण बहिरा झाला. तिथून मी घरीं आलों तो फार च आनंदांत होतों. मला वाटलें मी देवाच्या दर्शनासाठीं गेलों पण मला देवाचा स्पर्श हि झाला. आमच्या बरोबरची मंडळी आपला अनुभव सांगत होतीं कीं गांधीजी म्हणत 'मनांत राग न येतां मार सहन करतां आला पाहिजे.' म्हणून आम्ही प्रयत्न करीत होतों, परंतु राग येत असे. यावेळीं मात्र आमच्या मनांत सुद्धां राग आला नाहीं. आमच्या बरोबर एक मुलगी होती तिच्या छातीवर असा जोराचा मार बसला कीं तिला १०-१५ दिवस हॉस्पिटलमधें ठेवावें लागलें. मारणारांनीं स्त्री-पुरुष कांहीं न पाहतां बेछूट मारहाण केली. आणि हें सर्व धर्म-रक्षणासाठीं !!

मला मंडळींनीं सांगितलें की पूर्वी या ठिकाणीं म. गांधी आले होते त्यांच्यावर हि असा च हल्ला झाला होता आणि त्यांना मंदिर-प्रवेश मिळाला नव्हता. तेव्हां मला वाटलें कीं फार मोठ्या लोकांच्या मालिकेंत माझी गणना झाली. मी तेवढ्यावर च संतोष मानीत होतों. पण आणखी एकानें आठवण करून दिली कीं गांधींच्या आधीं तीस वर्षे स्वामी दयानंदांवर या च ठिकाणीं प्रहार झाला होता. तेव्हां मीं म्हटलें कीं म. गांधी आणि स्वामी दयानंद यांच्या यादीमध्यें देव माझी गणना करून राहिला आहे हा त्याचा मोठा च वर-प्रसाद माझ्यावर झाला.

## जगन्नाथपुरीचा अनुभव

तिथून पुढें आमची यात्रा ओरिसांत गेली. जगन्नाथ मंदिरांत दर्शनाला जाण्याची माझी इच्छा होती. मूर्तीवर माझी श्रद्धा असल्यामुळें मला देवदर्शनाची इच्छा असते. माझे कांहीं मित्र म्हणतात "कसली तुम्ही मूर्तीवर श्रद्धा ठेवता ? काय हा भोळेपणा ?" मी म्हणतों "होय, माझा भोळेपणा कांहीं जात नाहीं. मूर्तीच्या दर्शनानें माझे डोळे आले होतात. नामदेवाशीं जशी मूर्ति बोलत होती तशी माझ्याशीं हि मूर्ती बोलते असा मला अनुभव येतो.

तुम्हांला एक गंमत सांगतों. धुळ्याला गीतेवर प्रवचनें देत असतां १२ व्या अध्यायांत सगुण-निर्गुण भक्ताचीं लक्षणें सांगतांना मीं म्हटलें कीं भरत हा निर्गुण भक्त होता. रामाची सेवा करण्यासाठीं तो वनांत गेला नाहीं. परंतु अयोध्येंत राहून त्यानें दुरून रामाची भक्ति केली. पुढें प्रवचनांत असें म्हटलें आहे कीं 'एखाद्या चित्रकारानें असें चित्र काढावें कीं दोघे भाऊ भेटत आहेत, दोघांचे हि केस वाढलेले आहेत, दोघे हि तपश्चर्येनें कृश झाले आहेत, शंका येऊन राहिली आहे कीं यांतला जंगलांत गेलेला कोणता आणि अयोध्येला राहिलेला कोणता, एक जरा ठेंगणा आहे त्यावरून च फक्त ओळखतां येतें कीं हा धाकटा भाऊ भरत असावा. असें चित्र किती मधुर होईल !' असा त्या प्रवचनांत उद्गार आहे.

आणि माझ्या मित्रांनो, मी तुम्हांला काय सांगू ? आम्ही जेव्हां प्रथम पवनारला रहायला गेलों तेव्हां आश्रमची शेती खणू लागलों असतां माझ्या

कुदळीला दगड लागला. आसपास खणून पाहिलें परंतु तो खूप च मोठा दगड होता. माझ्यांत कोठलें इतकें बळ ? म्हणून मीं मित्रांना तो दगड काढायला सांगितलें. त्यांनीं तो दगड खणून काढला तर भरत आणि राम यांची एकत्र भेट होत आहे अशा प्रकारचें एक शिल्प कोरलेलें होतें तें. जी वासना १२ व्या अध्यायाच्या प्रवचनाच्या वेळीं १९३२ सालीं धुळ्याच्या जेलमध्यें झाली होती अगदीं तशा च सारखी ही मूर्ति १९४० सालीं पवनारला निघाली. वाकाटकांच्या काळांतली ती आहे असें तज्ञ सांगतात. फार सुंदर मूर्ति आहे. राम भरताला भेटताहेत, लक्ष्मण एका बाजूला उभे आहेत, सीतामाई कौतुकानें पाहते आहे, आणि हनुमान एका कोपऱ्यांत अगदीं लपून उभा आहे, अजून शत्रुघ्न भेटलेला नाहीं. अशी मूर्ति माझ्या हाताला लागल्यावर तिला दगड समजून बाजूला सारण्याइतका मी दगड नाहीं. त्यामुळें माझ्या हातानें त्या मूर्तीची मीं स्थापना केली. मी पवनारला होतों तोंपर्यंत रोज त्या मूर्तीसमोर नाथांचीं भजनें, तुकारामाचीं भजनें इत्यादि मोठ्या प्रेमानें मी म्हणत असे. माझे मित्र म्हणूं लागले " तुम्हीं हें मूर्तिपूजेचें काय वेड सुरू केलें आहे ? या विज्ञानयुगामध्यें तुम्ही ही मूर्तिपूजा कशी चालवितां ? " मीं म्हटलें कीं मी कांहीं मूर्ति स्थापन करायला गेलों नव्हतों कीं एखाद्या शिल्पकाराकडून ती मूर्ति बनवून घेतलेली नव्हती शेत खणत असतांना सापडलेली मूर्ति दूर सारण्याइतकी सद्‌बुद्धि कीं कुबुद्धि कांहीं हि म्हणा मला लाभली नाहीं. हें मीं विस्तारानें एवढ्यासाठीं सांगितलें कीं माझी मूर्तीवरील श्रद्धा कशा प्रकारची आहे तें तुमच्या लक्षांत यावें.

आतां जगन्नाथपुरीची कहाणी. आम्ही देव-दर्शनाला निघालों तेव्हां आमच्या मंडळींमध्यें एक फ्रेंच बाई होती. तिच्यासकट मी देवळांत देवापर्यंत पोंचलों. परंतु पुजाऱ्यानें सांगितलें कीं " फ्रेंचबाईसह तुम्हांला आंत जातां येणार नाहीं " तेव्हां मी परत फिरलों. जगन्नाथपुरीला या विषयावर तीन दिवसपर्यंत माझीं भाषणें झालीं. मीं म्हटलें कीं आपण मंदिरांत हरिजनांना प्रवेश दिला एवढ्यानें भागत नाहीं. ज्याची म्हणून श्रद्धा असेल आणि जो कोणी देव-दर्शनाला येऊं इच्छीत असेल त्या व्यक्तिमात्राला मंदिरांत प्रवेश मिळाला पाहिजे.

भेट/आमंत्रण .............. दि: ..............
क्रमांक ...................... नों. दि. ..............

## गुरु नानकांची आरती

चारशें वर्षांपूर्वीची कथा आहे. गुरु नानक जगन्नाथपुरीला आले होते परंतु त्यांना देवळांत प्रवेश मिळाला नाहीं. तेव्हां त्यांनीं देवळाच्या बाहेर उभे राहून आरती केली. ती शिखांच्या रोजच्या पठणामधें असते आणि रोज रात्रीं निजण्यापूर्वीं शीख लोक ती म्हणत असतात.

**" गगनमें थाल रवि चंद्र दीपक बने, तारका गगन मोती. "**

आकाश ही एक मोठी थाळी आहे, ताट आहे, आणि त्या ताटांत सूर्य-चंद्र या ज्योति लावलेल्या आहेत. अशी एक मोठी विशाल आरती त्या जगन्नाथाची चालली आहे. हा जगन्नाथ देवळांत अडकलेला नसून विशाल गगन-मंदिरांत त्याचा निवास आहे, अशी ती अत्यंत रमणीय आरती आहे.

## तमिळनाडच्या मंदिरांत

नंतर मी तमिळनाडमधें गेलों. तिथें अनेक मंदिरांत माझा प्रवेश झाला होता. कारण त्या वेळीं माझ्याबरोबरच्या मंडळींत इतर धर्माचे लोक नव्हते. माझ्याबरोबर इतर धर्माचे लोक नसले तरी उगीच विचारीत बसायचें कीं " परधर्मियांना देवळांत प्रवेश आहे कां हो ? " असा आग्रह मी राखत नसतों हरिजनांना प्रवेश आहे कीं नाहीं एवढें च पाहत असतों.

## गुरुवायूरच्या मंदिरांत मनाई

पुढें मी केरळमधें गेलों. तिथें गुरुवायूर नांवाचें प्रसिद्ध मंदिर आहे. दक्षिणेकडील तें पंढरपूर च. त्या मंदिरांत हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून केलप्पन यांनीं उपवास सुरू केले होते. पुढें गांधीजींनीं ते उपवास आपल्यावर ओढून घेतले आणि नंतर मंदिर हरिजनांना उघडें झालें. मी गुरुवायूरला गेलों तेव्हां माझ्याबरोबर ख्रिस्ती लोक होते. मीं पुजाऱ्यांना विचारलें कीं ' या ख्रिस्ती माणसांसकट मंदिरांत मला प्रवेश मिळेल काय ? ' पुजारी म्हणाले कीं ' तुम्ही आलांत तर आम्हांला आनंद होईल, न आलांत तर दुःख होईल. परंतु ख्रिस्ती लोकांना आंत येतां येणार नाहीं. ' मीं त्यांना म्हटलें " माझा नाइलाज आहे. माझ्याबरोबरच्या ख्रिस्ती मंडळींना बाहेर ठेवून

मला एकट्याला देवळांत जातां येणार नाहीं, तिथें मला देवाचें दर्शन होणार नाहीं."

या दोन कथा दोन वर्षांच्या अंतरानें झाल्या. म्हणजे दोन वर्षांत या बाबतींत हृदयपालट झाला नाहीं. गुरुवायूरला मला देवळांत जाऊं दिलें नाहीं यावर तेथील वर्तमानपत्रांत बरीच टीका झाली. तेथील प्रचंड लोकमत पुजाऱ्यांविरुद्ध होतें. चार दोन पत्रांनीं मीं असा आग्रह राखणें चूक आहे अशी टीका हि केली होती. परंतु एकूण मुख्य मुख्य वर्तमानपत्रांनीं माझा विचार योग्य होता आणि प्रवेश नाकारणें चूक होतें असें च म्हटलें. तेव्हां मला वाटलें कीं एकूण लोकमत तरी या बाबतींत बरें च पुढें गेलें आहे.

## गोकर्ण महाबळेश्वरांत प्रवेश मिळाला

नंतर आम्ही कर्नाटकांत गेलों. तिथें गोकर्ण महाबळेश्वराच्या मंदिरांत जाण्याचा प्रसंग आला. आमच्या बरोबर शमीम नांवाचा एक अत्यंत भाविक आणि प्रेमळ मनुष्य होता. पुजाऱ्यांना मी विचारलें कीं या मुसलमानासकट मला आंत जातां येईल काय ? पुजारी म्हणाले कीं "तुम्ही त्या मुसलमान बंधूसह जरूर येऊं शकतां" तर ही एक आनंदाची बातमी तुम्हांला कदाचित माहीत नसेल म्हणून सांगितली. गोकर्ण महाबळेश्वर हें लहान सहान तीर्थ नाहीं. पंढरपूरसारखें च तें अखिल भारतीय तीर्थ आहे. तेथें आम्ही मुसलमानबंधूसह प्रवेश केला. पण तो देव बाटला नाहीं.

आणखी अशी च एक घटना आहे. केरळमधील मेलकोटे येथें रामानुजाचार्यांचें एक मंदिर आहे. त्या ठिकाणीं रामानुजाचार्य पंधरा वर्षे राहिले होते. ख्रिस्ती इत्यादि इतर धर्माच्या मंडळींबरोबर त्या मंदिरांत आम्हांला प्रवेश मिळाला होता. रामानुज हे अत्यंत उदार विचाराचे होऊन गेले. कबीर, रामानंद, आणि तुलसीदास, हे सारे रामानुजाचार्यांच्या शिष्य-परंपरेंतील आहेत हें कदाचित तुम्हांला माहीत नसेल. मेलकोटे हें स्थान दक्षिण भागांत प्रसिद्ध आहे.

## माझी मंदिरावर श्रद्धा कां आहे ?

अशा या दोन ठिकाणीं आम्हांला प्रवेश मिळाला होता. महाराष्ट्रांत आल्यानंतर माझें पंढरपूरला येण्याचें ठरलें तेव्हां कांहीं लोकांनीं जाहीर करून दिलें कीं हा आतां पंढरपूरला येणार, आणि ते बाटगे लोक घेऊन देवळांत घुसणार. काय बिचाऱ्यांना माहीत माझी भक्ति ? मला जर तिथें मनाई असेल तर मी कां जाऊं ? तिथें च का देव अडकून पडला आहे ? परंतु मी मूर्तींत हि देव पाहतों आणि देवळांत हि पाहतों. मला जरी पांडुरंगाच्या मंदिरांत प्रवेश मिळाला नाहीं तरी त्या स्थानाविषयींची माझी श्रद्धा कमी होणार नाहीं. माझी श्रद्धा त्या दगडावर एवढ्यासाठीं आहे कीं त्याच्या दर्शनासाठीं असंख्य सत्पुरुष गेलेले आहेत, आणि त्यांनीं आपलें पुण्य त्या ठिकाणीं खर्च केलें आहे. एरवीं तिथें जाऊन काय करायचें ? तुकारामानें म्हटलें आहे,

**" तीर्थी धोंडा पाणी**
**देव रोकडा सज्जनीं "**

तीर्थांत काय आहे ? दगड नि पाणी. देव तर सज्जनांमधें रोकडा आहे. आणि मी तर संतांच्या च भेटी-गाठी घेत फिरतों आहे. असंख्य सत्पुरुषांची मला भेट झाली आहे. माझ्या जीवनांत मला महान् सत्पुरुषांच्या संगतीचा हि लाभ झाला आहे.

## पुंडलीकाचें आमंत्रण

अशा स्थितींत मी जबरदस्तीनें देवळांत कसा जाईन ? सत्याग्रहाची माझी ही रीत नाहीं. जिथें मनाई आहे तिथें श्रद्धा असून जायचें नाहीं हा च माझा सत्याग्रह आहे. परंतु इथें पोंचण्यापूर्वी रस्त्यांतल्या माझ्या एका पडावावर येथील पुंडलीकाच्या मंदिराची मंडळी मला भेटायला आली. त्यानीं सांगितलें कीं " आमच्या देवळांत तुम्ही अवश्य या. तुमच्या परिवारांत अन्य धर्मीय लोक असले तरी ते भक्त आहेत. तेव्हां त्यांना हि घेऊन तुम्हीं यावें अशी आमची फार इच्छा आहे " मीं त्यांना म्हटलें " माझा शब्दावर पूर्ण विश्वास आहे. तरी पण तुम्हीं जें आतां सांगितलें तसें एक

पत्र मला लिहून द्या. कारण वैद्यनाथधामाला तोंडी परवानगी मिळाली होती, पण प्रत्यक्ष गेल्यावर आम्हांला मार बसला होता. म्हणून तुम्ही लेखी पत्र मला द्या." त्याप्रमाणें त्यांनीं लेखी पत्र मला दिलें.

## रुक्मिणी मातेचें आमंत्रण

त्यानंतर दोन दिवसांनीं रुक्मिणी मंदिराचे भक्त माझ्याकडे आले आणि त्यांनीं सांगितलें कीं "रुक्मिणीमातेचें मंदिर तुमच्यासाठीं मोकळें आहे. तुमच्या साऱ्या परिवारासकट तुम्ही या" त्यांना हि मीं सांगितलें कीं रुक्मिणीनें भगवंताला जशी पत्रिका लिहून दिली होती तसें एक पत्र मला हि तुम्ही लिहून द्या." त्यांनीं हि मला लेखी पत्र दिलें.

अशा रीतीनें या दोन ठिकाणांची परवानगी मला मिळाल्यावर मीं म्हटलें "हा विठोबा कोण आहे? हा तर दासांचा दास आहे. तो पुडलीक माझ्या हातांत आल्यानंतर हा विठोबा राहील का बाहेर? आणि इतक्या-ऊपर तो बाहेर राहणार असेल तर त्याला मी काय करूं? पुंडलीकाच्या दर्शनाला मी जाईन. "पुंडलीकाच्या भेटीं परब्रह्म आलें गा" तिथें मला परब्रह्म च दिसेल. पुंडलीकासाठीं च तर पंढरपूर आहे. एरवी त्या पंढरपूरला पुसतो कोण? ही जी देवता आहे ती पुंडलीकानें च इथें आणली आहे"

माझ्या मित्रांनो! पुंडलीकाविषयींची माझी श्रद्धा आणि भक्ति गीताप्रवचनांत पाहून घ्या. दुसऱ्या अध्यायाच्या प्रवचनांत मीं म्हटलें आहे कीं "स्थितप्रज्ञ कोण होऊन गेला तें मी सांगूं शकत नाहीं, परंतु माझ्यापुढें स्थितप्रज्ञाची मूर्ति म्हणून पुंडलीकाची मूर्ति उभी असते." त्या पुंडलीयाची भेट मला होणार असें जेव्हां नक्की ठरलें तेव्हां मीं विनोदानें म्हटलें कीं "ही तर किल्ली च माझ्या हातीं आली आहे. आतां त्या विठ्ठलाच्या मंदिराला लागेना का कुलुप"

## पांडुरंगाचें हि आमंत्रण

आतां तुम्हांला सांगायला मला आनंद वाटतो कीं हें मी बोलत असतांना आतां च माझ्यापाशीं विठ्ठल मंदिराच्या लोकांच्या तर्फे एक चिट्ठी आली आहे. ती तुम्हांला मी वाचून दाखवितों.

" पूज्य श्री संत विनोबाजी,

मातृ-सेवापरायणतेसाठीं विठ्ठलानें स्वत: अवतार घेऊन पावन केलेल्या, ज्ञानेश्वरादि संतपरंपरेमुळें महिमा पावलेल्या, आणि महाराष्ट्राचें धर्मपीठ म्हणून गणल्या गेलेल्या, या पंढरपूर नगरींत आपणांसारख्या महा-संताचें आगमन व्हावें हें आम्ही आमचें महद्भाग्य समजतों. आपल्यासारख्या महा-भागवतास श्री विठ्ठल-दर्शनाची किती उत्सुकता असेल याची कल्पना हि आम्ही करूं शकत नाहीं.

आपल्या परिवारांत कांहीं हिंदु नसलेल्यांचा हि समावेश असल्यानें त्यांच्यासह मंदिरांत येण्यास देवस्थान-पंचांचा कांहीं आक्षेप आहे अशी आशंका आपणांजवळ व्यक्त करण्यांत आल्याचें समजतें. त्यामुळें असा कांहीं विक्षेप असेल तर आपण दर्शनास येणार नाहीं असा हि आपला मनोदय असल्याचें समजलें.

या बाबतींत कांहीं किंतु राहूं नये म्हणून आम्ही आपल्या चरणीं हें नम्र निवेदन करीत आहोंत. खालीं सही करणारे आम्ही पांच जण श्रीविठ्ठल देवस्थानचे पंच आहोंत. आम्हां पांच लोकांची पंचकमिटी आहे व कायद्यानें देवस्थानासंबंधीं सर्व अधिकार आम्हांस आहेत. आम्ही सर्व पंच आपणांस ग्वाही देऊं इच्छितों कीं आपण आपल्या सर्व परिवारासह श्रीविठ्ठल-दर्शनास आल्यास आमची कांहीं हि हरकत नाहीं. इतकें च नव्हे तर आपल्या आगमनाचें आम्ही सर्व पंच देवस्थानच्या वतीनें मनोभावानें स्वागत करूं व कृतार्थ होऊं.

आपले नम्र

१ भगवान पंढरिनाथ बडवे, चेअरमन
२ विठ्ठल एकनाथ बडवे
३ हरि पांडुरंग बडवे
४ विठ्ठल गेहनीनाथ बडवे

या चिठ्ठीत पांचवी सही नव्हती, कारण त्या वेळीं ते हजर नव्हते. त्यांनीं स्वतंत्र चिठ्ठी लिहून आपली सही पाठविली आहे.

## माझें हृदय विरघळलें

माझ्या मित्रांनो ! हें सबंध पत्रक वाचून माझें हृदय विरघळून गेलें. तुम्हीं पंढरपूरकरांनी आणि या बडवे मंडळींनीं मला पूर्ण जिंकून घेतलें. तुम्हीं मला तुमचे गुलाम करून घेतलें. या पत्रकांतला एक च शब्द मला सुधारायचा आहे. त्यांनीं मला जें ' महासंत ' आणि ' महाभागवत ' म्हटलें आहे तें खरें नाहीं. इच्छा माझी अवश्य अशी आहे की परमेश्वराच्या चरणा-पाशीं च मीं भेटावें आणि या देहानंतर दुसरी गति मला मिळूं नय. त्या तळमळीनें च माझें सबध काम चाललें आहे. हें भूदान ग्रामदान देखील परमेश्वराच्या सेवेशिवाय दुसऱ्या कोणत्या हि इच्छेनें मी करीत नाहीं. इतकें सगळें असलें तरी मी महाभागवत नव्हे, महासंत नव्हे. मला पामराला ही पदवी शोभत नाहीं.

तेव्हां आतां तुम्हां सगळ्यांच्या आशीर्वादानें आणि या वैष्ण-वांच्या भक्तिप्रेमाला वश होऊन उद्यां सकाळीं साडेचार वाजतां माझ्या स्थानाहून मी निघेन आणि पुंडलीकाचें मंदिर, रुक्मिणीमातेचें मंदिर, आणि भगवंताचें मंदिर, या तिन्ही ठिकाणीं जाऊन मी परमेश्वराची भेट घेईन.

## मी हा आग्रह कां राखतों ?

माझ्या मित्रांनो, अधिक सांगायची गरज नाहीं आणि अधिक सांगा-यची मला शक्ति हि नाहीं. पण एक गोष्ट सांगतों. हा जो मी आग्रह राखतों तो जर न राखला तर जगामधें हिंदु धर्माची पत जाईल. मुसल-मानांच्या मंदिरांत, ख्रिस्त्यांच्या चर्चमधें, शीखांच्या गुरुद्वारामधें अत्यंत प्रेमानें त्या मंडळींनीं माझें स्वागत केलेलें आहे. अजमीरला मुसलमानांचा सर्वांत मोठा दरगा भरतो. अजमीर हें हिंदुस्थानचें मक्का मानलें जातें. १९४८ साली मी त्या ठिकाणीं गेलों होतों आणि दहा हजार मुसलमानांच्या मेळाव्यामधें बसून " **स्थितप्रज्ञस्य का भाषा** " ही आमची प्रार्थना आम्हीं तिथें म्हटलीं. त्यानंतर त्यांच्या नमाजमधें मी हि सामील झालों. नमाज संपल्यावर त्यांच्या रिवाजाप्रमाणें नमाजमधें हजर असलेल्या सर्व मुसल-

मानांनी माझ्या हाताचें चुंबन घेतलें. या कार्यक्रमात सुमारे तास सव्वा तास गेला. इतकें त्यांचें प्रेम मला मिळालें आहे. ज्या माणसाच्या हृदयामधें प्रेम च भरलेलें आहे त्याच्यावर कोण प्रेम करणार नाहीं ?

ही जपानची प्रेमी मंडळी माझ्या बरोबर आहेत. ते बौद्ध आहेत. बौद्धांच्या प्रेमामुळें गयेला मीं समन्वयाश्रम काढला. त्यावेळीं मी जाहीर केलें कीं मला वेदान्त आणि बौद्ध धर्म यांचा समन्वय करायचा आहे. आणि बौद्ध लोक मोठ्या प्रेमानें म्हणतात की बाबाची यात्रा म्हणजे बुद्धानें चालविलेलें धर्म-चक्र-प्रवर्तन च आहे.

अशा रीतीनें मला बौद्धांचा आशीर्वाद मिळाला आहे, हिंदूंचा तर आहे च आहे. आणि मी केरळमधें गेलों होतों तिथें निरनिराळ्या पंथाचे चार चर्चेस आहेत. त्या चारी चर्चेसच्या प्रमुखांनीं पत्रक काढून जाहीर केलें कीं विनोबा जें काम करीत आहेत तें येशू ख्रिस्ताचें काम आहे ; आणि म्हणून सगळ्या ख्रिस्ती लोकांनीं विनोबाच्या कामांत सहकार केला पाहिजे.

अशा तऱ्हेनें तुमच्या धर्मांतल्या एका माणसाचें स्वागत बाकीच्या सगळ्या धर्मांतले लोक करीत असतांना मी कोणत्या तोंडानें म्हणू कीं या मंदिरांत मी एकटा च जातों ? ज्याला आंत जायची इच्छा नाहीं तो कशाला जाईल तिथें ? परंतु ज्याला भक्ति आहे, भाव आहे त्याला ' तूं परधर्मीय म्हणून मंदिरांत येऊं नकोस ' असें म्हणणें कसें योग्य होईल ? पंढरपूरवाल्यांना कबीराचें नांव माहीत च आहे तुकारामानें म्हटलें आहे ना ? " कबीराचे मागीं विणूं लागे शेले, मूल उठविलें कुंभाराचें " असे अभंग तुम्ही गातां कीं नाहीं ? तो कबीर कोण होता ? मुसलमान होता ना ? तुकारामानें लिहून ठेवलें आहे कीं मला चार खेळगडी, सोबती, लाभले आहेत. कोणते ते ? ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ आणि कबीर. मग आतां मुसलमान इत्यादि माझ्याबरोबर असतांना त्याना सोडून मी एकटा देवळांत कसा जाऊ ? बौद्धाना प्रवेश नाहीं, ख्रिस्त्यांना प्रवेश नाहीं, मुसलमानांना नाही, असें जर झालें तर माझें एकट्याचें तिथें जाणें शोभेल काय ? आणि त्यानें हिंदु धर्माची प्रतिष्ठा वाढेल काय ?

अनेक परदेशी लोक भारतांत येत असतात. हिंदुस्थानांत एक फार मोठी धर्मज्योति प्रगट होऊन राहिली आहे आणि तिची जगाला आज गरज आहे या भावनेनें हे लोक भारतांत येतात. आणि माझ्या पदयात्रेबरोबर हि राहतात. त्यांना सोडून मी एकटा कसा जाऊं? माझें जीवन आक्रमक नाहीं. मी कोणावर आक्रमण करीत नाहीं. तें माझ्या शीलांत नाहीं. ती अहिंसा नव्हे, ती संतांची शिकवण नव्हे.

आज मला फार मोठा आनंद झाला आहे. परमेश्वरानें मला आमंत्रण च दिलें आहे तर मी तळमळीनें जाऊन उद्यां विठोबाचें दर्शन घेईन.

**पंढरपूर,**
२८-५-५८

## महाराष्ट्राची पदयात्रा सुफलित झाली : २५ :

[ ठरल्याप्रमाणें ता. २९-५ ला पहांटे ४।। वाजतां विनोबा पांडुरंगाच्या दर्शनार्थ निघाले. तो एकादशीचा पवित्र दिवस होता. प्रथम ते गाडगे महाराजांच्या मठांत गेले. तेथें " देवकीनंदन गोपाळा " हा जयघोष चालला होता. शिष्य मंडळींनीं विनोबांना सहस्रकोटि नामजपाचें भांडार दाखविलें. जमलेल्या मंडळींना उद्देशून विनोबा म्हणाले ]

### गाडगे महाराजांच्या धर्मशाळेंत

" या ठिकाणी सहस्रकोटि नामाचा जप झाला आणि ज्याच्या त्याच्या आवडीचें नांव ज्यानें त्यानें घेतलें तें पाहून फार आनंद झाला. नाम-स्मरणाची खुबीच ही आहे कीं त्यांत आग्रह नसतो. तुकारामाला स्वप्नांत एक गुरु भेटला व त्यांनीं मंत्र दिला. तुकारामबुवा एका अभंगांत सांगतात '**आवडीचा मंत्र सांगितला सोपा**' गुरु कोणाला अडचणींत टाकीत नाहींत. ज्याची जी आवड असेल तो मंत्र त्याला देतात. ' माझी एक आवड आहे. व हे शिष्यांनो ! तुम्हांला तो च मंत्र घेतला पाहिजे ' असें जर तो म्हणेल तर तो गुरु न राहतां लघु बनेल.

या ठिकाणीं जें नामाचें भांडार आहे त्यांत सगळीं नामें आहेत आणि प्रत्येकानें आपापल्या आवडीचें नांव घेतलें आहे म्हणून ही एक फार मधुर गोष्ट झाली आहे. ही एक मोठी बँक आहे. येथें शक्ति सांठविली आहे. हें पाहून मी विचार करूं लागलों कीं सहस्रकोटि नामजप आम्हीं हिंदुस्थान-भर वांटून दिला तर छत्तीस कोटि लोकांत प्रत्येकाच्या वांट्याला तीस पस्तीस नांवें येणार आणि तेवढीं घ्यायचीं म्हटलें तर अर्ध्या मिनिटांत काम समाप्त होईल. समजा सबंध हिंदुस्थानांत असें ठरविलें कीं उद्यां सकाळीं आठ वाजतां अर्धा मिनिट जप करायचा तर अर्ध्या मिनिटांत एवढा सगळा पुरुषार्थ होईल. त्यावरून वांटून खाण्यांतलें गणित कसें असतें तें पहा.

पुष्कळदां लोक म्हणतात, जमीन, संपत्ति वांटून घेण्यानें दारिद्र्याचेंच वांटप होईल. तो कांहीं समाजवाद म्हणजे ऐश्वर्याचें वांटप होणार नाहीं. वास्तविक वांटून खाण्यानें च सुख वाढतें आणि दुःख कमी होतें. सगळी-कडे मी हें च सांगतों. परंतु गाडगे महाराजांच्या शिष्यांनीं सबंध हिंदुस्था-नांत एवढा मोठा पराक्रम केला, लोकांना नाम-स्मरणाचा महिमा सांगितला व सहस्र कोटि नामाचें भांडार उभें केलें. आणि मी तर फक्त पांच कोटि जमीन च मागतों. मग एवढें अल्प कार्य त्यांनी कां हातीं घेऊं नये ? गाडगे-महाराजांनीं गरिबांची सेवा नाना तऱ्हेनें केली. धर्मशाळा बांधल्या पाणपोया घातल्या. एवढें मोठें काम ज्यांनीं केलें ते पांच कोटि एकर जमीन मिळवि-ण्याचें काम सहज करूं शकतील. तेव्हां तुम्ही असें ठरवा कीं गांवोगांव जाऊन जमीन मागूं आणि ती वांटून टाकूं. म्हणजे भजनांत गोडी येईल.

## सर्वांत श्रेष्ठ दानें : भूदान, विद्यादान

काल तनपुरे महाराजांच्या मठांत भुकेल्यांना खायला घातलें. तें एक मोठें पुण्य च मानलें जातें. पण सकाळीं खायला घातलें तरी संध्याकाळीं पुन्हां भूक लागते च. म्हणून शास्त्रांत सांगितलें आहे कीं असें दान द्यावें जें एकदां दिल्यानंतर पुन्हां मागावें लागणार नाहीं. म्हणून भूमिदान व विद्या-दान हीं दोन श्रेष्ठ दानें मानलीं गेलीं. एकदां विद्या दिली कीं मग तो माणूस आपल्या अकलेनें काम करूं शकतो. तसें च एकदां भूमिदान दिलें कीं मग तो माणूस त्यांत मेहनत करून जन्मभर आपलें व आपल्या कुटुंबाचें

पोट भरूं शकतो. म्हणून गाडगे महाराजांच्या शिष्यांनीं हें भूमिदानाचें काम उचलावें. या कार्याला ते अगदीं योग्य आहेत. या कामासाठीं पायांत बळ लागतें, अंतःकरणांत निर्मळता लागते आणि वाणी रसाळ लागते. **अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ पायाचा शाबूत** असला म्हणजे हें काम होतें. हे लोक गांवोगांव फिरणारे आहेत च तेव्हां यांना वेठीस धरावें असें माझ्या मनांत आलें. पण ही कांहीं वेठ नाहीं, कीं जबरदस्ती नाहीं. यांत प्रेमानें यायचें असतें म्हणून गाडगे महाराजांच्या शिष्यांनीं नामस्मरणाबरोबर भूदानाचा कार्यक्रम उचलावा अशी माझी त्यांच्या चरणीं दोन्ही हात आणि मस्तक जोडून प्रार्थना आहे.

लोकांना नेसायला फाटकें मिळूं नये धड मिळावें म्हणून गाडगे महाराज चिंध्या नेसत, लोकांना पुरेसें खायला मिळावें म्हणून ते थोडें खात, लोकांनीं स्वच्छ रहावें म्हणून ते घाण साफ करीत. तेव्हां त्यांच्या शिष्यांनीं भूदानचें काम कां न करावें ? आजपर्यंत केलें नाहीं याचें कारण हें च कीं आजपर्यंत मी येथें आलों नव्हतों. आतां आलों आहे आणि तुम्हांला प्रार्थना करतों आहे. तुम्ही जर हें कार्य एक मिशन, धर्मकार्य समजून कराल तर तें चारीबाजूला पसरेल. तुम्हीं लोकांनीं नामस्मरणाविषयीं लोकांना फक्त सांगितलें च नाहीं तर त्यांच्याकडून लिहून हि घेतलें. त्या च प्रमाणें तुम्ही भूदान ग्रामदानाचा फक्त प्रचारच करायचा नाहीं तर दानपत्रें घेऊन जमीन वांटून प्राप्तीपत्रें हि लिहून घ्यावीं. परमेश्वर तुम्हांला हें कार्य करण्याची प्रेरणा देवो अशी माझी प्रार्थना आहे "

[ शेजारीं एका मंडपांत हजार स्त्रिया रांगेनें बसून बाळकृष्णाच्या मूर्तीची तुळशीपत्र वाहून पूजा करीत होत्या व मुखानें नामजप करीत होत्या. तें मंगल दृश्य पाहून विनोबाजी त्यांना उद्देशून म्हणाले ]

" हिंदुस्थानांत जर धर्म कुणी राखला असेल तर तो स्त्रियांनींच राखला आहे. आज धर्म-श्रद्धेवर चारी बाजूनें जोरदार प्रहार होत असून हि आमच्या लोकांनीं श्रद्धा राखली आहे. पण नुसती श्रद्धा ही आंधळ्या गरुडाप्रमाणें असते. पंख असून हि तो उडूं शकत नाहीं. म्हणून श्रद्धे-

बरोबर ज्ञान हि हवें. ज्ञान जीवनांत उतरलें पाहिजे आणि त्यायोगें आपलें जीवन बदललें पाहिजे."

[ तेथून विनोबाजी पुंडलीकाच्या मंदिराकडे निघाले. चंद्रभागेच्या तीरीं सूर्योदयाच्या सुमारास विनोबाजींनीं पुंडलीकाच्या मंदिरांत प्रवेश केला. शेंकडोंच्या उत्सुक जमावानें त्यांचें स्वागत केलें. महाभक्ताच्या चरणीं प्रणाम करून भरलेल्या हृदयानें विनोबाजींनीं उपस्थित जमावासमोर चार शब्द सांगितले. प्रत्येक शब्द भावभक्तीच्या आसवांनीं भिजलेला होता. मधून मधून शब्द लोपत आसवें ओघळत. ]

## पुंडलिकाच्या मंदिरांत

"आतांचा प्रसंग बोलण्याचा नाहीं आणि मी अधिक बोलूं हि शकणार नाहीं. 'प्रह्लाद नारद पराशर पुंडरीक' इत्यादि भक्तनाम-माला सबंध भारतांत गाइली जाते परंतु महाराष्ट्रापुरतें बोलायचें झाल्यास पुंडलीकाचें नांव कदाचित् पहिलें येईल. अनासक्तीचें उत्तम उदाहरण म्हणून पुंडलिकाचा आदर्श डोळ्यापुढें ठेवावा, असें मीं गीता-प्रवचनाच्या दुसऱ्या अध्यायांत प्रतिपादन केलें आहे तें पुस्तक सबंध हिंदुस्थानभर पसरलें असल्यामुळें निरनिराळ्या प्रांतांतील लोक मला विचारतात कीं, पुंडलीकाचें सबंध चरित्र कोठें आहे काय? मी त्यांना सांगतों कीं पुंडलीक हा कोणी बाहेर राहणारा भक्त नाहीं. उपनिषदांत म्हटल्याप्रमाणें तो हृदय-पुंडरिकांत राहत असतो. त्याची माहिती आपल्याला हृदयांत च मिळायला पाहिजे. हृदय शुद्ध झालें म्हणजे तिथें पुंडलिकाचें दर्शन होईल. यापेक्षां त्याच्याविषयीं अधिक माहिती मला नाहीं. त्याच्या मातृपितृभक्तीची लोकांमध्ये जेवढी माहिती आहे तेवढी मीं गीता-प्रवचनांत अनासक्तीचें उदाहरण म्हणून दिली च आहे. "**पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा**" हा घोष सबंध महाराष्ट्रांत चालला आहे.

आईबापांची सेवा, दुःखितांची दलितांची सेवा, ही परमेश्वराची सेवा होऊं शकते अशा भावनेनें केली तर फार मोठी सेवा ठरते. तुम्ही मंडळींनीं मला पुंडलीकाच्या दर्शनासाठीं येऊं दिलें याबद्दल मला फार आनंद होत आहे.

## भागवत धर्माचा उदारपणा

मला येऊं देण्यांत कांहीं अडचण नव्हती, पण माझ्या बरोबर इतर धर्मीतील मंडळी असतात भाविक मंडळींमध्यें 'हा कोणत्या धर्माचा' असें बघणें ही भागवत धर्माची रीत नव्हे. हिंदुस्थानांत जेवढे वैष्णव संप्रदाय झाले त्या सगळ्यांनीं उच्च-नीचता, जाति भेद, धर्मभेद इत्यादींवर प्रहार च केला आहे. आणि या विठ्ठल सप्रदायांत तर "**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ** ' असें म्हटलें आहे. कबीर, चोखामेळा, सजनकसाई, शेख महंमद वाणी तेली, कुंभार, चांभार, सुतार, लोहार, इत्यादि सर्व धर्माचे व जातीचे लोक वैष्णव संप्रदायांत आहेत. आणि आतांपर्यंत जे आले नसतील असें आणखीसुद्धां यायला पाहिजेत. "**यारे यारे लहान थोर । भलते याती नारीनर**" असें तुकारामानें म्हटलें आहे. शेंवटीं तर "वेश्यांनो तुम्ही हि या" असें त्यानें म्हटलें आहे. केवढी ही मनाची उदारता ! वेश्येला विचारीला इतर सोंवळ्या जगांत जागा नसेल पण पतितपावनापुढें जर तिला जागा नसेल तर "**तिनें जावें कवणा ठाया ?**"

## पांडुरंग म्हणजे बौद्ध मुनि

भगवान् गौतम बुद्धांनी अंबापाली नांवाच्या वेश्येचा उद्धार केल्याची गोष्ट बौद्ध लोक फार आदरानें सांगत असतात. हा विठोबा कोण आहे ? "**कलीलागीं झाला असे बौद्ध मौनी**" विठोबा हा मौनी बौद्ध आहे, म्हणजे बुद्धावतार याच्या ठिकाणी गुप्त रूपानें राहतो. तो कृष्ण आहे पण त्याच्या पोटांत बुद्ध मावतो. असा हा पांडुरंग बुद्धाला पोटांत घालून इथें उभा आहे. आजकाल हरिजन बौद्ध होत आहेत. पण ज्या देवतेनें बुद्धाला च पोटांत घातलें ती देवता त्यांना हि पोटांत घ्यायला तयार आहे. तेव्हां हरिजनांना म्हणायला हवें की तुम्ही इथें बुद्धाची गाणीं गात या. आपण 'राम कृष्ण हरि' म्हणतों. त्यांतील 'हरि' हा सर्वांचा भ्रम हरण करणारा आहे. म्हणून त्यांत गौतम बुद्ध हि येऊन गेला. तेव्हां 'राम कृष्ण हरि'चा अर्थ "राम कृष्ण बुद्ध" असा समजावा.



पुंडलीकाच्या भेटीनंतर पुंडलीकाच्या मंदिरांत भाषण देतांना



रुक्मिणी मातेची भेट



पांडुरंगाची भेट

म्हणून तुम्ही सारे बौद्ध, या बौद्ध मुनीच्या दर्शनाला या. इथें धम्मपद वाचा. आमच्या वारकरी संप्रदायांत तुमचीं बुद्धाचीं नवीन गाणीं शिकायला आम्ही तयार आहोंत. अशा रीतीनें तुकारामाचा विचार सगळीकडे पसरायला पाहिजे.

दुसऱ्या देशांतील लोक भूदान- ग्रामदान पाहण्यासाठीं प्रेमानें, मोठ्या भक्तिभावानें, आणि कांहीं तर मदत करण्यासाठीं म्हणून येथें आले, तर त्यांना पर-धर्माचे म्हणून देवाचें दर्शन घ्यायला येऊं न देणें हें किती संकुचितपणाचें आहे ?

मला फार आनंद झाला कीं असा संकुचितपणा तुम्हीं केला नाहीं व त्यांना दर्शन घ्यायला येऊं दिलें. मीं म्हटलें कीं मला एका पुंडलीकाच्या दर्शनाचा लाभ झाला तर दुसऱ्या कशाची हि पर्वा नाहीं. पुंडलीकानें देवदर्शनाची पर्वा केली नाहीं, आणि देवासाठीं वीट भिरकावून दिली. तर जो देव त्याच्यासाठीं वाट पाहत उभा राहिला आहे, तो देव माझ्यासाठीं हि वाट पाहील. म्हणून मी पुडलीकाच्या दर्शनानें च संतुष्ट झालों आहे."

**पंढरपूर**, ता. २९-५-५८ सकाळ

[ पुडलीकाचें दर्शन घेऊन विनोबाजी महाद्वार घाटानें मंदिराकडे निघाले. महाद्वार असंख्य स्त्री-पुरुषांनीं नुसतें फुलून गेलें होतें. एक भगवत्भक्त विठ्ठलाच्या दर्शनाकरतां जात होता. पुंडलीकाचें दर्शन घेऊन तृप्त झालेला व डोळ्यांतून अश्रूंचा अभिषेक करीत चाललेला तो वैष्णव व त्याचा मेळावा पाहून मन हेलावून जात होतें.

विठ्ठल मंदिराच्या समोर च संत चोखोबाची छत्री आहे. विनोबांनीं या संताचें दर्शन घेतलें. मंदिराच्या पहिल्या च पायरीवर संत नामदेव आहे. विनोबाजी त्याला हि भेटले आणि मोठ्या उत्कंठेनें मंदिरांत गेले.

अगदीं निःसंग निरामय होऊन गेले. बरोबर कोण आहेत, कोण नाहींत याचें त्यांना भान हि नव्हतें. त्यांना एका विठ्ठलाचा च वेध लागला होता. या वेळीं लोकांची गर्दी हटविण्यांत आली. पांडुरंगाचा गाभारा मोकळा

करण्यांत आला आणि विनोबाजींनीं विठ्ठलाला आलिंगन दिलें. अंतरात्म्याला परमात्म्याची ज्योत मिळाली. ते क्षणभर स्तब्ध झाले. डोळ्यावाटें झरणाऱ्या अश्रुजलानें त्यांनीं विठ्ठलाला अभिषेक केला.

विठ्ठलाच्या मूर्तीला त्यांनीं हार घातला. क्षणभर तें सांवळें रूप डोळे भरून पाहिलें. चंदनाचें गंध लावून आणि प्रसाद घेऊन गाभाऱ्यांतून बाहेर आल्यावर हि परत एकवार विठ्ठलाची मूर्ति त्यांनीं न्याहाळली. त्यांच्या-बरोबर असलेल्या हेमा (जर्मन) फातिमा आदि सर्व धर्मीय मंडळींना हि बडवे मंडळींनीं पादस्पर्शपूर्वक दर्शन घ्यायला लावलें.

नंतर विनोबाजी रुक्मिणीमातेच्या मंदिरांत गेले. तेथें हि ते थोडा वेळ मूर्ति पाहत उभे राहिले. नंतर बाहेरच्या सभामंडपांत आले, सारे वातावरण मांगल्याच्या, विशालतेच्या, व पावित्र्याच्या भावनेनें भरून गेलें होतें. रुक्मिणीमातेसमोर बसून विनोबाजी थोडा वेळ बोलले, ते म्हणाले ]

"आपल्या या महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायामधें आदिपुरुष म्हणून निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, इत्यादि फार थोर नांवें सगळयांच्या परिचयाचीं आहेत. त्या संप्रदायांतील शेंवटचा महापुरुष माझ्या दृष्टीनें साने गुरुजी होत. त्यांनीं दीक्षा घेतली होती कीं नाहीं मला माहीत नाहीं. परंतु अशा महापुरुषांना दीक्षेची गरज नसते. परंतु भगवत्दर्शनाची लालसा धरून, आणि मला एकटयाला च मुक्ति मिळाली तरी चालेल, अशी कल्पना न करता, सर्वांना घेऊन मी भगवत्दर्शन करीन अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली. ती प्रतिज्ञा त्यांनीं जीवनावर उदार होऊन पूर्ण केली आणि पंढरपूरचा देव व देऊळ सगळयांना उघडून दिलें.

## पंचवर्णासाठीं पांचजन्य

आज इथें जी घटना घडत आहे ती सबंध हिंदुस्थानच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं अंकित होण्यासारखी आहे. आज इथें तुम्ही हिंदु धर्माचें खरें रूप प्रकट केलें. भगवंतांनीं पांचजन्य शंख फुंकला असें गीतेंत वर्णन आहे. तो पांचजन्य मधें लोपला होता. आतां पुन्हां प्रगट होत आहे. हिंदु धर्मांत

संकुचिततेला यत्किंचित् हि वाव नाहीं हें आज इथें सिद्ध झालें. तुकारामानें म्हटलें आहे :

> ‘रक्त, श्वेत, कृष्ण, पीत, प्रभा भिन्न
> चिन्मयांजन सुदलें डोळां ’

तांबडें, पांढरें काळें, आणि पिवळें यांहून भिन्न एक सांवळें रूप आहे, तें माझ्या डोळ्यांत अजनरूपानें आहे, असें तुकाराम म्हणतो. या पांच वर्णांची प्रजा म्हणजे सबंध विश्वांतली प्रजा. पिवळी प्रजा म्हणजे चीन-जपानची, तांबडी प्रजा म्हणजे रेड इंडियन्स, काळी प्रजा म्हणजे शिद्दी-हबशी, पांढरी प्रजा म्हणजे युरोपांतील लोक, आणि सांवळी प्रजा म्हणजे हिंदुस्थानांतील लोक, हे पंचवर्ण आहेत. या पांचांपैकीं प्रत्येकासाठीं आमचे विचार मोकळें आहेत. ते सगळ्या जगभर पसरले पाहिजेत आणि जगांतले सगळे विचार इथें यायला पाहिजेत अशी तुम्ही आज प्रतिज्ञा केलीत.

## मराठींतील धर्मग्रंथ ज्ञानेश्वरी

पण हें कांहीं नवीन नाहीं. ज्ञानदेवानें ज्ञानेश्वरींत जें म्हटलें आहे तें च आम्हीं आज सातशें वर्षांनंतर केलें आहे. ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरी लिहितांना ‘मी भक्तीचा ग्रंथ लिहीत आहें’ असें नाहीं म्हटलें. ज्ञानेश्वरींत भक्ति, ज्ञान, योग, गुणविकास, ध्यान, इत्यादि सर्व च आहे. परंतु ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे :

> “किंबहुना तुमचें केलें । धर्मकीर्तन सिद्धी नेलें ।
> येथें माझें जें उरलें । पाईकपण ॥

भगवंताच्या व गुरूच्या कृपेनें मी धर्म-कीर्तन केलें आहे, मी तुमचा सेवक उरलों आहे, असें ज्ञानदेव म्हणतो. महाराष्ट्राला, मराठी भाषेला, धर्म-ग्रंथ आहे काय ? असें कोणी विचारलें तर “आमचे सर्व धर्मग्रंथ संस्कृतांत च आहेत” असें नका म्हणूं. संस्कृतांत तर ते आहेत च. परंतु मराठींत ज्ञानदेवानें एक धर्मग्रंथ प्रगट केला आहे, तो ज्ञानेश्वरी आहे. त्या धर्मग्रंथाला यत्किंचित् भेद सहन होईल काय ? ज्ञानदेवांनीं आपला ग्रंथ कोणत्या देवाला अर्पण केला आहे पहा.

"आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें

ज्ञानदेवांच्या तोंडून लहान शब्द निघाला नाहीं. ते म्हणतात या 'वाग्यज्ञानें' 'विश्वात्मक' देवाची मी पूजा करीत आहें.

## विश्व-मानुष:

भगवान् कृष्णाला आम्ही केवळ हिंदुधर्माचे गुरु म्हणत नाहीं तर 'कृष्णं वंदे जगद्गुरुं' असें म्हणतों. आमची इतकी विशाल, व्यापक दृष्टि कोणत्या काळांत होती ? तर ज्या काळांत जगांत कुठें काय आहे तें आम्हांला माहीत हि नव्हतें. कंकद्वीप, नवद्वीप, इत्यादि कल्पना आम्ही करीत असूं. परंतु आज तर एखाद्या पोराला हि जगाच्या भूगोलाचें ज्ञान आहे. पूर्वींच्या काळीं हें ज्ञान नसतां हि वैदिक धर्माच्या लोकांनीं 'विश्व-सेवका' ची भूमिका घेतली. ऋग्वेद हा जगांतील आदि ग्रंथ मानला जातो. त्या ग्रंथांत 'विश्वमानुष' हा सुंदर शब्द मला सांपडला. ही च तर आमची खरी दौलत. ही दौलत साऱ्या जगभर लुटविली पाहिजे. हें च आमचें कार्य आहे. मध्यंतरी आम्ही हें विसरलों होतों. या प्रसंगानें तुम्ही हिंदुस्थानला व्यापक विश्वधर्माकडे नेणार आहांत.

## नास्तिकतेचा अर्थ

मुसलमान, ख्रिस्ती इत्यादि सगळे आस्तिक धर्म आहेत. या सगळ्या आस्तिकांनीं नास्तिकता काढून टाकली पाहिजे. नास्तिकता म्हणजे काय तें समजून घ्या. 'देव नाहीं असें म्हणणारा तो नास्तिक' अशी संकुचित व्याख्या आपल्या धर्मांत नाहीं. देव हा शब्दापलीकडे आहे. तेव्हां नास्तिक म्हणजे ज्याच्यांत दंभ, क्रोध, दर्प वगैरे आहेत तो.

## तुकारामाचीं अद्भुत् वचनें

परमेश्वर आहे म्हणायचें कीं नाहीं म्हणायचें याविषयीं तुकारामाचें एक फार मजेदार वाक्य आहे. तसें वाक्य क्वचित् च दुसरीकडे पहायला सांपडेल. तो म्हणतो,

'आहे ऐसा देव वदवावी वाणी
नाहीं ऐसा मनीं अनुभवावा'

देव आहे असें वाणीनें म्हणावें, आणि देव नाहीं असें मनांत अनुभवावें. यापुढें कोणतें तत्त्वज्ञान काय बोलणार ? तत्त्वज्ञान म्हणतें कीं भक्तीचे दोन प्रकार आहेत. आम्ही 'अस्ति' रूपानें भगवंताची भक्ति करतों, त्याप्रमाणें 'नास्ति' रूपानें हि करतों. गीतेंत तर म्हटलें आहे "तूं सत् आहेस, असत् आहेस, आणि दोहोंच्या पलीकडे आहेस" तेव्हां अस्ति-नास्ति हे सारे भेद आमच्या पोटांत मावतात.

तुकारामाचा आणखी एक मंत्र आहे. त्याच्या बिनशिकलेल्या वाणींत काय काय आहे बघा,

**'तुका म्हणे जें जें बोला**
**तें तें साजें या विठ्ठला'**

यापेक्षां अधिक उदारता कोणती असेल ? इतका महोदार, महान्, वैदिक धर्म, विश्वधर्म, भागवत धर्म, इथें प्रगट झाला.

तुम्हीं आज माझ्यावर फार च मोठा उपकार केला आहे. इतका उपकार आतांपर्यंत माझ्यावर कोणीं च केला नाहीं.

**पंढरपूर,** ता. २९-५-५८

## नैतिक शस्त्रागार मजबूत करण्याची घटना

आज सकाळीं जें दृश्य मी पाहिलें त्याचें सबध जन्मांत मला विस्मरण होणार नाहीं. इतका खोल ठसा माझ्या हृदयावर त्याचा उमटला तिथें विठोबाच्या चरणासमोर उभे असतांना मला जो अनुभव आला तो मी शब्दांत मांडूं शकणार नाहीं, आणि म्हणून तो प्रयत्न मी सोडून देतों.

तिथल्या व्याख्यानांत मीं सांगितलें कीं आज मला जें दान मिळालें आणि जो उपकार आज माझ्यावर झाला त्याहून अधिक श्रेष्ठ दान आणि अधिक उपकार आजपर्यंत कोणी माझ्यावर केला नाहीं. अजून महाराष्ट्रांत चार महिने माझी यात्रा चालणार आहे. तेवढ्यांत मला कोणी किती हि जमीन देवो अथवा न देवो, कोणी मला ग्रामदान देवो अगर न देवो, पण आज मला जें दान दिलें तें देऊन महाराष्ट्रानें अधिकांत अधिक जें देणें शक्य होतें तें मला देऊन टाकलेलें आहे. ही जी घटना आज घडली ती माझ्या दृष्टीनें सर्वोदयाच्या इतिहासामधें अपूर्व घटना आहे. आज ते एम्. आर. ए. वाले माझ्याकडे आले होते त्यांना मीं सांगितलें की आज पंढरपूरवासियांनीं नैतिक शस्त्रागार फार मजबूत केलें आहे. मीं त्यांना हें हि सांगितलें कीं कशा रीतीनें ख्रिस्ती, जैन, पारसी आणि मुसलमान इत्यादि मित्रांसकट विठोबाच्या चरणाचें दर्शन आम्हां सर्वांना लाभलें. हें ऐकून त्यांना फार आनंद झाला व ते म्हणाले 'निःसंशय च ही नैतिक शस्त्रागार मजबूत करणारी घटना आहे.'

## भारताचें मिशन

भारताची एक परंपरा आहे आणि त्या परंपरेनें भारताला आज एक मिशन आहे. विश्व-जीवनामधें भारताला जें कर्तव्य पार पाडायचें आहे त्यासाठीं त्याला सामर्थ्य हवें आहे. आजच्यासारख्या घटनांनीं त्याला तें सामर्थ्य येणार आहे. अनेक जमाती अनेक पंथ अनेक भाषा बाहेरून भारतांत आल्या. त्यांना भारतानें आत्मसात केलें आणि त्यांचें भरण केलें म्हणून

भारत हा देश सार्थनाम झाला आहे. म्हणून मी म्हणत असतों की 'जय-हिंद' किंवा 'जय-जगत्' हा उद्घोष यापुढें तोकडा पडणार आहे. 'विश्व-मानुष' ही जी ऋग्वेदाची प्रतिज्ञा, त्या प्रतिज्ञेप्रमाणें भारताला व्यापक बनावें लागणार आहे. सर्वोदयामार्फत हें काम भारताला करतां येण्यासारखें आहे.

## भगवंताचा अनुराग फळाला आला.

वैद्यनाथधामाला आमच्यावर प्रहार झाला त्या दिवशीं मीं म्हटलें होतें कीं जगन्नाथाचा अनुराग प्रकट झाला. जगन्नाथ हा खरोखर च जगाचा नाथ व्हावा, कृष्ण हा जगद्गुरु व्हावा आणि भारत हें सबंध विश्वाला प्रेमाचें आणि शांतीचें आवाहन करणारें, सर्वांची सेवा करणारें राष्ट्र व्हावें; ही जी तळमळ त्या दिवशीं आम्हां सर्वांच्या चित्तांत होती, ती तळमळ आज फळाला आली. आणि आमच्या या पंढरीरायानें, आमच्या या पित्यानें त्याच्या मुलाला मुलाच्या शर्तीवर भेट दिली : यापेक्षां अधिक कारुण्य अधिक वात्सल्य, अधिक प्रेम काय असूं शकेल ? तें कारुण्य आणि तें वात्सल्य आज मी अनुभविलें. आणि माझा असा विश्वास आहे कीं महाराष्ट्रापुरतें बोलायचें झाल्यास ज्या भागवत धर्माचा पाया ज्ञानदेव महाराजांनीं घातला, पुंडलीकानें आपल्या आचरणानें ज्याचा उत्तम आदर्श दुनियेपुढें ठेवला, त्या भागवत धर्माचें उज्ज्वल स्वरूप आजपासून साऱ्या जगांत प्रकाशित होईल आणि आमच्या सबंध जीवनाला त्याचा स्पर्श होईल.

## पतितांच्या उद्धाराची तळमळ ही च भक्ति

हीं देवळें तरी कशासाठीं काढलेलीं आहेत रे ? दक्षिणेकडे ते रामानुजाचार्य, आणि या ठिकाणीं ज्ञानदेव व एकनाथ, होऊन गेले. त्यांना पतितांच्या, अनाथांच्या, उद्धाराची किती तळमळ होती ? त्या जगन्नाथ भक्ताला, चैतन्यांना, दलितोद्धाराची किती तळमळ लागली होती ? भारताचा हा सारा इतिहास पाहिला म्हणजे वैदिक धर्माचें अत्यंत मधुर फळ या अशा भक्तांच्या गाथ्यांतून आपल्याला चाखायला मिळतें.

रामानुजाचार्यांची एक प्रसिद्ध गोष्ट आहे. त्यांना त्यांच्या गुरूनीं एक मंत्र दिला होता आणि त्याचा गुप्तपणें एकांतांत जप करायला सांगि-

तलें होतें. त्याप्रमाणें ते एकांतांत जप करीत. परंतु एक दिवस त्यांना अशी स्फूर्ति झाली कीं हा मंत्र साऱ्या लोकांना आपण जाहीर करून द्यावा. गुरूंनीं मनाई केली होती तरी ते एक दिवस उठले आणि लोकांना बोलावून आणून जाहीरपणें त्यांनीं सर्वांना त्या मंत्राचा उपदेश दिला. त्या दिवसापासून अगदीं उघडा मंत्र म्हणून जगाला तो ते सांगूं लागले. पुढें गुरूंच्या कानावर ही गोष्ट गेली तेव्हां गुरूंनीं रामानुजाचार्यांना बोलावलें आणि सांगितलें कीं ' तुला मीं हा मंत्र गुप्त ठेवायला सांगितला होता पण तुझ्याच्यानें तें झालें नाहीं. तुला संयम राहिला नाहीं. तेव्हां आतां तुझी कांहीं चांगली गति दिसत नाहीं मला. तुला दुर्गति लाभेल." यावर रामानुजाचार्य म्हणाले " मीं मंत्र गुप्त ठेवला नाहीं म्हणून मला दुर्गति मिळेल तें ठीक आहे, परंतु ज्यांनीं तो मंत्र घेतला त्यांना कोणती गति मिळेल ? " तेव्हां गुरु म्हणाले " त्यांना दुर्गति मिळण्याचा प्रश्न नाहीं. त्यांनीं तो श्रद्धेनें, भाविकपणानें, घेतला तेव्हां त्यांना सद्‌गति च मिळेल." यावर रामानुज म्हणाले " इतक्या असंख्य लोकांना सद्‌गति मिळण्यासाठीं मला एकाला दुर्गति मिळणार असेल तर मला मुळींच वाईट वाटायचें नाहीं." यावर गुरु काय बोलणार ? " **शिष्यात् इच्छेत पराजयम** " या नात्यानें या शिष्यानें आपला पराजय केला असें गुरु समजून चुकला. नंतर रामानुजाचार्यांनी पुढें सबंध तमीळनाडमध्यें आणि देशामध्यें सगळ्यांना उघड उपदेश दिला.

## प्रगट गुह्य बोले

ब्रह्मविद्या गुप्त राखावी यांत हि एक दृष्टि आहे. ती विद्या जर बाजारांत विकायला काढली तर तिला कांहीं भाव येणार नाहीं. परंतु ती विद्या प्रगट करण्यांत हि दुसरी गोडी आहे. आपल्या येथें ज्ञानदेवांनीं आणि नाथांनीं हें च काम केलें. त्यांनीं सबंध हिंदुस्थानांत ब्रह्मविद्येचीं दारें उघडीं करून दिलीं. ज्ञानदेव म्हणतात " **इये मराठीचिये नगरीं ब्रह्मविद्येचा सुकाळ करी** " आणि पुढें भक्ताचें लक्षण सांगतांना म्हणतात, जें ज्ञान ' **गुरुशिष्याचिये एकांतीं,**' बोलायचें असतें तें " **त्रिजगतीं गर्जतो** "–सबंध जगांत ते ज्ञान गर्जत सुटतात. ज्ञानदेवाची आरती लिहिणाऱ्या रामा जनार्दनांनीं

म्हटलें आहे "**प्रगट गुह्य बोले, विश्व, ब्रह्म चि केलें रामा जनार्दनीं पायीं ठक चि ठेलें, आरती ज्ञानराया**" ब्रह्म कुठें तरी लपलेलें आहे आणि तें ध्यानानें प्राप्त करायचें आहे, ही जी जुनी प्रक्रिया होती ती ज्ञानदेवानें बदलून टाकली आणि सारें विश्व च ब्रह्म करून टाकलें. म्हणून तें प्रगट गुह्य झालें. हा पराक्रम ज्ञानदेवांनीं मराठींत केला, रामानुजाचार्यांनीं संस्कृतांत आणि तमीळ भाषेंत केला. ज्ञानदेवाच्या पूर्वीं चैतन्य महाप्रभूनीं सगळीकडे जाऊन असेंच प्रेम वांटलें. लहान मुलें, स्त्रिया खालच्या मानल्या गेलेल्या जाती इत्यादि सरसकट सर्वांमधें त्यांनीं इतकें, प्रेम वांटलें कीं चैतन्यदेव म्हणजे कृष्णाचा च अवतार आहे असें बंगालमधें लोक मानूं लागले. याचें कारण चैतन्यांच्या ठिकाणीं मूर्तिमंत प्रेम अवतरलें होतें.

## सामाजिक समाधि हें सर्वोदयाचें काम

अशा रीतीनें पूर्वीच्या संतांनीं अशी उमेद धरली होती कीं संतांकडून मिळालेलें ज्ञान पचवून त्याला आम्ही नवीन रूप देऊं आणि तें सबंध जगामधें आणू. त्याप्रमाणें त्यांनी जुन्या वैदिक धर्माला अधिक व्यापक रूप दिलें. परंतु आपल्याला त्यांच्या हि पुढें एक पाऊल टाकायचें आहे. भक्तीचें रूपांतर सर्वोदयामधें करायचे आहे. "**समः सर्वेषु भूतेषु**" ही पराभक्ति आतां सामान्य भक्ति करायची आहे. सारे भूतमात्र माझीं च रूपें आहेत, वरवरचा भेद मिथ्या आहे, हा अनुभव व्यक्तिगत समाधीमधें एखाद्याला यायचा. परंतु ती व्यक्तिगत समाधि आतां आपल्याला सामाजिक समाधि करायची आहे.

माझ्या मित्रांनो, फार मोठी धाडसाची भाषा भगवान् माझ्या मुखांतून प्रगट करून राहिला आहे. तीन वर्षांपूर्वी बंगालमध्यें माझी यात्रा चालू होती तेव्हां रामकृष्ण परमहंस यांची ज्या ठिकाणीं प्रथम समाधि लागली त्या ठिकाणीं मंडळी मला घेऊन गेली होती. एक तलाव आहे त्या ठिकाणीं. सकाळच्या वेळीं तिथें मी बसलों. जमलेल्या मंडळींसमोर बोलतांना मीं म्हटलें कीं रामकृष्णांना ज्या समाधीचा एकट्याला अनुभव आला होता ती समाधि आपल्याला सामाजिक करायची आहे. ज्ञानदेवांनीं

हि म्हटलें आहे कीं सगळीकडे समाधि पसरून देणें हें श्रेष्ठ बुद्धि-वैभव आहे.
" बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें "

सर्वत्र एकत्वाचा अनुभव येणें ही जी पराभक्ति तिचा अनुभव या विज्ञानयुगामध्यें जगाला आला तरी पाहिजे, किंवा जगाचा नाश तरी झाला पाहिजे, अशी परिस्थिति आज विज्ञानानें निर्माण केली आहे. साम्ययोग हा आतां काव्यामध्यें किंवा समाधीमध्यें अनुभविण्याचा विषय राहतां कामा नये, तो प्रत्यक्ष जीवनामध्यें आणा, असें आव्हान विज्ञान आम्हांला देत आहे. आणि त्या च बळावर आमची ही यात्रा चालली आहे.

## आमच्या जन्माचें प्रयोजन

लोक मला विचारतात " ज्या गोष्टी ज्ञानदेवादिकांनीं सांगितल्या त्या च तुम्ही पुन्हां सांगणार काय? आणि जें त्यांच्याच्यानें झालें नाहीं, तें तुमच्यानें होणार आहे काय? " मी त्यांना म्हणतों " अरे, आम्ही ज्या गोष्टी करूं म्हणतों त्या त्यांच्याच्यानें होण्यासारख्या असत्या तर देवानें तुम्हां-आम्हांला जन्माला च कशाला घातलें असतें? कांही गोष्टी त्यांच्याच्यानें व्हायच्या नव्हत्या आणि आमच्याच्यानें व्हायच्या होत्या म्हणून तर आमचा जन्म आहे. नाहीं तर आमच्या जन्माचें प्रयोजन काय ?

## सर्वोदयाची प्रयोगशाळा घरोघर हवी.

या युगांत विज्ञान ही फार मोठी शक्ति आमच्या मदतीला आली आहे. कांहीं लोक म्हणतात " ह्या गांधीवाल्यांना विज्ञानाचें वावडें असणार." मी त्यांना म्हणतों " अरे, आम्हां अहिंसावाल्यांना तर विज्ञान हवें आहे. तुम्हा हिंसावाल्यांच्या गळयाला मात्र विज्ञानाच्या प्रगतीची तात लागली आहे!! हिंसेची महती गाणाऱ्यांना विज्ञान घातक ठरणार आहे. कारुण्य आणि आत्मज्ञान यांची जोडी विज्ञानाशीं जमली तर जगाचें कल्याण आहे. आणि हिंसेशीं जर त्याची जोडी जमली तर मात्र जगाचा नाश आहे. विज्ञानाची जोड अहिंसेशीं बसवायची हें च तर सर्वोदयाचें काम आहे. अहिंसेशीं विज्ञानाची जोड बसविण्याची लॅबोरेटरी, प्रयोगशाळा, मोठ्या मोठ्या शहरांतून नव्हे तर खेडयांतून, घराघरांतून, उभी झाली पाहिजे.

या विज्ञानयुगांत साम्ययोग ही केवळ समाधीत अनुभविण्याची गोष्ट उरली नाहीं. साऱ्या समाजाला साम्ययोगाचा अनुभव यायला पाहिजे. पूर्वी साम्ययोग हें शिखर होतें. परंतु आतां तो पाया झाला आहे. त्याच्या आधारावर च आतां जीवनाची उभारणी झाली पाहिजे ही विज्ञान-युगाची मागणी आहे. म्हणून परधर्मियांना मंदिरांत प्रवेश देण्याची आजची जी घटना झाली आहे तिनें पंढरीचा राणा फार उंच झाला आहे. त्याचा महिमा आतांपर्यंत प्रगट होता च, परंतु आज तो विशेष प्रगट झाला.

## प्रह्लाद श्रेष्ठ भक्त कशामुळें

भक्तीचा मूळ मंत्र देणारा प्रह्लाद. नारद हा त्याचा गुरु. परंतु महाभक्तांच्या नामावलींत प्रल्हादाचें नांव प्रथम आहे.– "प्रह्लाद नारद पराशर." याचें कारण काय ? भगवंतांनीं जेव्हां भयानक रूप घेऊन नरसिंहाचा अवतार प्रगट केला तेव्हां भगवंताची चिर-परिचित लक्ष्मी देखील घाबरून गेली. ज्या नारदाची वीणा एक क्षण हि थांबत नसे तो नारद हि घाबरला, आणि त्याची वीणा बंद पडली. परंतु प्रह्लाद निर्भयपणें नरसिंहासमोर उभा राहून म्हणाला '**नाहं बिभेमि**' मी भीत नाहीं. दुष्टांपुढें अनेकांनीं निर्भयता प्रगट केली होती. वाल्याकोळ्यापुढें नारद हि निर्भयपणें उभा राहिला. परंतु भगवंताच्या भयानक रूपापुढें मात्र तो घाबरला. या निर्भयतेमुळें तो श्रेष्ठ भक्त ठरला आणि पहिला आला. त्या प्रह्लादानें भगवंतापाशीं काय मागणें मागितलें तें पहा,

**"प्रायेण देवमुनयो स्वविमुक्ति-कामा:**
**मौनं चरन्ति विजने न परमार्थनिष्ठ:**
**नैतान् विहाय कृपणान् विमुमुक्ष एक:....."**

पूर्वी स्वत:च्या मुक्तीची कामना बाळगून निर्जन वनामध्यें मौन धारण करून वावरणारे मुनि आणि देव होऊन गेले. त्यांच्यांत परार्थनिष्ठा नव्हती. परंतु मी मात्र या बिचाऱ्या कृपण जनांना सोडून एकटा मुक्त होऊं इच्छीत नाहीं." प्रह्लादाची ही केवढी प्रखर टीका आहे ! त्या देवांच्या आणि मुनींच्या मार्गे उत्तम का होईना पण स्वार्थ लागला होता. ते खरे परार्थ-निष्ठ नव्हते.

## सामाजिक समाधीची तळमळ

" **नैतान् विहाय कृपणान् विमुमुक्ष एकः** " हा संस्कृत साहित्यांतील सर्वश्रेष्ठ उद्‌गार आहे. या उद्‌गारांत कोणतें श्रेष्ठ काव्य आहे? मोक्ष हा एकट्याला मिळायचा नसतो. जो स्वतःपुरता मोक्ष पाहूं गेला त्याच्यापासून मोक्ष दूर पळाला. जेथें ' मी ' आहे तेथें ' मोक्ष ' नाहीं. आणि जेथें ' मोक्ष ' आहे तेथें ' मी ' नाहीं, असें आहे. तुकाराम म्हणतो " **मुनि मुक्त झाले भेणें गर्भवासा, आम्हां विष्णुदासां सुलभ तो** " मुनि गर्भवासाच्या भयानें मुक्त झाले, परंतु ( एकट्याच्या ) मुक्तीला हि आम्ही भय च समजतों. ' यांत तुकारामाला जें दर्शन झालें तें भविष्यकाळचें होतें. भविष्यकाळीं असा समाज बनेल हें पूर्वदर्शन क्रांतदर्शी कवीला होत असतें. सर्व समाज जिथें प्रेममय बनला आहे असें दृश्य पहायला मिळावें ही त्यांची आकांक्षा असते. " **ऐसें भाग्य कई लाहता होईन, अवघे देखे जन ब्रह्मरूप** " याचा अर्थ असा नव्हे कीं समाधींत सारे लोक ब्रह्ममय दिसावेत. ते तसे तर त्याला केव्हां च दिसले होते. परंतु व्यक्तिगत स्वार्थांत गुरफटलेले लोक त्यांतून सुटून, आपला संसार साधून, समाधि साधतील, सारा समाज ब्रह्मरूप होईल, असें मला कधीं दिसेल? असें तुकाराम म्हणत आहेत. म्हणजे सामाजिक समाधीच्या तळमळीचे हे त्याचे उद्‌गार आहेत.

आज पंढरपूरला जी घटना घडली तिच्या आधारावर आपल्याला जीवन उभारायचें आहे. जीवनांत जे नाना आर्थिक सामाजिक, इत्यादि भेद आहेत ते आतां आपण नाहींसे करूं या. आजची घटना ही साम्ययोगाच्या जीवनाचा पाया समजून तुम्ही वागाल अशी मी आशा करतों. तुम्हा लोकांचा माझ्यावर आज फार मोठा उपकार झाला आहे याबद्दल तुम्हांला जितके धन्यवाद द्यावे तेवढे थोडे च आहेत.

पंढरपूर,

२९-५-५८

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ३५०२८ वि: निबंध
क्रमांक ........ नों. दि. २०-१२-६३

# साहित्य-शक्ति

[ साहित्य-प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगीं दिलेलें भाषण ]

## अप्रतिम खाऊ

साहित्याचें प्रकाशन करतांना मला फार उत्साह वाटतो. साहित्यदेवते-विषयीं माझ्या मनांत फार श्रद्धा आहे. माझें लहानपणचें सुमारें १० वर्षांचें जीवन एका लहानशा खेड्यांत गेलें. नंतरचीं १० वर्षें बडोद्या-सारख्या मोठ्या शहरांत गेलीं. त्या नंतर थोडे दिवस इकडे तिकडे फिरून शेवटीं गांधीजींच्या जवळ पोहोंचलों. त्यानंतरची हकीकत सांगायचें आज कांहीं कारण नाहीं.

मी कोंकणांतल्या खेड्यांत होतों तेव्हां माझे वडील तेथें रहात नसत. कांहीं अध्ययन आणि कामाच्या निमित्तानें बडोद्याला रहात असत. परंतु ते बहुधा दिवाळीला घरी येत त्या वेळीं " ते तुमच्याकरतां कांहीं खाऊ घेऊन येतील " असें आई आम्हांला सांगे. मुलांकरता मोठे लोक मेवा मिठाई आणतात त्याप्रमाणें ते हि आणतील अशी आमची समजूत. ही अगदीं माझ्या लहानपणची गोष्ट आहे. तेव्हां मी नुकता च लिहिणें वाचणें शिकूं लागलों होतों. त्या गांवीं शाळा नव्हती म्हणून माझ्या काकांनीं च मला क, का, कि, की, शिकविण्यास सुरवात केली होती. तेव्हांची ही गोष्ट आहे. आमचे वडील आले तेव्हां मी त्यांच्याकडे खाऊकरतां धांवत च गेलों. त्यांनीं आणलेला खाऊ माझ्या हातीं दिला. खाऊ म्हणजे कांहीं तरी गोल लाडवाप्रमाणें असेल असें मी समजत होतों परंतु वडिलांनीं खाऊचें पॅकेट म्हणून जें माझ्या हातीं दिलें तें गोल नव्हतें तर चपटेंसें होतें. तेव्हां मला वाटलें कीं ही कांहीं विशेष प्रकारची मिठाई असावी. उघडून पाहिलें तों त्यांतून दोन पुस्तकें निघालीं. तीं घेऊन मी तसा च आईकडे गेलों; आणि तिच्या पुढ्यांत तीं पुस्तकें ठेवलीं. तेव्हां आई म्हणाली " विन्या, तुझ्या वडिलांनीं आज जो तुला खाऊ दिला आहे त्यापेक्षां चांगला खाऊ दुसरा कोणता च असू शकणार नाहीं. तीं पुस्तकें रामायण आणि भागवत यांतल्या गोष्टींचीं

होतीं असें मला आठवतें. आजपर्यंत रामायण आणि भागवत मीं कितीतरी वेळां वाचलें असेल पण "ह्याहून उत्तम खाऊ दुसरा कोणता हि असूं शकणार नाहीं" हें आईचें वाक्य मी कधीं विसरलों नाहीं. तें वाक्य माझ्या अंतःकरणांत इतकें खोल रुजलें आहे, कीं कुठलें हि सुंदर विचाराचें पुस्तक मी पाहतों तेव्हां त्याच्यापुढें बाकी सर्व मला फिक्कें वाटतें.

भगवंताच्या अनेक शक्ति आहेत. पण त्यांतील एक च शक्ति एकच कला प्रकट झालेली आहे. ती शक्ति आहे प्रेरणा. ही च शक्ति कवि आणि साहित्यिक यांना प्रेरणा देत असते. ती शक्ति कवि आणि साहित्यिक च जाणूं शकतात. दुसऱ्यांना तिचें दर्शन नाहीं. महंमद पैगंबरांविषयीं आख्यायिका आहे की जेव्हां त्यांना समाधि लागे तेव्हां त्यांच्या अंगांतून घामाच्या इतक्या धारा फुटत कीं जवळचे लोक ती तपश्चर्या ते कष्ट पाहून अगदीं घाबरून जात. पण ती 'ती' च वस्तु होती. 'तीच' या शब्दाला अरबी शब्द आहे 'वही.' आणि वही शब्दाचा अर्थ आहे. परमेश्वराचा संदेश मनुष्याला पोंचविणारी वस्तु.

## स्फूर्ति-वेदना

परमेश्वराचा संदेश जेव्हां एखाद्याच्या अंतःकरणांत प्रवेश करतो तेव्हां त्या व्यक्तीला अत्यंत वेदना आणि टॉर्चर होतो. त्या वेदनांना प्रसूति-वेदनांची च उपमा देतां येईल. परंतु या वेदना प्रसूति-वेदनांपेक्षां हि जास्त तीव्र असतात. हें मी माझ्या अनुभवावरून सांगूं शकतों. त्यावेळीं असें वाटतें कीं आपण आपल्याला विसरून च गेलेलों आहोंत व कांहीं अनिर्वचनीय वस्तु आपल्यावर स्वार झाली आहे. ती ब्याद टळली तर बरें असें वाटत असतें. पण ती आपण टाळूं मात्र शकत नाहीं. अशा प्रकारच्या वेदनांनंतर कवीला जें दर्शन होतें तें लोकांना किंचित् चाखायला मिळतें. त्यानें लोकांचें मनोरंजन होते परंतु तें लिहिणाऱ्या कवीला किंवा साहित्यिकाला ज्या वेदना झाल्या त्या त्याच्या त्यालाच माहीत. 'ट' ला 'ट' जोडण्यानें कवि होत नाहीं. कवि म्हणजे क्रांतदर्शी. ज्याला पर-दर्शन असतें तो. हें जग पहायला दोन चर्मचक्षु आहेत. हा देवाचा मोठा उपकार आहे. त्यांनीं आपण आपल्यापुढें नटलेली ही सुंदर सृष्टि पाहूं शकतों. पण हे डोळे गुन्हेगार हि आहेत, कारण

त्यांच्यामुळें या जगापेक्षां आणखी एक वेगळीच खूबसूरत दुसरी एक दुनिया आहे ती या दोन डोळ्यांमुळेंच झांकली जाते. यांच्यामुळें त्या वेगळ्या सुंदर जगाकडे माणूस आकर्षित होत नाहीं. जवळ हि जाऊं शकत नाहीं. पण जेव्हां हा तृतीय नेत्र उघडतो तेव्हां जगाच्या सामान्य व्यवहारांत आणि व्यवहारांमागें कोणती शक्ति काम करीत आहे तिचें दर्शन होतें. तें दर्शन झालें म्हणजे काव्यस्फूर्ति होते आणि त्यांतून साहित्य निर्माण होतें. म्हणून च साहित्यिकांवर माझी फार श्रद्धा आहे.

## जग घडविणाऱ्या शक्ति : पहिली विज्ञान

हें जग बनवण्यांत परमेश्वराशिवाय आणखी कोणाचा प्रमुख भाग आहे असें विचारलें तर कोणी म्हणतात राजकारणी पुरुषांचा भाग जगाला वळण लावण्यांत फार मोठा आहे.बाबर आला त्यानें अमुक गोष्टी केल्या आणि क्लाईव्हनें अमुक केलें असें म्हटलें जातें. परंतु या राजकारणी लोकांचा समाजजीवनावर कांहीं हि परिणाम झालेला नाहीं. आणि समाजजीवनांत त्यांचा कुठें पत्ता हि नाहीं. जगाच्या जीवनाला आकार देणाऱ्या तीन शक्ति आहेत. पहिली 'विज्ञान.' ही जगाच्या जीवनाला रूप देते. उदाहरणार्थ हा माझ्यापुढें लाऊडस्पीकर आहे त्यामुळें इतके हजारों लोक माझें भाषण शांतपणें ऐकत आहेत. लाऊडस्पीकर नसता तर तुमचें नुसतें दर्शन घेऊन आणि प्रणाम करून मला जावें लागलें असतें. बोलायचें असतें तर लहानसा च समुदाय असावा लागला असता. लाखों लोक एकदम कीर्तन, भजन, चिंतन मनन, करूं शकतील याची कल्पना देखील पूर्वीच्या लोकांना आली नसेल. आमच्या लहानपणीं स्वतःच लाऊडस्पीकरसारखा ओरडून भाषण करूं शकत असेल तोच वक्ता कामीं पडायचा. ज्याचें भाषण दहा हजार श्रोते ऐकूं शकले,त्यानें च सभा जिंकली असें समजलें जाई. तरुणपणीं माझा आवाज फार तर एक हजार लोकांपर्यंत पोंचत असे. त्याकाळीं मोठ्या आवाजानें भाषण करण्याची विद्या वक्त्यांना शिकावी लागे. पण आतां लाऊडस्पीकर आला त्यानें केवळ स्थूल परिवर्तन च होत नाहीं तर मानसिक परिवर्तन हि होतें. तसें च छापण्याच्या कलेमुळें ज्ञानविज्ञानाचा किती प्रचार होऊं शकतो याची आमच्या पूर्वजांना काय कल्पना असेल ?

आज कोटयवधि संख्येनें पुस्तकें छापलीं जात आहेत. त्यांत कांहीं गलिच्छ वाङ्मयाचा हि प्रचार होतो ही गोष्ट वेगळी पण जीवनांत परिवर्तन करणाऱ्या या वस्तु विज्ञानामुळें प्राप्त झाल्या आहेत. अग्नीचा शोध लागल्यावर सर्व ऋषिगण अग्नीचीं स्तोत्रें व गीतें गाऊं लागले त्याप्रमाणें अणु शक्तीचीं हि गीतें गायिलीं जातील. आज अणुशक्ति संहारकरूपानें उपस्थित झाली आहे. पण तिला केवळ रुद्ररूप च नाहीं, शिवरूप हि आहे. तें तिचें शिवरूप प्रकट होईल, तेव्हां दुनियेचें जीवन बदलून जाईल.

## दुसरी शक्ति आत्मज्ञान

जगाच्या जीवनाला आधार देणारी दुसरी शक्ति आहे 'आत्मज्ञान.' जेथें जेथें आत्मज्ञान प्रकट झालें तेथें तेथें जीवन पूर्णपणें बदलून गेलें. गौतमबुद्ध, ख्रिस्त, महंमद पैगंबर, ज्ञानदेव, तुलसीदास, माणिक्यवाचकर आदि महाज्ञानी संत वेळोवेळीं जन्माला आले आणि अशा एकेक व्यक्तीच्या आगमनानें लोकजीवनाचें स्वरूप च बदलून गेलें जीवनपरिवर्तन करणारी आत्मज्ञान ही दुसरी शक्ति आहे.

## तिसरी शक्ति साहित्य

जगाचें परिवर्तन करणारी तिसरी शक्ति आहे साहित्य. वाल्मीक, व्यास, शेक्सपीअर होमर, शंकराचार्य, रवींद्रनाथ वगैरे साहित्यिक जन्माला आले आणि जगाला नेहमीं मदत होईल अशी वस्तु देऊन गेले. जेव्हां शांतीची गरज होती तेव्हां शांति देणारी वस्तु त्यांनी दिली. जेव्हां उत्साहाची गरज होती तेव्हां उत्साह वाढविणारी वस्तु दिली. ज्या समाजाला ज्या वस्तूची गरज होती ती त्यांनीं लोकांना पुरवली. त्यामुळें समाज-जीवन बदललें. जगामधें ज्या मोठमोठ्या क्रांत्या झाल्या, त्यांच्यामागें क्रांतदर्शी विचारक साहित्यिक होते.

## विज्ञान आणि आत्मज्ञान यांना जोडणारा पूल

या तीन शक्तींनीं च जगाची घडण केली आहे. विज्ञान, आत्मज्ञान आणि वाक्शक्ति याच मनुष्याचें जीवन बदलत असतात. विज्ञानानें स्थूल रूप बदलतें, आणि मनावर परिणाम होण्याची परिस्थिति उत्पन्न

होते. पण तें मनावर प्रत्यक्ष परिणाम करूं शकत नाहीं. वाणी विज्ञानाच्या पुढें जाऊन सरळ हृदयावर च प्रहार करते आणि तेथपर्यंत थेट जाऊन भिडते. आत्मज्ञान अंत:करणांत प्रकाश पाडतें. विज्ञान हृदयाच्या बाहेर आणि आत्मज्ञान आंत असतें आणि या दोघांना जोडणारा पूल वाणी तयार करते. दोन्ही बाजूंचा जोड करते आणि दोन्ही बाजूंवर प्रकाश हि टाकते. तुलसीदासांनीं म्हटलें आहे :

**रामनाम मनिदीप धरू, जीह देहली द्वार**
**तुलसी भीतर बाहरहु, जो चाहसि उजियार ।**

जर तुला आंत आणि बाहेर दोन्हीकडे उजेड पाहिजे असेल, प्रकाश हवा असेल तर रामनामरूपी दिवा जिह्वारूपी दारावर ठेव, म्हणजे तो रामनामरूपी दीप आंत आणि बाहेर सर्व ठिकाणीं प्रकाश पसरून देईल असें तुलसीदासांनीं सांगितलें आहे ही वाणी म्हणजे माणसाला परमेश्वरानें दिलेली अप्रतिम देणगी आहे. ती देणगी जनावरांना मिळालेली नाहीं. मनुष्याला जी वाणीची देणगी मिळाली आहे ती फार मोठी शक्ति आहे. त्या शक्तीचा जेव्हां दुरुपयोग होईल तेव्हां समाजाचा अध:पात होईल. प्रगति होणार नाहीं. ऋग्वेदांत म्हटलें आहे.

**सक्तुमिव तितउना पुनन्तो, यत्र धीरासो वाच मक्तत ।**

ज्याप्रमाणें आपण धान्य चाळून पाखडून घेतों तेव्हांच निर्मळ भरीव दाणा लाभतो त्याप्रमाणें ज्या समाजांत वाणी संयमपूर्वक वापरली जाते तेथें लक्ष्मीचा वास असतो. धान्य जसें चाळून पाखडून स्वच्छ केलें जाते तशी जेव्हां ज्ञानी पुरुष वाणी हि पारखून तींतले उत्तम, पावन, पवित्र, शुद्ध, निर्मल स्वच्छ, नेमके शब्द शोधून त्याचा प्रयोग करतो तेव्हां समाजांत लक्ष्मी वास करते.

## लक्ष्मी-सरस्वतीचें वैर नाहीं

पुष्कळ लोक म्हणतात कीं सरस्वती आणि लक्ष्मी यांचा विरोध आहे. याच्या अगदीं उलट वेदाचें म्हणणें आहे. लक्ष्मी आणि सरस्वतीचें वैर आहे म्हणणें ही किती अडाणी गोष्ट आहे ! ती तर संयोजक शक्ति आहे. आंतल्या आणि बाहेरच्या जगाला जोडणारी कडी आहे. ती विज्ञान

आणि आत्मज्ञान यांचा संयोग करते. जगामध्यें जितक्या शक्ति ज्ञात आहेत त्या सर्वांना जोडणारी कोणती चीज असेल तर ती वाणीच होय. अशा सरस्वतीचें लक्ष्मीशीं वैर कसें असेल ? असे म्हणणें मूढ बुद्धीचें लक्षण आहे. वेदांची सूक्ष्म दृष्टि त्यांत नाहीं. 'तत्र लक्ष्मी निहिता' 'तेथें लक्ष्मी निहित आहे' असें स्पष्ट म्हटलें आहे. कारण वाणी ही सुक्ष्म शक्ति आहे म्हणून तिच्यामध्यें इतर शक्ति वास करतात.

## बोलण्यापेक्षां जास्त ऐकावें

माझा वाणीवर अत्यंत विश्वास आहे. मी सध्यां सतत वोलत जरी असलों तरी त्यापेक्षां ऐकतों जात. आपण जेवढें बोलतों त्यापेक्षां दुप्पट ऐकलें पाहिजे. कारण श्रवण हा हि वाणीचाच महिमा आहे. देवानें आपल्याला एक जीभ आणि दोन कान दिले आहेत. म्हणून बोलावें त्याच्या दुप्पट ऐकावें हें तर स्थूल गणित झालें. पण याहून आणखी दुसरें एक गणित आहे. देवानें दोन कान दिले आहेत पण त्यांना काम फक्त ऐकण्याचें एकच दिलें आहे. पण जीभ एक आहे तरी तिला बोलणें आणि रस चाखणें हीं दोन कामें देवानें दिलीं आहेत. म्हणून कानानें चौपट काम केलें पाहिजे. तें कांहीं असो. बोलण्यांत आणि श्रवण करण्यांत वाणीचा च महिमा आहे

## माझा जप चालला आहे

'तुम्ही इतके कां बोलतां ?' असें जेव्हां लोक मला विचारतात तेव्हां मी त्यांना सांगतों कीं 'मी उपदेश करण्याकरितां बोलत नाहीं. तो माझा जप चाललेला असतो. वेद आज्ञा करण्यासाठीं, उपदेश करण्यासाठीं बोलतात, वेदांना तसा अधिकार आहे. पण मी बोलतों जपाकरितां, प्रचाराकरितां. जेव्हां मी माझा विचार तुमच्या समोर मांडतों तेव्हां तो विचार माझ्या मनांत अधिक दृढ होत जातो. त्यांतले तुम्ही किती ग्रहण करतां हें तुमचें तुम्हाला माहीत. तुम्ही तें ग्रहण करा अगर नका करूं माझ्या विचाराला त्या जपामुळें बळकटी येत जाते आणि माझी भक्ति हि दृढ होते. मनूचें एक सुंदर वचन आहे

**जपेनैव तु संसिध्येत् ब्राह्मणो नाऽत्र संशयः**
**कुर्यात् अन्यत् न वा कुर्यात्**

ब्राह्मण म्हणजे काय ? ब्राह्मण म्हणजे मन. म्हणून ब्राह्मण दुसरें कांहीं करो वा न करो तो केवळ जप करील तर त्या जपानें च त्याला सिद्धि लाभेल. हें जें भूदान, ग्रामदान मला मिळालें आहे असें म्हटलें जातें तें तुम्हीं प्राप्त केलेलें आहे. तें मला कसें मिळालें ? तुम्ही लोक ठिक-ठिकाणीं फिरलां, लोकांना समजावून सांगितलें आणि ग्रामदानें घेऊन आलां. मग त्याचें श्रेय मला कां मिळत आहे ? कारण मी त्याचा जप करीत राहिलों आहें म्हणून. यज्ञ, दान, तप यांची व्याख्या करतांना म्हटलें गेलें कीं जो कोणी परिश्रम करून देईल, पोटाला चिमटा काढून देईल, तर तो यज्ञ होईल. कोणी संचित वस्तुमधून देईल तर तें दान होईल. तेव्हां भूदान-यज्ञांत यज्ञ आणि दान तर आहे च, पण तप कोठें आहे ? हजारों लोक फिरत आहेत. कधीं त्यांना खायलाहि मिळत नाहीं. कसली सुख-सोय मिळत नाहीं. शि य आतां तर निधिमुक्ति झाली आहे. तेव्हां मी कार्यकर्त्यांना एक तेलगू भजन म्हणून दाखवितों. त्याचा अर्थ आहे ‘ निधीमधें सुख आहे कीं राममंनिधीमधें आहे ?’ अशा तऱ्हेनें तप वाढविण्याच्या मीं अनेक क्लृप्त्या काढल्या. एकाहून एक जास्त कठिण, आजच्यापेक्षां उद्यां जास्त, उद्यांपेक्षां परवां जास्त, असें त्यांचें तप चाललें आहे. पण मी काय करीत आहें ? ना यज्ञ ना दान, कीं ना तप. माझा जप च चालला आहे. आणि मी पाहतों आहे कीं या जपांत शक्ति भरलेली आहे.

## सरस्वतीची उपेक्षा नको

पण एकंदरींत आपल्या कार्यांत वाणीची उपेक्षा झाली आहे. असें मला आढळून येतें. जाणून बुजून नाहीं पण सरस्वतीची कृपा आपण संपादन केली नाहीं. ज्याला प्रचार म्हणतात तसला प्रचार मला नको आहे. मला प्रकाश पाहिजे आहे. हा अगदीं स्वतंत्र शब्द आहे. हिंदुस्थानचा खास शब्द आहे तो. इंग्रजींतले प्रोपागांडा किंवा पब्लिसिटी हे शब्द अगदीं वरवरचे आणि उथळ आहेत. मला पब्लिसिटी नको, प्रचार नको, प्रकाश पाहिजे आहे. शीख लोकांमधें एक रिवाज आहे. ते सकाळीं उठून प्रातर्विधि आटोपून, त्यांच्या घरांत ज्या खोलींत ग्रंथसाहेब ठेवलेला असतो त्या खोलींत मोठ्या भक्तिभावानें जातात आणि ग्रंथसाहेब उघडतात. आणि सहजगत्या

जें पान उघडलें असेल तें पान, आज मला काय प्रकाश मिळणार आहे, असें म्हणून वाचतात. या विधीला शीख लोक 'प्रकाश' म्हणतात. आपल्याला ग्रंथाचें जें प्रकाशन पाहिजे आहे तें असलें प्रकाशन पाहिजे आहे. कामाची अतिशयोक्ति करून लोकांच्या पुढें ठेवावें हें मला नको आहे. पण या कामाच्या मागें जो विचार आहे तो अगदीं खोल, विश्वव्यापक आत्म्यापर्यंत जावा. तो विचार मजबूत, खोल आणि व्यापक व्हावा. सर्वोदयविचारापेक्षां अधिक मजबूत, अधिक खोल किंवा अधिक व्यापक दुसरा एखादा विचार आज आपल्याला उपलब्ध होऊं शकतो असें मला वाटत नाहीं. संभव आहे पुढच्या पिढीला तो उपलब्ध होईल हि. म्हणून आजपर्यंतचें तत्त्वचिंतन आणि संतपुरुष जितके खोल गेले होते त्यापेक्षां आपण अधिक खोल जाऊं तर च सर्वोदयविचाराचें दर्शन मजबूत होईल आणि कसोटीला टिकेल. विचाराची किती हि कातरी चालवली तरी हि ते तुटणार नाहींत अशी शक्तिशाली वस्तु या विचारांत अंतर्हित आहे. पण त्यासाठीं विचारांचें अध्ययन मनन आणि प्रकाश झाला पाहिजे. याकरितां च जरा नम्र होऊन साहित्याची कास धरायला हवी.

## खरे साहित्यिक कोणाचे दास नसतात

जे खरे साहित्यिक असतात ते कोणाच्या आज्ञेचे दास नसतात. तसेंच ते कोणत्याहि सद्विचाराची उपेक्षा हि करूं शकत नाहींत. जो विचार पटणार नाहीं तो कोणाची आज्ञा म्हणून ते मान्य करणार नाहीत. अलीकडे आपल्याला साहित्यिक किंवा वैज्ञानिक म्हणवणारे कित्येक लोक 'टू ऑर्डर' कामें करतात. पुष्कळदा वर्तमानपत्रांचे मालक वेगळे असतात आणि लेखकांना त्यांच्या इशाऱ्याप्रमाणें चालावें लागतें एखादी वस्तु त्यांना मान्य असो वा नसो मालकाच्या आज्ञेप्रमाणें त्यांना लिहावें च लागतें. वैज्ञानिक हि आतां म्हणूं लागले आहेत कीं 'आज संशोधन नीट करतां येत नाहीं कारण, आम्ही बांधलेले आहोंत. आम्हांला अमुक अमुक प्रकारचें संशोधन करून अमुक अमुक परिणाम आणा असा हुकूम येतो आणि त्याप्रमाणें आम्हांला करावें लागतें'. जोंपर्यंत वैज्ञानिक आपली बुद्धि विकण्याचें बंद करणार नाहींत आणि साहित्यिक म्हणवणारे आपली वाणी विकणें

थांबवणार नाहींत तोंपर्यंत जगाचा विकास होणार नाहीं. वैज्ञानिकांनीं आपली बुद्धि आणि साहित्यिकांनीं आपली वाणी विकून जगाला धोक्यांत आणलें आहे. सर्व च वैज्ञानिक आणि साहित्यिक यांच्याविषयीं मी हें बोलत नसून जे खोटे आहेत, नकली आहेत. आपल्याला साहित्यिक, वैज्ञानिक म्हणवून घेण्याचा अट्टाहास धरतात त्यांच्यापुरतें हें माझें विधान आहे.

## साहित्याची व्याख्या

म्हणून वाक्-विसर्ग हा जनताघविप्लव असला पाहिजे. जनतेचें पाप धुऊन टाकणारा वाक्समूह असेल तर च तो साहित्य म्हणायला योग्य होईल असें भागवतांत लिहिलें आहे. बाकीचें नुसतें वाङ्मय आहे. साहित्य म्हणजे जें जीवनाबरोबर सतत नित्य निरंतर सोबत करतें, नेहमी पोषण देत राहते तेंच साहित्य. सरस्वतीच्या कृपेनें जनतेचें पाप धुऊन टाकणारा जो वाक्-विसर्ग असतो, ती च वाणीसरस्वती होय.

माझ्या प्रिय मित्रांनो ! आमचा समाज ज्या विचारावर उभा आहे तो विचार अत्यंत मजबूत, अत्यंत खोल आणि व्यापक आहे. पण आम्हांला त्याचें तितकें खोल आणि व्यापक दर्शन नाहीं, म्हणून गेलीं सात वर्षें आपण चांचपडत आहोंत, रस्ता शोधीत फिरत आहोंत. आपण अत्यंत नम्रपणें साहित्यिकांकडे गेलें पाहिजे, त्यांच्यापुढें आपला प्रश्न खुल्या दिलानें मांडला पाहिजे आणि त्यांना म्हटलें पाहिजे ‘आपण तटस्थ पुरुष आहां, आमची चूक कोठें आहे ती दाखवा आणि आम्हांला नीट मार्गावर घेऊन चला. आम्हांला मार्गदर्शन करा’

## साहित्यिकांनीं सर्वोदय विचाराचें स्वागत केलें आहे

मला सांगायला आनंद वाटतो कीं जेथें जेथें मी साहित्यिकांना भेटलों तेथें तेथें सर्व साहित्यिकांनीं सर्वोदय-विचाराचें स्वागतच केलें. हा विचार जगाला वांचविणारा आहे, त्यांत अमृतत्व आहे असेंच सांगितलें. म्हैसूर बंगाल, तमिलनाड, केरळ उत्तर प्रदेश इत्यादि ठिकाणच्या साहित्यिकांनीं मला सांगितलें कीं आज जगाला वैफल्यांतून बाहेर काढणारी कोणती वस्तु

जगांत असेल तर ती सर्वोदय-विचार ही च होय. माझ्या पाठीमागें फार मोठी शक्ति उभी आहे. म्हणून आमच्या कार्यकर्त्यांनीं अध्ययनाची उपेक्षा करूं नये अशी माझी इच्छा आहे. स्वत: विचार पूर्ण समजावून घ्यावा, लोकांच्यापुढें चर्चा करव्यात तेव्हांच सरस्वतीची खरी उपासना होईल.

## भारतांत एकीची आवश्यकता

हिंदुस्थानांत ऐक्य वाढविण्याची आज अत्यंत आवश्यकता आहे, इतकी पूर्वी कधीं हि नव्हती. आज देशाला छिन्नभिन्न करणाऱ्या अनेक ताकती काम करीत आहेत आणि त्या भाषा, धर्म, प्रांत, पंथ इत्यादि पॉलिटिकल आयडियालॉजीच्या नांवानें प्रकट होत आहेत. म्हणून देशाला एक करणारी शक्ति सांपडूं शकत असेल तर ती शोधली पाहिजे.

## देशाला जोडणारी शक्ति : एक भाषा एक लिपि

सर्व देशाला एक करणारी अशी एक शक्ति आहे ती म्हणजे सर्वांची भाषा आणि सर्वांची लिपि एक व्हावी. यांत दुसऱ्या भाषा आणि लिपि यांचा निषेध नाहीं. त्या हि चालतील च. पण सबंध राष्ट्राला जोडणारी, सर्व देशाची भावना समरस करणारी जर एखादी चीज मिळून जाईल तर देशाची खूप उन्नति होईल. नागरी लिपि ही अशी देशाची एक लिपि होण्यासारखी आहे. पण हें सर्व प्रेमानें व्हावें. कोणती हि गोष्ट लादली जाऊं नये.

## नागरी लिपीचा चीन व जपान हि स्वीकार करतील

आतां हिंदुस्थानशीं चीन आणि जपान यांचा संबंध आला आहे आणि पुढें अधिक येणार आहे. दोन्ही भाषांचें साम्य लक्षांत घेतां मला वाटतें आपण जर नागरी लिपीचा प्रेमपूर्वक स्वीकार केला तर नागरी लिपीच्या साहाय्यानें आपण चिनी आणि जपानी साहित्याचा लाभ आपल्या भाषांना देऊं शकूं. ती लिपी पूर्व आशियांत ऐक्य आणायला खूप सहायक होईल. ही पुढची गोष्ट आहे, भविष्याच्या पोटांत लपलेली आहे. पण आपण प्रयत्न मात्र करीत राहिले पाहिजे. तसा प्रयत्न मीं केला आहे. त्याकडे मी आपलें

ध्यान वेधूं इच्छितों. तसें पाहिलें तर गीता-प्रवचनें हिंदुस्थानांतल्या प्रत्येक भाषेंत छापलीं गेलीं आहेत, पण एका च लिपीमध्यें सर्व भाषांचा अनुवाद छापला जावा असा मीं आग्रह धरला आहे. तेलगू, पंजाबी, ओडिया आणि गुजराथी गीता-प्रवचनें नागरींत छापलीं गेलीं आहेत. मराठी आणि हिंदी नागरींत च आहेत. तेव्हां माझी तुम्हांला अशी शिफारस आहे कीं तुम्ही देशांतल्या मुख्य मुख्य भाषा शिकून घ्याव्या. तसें पाहिलें तर आपली मातृभाषा, शेजारची एक भाषा आणि राष्ट्रभाषा अशा तीन भाषा प्रत्येकाला आल्या च पाहिजेत. लिपि एक झाली म्हणजे हें सहज साधतां येईल. आणि अशी एक लिपि व्हायला नागरी योग्य आहे अशी माझी सूचना आहे. त्या लिपींतून भिन्न भिन्न भाषा शिकणें सोपें होईल. एक तेलगू गीता-प्रवचन आणि एक हिंदी गीताप्रवचन घेतलें कीं हिंदी जाणणाराला तेलगू सहज समजूं लागेल. म्हणून मीं माझ्यापुरता याचा आरंभ करून दिला आहे. त्यापासून तुम्ही लाभ करून घ्याल अशी मला आशा आहे.

पंढरपूर, ता. २९-५-५८

## सेवा हा सर्वोत्तम धर्म आहे : २८ :

[ सर्वोदय-संमेलन पंढरपूर येथील स्वयंसेवकांसमोरचें भाषण ]

भर्तृहरीचें एक वाक्य आहे कीं सेवा करणें हें योग्याला सुद्धां साधत नाही, इतकें तें कठिण आहे. पण असें म्हणून सेवाधर्म कांहीं टाळायचा नाहीं. तो इतका आवश्यक आहे कीं त्याच्याशिवाय व्यक्तीचा आणि समाजाचा विकास व्हायचा च नाहीं. सेवा हा सर्वोत्तम धर्म आहे. तो कठिण असला तरी साधावयाय पाहिजे.

तुम्ही स्वयंसेवक मंडळी कामामध्यें गुंतलां होतां आणि त्यामुळें संमेलनांतील व्याख्यानें ऐकण्याची संधि तुम्हांला मिळाली नाहीं. हा तुमचा त्याग फार मोठा आहे. ह्या त्यागाचें सेवाधर्मांत फार मोठें स्थान आहे. ज्या त्यागापासून मनुष्याला शांति लाभते तो च खरा त्याग अशी त्यागाची

व्याख्या आहे. त्यागामुळे अशांति लाभली तर तो त्याग च नाहीं. तुम्ही एका चांगल्या सेवाकार्यात मग्न झालां होतात. निष्काम सेवा करणारा मोक्षाचा अधिकारी होतो असें भगवंतांनीं म्हटलें आहे. समाजामधें कांहीं लोक सेवेंत मग्न असणारच त्याशिवाय समाजाचें चालायचें च नाहीं. स्त्रिया, वैश्य, शूद्र हे सगळे भक्तीनें मोक्षास जातील असें म्हणून च भगवतांनीं म्हटलें आहे. सेवेमधें मग्न असणारे हे च लोक आहेत. ह्याचा अर्थ अमक्या जातीचे अमुक सेवा करणारे, असा नव्हे. कांहीं कामें अशीं असतात कीं जीं रोज करावीं लागतात. उदाहरणार्थ भंग्याचें काम, स्वयंपाकाचें काम. स्वयंपाक रोज करावा लागतो पण स्वयंपाकाशिवाय चालू शकत असेल तर एखाद्या दिवशीं फराहार सुद्धां होऊं शकेल पण असें असलें तरी सुद्धां कांहीं माणसें सेवेमध्यें मग्न राहणार च. स्त्रिया नेहमीं सेवेंत मग्न राहिलेल्या असतात.

## स्त्रियांनीं ज्ञानी व्हावें

स्त्रियांना नेहमीं सेवा करावी लागते. त्याबरोबर त्या ज्ञानी हि बनतील तर त्यांचें कल्याण होईल, देशाचें हि कल्याण होईल. त्याच्या हातांत मुलें असतात म्हणून त्यांना ज्ञानी बनलें च पाहिजे. कांही स्त्रिया परम ज्ञानी हि असूं शकतात. पण कसें हि झालें तरी त्यांना सेवा ही करावी च लागते. त्यामुळें त्यांना वाचनादीसाठी वेळ मिळत नाहीं. त्यांना तशी सोय करून देणें पुरुष मंडळींचें काम आहे. तशी कुशल योजना केली पाहिजे. कांहीं योजना करून एक वेळचा संध्याकाळचा स्वयंपाक टाळतां आल्यास स्त्रियांना संधि मिळू शकते. स्त्रियांना श्रवणाची, ज्ञान संपादनाची संधि मिळाली तर त्यांचें कल्याण होईल. परंतु त्यांना ज्ञान जरी मिळालें नाहीं तरी सेवाभक्तीनें त्या तरतील आणि त्यांना मोक्ष मिळेल असें भगवान् म्हणतात. तसें च वैश्य काय किंवा शूद्र काय ते सेवेंत मग्न असतात, त्यांना ज्ञानाचीं साधनें उपलब्ध असून हि ते त्यांचा उपयोग करू शकतात च असें नाहीं, तरी हि त्यांच्या सेवेनें त्यांना मोक्ष मिळेल असें परमेश्वर म्हणतात. ह्याच्या उलट मोठे मोठे ज्ञानी असले तरी त्यांना मोक्ष मिळणार नाहीं. ज्ञान नसून केवळ भक्ति असली तरी मोक्ष मिळू शकतो असें गीतेंत भगवंतांनीं सांगितलें आहे.

## भक्तिशिवाय मोक्ष नाहीं

मोक्षाला वेदाभ्यास, तत्त्वज्ञान, कर्मकांड लागतें असें कांहीं नाहीं, पण मोक्षाला भक्ति मात्र जरूर लागते. हृदय भक्तीनें भिजावें च लागतें. आज सकाळीं माडगुळकरांचें गीतरामायण ऐकतांना शेंवटचें गाणें ऐकतां ऐकतां मी विरघळून गेलों. तें ऐकतांना माझें लक्ष रागाकडे नव्हतें की चालीकडे नव्हतें. माझें हृदय भक्तीनें भिजलें होतें. असें झालें नाहीं तर नुकसान होईल.

म्हणून सेवा करणें व भक्तीनें भिजणें हें च मोक्षाचें साधन आहे. कोठली हि सेवा हृदय द्रवून केली आणि निष्कामतेनें केली तर च मोक्ष मिळेल.

## सेवेशिवायचें ज्ञान उन्मत्त होतें

सेवेशिवाय जें ज्ञान असतें तें उन्मत्त होतें. महाभारतांत एक कथा आहे. युद्ध चालू असतांना कृष्ण आणि पांडव बसले होते. चर्चा चालली होती युद्ध थांबत कसें नाही. तेव्हां युधिष्ठिर अर्जुनाला म्हणाले, ' अरे अर्जुना ! एवढें मोठें तुझें गांडीव धनुष्य पण तें कांहीं हें युद्ध आवरूं शकत नाहीं, तेव्हां तुझ्या त्या गांडीवाची काय किंमत आहे?' तें ऐकतांच अर्जुन गांडीव उचलून युधिष्ठिराला मारावयास धांवला. ज्या युधिष्ठिरानें जन्मभर अर्जुनाला शिकविलें त्याच्यावर च प्रहार करायला तो धांवला. तेव्हां त्याला कृष्णानें अडविलें आणि विचारलें हें तूं काय करीत आहेस ? तेव्हां अर्जुन म्हणाला जो माझ्या गांडीवाची निंदा करील त्याचें डोकें या गांडीवानें च उडवायचें अशी माझी प्रतिज्ञा आहे. तेव्हां श्रीकृष्ण म्हणाले, "तूं वृद्धांची सेवा केली नाहींस म्हणून असा उपटसुंभासारखा वागतोस. तूं वृद्धांची सेवा केली असतीस तर तुझ्यांत नम्रता आली असती. युधिष्ठिरानें जें म्हटलें तें तुझा पाणउतारा करण्यासाठीं म्हटलें नाहीं तर तुला उत्साह देण्यासाठीं म्हटलें."

म्हणून केवळ ज्ञान असून भागत नाहीं. तें ज्ञान सेवा करून मिळवलें पाहिजे. सेवेशिवायचें ज्ञान पचत हि नाहीं, तें ज्ञान रुक्ष होतें.

तुम्ही मंडळी सेवेंत होतां, त्यामुळें तुम्हांला संमेलनांतील भाषणें ऐकायला मिळालीं नाहींत, ऐकण्याचा मोह टाळून तुम्ही आपल्या सेवेंत तन्मय

राहिलांत म्हणून आतां शेंवटीं तरी तुम्हांला गोड भात घालायला हवा त्यासाठीं मुद्दाम मी तुमच्या जवळ आलों.

माझ्या मित्रांनो, मीं हे सांगितलेले थोडेसे शब्द तुम्ही लक्षांत ठेवाल तर तुम्हांला ते जन्मभर उपयोगी पडतील, आणि संमेलनांतील भाषणें ऐकलीं नाहींत त्यामुळें तुमचें फार नुकसान झालें असें म्हणतां येणार नाहीं.

पंढरपूर ता. २-६-५८

## " अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव " : २९ :

आतां आम्ही पंढरपूरहून आलों आहोंत. हें तुमचें गांव म्हणजे पंढरपूरचाच एक भाग आहे. तुम्ही नेहमीं च पंढरपूरला जात असाल. कुणाला कांहीं वैताग आला कीं चालला विठोबाकडे. नुकतेच साऱ्या हिंदुस्थानांतून ५-२५ हजार लोक दूरदूरहून तिथें आले होते, व त्यांनीं विठोबाचें दर्शन घेतलें. यापूर्वीं दूरदूरच्या प्रांतांतून एखाद दुसरा यात्रेकरू पंढरीला आला असेल पण इतक्या मोठ्या संख्येनें इतक्या दूरदूरचे लोक यापूर्वीं इथें कधीं आले नसतील. या वेळीं विठोबाचें दर्शन घेणाऱ्यांत हरिजन तर होतेच पण बौद्ध, जैन, ख्रिस्ती, मुसलमान, पारसी इत्यादि सर्व धर्मांचे लोक होते. असा तिथें एक फार मोठा सुखसोहळा झाला.

### एकाच भगवंताचीं अनेक नांवें

आतां यांतून तुम्ही आम्ही काय शिकायचें आहे ? देव बाटला असें का म्हणायचें ? निरनिराळ्या धर्मांत अनेक भक्त होऊन गेले. कोणी गुडघे टेकून देवाची प्रार्थना केली, कोणी उभ्या उभ्या केली, कोणी आसन मांडी घालून केली, कोणी प्रदक्षिणा घालून केली म्हणून हे एकमेकांचे दुष्मन झाले काय ? सगळ्यांनीं देवाची च प्रार्थना केली ना ? कोणी देवाला विठ्ठल नांव दिलें कोणी अल्ला दिलें तर कोणी गॉड म्हटलें. पण हीं सगळीं देवाचीं च नांवें ना ? तेव्हां अशी सगळी भक्त मंडळी भेदभाव

विसरून एकत्र झाली म्हणजे देवाला फार आनंद होतो. एका साधारण माणसाला जर अनेक नांवें असतात तर देवाचीं अनेक नांवें कां असूं नयेत ? मुलगा बापाला बाबा म्हणतो तर नोकर बाबूजी म्हणतो. मित्र गोविंदराव म्हणेल तर पुतण्या काका व भाचा मामा म्हणेल. एकाच माणसाला अनेक नात्यांमुळें अनेक नांवें मिळतात, मग भगवंताला अनेक नांवें कां नसणार ? म्हणून देवाच्या नांवानें भांडणें, पक्षभेद, झगडे वगैरे करणें हें अगदीं परम पाप आहे.

## ‘उंच नीच कांहीं नेणे भगवंत’

आपणांत कोणी कमी अधिक पुण्यवान असतील पण देवापुढें आपण सगळे पापी च आहोंत. रात्रीं चमकणाऱ्या ताऱ्यांत एकाची चमक दुसऱ्यापेक्षां जास्त असते, पण दिवसां सूर्यासमोर सगळे सारखे. तुकारामानें म्हटलें आहे “ **पतित पतित परि मी त्रीवाचा पतित** ” आतां तुमच्यापेक्षां व विनोबापेक्षां का तुकाराम जास्त पतित होते ? पण मी पतित असें जें त्यांनीं म्हटलें तें देवासमोर म्हटलें. तो परमात्मा केवढा पावन, ज्ञानमय, पुण्यमय, प्रेममय आणि त्याच्यासमोर तुम्ही आम्ही क्षुद्र जीव म्हणजे कांहीं च नाहीं. तेव्हां मी मोठा, तो लहान. हा हरिजन तो ब्राह्मण. हा सोवळा तो ओवळा अशी भाषा देवासमोर चालेल का ? म्हणून ईश्वरापाशीं अभेद शिकला च पाहिजे. त्या जागीं जर आम्हीं भेद काढला तर आम्ही भेदासुर च वाढविला. मग आम्ही परमेश्वराचे भक्त राहिलों नाहीं. म्हणून आतां आपण सर्वांनीं भेदभाव विसरून प्रेमानें रहायला शिकलें पाहिजें “ **उंच नीच कांहीं नेणे भगवंत** ” जी गोष्ट ईश्वर जाणत च नाहीं ती दुसरे जाणूं लागले तर त्यांना काय म्हणायचें !

## संतांची दृष्टि

एकनाथांनीं एका अभंगांत परमेश्वराचें वर्णन करतांना म्हटलें आहे

**“ निवृत्ति शोभे मुकुटाकार । ज्ञान सोपान वटेश्वर**
**विठू पंढरीचे राणे । त्याले भक्तांचीं भूषणें**
**गळां शोभे वैजयंती । तिसी मुक्ताई म्हणती**

अखंड शोभे माझ्या बापा । पदकीं जो नामा शिपा

कासे कसिला पीतांबर । तो हा जाणावा कबीर–

देवाभोंवतींचा पीतांबर म्हणजे कबीर. म्हणजे एका मुसलमानाला देवा-भोंवतीं गुंडाळून टाकाला,––

चरणीं वीट निर्मळ। तो हा झाला चोखामेळ–

आणि एकनाथ कोठें आहे ?–

चरणांतळील उर्ध्व रेखा झाला जनार्दन एका"

भगवंत ज्यावर उभे ती वीट म्हणजे चोखामेळा आणि वीट व भगवंताचे चरणाखालील झांकलेली रेखा म्हणजे एकनाथ. चोखामेळा हा महार व एकनाथ ब्राह्मण पण मी चोखामेळ्याच्या हि खालचा आहें, असें एकनाथ म्हणतात. ज्ञानदेवांनीं एका अभंगांत म्हटलें आहे,–

"वाराणासी-यात्रे जाईन । प्रयाग-तीर्थ पाहीन ।

त्रिवेणिये स्नान करीन । परि मी वीट नव्हेन ।।

विठोबापाईंची वीट । मी कईं बा होईन"

वाराणसी, प्रयाग आदि तीर्थांना मी जाईन पण विठोबाच्या पायाखालची वीट मी केव्हां होईन अशी त्यांना तळमळ आहे. आपल्यांतले मोठ्यांतले मोठे ज्ञानशिरोमणी ज्ञानेश्वर त्यांना पायाखालची वीट बनण्याचें भाग्य केव्हां लाभेल अशी तळमळ आणि आम्ही म्हणतों की, 'आम्ही उंच आहोंत, आम्हांला मंदिरांत जाण्याचा अधिकार, दुसऱ्यांना तो अधिकार नाहीं,' हें आम्हांला शोभतें काय ? पण आजपर्यंत आम्ही हें महापाप करीत आलों आहोंत, त्यामुळें हिंदुधर्माचे अगदीं धिडवडे निघाले आहेत, हिंदुधर्म या जातिभेदामुळें अगदीं खिळखिळा झाला आहे. परमेश्वराच्या नांवानें सर्वांनीं एकत्र खायचें, प्यायचें, नाचायचें ही गोष्ट च आतां राहिली नाहीं आणि शिवाशिवी जातिभेद, सोवळे ओवळे यांचा नुसता बुजबुजाट झाला.

## पंढरपूरचा विशेष : देवाला आलिंगून भेट

या सामाजिक भेदाबरोबर दुसरे आर्थिक भेद हि वाढत आहेत. आपण चोरी हें पाप समजतों, पण संग्रह करणाऱ्याचा सन्मान करतों. वास्तविक

संग्रह करणारा हा चोराचा बाप आहे, तो तर चोराला जन्म देतो. बारकीशी चोरी जर पाप तर एवढ्या मोठ्या संग्रहाला महापाप समजलें पाहिजे. पण आमच्याकडे कोठें कांहीं विवेकाला स्थान च नाहीं! कीर्तनांत देखील आम्ही श्रीमंताला पुढें बसविणार. मुसलमानांच्या जुम्मा मशीदींत औरंगजेब बादशाह जर थोडा मागून आला तर तो सर्वांच्या मागें बसायचा. तिथें काहीं भेद नाहीं. ज्याला जिथें जागा मिळाली तिथें तो बसला.

पंढरपूरला असें च आहे. तिथें पांडुरंगाच्या मंदिरांत कोणी हि जावें व देवाला आलिंगन द्यावें. दुसरीकडे देवाला दुरून नमस्कार करतात. अरे, दुरून नमस्कार तर दुर्जनाला करायचा असतो. भगवंताला दुरून नमस्कार करता आणि बायकापोरांना कवटाळता. कवटाळायचें असेल तर देवाला कवटाळा व इतरांपासून सावध रहा. देवाला आलिंगन द्यायचे, एकमेकांच्या पायां पडायचे ही पंढरपूरची रीत आहे. दुसरीकडे अशी रीत नाहीं. हा साम्ययोगी भगवान आहे ही गोष्ट आम्ही विसरलों आणि नाना भेद उभे केले.

## भेदरूपी पशूला यज्ञांत मारा

ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे कीं यज्ञांत बोकड कां मारतां? भेदरूपी पशूला च मारा. पण आम्ही लोकांनीं देवाच्या आवडी निवडी ठरविल्या आणि कोणाला बकरा तर कोणाला कोंबडा द्यायचें ठरविलें. मरीआई, जोखी अशा सगळ्या देवता उभ्या केल्या. अरे, देवच बकरा आणि कोंबडा निर्माण करतो तेव्हां आपल्या च मुलाला खाणारी आई कधीं असते काय? म्हणून हा सगळा मिथ्या देवाचा बाजार भरला आहे त्याला काढून टाका आणि एकाच आत्मारामाला भजा. सारे भेदभाव विसरून प्रेमानें रहायला शिका

तुंगत (सोलापूर), ४-६-५८

## सोलापूर संगमस्थान आहे

तुमच्या या नगरीमध्यें मी यापूर्वी कधीं हि आलों नव्हतों. आज भूदानयात्रेमध्यें मला तुमच्या नगरीचें दर्शन झालें याचा मला फार आनंद होत आहे. सोलापूर हें एक संगमस्थान आहे. आपल्या देशांत सगळीकडे संगमस्थानें फार पवित्र मानलीं जातात. सोलापुरांत मराठी व कानडी भाषांचा संगम आहे, लिंगायत आणि जैन समाज यांचा संगम आहे. कारखानदार आणि मजूर विणकर यांचा संगम आहे. अशा या मोठ्या संगमस्थानांतील लोकांच्या चित्तांत संकुचितपणा असूं च शकत नाहीं, व्यापक च विचार असायचा. म्हणून बसवेश्वरानें देवाला ‘ कूडळ संगम देवा ’ म्हटलें. ज्या ठिकाणीं संगम असतो तिथें देव राहतो. हा माझ्यासमोर बसलेला एवढा मोठा समुदाय हा च कूडळसंगम आहे. इतके सगळे अनेक धंद्यांचे धर्मांचे, भाषांचे, लोक इथें एकवटले ही च देवता आहे. याला च आपल्या भाषेंत ‘ नारायण ’ म्हणतात. नारायण म्हणजे नरांचा समूह.

## दोष म्हणजे संस्कृति नव्हे

मी या शहरांत आलों तेव्हां लोकांनीं मला येथील हुतात्म्यांचें स्मारक दाखविलें. जगांत असंख्य माणसें जन्मतात आणि मरतात जन्माला आलेलीं सगळीं मरतात च. पण कांहीं माणसें समाज-कार्यासाठीं आपलें बलिदान देतात. अशांचें स्मरण समाज नेहमी करीत असतो. अशा रीतीनें देशाच्या इतिहासांत त्याग, पराक्रम, प्रेम, करुणा तपस्या इत्यादि गोष्टी लोकांच्या स्मरणांत जमा होतात आणि त्यांतून च देशाची संस्कृति बनते. आमच्यांत अनेक दोष आहेत पण ते दोष म्हणजे संस्कृति नव्हे. आमच्या पूर्वजांनीं ज्या चांगल्या गोष्टी आमच्या स्मरणासाठीं ठेवल्या, त्यांचें स्मरण ही च आमची संस्कृति. पंढरपूर, तुळजापूर, गुलबर्गा इत्यादि स्थानें तुमच्या चारी बाजूला आहेत. त्यामुळें तुमच्या सोलापूर जिल्ह्याला फार मोठी संस्कृति लाभली आहे.

## पहिला नमस्कार मजुरांना

इथें आल्यानंतर पहिला नमस्कार, ज्यांनीं हें शहर वसविलें त्या मजुरांना आहे. देशाच्या आणि सबंध मानवसमाजाच्या शिरावर जास्तींत जास्त ऋण कोणाचें असेल तर तें मजुरांचें आहे. ते शरीरपरीश्रम करतात, निढळाचा घाम गाळून लक्ष्मी उत्पन्न करतात, इतरांना जेवायला घालतात. ते आम्हांला मातापित्यांसमान आहेत. सोलापुरांत आल्यावर स्वाभाविक च मजुरांची प्रथम आठवण होते. मुंबई अहमदाबाद, कानपूर, नागपूर, कोइमतूर अशा शहरांत सगळचांत जास्त उपकार मजुरांचा आहे. हें लक्षांत घेऊन आम्हा सर्वांची सहानुभूति मजुरांकडे असली पाहिजे. त्यांचें जीवन चांगलें व्हावें, त्यांना सुख लाभावें आणि नंतर च आम्हांला तें मिळावें, अशी आम्हा लोकांची बुद्धि असली पाहिजे.

## तटस्थ सज्जनांची मध्यस्थी म्हणजे सर्वोदय विचार

इथें गिरण्या बंद पडत आहेत व मजूर बेकार होत आहेत हें ऐकून मला वाईट वाटलें. मीं या प्रश्नाचा अभ्यास केला नाहीं त्यामुळें मालकांची काय बाजू आहे तें मला माहीत नाहीं. त्यांच्या हि कांही अडचणी असतील. मालक, मजूर, सरकार असा त्रिकोण बनला आहे. तेव्हां मजुरांच्या समस्या सुटायच्या म्हणजे या तिहींमध्यें प्रेमभाव असला पाहिजे. अलीकडे लोक समजतात कीं संघर्ष करून प्रगति होईल. पण हिंदुस्थानला हा विचार लाभाचा नाहीं. कारण झगडा ही गोष्ट जर मान्य झाली तर हिंदुस्थानांत झगड्याला अंत च राहणार नाहीं. जाती, धर्म, पंथ, भाषा, पक्ष इत्यादि अनेक झगडे सुरू होतील. हिंदुस्थानांत प्रश्न हि अनेक आहेत, भेद हि अनेक आहेत, आणि देश हि मोठा आहे. हिंदुस्थानांत सगळचांत मोठी अडचणीची गोष्ट म्हणजे इथें आमच्या लोकांना पुरेसें अन्न नाहीं, धान्य बाहेरून मागवावें लागते. अशा स्थितीत झगडा करून प्रगति होते असें ज्यांनीं मानलें त्यांना हिंदुस्थानच्या परिस्थितीचा कांहीं अंदाज च लागला नाहीं असें म्हणावें लागेल. म्हणून इथें सगळ्या समस्यांचा परिहार प्रेमानें च झाला पाहिजे व तो होईल असा मला विश्वास वाटतो. मजूर व मालकांनीं आपापल्या अडचणी मांडून त्यांचा निकाल देण्याचें काम एखाद्या सज्जन, तटस्थ, निर्विकार व्यक्तीवर

सोंपवावें, व तो जो निर्णय देईल तो मान्य करावा. असे तटस्थ सज्जन देशांत नाहींत च असें म्हणणें म्हणजे आपला देश रावणाच्या लंकेहून हि भयंकर आहे असें मानावें लागेल. कारण लंकेंत सुद्धां एक बिभीषण होता. तेव्हां असे जे सज्जन असतील त्यांना हुडकून काढावें, आणि देशांत निर्माण होणारे कठिण प्रश्न आपण त्यांच्यासमोर मांडावेत. परमेश्वरकृपेनें असे निर्विकार पुरुष आज हि आपल्या देशांत आहेत. अशा रीतीनें सज्जनांच्या मध्यस्थीनें प्रश्न सोडविण्याच्या विचाराला च सर्वोदय विचार म्हणतात.

## सर्वोदय म्हणजे सर्वांचें भलें

सर्वोदय म्हणजे सगळ्यांचें भलें. युरोपांत जास्तींत जास्त लोकांचें जास्तींत जास्त हित हा एक विचार निघाला. त्यांत कमी लोकांच्या हिताचा त्याग करावा लागला तरी पर्वा नाहीं. पण आपल्याकडे '**सर्वभूतहिते रताः**' असें म्हटलें जातें. याचें नांव सर्वोदय. सर्वोदयांत एका माणसाची अडचण, ही सर्वांची अडचण मानली जाईल. अगदीं लहानांतल्या लहान माणसाला हि असें वाटेल कीं या देशांत माझ्यावर अन्याय होणार नाहीं, व या देशावर माझा तितका च अधिकार आहे जितका मोठ्यांचा आहे सर्वोदयाचीं दोन मुख्य तत्त्वें आहेत. (१) प्रत्येकानें आपली सेवा समाजाला अर्पण करावी आणि (२) समाजाकडून प्रत्येकाला समान रक्षण व विकासाची समान संधि मिळावी.

समाज व व्यक्ति यांचा कधी हि झगडा होऊं शकत नाहीं. कारण त्यांचें नातें शरीर व अवयव याप्रमाणें असतें. शरीरापासून कापलेला हात कांहीं च काम करूं शकणार नाहीं, तर हातावांचून शरीराचें चालणार नाहीं. अवयव देहापासून अलग केले तर त्यांच्यांत शक्ति राहणार नाहीं. कापून वेगळी केलेली जीभ बोलूं शकणार नाहीं, कान ऐकूं शकणार नाहींत. म्हणून सर्वोदयांत प्रत्येकजण आपल्याजवळ जमीन, धन, शरीरपरिश्रम करण्याची शक्ति, बुद्धि, प्रेम या पंचविध शक्तींपैकीं जें कांहीं असेल तें समाजाला, नारायणाला, कूडळसंगमदेवाला अर्पण करील व समाजाकडून प्रत्येक व्यक्तीला समान शिक्षण, रक्षण, पोषण व विकासाची संधि मिळेल

## निष्पक्ष, निर्वैर आणि निर्भय सेवकांची गरज

हा सर्वोदय-विचार सतत सात वर्षें पायपिटी करून सांगत सांगत आज मी तुमच्या नगरींत येऊन पोंचलों आहे. मी इथून उद्यां निघून गेल्यावर मागें कोणी काम च केलें नाहीं तर आजचा उत्साह म्हणजे अंधारांत वीज चमकल्यासारखा होईल. विनोबाची वावटळ आली आणि गेली, पण या सोलापूरच्या पदरांत कांहीं च पडलें नाहीं असें होईल. म्हणून इथें कार्यकर्ते मिळाले पाहिजेत. एवढ्या मोठ्या नगरांतून शें-दोनशें कार्यकर्ते जिल्हा व नगराच्या सेवेसाठीं मिळणें कठिण कां जावें? जात, गोत, पंथ, पक्ष, धर्म भाषा आदि कांही हि न पाहतां फक्त माणसाचें दुःख पाहून त्यांची निरंतर सेवा करणाऱ्याची एक सेना इथें उभारली गेली पाहिजे.

काल इथले व्यापारी मला भेटले तेव्हां मीं त्यांना हें च सांगितलें कीं देशांत ५० लाख एकर जमीन आणि चार हजार ग्रामदानें मिळालीं. मी सात वर्षांपासून ओरडून राहिलों आहे. एवढें दानकार्य चाललें असतांना आतां तुम्ही आपला वांटा उचला व हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांच्या हातून स्वतंत्र जनशक्ति निर्माण करण्याचें काम होत आहे, असें दिसूं द्या म्हणजे व्यापाऱ्यांना प्रतिष्ठा मिळेल. निष्पक्ष, निर्वैर आणि निर्भय अशा सेवकांची सेना उभारायची आहे. माझें मागणें थोडें च आहे, '**मागणें लई नाहीं लई नाहीं**.' १२ लाखाच्या सोलापूर जिल्ह्याकरतां दोन अडीचशें सेवक मिळणें कठिण कां वाटावें?

हिंदुस्थानांत प्रेम, भक्ति, धर्म आहे पण तो एकवटला पाहिजे. मी सहाव्या हिश्याचें दान मागतों तेव्हां पुष्कळ व्यापारी मला म्हणतात कीं, 'आम्ही तर या पेक्षां किती तरी अधिक दान देत असतों. तेव्हां तुमची मागणी फार च अल्प आहे.' मी त्यांना म्हणतों कीं तुमचें तें सर्व दान एकवटून द्या म्हणजे त्यांतून शक्ति निर्माण होईल. आपल्याला हिंदुस्थानांत जनशक्ति निर्माण करावयाची आहे, व देशाच्या अंतर्गत कारभारांत पोलिस व लष्कर यांचें काम च पडत नाहीं असें दाखवायचें आहे. मग परकीय हल्ल्यापासून रक्षण करण्याकरतां जी काय सेना लागायची ती लागूं देत, पण अंतर्गत रक्षण आमचे स्वयंसेवक करतील. ते सेवक निरंतर सेवा करतील,

शरीरपरीश्रमनिष्ठ असतील, कुठें हि भांडण झालें तर मधें पडून स्नेह ओततील, असें झालें पाहिजे.

म्हणून मला वाटतें कीं येथील व्यापाऱ्यांना हें शांतिसेनेचें महान् कार्य करणें शक्य आहे. किरकोळ गोष्टींत लक्ष घालून भारतासारखा मोठा देश कसा टिकणार ? तसेंच केवळ सरकारच्या शक्तीवर अवलंबून निभाव कसा लागणार ? सरकार म्हणजे पोहरा आहे आणि जनता विहीर आहे. जनतेची एवढी प्रचंड शक्ति आहे कीं त्याचा हिशेब च नाहीं. आतांपर्यंत आम्हांला ६ लाख कुटुंबांकडून दान मिळालें आहे. पण आम्हांला देशाच्या सर्व सहा कोटि कुटुंबांकडून दान हवें आहे. तेवढें मिळालें तर भारतांत प्रचंड शक्ति निर्माण होईल. त्या शक्तीनें च भारत प्रगति करील.

## पंचवार्षिक योजना म्हणजे एका महिन्याचा साबणाचा खर्च

पंढरपूरला एका मठांत सहस्रकोटि नामजपाचा ढीग पाहिला. तो पाहून मीं हिशोब केला कीं ३७ कोटि लोकांनीं प्रत्येकी ३० नामें घेतलीं तर सहस्रकोटि होतील. त्याला फक्त पाव मिनिट वेळ लागेल. म्हणजे सबंध हिंदुस्थाननें पाव मिनिट नामस्मरण केलें तर सहस्रकोटि जप होईल. आम्हांला तर असें हवें की साऱ्या समाजानें चोवीस घंटे नामस्मरण करावें. अशी भक्तीची भावना निर्माण झाली तर फार मोठी शक्ति निर्माण होईल.

सरकारची एवढी मोठी पंचवार्षिक योजना म्हणजे ४८०० कोटि रुपये पांच वर्षांत खर्च करण्याची योजना. याचा अर्थ प्रत्येक माणसामागें महिन्याकाठीं अडीच रुपये खर्च ! त्यांत च रस्ते, शाळा, कालवे, शेतीसुधारणा, कारखाने इत्यादि सर्व होणार. इथें तर आमच्या यात्रेंतील मुलींना कपड्याच्या साबणाला च मुळीं अडीच रुपये लागतात. म्हणजे या मुलींच्या साबणाचें प्लॅनिंग सबंध फाइव इयर प्लॅनइतकें आहे, अन् तेवढ्यांत हि सरकारचें गाडें अडलें आहे कीं हा पैसा आणायचा कुठून ! पण हें लक्षांत घ्या की पैसा म्हणजे परिश्रम. प्रत्येक माणसानें महिन्यांतील वीस दिवस रोज एक तास श्रम करून तो देशाला अर्पण केला तर अडीच रुपयांचा

महिन्याचा श्रम झाला. पण हें सगळें केव्हां होणार? जेव्हां संकल्प-शक्ति प्रकट होईल तेव्हां.

तुम्ही आपल्या डोळ्यांदेखत पाहिलें कीं रावणापेक्षां हि शक्तिशाली असा इंग्रज ज्यानें जर्मनीला हरविलें त्याला आम्ही 'चलेजाव' म्हटलें. आणि सामुहिक संकल्प-शक्ति प्रगट झाली तेव्हां त्याला इथून जावें च लागलें. तेव्हां आतां तुम्ही असा संकल्प करा कीं आम्ही सबंध भारतांत ग्रामस्वराज्याची स्थापना करणार, स्वावलंबी व सहयोगी समाज बनविणार, त्यासाठीं श्रीमंत सहाव्या हिश्याचें, गरीब रुपयांत एक नयापैशाचें दान करील, देशांत शांतिसेना उभी करूं. म्हणजे तुमच्या लक्षांत येईल कीं पांच वर्षांत भारताचा रंग च पालटला आहे व भारतीय आत्मा विश्वासानें आपलें कार्य करायला समर्थ झाला आहे.

## ऑस्ट्रेलियाकडून अपेक्षा

भारताकडून आपल्याला कांहीं संदेश मिळेल या आशेनें आज जग भारताकडे पहात आहे. नाना देशांतले लोक गांधींच्या देशांत काय होतें तें पाहूं या, म्हणून इथें निरीक्षण करण्याला येतात आणि त्यांना थोडें जरी पहायला सांपडलें तरी आनंद होतो. आज च आमच्या यात्रेंत ७-८ दिवसांपासून असलेले एक ऑस्ट्रेलियन बंधु म्हणाले कीं 'तुमचें हें काम फार चांगलें आहे. मी आपल्या देशांत जाऊन हें काम करीन.' त्यांनीं मला विचारलें कीं 'ऑस्ट्रेलियांतून या कार्याला मदत म्हणून कांहीं पैसे पाठवूं का?' तेव्हां मीं म्हटलें, आम्हांला पैसा नको. त्यावर त्यानें विचारलें 'मग मी आपल्या कार्याला कोणत्या प्रकारें मदत करूं?' यावर मी म्हणालों, तुम्ही ऑस्ट्रेलियांत जाऊन प्रेमाचा संदेश द्या व तेथील लोकांना सांगा कीं जमीन सगळ्यांची आहे. ऑस्ट्रेलियांत जमीन भरपूर आहे. आज तिथें जेवढीं माणसें आहेत त्या पेक्षां ५० पट अधिक माणसें तेथें राहूं शकतात. जपानजवळ जमीन फार कमी आहे म्हणून 'जपानी मित्रांनो यारे या आम्ही तुम्हांला ऑस्ट्रेलियांत जमीन देतों'– असें म्हणण्याकरतां ऑस्ट्रेलियन लोकांची तयारी करा. यावर ते म्हणाले कीं 'तिथें मी असें बोलायला गेलों तर आज ऑस्ट्रेलियाचे लोक मुळींच ऐकणार नाहींत.'

पण हिंदुस्थानांत तर ही लहान लहान मुलें देखील 'जय जगत्' म्हणत आहेत. हिंदुस्थानांतल्या मुलांना देखील वाटतें कीं साऱ्या जगावर प्रेम करावें. सारा मानव-परिवार एक आहे हें आमच्या पूर्वजांनीं आम्हांला शिकविलें आहे. मला हें सांगायला अभिमान वाटतो कीं जगाचा पहिला ग्रंथ जो वेद तो इथें जन्मास आला, व त्या दहा हजार वर्षांच्या जुन्या ग्रंथांत 'विश्वमानुष' हा शब्द आला आहे. त्यामुळें विश्वमानुष निर्माण करायचा आहे ही कल्पना आमच्या मुलाबाळांना चट्कन् पटते.

तो ऑस्ट्रेलियन म्हणाला कीं 'ऑस्ट्रेलियांतील लोकांना एकदम हा विचार पटणार नाहीं पण मी त्यांना प्रेमाच्या व तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगून हळू हळू सुरुवात करेन.' मीं त्याला म्हटलें ठीक आहे, सुरुवात कर. पण शेंवटीं सर्व देशांची आपल्याला इतकी तयारी करायची आहे कीं जगांत कुठें हि, रंजले गांजलेले लोक असतील ते आमचे प्राणसखे आहेत, अशी भावना निर्माण व्हावी.

आजपर्यंत इथें ६ कोटि पैकीं ६ लाख-कुटुंबांनींच दान दिलें आहे तरी हि जगाला याविषयीं आशा वाटूं लागली आहे. जगाची नजर हिंदुस्थानकडे लागली आहे तेव्हां. तुम्ही सोलापूरचे लोक या कार्याचा झेंडा हातीं घ्या व आपल्याला नवीन धर्मचक्र-प्रवर्तन करावयाचें आहे अशा भावनेनें कामाला लागा.

सोलापूर,
ता. ८-६-५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत.
अनुक्रम 35725 वि: निबंध
क्रमांक ........ नों: दि: 20.12.63

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ९५८५

REFBK-0009785